स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. २१९६
९८८२



चं. गु. जोशी


जीवनाचा नवा विचार

(कृष्णमूर्तीच्या दृष्टीकोनातून)

REFBK-0018453

मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई
८८३५१ निबंध
२१८८ २।१०।७२

७९३५९ निबंध
१७०७ २९६



REFBK-0018453

जीवनाचा नवा विचार

(कृष्णमूर्तींच्या दृष्टीकोनातून)

प्रकाशक :
मनोहर यशवंत जोशी, B A., B.Com.
प्रसाद प्रकाशन
१८९२ सदाशिव, पुणे ३०

••

प्रकाशन
जून १९७२

••

©

••

किंमत १२ रुपये

••


मुद्रक :
र. भ. निगुडकर
प्रकाश मुद्रणालय
३९५।४ सदाशिव, पुणे ३०

अनुक्रमणिका

आम्हांला परमार्थ कां साधत नाहीं ?	१
माणसें त्रस्त कशानें होतात ?	१०
पुनरावृत्तीचा शाप	१७
काळजी	२६
चिंतन म्हणजे काय व त्याची वेळ कोणती ?	३८
कर्मयोगाचा अर्थ तरी काय असावा ?	४५
समस्या आणि संघर्ष	५३
मौनाचा अर्थ तरी काय असावा ?	६१
सत्य कोणतें व साधन म्हणजे काय ? (पूर्वार्ध)	७१
सत्य कोणतें व साधन म्हणजे काय ? (उत्तरार्ध)	७८
एकलेपणा	८६
बुद्धि ही वैरीण तर नसेल ?	९७

अखंड सावधानता म्हणजे काय ? (पूर्वार्ध) १०६
अखंड सावधानता म्हणजे काय ? (उत्तरार्ध) ११९
यंदा कृष्णमूर्ति असे कां बोलले ? १२९
नवा मानव आणि जगहि नवें १३८
मनाचें वार्धक्य (पूर्वार्ध) १५१
मनाचें वार्धक्य (उत्तरार्ध) १५९
भीति हें सुखलालसेचेंच दुसरें नांव आहे काय ? १६८
स्मृति ही मैत्रीण कां वैरीण ? १७७
कुठें चूक झाली कुणास ठाऊक ? १८७
मनांत क्रांति कां होत नाहीं ? १९५
राग २०२
सुख म्हणजे तरी काय ? २१४
एकूण सारांश काय ? २२३

५६३५१ निबंध
२१९६ २१।१०।५२



एक

आम्हांला परमार्थ कां साधत नाहीं ?

शाळेंत असतांना आमच्या एका शिक्षकांनीं, नेमलेल्या नाटकांत रसपरिपोष कोठें व कसा झाला आहे हें अजीबात न सांगतां, सगळा तास नाटक कसें पाहावें हें सांगण्यांतच घालविला, इतकें महत्त्व त्यांना त्या विषयाचें वाटत होतें. त्यावेळीं मला तो औचित्यभंग वाटला, पण आता केव्हां केव्हां असें वाटूं लागतें कीं, नाटकाचें अथवा इतर कोणत्याहि ग्रंथाचें मर्मग्रहण नीट व्हावें अशी इच्छा असेल तर, आपल्या स्वतःच्या मनोभूमिकेकडेच प्रथम लक्ष दिलें पाहिजे. परमार्थ ग्रंथांचा अर्थ समजून घेण्याच्या बाबतींत तर वरील पूर्वअट (pre-condition) फारच महत्त्वाची आहे, असें दिसतें.

'पालथ्या घागरीवर पाणी' अशी एक जुनी म्हण आहे. कितीहि पाणी ओता, जर घागर उपडी असेल तर आंत थेंबहि शिरायचा नाहीं, हें सहज समजूं शकतें. पण डोळे व कान उघडे ठेवून जे ग्रंथ आम्ही वाचतों अथवा त्यांचें निरूपण ऐकतों, त्यांचा कांहींच अर्थ आमच्या मनांत कां मुरत नाहीं, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर जर आपणांला सांपडलें, तर कितीतरी इतर समस्या सुटण्याच्या मार्गाला लागतील. हा प्रश्न जितका जिव्हाळ्याचा तितकाच व्यापक आहे. शहाणे लोक जें सांगतात तें इतरांनी (व बऱ्याच वेळां त्या खुद्द शहाण्यांनीं) आचरणांत न आणल्यामुळेंच जगातलीं दुःखें आजपर्यंत उत्पन्न

झालीं आहेत. सर्वच क्षेत्रांत सांगणारांची वाण पडलेली नाहीं. ऐकणारेहि असतात किंवा गोळा करतां येतात; परंतु जें सांगितलें जातें त्याचें प्रत्यक्ष आचरणांत रूपांतर कां होत नाहीं, हा एकच प्रश्न प्रथमपासून आतांपर्यंत अनुत्तरित राहिला आहे.

मानवी जीवनाचें खरें स्वरूप काय आहे, हें सांगणारे जे ग्रंथ अथवा इतर प्रकारचें वाङ्मय आहे, त्या सर्व वाङ्मयाला परमार्थग्रंथ अशी संज्ञा आपण देऊं. अशा परमार्थग्रंथांचा अभ्यास करणारा अथवा परमार्थविषयावरची व्याख्यानें, प्रवचनें, वगैरे नियमानें ऐकणारा एक मोठा वर्ग प्रत्येक देशांत व समाजांत आहे. हा वर्ग असावयास पाहिजे तेवढा मोठा नाहीं, अशी तक्रार कांहींजणांची आहे. परंतु तो विषय बाजूला ठेवून आज आपण एवढा विचार करूं कीं, जो वर्ग या विषयांत रस घेतो त्या वर्गावर तरी, परमार्थग्रंथांचा अथवा परमार्थावरील व्याख्यानांचा कांहीं परिणाम होत आहे किंवा नाहीं ? आणि जर होत असला तर तो कोणत्या प्रकारचा होत आहे ?

हा विचार करण्याचें कारण एवढेंच कीं, परमार्थप्रतिपादनाचा इष्ट हेतु कां साध्य होत नाहीं हें पाहतां पाहतां, कदाचित् परमार्थज्ञानाचे खरें स्वरूप काय असावें, यावर अधिक प्रकाश पडेल.

परमार्थावरचे एखादें व्याख्यान अथवा प्रवचन ऐकत असतांना, श्रोतृवर्ग इतका रंगून गेलेला दिसतो कीं, वक्त्याच्या मनांत बरीच आशा उत्पन्न होते. पण तें ऐकत असतांना आपल्या मनांत नक्की काय चाललेलें असतें, हें पाहणें मोठें उद्बोधक आहे. कांहीं वेळां वक्त्याच्या शब्दांचें सौंदर्य आपल्या मनावर मोहिनी टाकतें. हें सौंदर्य दोन प्रकारचें असतें. शब्द उच्चारतांना त्यांचा जो नाद कानीं पडतो तो कित्येकदां इतका मधुर असतो कीं, सारखें ऐकत राहावेंसें वाटतें. पद्यरचनेंत, तसेंच गद्यभाषणांतहि हें नादमाधुर्य सारखेंच असूं शकतें. या नाद-माधुर्याला लुब्ध होऊन आपण पुन्हां पुन्हां ती प्रवचनें ऐकूं पाहतों; व अशी समजूत करून घेतों कीं, परमार्थाच्या साधनेकरतां हे कष्ट चालले आहेत ! या नादमाधुर्याच्या जोडीलाच वातावरणाचें आकर्षण, जनसमूहाचें आकर्षण, इत्यादि गोष्टी असतात. चोखंदळ श्रोता असला तर तो याच्यापुढें जातो. पण अनुप्रासा-सारख्या शब्दचमत्कारांच्या मगरमिठींतून तो सुटतो न सुटतो तोंच, अर्थालंकार त्याला पकडतात. कुशल वक्ता आपला विषय अशा तऱ्हेनें मांडूं शकतो कीं, पदोपदीं विरोधाभास (paradox) अथवा अतिशयोक्ति यांची रेलचेल उडावी. याशिवाय श्रोत्यांच्या मनाची पकड परमार्थप्रतिपादनांत घेण्याचा आणखी हमखास उपाय म्हणजे दृष्टांत. हे दृष्टांत निरनिराळ्या प्रकारचे असूं शकतात. कांहीं वेळां पुराणांतल्या व्यक्तींच्या जीवनांतले प्रसंग, मुद्दा स्पष्ट करण्याकरतां घेतले जातात;

तर कांहीं वेळां जडसृष्टींतल्या घटनांच्या मदतीनें प्रतिपादन केलें जातें. कांहीं वेळां दंतकथांचा, तर कांही वेळां ऐतिहासिक कथांचा उपयोग केला जातो. हें सर्व सांगण्याचा हेतु, प्रतिपादकांच्या विवेचनपद्धतींतला दोष दाखविण्याचा मुळींच नसून आपल्या मनावर परमार्थप्रतिपादनाचा जो परिणाम होत असतो, त्याचें विश्लेषण करण्याचा आहे. वाचनाची अथवा श्रवणाची क्रिया करतांना आपल्या मनांत नक्की काय होत आहे हें न पाहतां, परमार्थ आपणांला केव्हांतरी समजूं शकेल काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

परमार्थप्रतिपादनाचे जे मार्ग निरनिराळ्या कालखंडांत अथवा देशांत रूढ झाले, त्यांचा उपयोग त्या त्या समाजाला, समाजस्थैर्याच्या दृष्टीनें अथवा सदाचरणाला लोकमान्यता मिळवून देण्याच्या दृष्टीनें कसा झाला, हा विषय अगदीं स्वतंत्र आहे. समाजशास्त्रज्ञ अथवा इतिहासतज्ज्ञ त्याचा जरूर तो परामर्श घेतील. आज आपल्यापुढें एवढा एकच विषय आहे कीं, व्यक्ति म्हणून परमार्थाबद्दलचें जें जें वाचन अथवा श्रवण आम्ही करतों, त्याचा उपयोग जीवनाबद्दलचें आमचें अज्ञान प्रत्यक्ष दूर करण्याचे बाबतींत कितपत होत आहे ? हा उपयोग फारसा होत नाहीं, असें दिसल्यास त्याचीं कारणें कोणतीं असावींत ?

आणखी एक मुद्दा लक्षांत घेणें जरूर आहे. तो हा कीं, ज्यांना परमार्थग्रंथ असें नांव दिलें जातें, त्या ग्रंथांपैकीं बरेचसे ग्रंथ संपूर्णतः अथवा बऱ्याच अंशानें सामाजिक सदाचरणाची चर्चा करीत असतात; व कांहीं वेळां तर असा प्रकार आढळतो कीं, नीतिनियमांची प्रशंसा कोठें संपते व जीवनाबद्दलचें तत्त्वज्ञान कोठें सुरू होतें, हें सांगणें अशक्य होऊन बसतें. विशेषतः पुनर्जन्म मानणाऱ्या धर्मग्रंथांत मनुष्याच्या मुक्तीचा मार्ग पुण्याच्या प्रांतांतून जातो, असें प्रतिपादन असल्यामुळें, पुण्यप्राप्तीच्या उपायांवर म्हणजेच सदाचरणावर सर्वस्वीं भर असतो. या प्रकारच्या ग्रंथांच्या अभ्यासामुळें समाजांत सदाचरण वाढीस लागतें असें जरी दिसलें, तरी जीवनाबद्दलचें अज्ञान, त्या प्रमाणांत दूर झालें असें म्हणतां येणार नाहीं. मुक्त जीवन व सदाचारी जीवन यांचें कित्येक वेळां साहचर्य दिसत असलें तरी, या दोन्ही गोष्टी एकच आहेत असें आपल्या अनुभवास येत नाहीं. मुक्त जीवन म्हणजे काय, या एकाच विषयास वाहिलेले असे जे ग्रंथ अथवा ग्रंथांचे भाग असतात, त्यांनाच खऱ्या अर्थानें 'परमार्थग्रंथ' असें म्हणता येईल, व या अशा ग्रंथांपुरताच विचार, या लेखांत प्रामुख्यानें करावयाचा आहे.

विषयाची मर्यादा अशा तऱ्हेनें निश्चित करण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं, माणसाचें जीवन दुहेरी आहे. चांगल्या तऱ्हेनें जगण्याकरतां प्रत्येक माणसाला दोन प्रकारचें ज्ञान संपादन करावें लागतें. इतरांशीं म्हणजे समाजांत कसें वागावें किंवा चांगला नागरिक कसें व्हावें हें सांगणाऱ्या ज्ञानाची जितकी

जरूर माणसाला लागते, तितकीच जरूर स्वतःच्या वैयक्तिक जीवनांतला संघर्ष व दुःख दूर करणाऱ्या ज्ञानाची असते पहिल्या प्रकारच्या ज्ञानाचा संबंध माणसाच्या व्यावहारिक जीवनाशीं येतो; तर दुसरें ज्ञान त्याच्या आंतरजीवनाबद्दलचें असतें. स्थूलमानानें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, व्यावहारिक विषयांबद्दलचें ज्ञान मिळविण्याची पद्धत म्हणजे माहितीचा संग्रह करणें (Accumulation of Information) ही होय. हा संग्रह करण्याकरतां माणसाला आपल्या स्मृतीचा उपयोग करावा लागतो. पण ही पद्धत माणसानें आपलें जीवन कसें जगावें, याबद्दलचें ज्ञान मिळविण्याकरतां मुळींच उपयोगी पडत नाहीं. ही एकच गोष्ट माणूस सतत विसरत आला आहे. माणसाच्या बुद्धीला एकच वळण पडलेलें आहे. तें असें कीं, तज्ज्ञांकडून नवीन माहिती मिळविणें, तिचा संग्रह करणें, नंतर त्या माहितींत कांहीं दोष आढळतो का हें इतर तज्ज्ञांकडून अथवा ग्रंथांतून मिळालेल्या माहितीशीं तिची तुलना करून ठरविणें, नंतर पुन्हां आणखी माहिती मिळविणें, हीच पद्धत परमार्थग्रंथांचें वाचन अथवा श्रवण करतांना आपण अंगिकारतो, व येथेंच नेमकी चूक होते.

परमार्थग्रंथांकडे नवीन माहिती मिळविण्याचीं साधनें, या दृष्टीनें पाहण्यांत काय धोके आहेत याचा विचार पुढें करूं. पण आणखी एक गोष्ट आपण विसरतों. ती ही कीं, परमार्थ हा एकच विषय असा आहे कीं, ज्याचे बाबतींत आंत एक व बाहेर एक असें होता उपयोगी नाहीं. समाजांत वागण्याचे नीतिनियम कांहीं वेळां अशा पद्धतीनें पाळले तर फारसें कांहीं बिघडत नाहीं. 'रस्त्याच्या उजव्या बाजूनें मोटार हांकावी,' असें मनांत सारखें वाटत असलें तरी, प्रत्यक्ष मोटार जर डाव्या बाजूनें गेली तर कोणताच गुन्हा होत नाहीं. पण परमार्थांत होणारा गुन्हा हा अंतःकरणाच्या आंतल्या बाजूस असतो; आणि तो झाला कीं नाहीं, हें इतरांना तर समजत नाहींच; पण ज्याचें त्याला देखील बहुशः उमजत नाहीं.

कायद्याच्या शब्दांत न सांपडतां पळवाटा काढून, कितीतरी बेकायदेशीर कृत्यें करतां येतात. तसेंच परमार्थाचे बाबतींत आपलें होत असतें. परमार्थाचें साधन चालूच असतें, पण साध्य प्रथम होतें तितकेंच दूर राहतें. याचें कारण, जें साधन आपण करतों तें आपल्या मनाच्या फक्त कडेला स्पर्श करतें व मनाचा आंतला गाभा तसाच राहतो. मनांत संपूर्ण क्रांति झाल्याखेरीज परमार्थसाधनाला सुरुवातच होत नाहीं, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. माणसानें रागाला अथवा हिंसेला चित्तांत थारा देऊं नये. हिंसा, मानसिक हिंसादेखील महापाप आहे हा उपदेश कितीतरी ग्रंथांतून, कितीतरी वर्षें आम्ही ऐकत आलों. पण रागानें व्यापलेली आमच्या मनांतली जागा थोडीतरी कमी झाली आहे काय ? नाहीं. रागाचे दुष्परिणाम काय होतात, याबद्दलची आम्हांला मिळालेली माहिती कमी

पडली म्हणून असें झालें असें म्हणतां येईल काय ? याचाच अर्थ असा कीं, कांहीं विषय असें असतात की, त्यांचेबद्दलची निव्वळ माहिती उपयोगी पडत नाहीं; तर दुसरीच कांहींतरी क्रिया व्हावी लागते. महर्षि व्यासांचा एक श्लोक प्रसिद्ध आहे :

ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष न च कश्चिच्छृणोति माम् ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥

व्यासांचे वेळेपासून आजपर्यंत माहिती मिळविण्याचें आमचें काम सतत चालूं आहे. पण माहितींत भर पडल्यामुळें फार तर इतरांना समजावून सांगण्याची आमची शक्ति वाढेल; पण चित्तांत क्रांति होईल काय, या प्रश्नाकडे आमचें जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. हें असें कां होतें, तें आतां पाहूं. परमार्थग्रंथांचें वाचन अथवा श्रवण ज्या ज्या प्रसंगीं होत असतें त्या त्या प्रसंगाकडे आपण कोणत्या दृष्टीनें पाहतों, हें समजून घेणें महत्त्वाचें आहे. घरांत मुलें फार गोंगाट करतात एवढ्या एकाच कारणावरून त्यांना शाळेंत कोंडलें तर त्यांना विद्या कां येत नाहीं ही तक्रार जितकी निरर्थक, तितकीच परमार्थप्राप्ति कां होत नाहीं ही आपली तक्रार पुष्कळदां अनाठायीं असतें. घरांतल्या कटकटीस कंटाळून जव्हा आपण देवळांत जातों, तेव्हां देव आपल्याला भेटेलच अशी खात्री देतां येत नाहीं. मनाच्या या अशा अवस्थेंत वर उल्लेख केलेले शब्दालंकार व अर्थालंकार मनाला रिझवितात; आणि एक प्रकारची सुखसंवेदना आपण अनुभवूं लागतों. पण हें सुख म्हणजेच परमार्थप्राप्तीचें सुख, असें कां म्हणतां येईल ? परमार्थाचें साधन म्हणून जें कांहीं आपण करतों, त्यांतील मनोविनोदनाचा भाग कोणता व किती हें ओळखतां येऊन तो बाजूला काढतां आला पाहिजे. परमार्थाकडे माणसाची प्रवृत्ति व्हावी, निदान त्याचें तोंड त्या दिशेला वळावें, याकरतां मनोविनोदन हें परमार्थ-ग्रंथांच्या मानगुटीस बसलें असेंहि कदाचित् झालें असेल. पण यापेक्षां अधिक मूल-गामी विचार आपण करावयास नको का ?

या मूलगामी विचाराची दिशा कृष्णमूर्ति दर्शवितात ती अशी :–

Question–When you follow anger, does anger give you pleasure ?

Krishnamurti :–Certainly, Sir, when you let off steam. We either pursue for the sake of pleasure, to gain something or for the sake of avoidance....When you know that pleasure is going to bring ultimate destruction, why do you pursue it ? Because you really do not know definitely, for yourself, that it is painful ultimately....When you know a certain thing is poison, you do not play with it and taste it. What is it that prevents you from knowing that anger is poison and why do you not leave it alone ?

.... You pursue certain qualities because you have not studied them, because you are not interested in being aware of them. If you understand anger, you are transformed immediately..It means action in your way of living, which may lead to more and more trouble. As you do not want to be involved in any trouble, you are not serious, earnest, about any of these things. You like to lead a superficial life, avoiding pain and seeking pleasure.

(Group–Discussions of 1940–p. 57–58)

जगांत ज्या हिंसेचें थैमान इतिहासकालापासून आजपर्यंत चालूं आहे ती हिंसा वाईट, अथवा तिला जन्म देणारा राग वाईट, हें ज्ञान सतत असतांनादेखील चित्तांतून राग कां जात नाहीं ? हें जर आपणाला समजलें तर हिंसेचा प्रश्न तर मिटेलच; पण अध्यात्मांतली मुख्य समस्याहि नाहींशी होईल. कांही वेळां असें वाटतें कीं, बुद्धि माणसाची प्रतारणा तर करीत नसेल ? बुद्धीजवळ अशी कांहीं-तरी जादू असली पाहिजे कीं, तिच्या योगानें ती, महत्त्वाच्या गोष्टींचें ज्ञान, मनाच्या फक्त दारांत नेऊन ठेवते; व त्याच वेळीं अशी कांहीं व्यवस्था करते की, तें ज्ञान मनाच्या गाभाऱ्यांत शिरणार नाहीं.

हें ज्ञान मनाच्या दारांतच घुटमळत राहतें, याचें कारण तें संशयानें गुरफटलेलें असतें; व हा संशय केव्हां केव्हां इतका सूक्ष्म असतो कीं, त्याची जाणीवसुद्धां आपणांला होत नाहीं. आपण खूप समजतों कीं, राग अथवा हिंसा वाईट, हें आतां आम्हांला चांगलें समजलें आहे. पण तें तसें खरोखर समजलेलें नसतें. इतरांचा राग व त्यांचे दुष्परिणाम पाहून, अथवा अशा प्रकारचा कांहींतरी सिद्धांत श्रवण करून, आम्ही इतरांना सुनावूं शकतों कीं, क्रोध हा माणसाचा मोठा शत्रु आहे अथवा हिंसा हें महत्पाप आहे. पण हें तत्त्व स्वतःवर प्रसंग आला कीं आम्ही नेमकें विसरतों. रागाच्या संपूर्ण कबजांत आम्ही जातों व प्रसंग संपल्यावर आणि राग ओसरून गेल्यावर आम्ही पुन्हां म्हणूं लागतों कीं, " राग वाईट आहे आणि हिंसा पाप आहे क्रोध संपूर्ण नष्ट करणें हें माझें ध्येय आहे, व तें या जन्मांत नाहींतर पुढील जन्मांत तरी प्राप्त करून घेतल्याखेरीज मी राहणार नाहीं."

बुद्धीची करामत हीच कीं जें गैरसोईचें असतें त्याला ध्येयाचें रूप देऊन (म्हणजे तें शक्य तेवढें दूर ठेवून) चालू जीवनक्रमांत कोणताहि प्रत्यवाय न येईल अशी व्यवस्था ती करते. याचाच अर्थ असा कीं, माझ्या बुद्धीला अमुक तत्त्व पटलें आहे असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां त्याला फारसा अर्थ नसतो. संशयाचा स्पर्शहि ज्या ज्ञानाला झालेला नसतो, तेंच खरें ज्ञान, बाकी सर्व अज्ञानच असें ठाम समजावें एखाद्या बाटलीत विष आहे हें समजल्यानंतर वरच्यासारखा अर्धवट प्रकार आपण कधींच करीत नाहीं. " त्या बाटलीला स्पर्श करूं नको " असे पुन्हां

पुन्हां आपणाला सांगावें लागत नाहीं; अथवा " ती बाटली टाळणें " हें माझें ध्येय, मी हळूहळू प्राप्त करून घेणार आहे असेंहि आपण म्हणत नाहीं. हें विषज्ञान जसें निर्णयात्मक असतें, तशी ' निश्चयात्मिका बुद्धि ' परमार्थविषयांत आपली कां होऊं नये ?

परमार्थज्ञान व्हावयास पाहिजे असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां, आपण असा आग्रह धरला पाहिजे कीं, संशयाचा अथवा संदिग्धतेचा लवलेशहि त्या ज्ञानाला चिकटलेला असेल तर तें खरें ज्ञानच नव्हे. लोकांच्या भिडेला बळी पडून, विद्वान् लोक तसें सांगतात म्हणून, अथवा पूज्य ग्रंथांत तसा सिद्धांत आहे म्हणून जें जें आपण बुद्धीनें ग्रहण करूं तें तें सर्व कुचकामाचें आहे. हें असें ज्ञान, मनांत खरी क्रांति होण्याचे बाबतीत फक्त चालढकल (postponement) करण्यास उपयोगी पडतें; आणि दुसरा त्याचा उपद्रव म्हणजे इतरांना आपल्या विद्वत्तेनें स्तिमित करणें. या ज्ञानाचें असें जें प्रचारात रूपांतर होतें, त्याच्यायोगानें संघटना व अज्ञान समाजांत वाढीस लागतात.

एकूण असें दिसतें कीं, परमार्थज्ञानाला फक्त बुद्धीच्या क्षेत्रांत प्रवेश मिळाला तर व्यक्तिजीवनांत विशेष असें कांहींच साधलें जात नाहीं. याचाच अर्थ असा कीं, ' मी ' शिल्लक राहून तो ज्ञानवान् झाल्यानें जीवनांतला संघर्ष अथवा दुःख नष्ट होऊं शकत नाहीं. ' मी'ला अशी कांहीं युक्ति करतां येते कीं, जिच्या योगानें तो स्वतः आहे तसाच कायम राहतो; पण चित्ता मात्र अशी वाहतो कीं, " अजून मी मुक्त कां होत नाहीं ?" या चिंतेचें स्वरूप नीट ध्यानांत येण्याकरतां, संत तुलसीदास यांनीं दिलेला एक दृष्टांत फार उपयोगाचा आहे. जंगलांतलीं माकडें पकडण्याकरतां पारधी लोक लांब पण निमुळत्या तोंडाच्या भांड्यांचा उपयोग करतात. या भांड्यांत लाडू भरलेले असतात, व तीं भांडीं अशीं माकडें बसलेल्या झाडांच्या खालीं उघडीं ठेवण्यांत येतात. माकडांना जेव्हां हे लाडू खाण्याचा मोह होतो, तेव्हां ती खालीं येतात व प्रत्येक माकड आपला एक हात त्या निमुळत्या तोंडात घालून त्या हातांत मावतील तेवढे लाडू गच्च धरून, तो हात बाहेर काढण्याचा प्रयत्न करूं लागतें. पण त्याचा हात बाहेर निघतच नाहीं. 'जोंपर्यंत हातांतले लाडू टाकून दिले जात नाहींत, तोंपर्यंत हात बाहेर निघणार नाही, ' हें ज्ञान त्या माकडांना नसल्यामुळें तीं सर्व माकडें पारध्यांच्या जाळ्यांत सांपडतात. परमार्थाच्या बाबतींत माणसांचें हें असेंच होतें. ' मी ' वर असलेली आपली पकड कायम ठेवूनच, परमार्थाचीं सर्व साधनें आपण करूं पाहतों व येथेंच आपली चूक होते. ही पकड कोठें व कशी बसली आहे हें ज्या ज्ञानाच्या योगानें ध्यानीं येईल तेंच खरें परमार्थज्ञान; बाकी सारा वेळेचा नुसता अपव्यय, दुसरें कांहीं नाहीं.

स्वतः कायम राहून ज्याअर्थी 'मी' वाटेल तें ज्ञान संपादन करूं शकतों त्याअर्थी, 'मी' नाशाकरतां बाहेरचे ग्रंथ अथवा उपदेशक यांच्याकडे न वळतां, या 'मी' कडेच आपण सतत लक्ष दिलें पाहिजे. प्रत्येक क्षणाला 'मी' चें स्वरूप बदलत असल्यामुळें, हें लक्ष चालू क्षणांतल्या 'मी' वर केंद्रित केलें पाहिजे. भविष्यकाळांत केव्हांतरी, गीतेंत सांगितल्याप्रमाणें, 'निर्मानमोहाः जितसंगदोषाः' असे आपण होऊं असें ध्येय डोळ्यांपुढें ठेवल्यानें, चालू घटकेचा 'मी' लेशभरहि कमी होऊं शकत नाहीं, हें आपण विसरतों. येथेंच सांगून टाकण्यास हरकत नाहीं कीं, 'परमार्थसाधन' या नांवानें जें जें वाचन अथवा श्रवण आम्ही करतों, तें तें सर्व पुढें प्राप्त करून घ्यावयाच्या ध्येयाचें स्वरूप स्पष्ट व्हावें, या बुद्धीनेंच करीत असतों. आमची सारी तळमळ या भावी ध्येयप्राप्तीवद्दल असते; व मनाचा हा असा व्यापार एकदां सुरू झाला कीं, चालू घटकेतल्या 'मी'चें निरीक्षण करण्याकरतां जी शक्ति जरूर असते, ती सर्व मनाची शक्ति नाहींशी होते. परमार्थाबद्दलची ही नवीन दृष्टि कृष्णमूर्तीनीं आपणांला दिली आहे. ते म्हणतात :–

You may read all the books in the world, all the sacred books and psychological books, but merely living on that level will not satisfy you, and I am afraid that way we fall in with other people's ideas, other people's experiences, moods, mottos and thereby we become stagnant... To know that I am greedy without finding excuses for it, or condemning it, without idealising its opposite and saying " I must not be greedy," simply to know that I am greedy is already the beginning of transformation..I want to know everything about myself and so I am open to all the intimations concerning me, whether they come from another or from myself. I am open to the conscious and the unconscious within me, open to every thought and feeling that is constantly moving, arising and fading away in myself... To know that one is greedy or violent, to know and understand it, requires an extra-ordinary perception, does it not ? It demands honesty, clarity of thought. Whereas, to pursue an ideal away from what is an escape, it prevents you from discovering and acting directly upon what you are...

(Talks in India 1948, P. 21, 31 and 33)

असें सुद्धां म्हणता येईल कीं, जेव्हां ध्येयाच्या मागें आपण लागतों व परमार्थसाधन करीत आहोंत असें लोकांना अथवा स्वतःला सांगतों, तेव्हां एक प्रकारचा अप्रामाणिकपणाच आपल्या अंगीं असतो. स्वतःच्या 'मी'कडे पाहणें हें जितकें अवघड तितकेंच अडचणीचें असतें. या अडचणी उत्पन्न होऊं नयेत म्हणूनच आत्म-

निरीक्षण आपण टाळीत असतों. पहिली आणि मुख्य अडचण अशी कीं 'मी'च्या मदतीनें जीं इंद्रियजन्य व विचारजन्य सुखें (pleasures) आम्हाला मिळतात, त्यांचेवर पाणी सोडण्यास आमचें मन तयार होत नाहीं. दुसरी अडचण अशी कीं, 'मी'च्या संगतीनें जो मोठेपणा आम्हांला मिळालेला असतो, तो सोडणें जिवावर येतें. 'मी' गेला तर हीं सुखेंहि गेलीं व समाजांतलें आमचें स्थानहि गेलें. मग, 'जीवन अगदीं भकास होईल, जगण्यांत रामच राहणार नाहीं' अशा भीतीनें 'मी'चा खरोखरच निरास होईल असा कोणताहि उद्योग हातीं घेण्यास आमचें मन कचरत असतें. सुखाची अथवा मोठेपणाची लागलेली चटक माणसाला 'मी' सोडूं देत नाहीं. पण या 'मी' च्या अस्तित्वामुळेच जीवनांत दुःखाची निर्मिति होते. कारण कोणतेहि सुख चिरस्थायी नसतें. संसारांतल्या सुखांचा क्षणभंगुरपणा व सुख नष्ट झाल्यामुळेंच होणारी दुःखप्राप्ति लक्षांत आल्यामुळें आम्ही जरी परमार्थाकडे वळलों तरी, 'मी' ची सोबत परमार्थांतहि जर आमच्याबरोबरच असली, तर दुःख आमच्या कपाळचें चुकत नाहीं.

परमार्थाचा अवघडपणा हा अशा प्रकारचा आहे.

* * *



दोन

माणसें त्रस्त कशानें होतात ?

"मी फार त्रासून गेलों आहें, यांतून कोण मला मुक्त करील ?" असें आक्रंदन आपलें चित्त कितीतरी वेळां करीत असतें. हा आक्रोश केव्हां सूक्ष्म स्वरूपांत तर केव्हां इतरांनाहि ऐकूं येईल एवढ्या मोठ्यानें, आपलें मन करीत असतें. पण त्रास तरी कशाचा होतो ? त्रास देणारी वस्तु बाहेर असते का आपल्या चित्तांतच असते ? जर ती आपल्या चित्तांतच असली तर ती तेथें कोठून येते? बाहेरची परिस्थिति, ती वस्तु चित्तांत आणून सोडते, असा का प्रकार आहे? कां चित्तांतच कांहींतरी मूळ धरतें व मग त्याचा संबंध बाहेरच्या घटनेशीं जोडला जातो ? 'बाहेरची घटना' असें जिला आपण म्हणतों ती खरोखरच प्रत्यक्ष जागेवर असते का ती म्हणजे एखादी स्मृति अगर कल्पनाच असते ? हे सर्व प्रश्न महत्त्वाचे आहेत; व माणूस त्रस्त कां होतो, हें समजून घ्यावयाचें असेल तर त्यांचा पिच्छा पुरविला पाहिजे. प्रत्येकाच्या जीवनांत कांहींना कांहीं समस्या असतात; व माणूस त्रस्त होतो तो या समस्यामुळें. जीवनांत समस्या ही केव्हांतरी उत्पन्न होतेच म्हणून 'समस्या' असें नांव ज्या गोष्टीला आपण देतों, तिची सुरुवात किती प्रकारांनीं होते, हें आपण पाहूं.

या क्षणाला मला कांहीतरी जेव्हां हवें वाटतें, तेव्हांच समस्येचा माझ्या जीवनांत पहिला पदक्षेप होतो. अर्थात् जें हवेसें वाटतें तें मजजवळ चालू क्षणांत

नसतें, किंवा तशी माझी समजूत असते. एकदां कोणतीहि वस्तु हवीशी वाटली कीं, पुढच्याच क्षणीं मन प्रक्षुब्ध होतें. या प्रक्षोभाचें स्वरूप भिन्न वेळीं भिन्न प्रकारचें असतें.

(१) ही वस्तु दुसऱ्यांच्याजवळ असतांना ती मलाच कां मिळूं नये ?

(२) ही वस्तु मला आतांच कां मिळत नाहीं ? ती याच क्षणीं माझ्या हातांत आली पाहिजे.

(३) ही वस्तु मजजवळ पूर्वी होती. ती इतरांच्याकडे अजूनहि आहे. मग मलाच ती कां गमवावी लागली ?

(४) ही वस्तु मी तावडतोव मिळविणारच. पण सामाजिक नीतिबंधनें आड येत आहेत. तेव्हां आतां माझ्यापुढें असा प्रश्न आहे कीं, समाजांतल्या माझ्या प्रतिष्ठेला अजिबात तडा न जातां ती कशी मिळवावी ? मग मी, प्रतिष्ठा कायम ठेवून इष्टसिद्धि कशी करतां येईल याबद्दलच्या युक्त्याप्रयुक्त्या शोधूं लागतो व त्या उघडकीस येतील कां काय या भीतीनें, माझा जीव सारखा हैराण होतो.

(५) इष्टप्राप्ति न होण्याचें कारण माझी आर्थिक परिस्थिती प्रतिकूल आहे. ती बदलत कां नाहीं, याबद्दल मी जिवाला खाऊन घेतों.

प्रक्षोभाचे आणखीहि बरेच प्रकार संभवतात. पण आपल्या जास्त परिचयाचे व प्रातिनिधिक असे वरील पांच प्रकार आहेत. कोणत्या का प्रकारानें होईना, मन एकदां वासनाग्रस्त झालें कीं, दुसऱ्याच क्षणाला मनांत एक निराळी गति सुरू होते. वासना चित्ताला एका दिशेकडे म्हणजे तिच्या विषयाकडे (object of the desire) पिटाळते; पण लगेच मनांत दुसरा एक विचारप्रवाह सुरू होतो. तो वासनेला बजावतो कीं, तूं जें करतेस तें बरोबर नाहीं. जें तुला हवें आहे तें धर्माला अगर कायद्याला मंजूर नाहीं; अगर चालू परिस्थितींत तें अशक्य आहे. **ज्या मनांत वासना मूळ धरते त्याच मनांत तिचे निराकरण करणारा विचारहि उत्पन्न व्हावा, हें एक मोठें आश्चर्य आहे.** तो विचार म्हणजे मनाच्या अंगचें असें खरें शहाणपण असतें, तर वासनेचा उद्भवच कां व्हावा ? हा मागून येणारा विचार, पुष्कळ वेळां आधीं लक्षांत न आलेले अनर्थ आपल्या नजरेस आणून देतो यांत शंका नाहीं. त्यामुळें तत्काळ एखादी कृति अविचारानें हातून होण्याचें टळतें, हेंहि खरें. पण प्रश्न असा आहे कीं, अमुक एक कृति करणें चांगलें नव्हे, तें नीतीला धरून नाहीं, अथवा तें दंडनीय आहे एवढें समजल्यानें चित्तांतला संघर्ष कमी होतो का ? फारतर एवढेंच होतें कीं, हातून दुष्कृत्यें घडत नाहींत. (तीं व्हावींत, असें कोणीच म्हणत नाहीं.) पण एक गोष्ट मात्र खरीं कीं, माणसाचें जीवन एवढ्यानें समस्या-विरहित होत नाहीं. माणसाच्या वासनेचा वारू भरधांव निघाला असतां तो

अडखळतो, केव्हां केव्हां थांबतोहि. पण तो जागचेजागीं पाय आपटीत बसतो कीं काय, असें वाटतें. गीतेनें हा पेंच (dilemma) नेमका ओळखला आहे:—

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ।। अ. ३, ६ ।।

हा श्लोक या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे.

आणखी एका दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करूं. आपलें मन वर उल्लेख केलेल्या पाचांपैकीं कोणत्या कां प्रक्षोभांत असेना, तें एक प्रकारच्या युद्धांत अडकलेलें असतें. एखादी हवी असणारी वस्तु जवळ नसली कीं, युद्धच सुरू होतें म्हणाना. चालू क्षणांतली परिस्थिति आणि वांच्छित स्थिति यांमध्यें जें अंतर असतें, तें भरून काढण्याकरतां धडपड सुरू होते. याचा अर्थच असा कीं, मी चालू स्थितीशी लढूं लागतो. हा लढा वर दिसत नसला तरी **मनाची शक्ति खर्ची करतो.** किंबहुना जगण्यांतला सर्व आनंदच तो नाहींसा करतो. यामुळें आधींच मरगळलेल्या अशा मनाची आदर्श जीवनाबद्दलच्या कल्पनांशी (ideals) जेव्हां गांठ पडते, तेव्हां आणखी एक दुष्परिणाम होतो. तो असा कीं, मनाला आपण अपराधी (Sense of guilt) आहोंत असें वाटूं लागतें. (याचा अर्थ, मनाला हवें तसें वागणारा निरपराधी असतो, असा मुळींच नाहीं.) शिवाय मनाला जें **प्रथम** हवें असें वाटत असतें तें प्रिय असतें. त्याची एक विलक्षण ओढ असते. म्हणून जें प्रिय वाटतें तेंच योग्यहि असलें पाहिजे, निदान निसर्गाला धरून म्हणून तें पत्करलें पाहिजे असा आग्रह सुरू होतो. हें जें समर्थन (justification) सुरू होतें, त्यांत मन आणखी व्यग्र होतें. समर्थनाकरतां जीं कारणें मन पुढें करतें, तीं खरीं आहेत कीं नाहींत, याबद्दल सारख्या शंका येतात. एक शंका नाहींशी होते तोच तिचे जागीं दुसरी येते. योग्यायोग्य ठरविणारे जे अधिकारी पुरुष (authority) असतील त्यांचा अधिकार सोयीप्रमाणें मान्य केला जातो; अथवा नाकारला जातो. त्यांच्या शब्दांच्या अर्थाची हवी तशी व हवी तेवढी ओढाताण केली जाते हेंहि एक प्रकारचें युद्धच मनाला करावें लागतें. थोडक्यांत असें कीं, चालू क्षणांतल्या जीवनाशीं वासनेमुळें जें युद्ध जुंपतें, त्याच्या भरीला हें नवें युद्ध माणसावर आणखी लादलें जातें.

वासनांच्या गुलामगिरींतून माणसाला मुक्त करण्याकरतां आदर्श जीवन जन्माला आलें. त्यानें आपणांला निग्रह शिकविला. निग्रहानें समाजांतला अनर्थ थांबविला; पण मनांतल्या वासनेचा क्षय केला नाहीं. वासना आणि निग्रह यांचें माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जें द्वंद्वयुद्ध चालतें तें पाहण्यासारखें आहे. केव्हां वासनेची जीत तर केव्हां नीग्रहाची, असा प्रकार सतत चालूं आहे. निग्रहाची जीत

झाली कीं, आपण हरखून जातों. पण ही 'हारजीत' खरोखरीची आहे कीं तें एक नाटकच आहे ? द्वंद्वयुद्ध खेळणारे दोघे आहेत कीं, एकाचाच हा डबलरोल आहे ? असा संशय येण्याचें कारण असें कीं, या दोघांचाहि जन्म व परिपोष एकाच घरांत होतो. तें घर म्हणजे माणसाच्या मेंदूंतलें स्मृतियंत्र. स्मृतींतूनच वासना निर्माण होते; व तिचा निग्रह केला पाहिजे हा विचारहि स्मृतींतूनच पुढें येतो. कांहीं वेळां एकाच बुंध्यातून दोन झाडें वर आलेली आपण पाहतों, तसें तर हें नसेल ?

वासना व निग्रह एकरूप तर नसतील ? असा प्रश्न मनाला कित्येकदां चाटून जातो. पण "भलताच प्रश्न विचारलास !" असें आपण स्वतःलाच दटावतों व पुढें चालूं लागतों. याचें एक कारण असें कीं, ओढाळ गुराप्रमाणें वासना इकडे तिकडे धांवूं लागली कीं, तिला आडवणें व बांधून ठेवणें, हें अगदीं क्रमप्राप्त व स्वाभाविक वाटतें. बाहेरच्या गतिशील वस्तूला थांबविण्याचा हाच एक मार्ग आहे, हें उघड आहे. पण मनाचे व्यापार समजण्याला इतके सोपे नाहींत. आपणांला चित्त वासनेपासून अलग करावयाचें आहे. "माझ्या मनांत समोर दिसणाऱ्या सुंदर वस्तूची जी अभिलाषा उत्पन्न झाली आहे, ती फार वाईट आहे. ती बंद पडली पाहिजे." असा हुकूम मी जेव्हां चित्ताला करतो तेव्हां मी एक विसरतों कीं, चित्तानेंच त्या वस्तूचा आकार धारण केला आहे. किंबहुना माझें चित्त म्हणून निराळें उरलेलेंच नाहीं. 'त्या वस्तूच्या चित्राची आंतल्या आंत पुनरावृत्ति करणारे एक यंत्र,' एवढेंच स्वरूप माझ्या चित्ताला प्राप्त झालेलें आहे. हें असें झाल्यावर, त्या यंत्राच्या कक्षेच्या बाहेर कोणती तरी कृति झाल्याखेरीज पुनरावृत्ति पूर्णपणें थांबणें शक्य नाहीं. वरील हुकूम जेव्हां मी देतों, तेव्हां या पुनरावृत्तीलाच मदत होईल, असें कांहीं माझ्या हातून घडत नाहीं ना, हें पाहावयास नको काय ? जी स्मृति एकदम वितळणें जरूर तिचेंच पुनरुज्जीवन अथवा दृढीकरण, "हें नको; हें थांबावयास पाहिजे." असें म्हणण्यानें होत नाहीं का ? घरांतली प्रिय व्यक्ति मृत झाल्यानंतरहि हाच प्रकार होतो. मरणाच्या क्षणाला जें दुःख होणें अगदीं स्वाभाविक, तें दुःख नाना प्रकारच्या जुन्या आठवणी उगाळून आपण वाढतीत राहतों; व जें यंत्र ही पुनरावृत्ति करीत असतें त्या यंत्रालाच ती बंद करण्याचा हुकूम देतों. पण 'हुकूम देणारा' या यंत्राच्या बाहेर नसतो. दुःखी झालेला व म्हणून दुःखांतून मुक्त होऊं पाहणारा हा, त्या दुःखाचाच एक वाढविलेला भाग असतो. या पद्धतीनें दुःखनिवृत्तीचा प्रयत्न करणें म्हणजे, दुःखाशीं असलेला संपर्क कायम टिकविणेंच नव्हे काय ?

आतां हें खरे कीं, काल जसा जातो तशी स्मृति पुसट होत जाते; व दुःख हळूंहळूं कमी होतें. पण ही आपली कर्तबगारी नव्हे. तसेंच दुःखाचा विसर पडण्या-

करतां, मन दुसरीकडे गुंतविणे (escape) हाहि उपाय आपण करतों. पण याने दुःखाची समस्या आपण सोडविली असें होत नाहीं. चित्त वासनाग्रस्त असलें अगर दुःखानें हैराण झालेलें असलें तर निग्रहाचा उपयोग कितीसा होतो, एवढेंच आपणांस पाहावयाचें आहे. बाहेर होणारे उपद्रव कांहीं प्रमाणांत थांबतात, हें एकदम कबूल. पण वासना व तिचा निग्रह हीं दोन्हीं टोकें एकाच दांडीचीं असावींत; एक टोंक हालवलें कीं दुसरेंहि चाळवलें जातें, असें दिसतें. वासना चित्तांत उद्भवली कीं लगेच तिचा निग्रह करण्याची इच्छा होते; पण निग्रहानें वासनेला जीवदानच मिळतें. मात्र ती खोल जाऊन रुतून बसते; व पुन्हां बाहेर येण्याच्या संधीची वाट पाहते. अशी संधि मिळाली कीं, तिचा प्रभाव पूर्वीपेक्षां फारच अधिक असतो.

वासनेचा उद्गम व निग्रहानें तिची तात्पुरती समाप्ति, यांचा आणखी एक दुष्परिणाम होतो. मनाचें अगर मेंदूचें एकंदर सामर्थ्यच कमी होतें. विशेषतः उतारवयांत माणसाची बुद्धि तल्लख अशी दिसत नाहीं, याचें कारण काय असावें ? निसर्गनियमाप्रमाणें शरीराचे सर्व अवयव कमी समर्थ होत जातात, हें एक कारण आहेच. पण मला वाटतें, 'मेंदूचा जन्मभर केलेला गैरवापर' हेंहि तितकेंच महत्त्वाचें कारण आहे. प्रतिकूल परिस्थितीशी करावा लागणारा संघर्ष कमी तीव्र व्हावा, याकरतां अनेक चळवळी व समाजक्रांत्या झाल्या. पण माणसाला कोणती परिस्थिति प्रतिकूल वाटते, हें त्याचें मन ठरवितें हें आपण विसरलों. तसेंच बाहेर कराव्या लागणाऱ्या संघर्षापेक्षां मनांतल्या संघर्षाचा जाच अधिक होतो, इकडेहि आपण दुर्लक्ष केलें. एवढेंमात्र खरें कीं, ज्याचा कब्जा एखाद्या समस्येनें घेतलेला आहे तें मन, नुसत्या निग्रहावर विसंबून राहिल्यामुळें वरचेवर अधिकच संत्रस्त होत जातें. 'बुडत्याचा पाय अधिक खोलांत,' अशी त्याची स्थिति होते. समस्या सोडविण्याकरतां म्हणून केलेली प्रत्येक कृति, समस्येची गुंतागुंत वाढवीत जाते. एवढेंच नव्हे, तर समस्येंतच सदैव राहावें, असें त्या मनाला वाटूं लागतें. मनाचा एक भाग 'समस्या का सुटत नाहीं ?' असें म्हणतो; तर दुसऱ्या भागानें समस्येलाच घट्ट पकडलेलें असतें. याचा अर्थ असा कीं, समस्याहेतु असा जो मध्यवर्ती विचार (thought) असतो, तो टाकून द्यावा असें मनाला वाटतच नाहीं. तो टाकला तर मनांत जी पोकळी निर्माण होईल, तिची भीति मनाला वाटूं लागते. मला तर वाटतें कीं, मनांत **पोकळी** (emptiness) **येऊं नये याकरतांच माणसाची सगळी धडपड चाललेली आहे.** तें कसें का असेना, एवढेंमात्र खरें कीं, समस्येंत गुंतलेलें मन संपूर्ण अंतर्मुख (self-conscious) बनतें. बाहेर काय चाललें आहे, सभोंवतालीं कोण आहे, याचें त्याला पुरेसें भान राहात नाहीं. अशा माणसाला, जीवनांतला प्रत्येक क्षण जें नाविन्य बरोबर घेऊन येतो, त्याचा पूर्ण

आस्वाद घेतां येत नाहीं. केव्हां केव्हां तर काल सारखा पुढें चालला आहे, परिस्थिति वेगानें बदलत आहे, याची किंचितहि जाणीव त्याला होत नाहीं. तो सदैव आपल्याच चिंताकोशांत अडकून पडलेला असतो. त्याचा घरांतल्या अगर बाहेरच्या माणसांशीं संबंध येऊन न आल्यासारखाच होतो. तो सर्वांपासून अलग (isolated) पडतो. स्वकीयसुद्धां एका अर्थानें त्याला पूर्ण परके होतात. त्याचा एकच आप्त असतो तो म्हणजे चालू समस्येंतला मध्यवर्ती विचार. हा विचार म्हणजे कोणत्यातरी गतानुभवाची स्मृति अगर स्मृतींची मालिका असते.

समस्याग्रस्त माणूस आत्मकेंद्रित असल्यामुळें, इतरांनाहि त्याचें आकर्षण वाटत नाहीं. कारण तो आणि जग यांचे दरम्यान एक भितच जणूं उभी राहते. या भितीच्या वरून अधूनमधून एकमेकांकडे किंचित् डोकावून पाहणें, यालाच तो आपलें जीवन समजतो. इतरांना आपल्यामध्यें रस वाटत नाहीं. म्हणून तो अधिकच खिन्न होतो. पण इतरांच्या दुराव्याचें कारण, स्वतःचेंच त्यांच्याबद्दलचें औदासीन्य आहे, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं.

समस्येनें ज्याची संगत केली आहे अशा माणसाची परिस्थिति अगदींच केविलवाणी होते. समस्येचा भुंगा रात्रंदिवस मागें असतो; तो कांहीं पिच्छा सोडीत नाही. स्वजन परके होतात. आणखी असें होतें कीं, त्याच्या बुद्धीला मालिन्य येऊं लागतें. त्याची स्मरणशक्ति पूर्वीप्रमाणें काम देत नाहीं. तिचे ठिकाणीं मंदपणा येऊं लागतो. यामुळें व्यवसायाचीं कामें करतांना अथवा दैनंदिन जीवनांतले प्रश्न सोडवितांना, एकप्रकारचें जाडय त्याच्या स्वतःच्याच प्रत्ययाला येऊं लागतें. इतरांनाहि तें दिसूं लागतें मग तो स्वतःशीं जास्तच चरफडूं लागतो. चढाओढ (competition) हाच ज्या जगाचा आत्मा आहे तें जग, अशा संधीची वाटच पाहत असतें. जो थांबला तो संपला, या सूत्रावर जगाचे सारे व्यापार चालत असतात. मग एखाद्या व्यक्तीच्या मनःस्थितीकडे सहानुभूतिपूर्वक पाहायला वेळ आहे कुणाला ?

पण या माणसाचें सर्वांत जास्त नुकसान होतें, तें निराळेंच आहे. समस्येच्या आहारीं गेलेला मनुष्य अध्यात्माला अगदीं नालायक होतो. शोकांतिका अशी आहे कीं, अध्यात्माची सर्वांत जास्त गरज याच माणसाला असते. (खरें पाहिलें असतां, ती सर्वांना सारखीच आहे.) कांहीं रोगांत औषधाविषयींच घृणा उत्पन्न होते, त्यासारखा हा प्रकार असावा. अध्यात्मग्रंथांचें वाचन करण्याचा प्रश्न नाहीं. त्रस्त झालेला मनुष्य तें तर जारीनें सुरू करतो पण खऱ्या अध्यात्माकरतां मनाकडून जी कृति व्हावयास पाहिजे तीच होत नाहीं. कारण मनांत समस्या (problem) कांठोकांठ भरलेली असते. तें रितें झालें तरच, सत्याला आंत

शिरण्याला आवकाश सांपडणार. एका दृष्टीनें, असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं कीं ज्या मनाला समस्येचा स्पर्श होत नाहीं अथवा ती आलीच तर जें मन तिला क्षणार्धांत झटकून टाकतें, तें सत्याशींच संलग्न असतें सत्य त्याचेपासून दूर नसतें. म्हणूनच, समस्येला चित्तांत मूळ धरूं देऊं नका असा आग्रह कृष्णमूर्ति धरतात :–

First of all one has to be aware not only of the problem, the nature of the problem, the structure of the problem, but also one has to be able to meet it—not eventually, not gradually, taking time over it—but to meet it immediately and resolve it immediately, so that the problem does not take root in the mind ....Because the more one allows a problem of any kind to linger, to endure for a day or for a month or even for a few minutes, *it obviously distorts the mind;* is it possible to meet a problem without any distortion and be completely free of it, immediately ?... When one meets life with images, then there are problems.

(Talks in Europe 1967, p. 188.)

* * *



तीन

पुनरावृत्तीचा शाप

पुराणांतील एक कथा मला आठवते. त्या कथेंतला तपोनिष्ठ ब्राह्मण मुक्त होण्याच्या अगदीं बेतांत आला होता. पण दुर्दैव आड आलें, आणि त्याच्या हातून कसलातरी प्रमाद घडला व एका तेजस्वी ऋषीनें त्याला तूं पुन्हां पुनरावृत्तीच्या फेऱ्यांत सांपडशील, असा शाप दिला. हा शाप खरोखरच भयंकर होता. कारण पुनरपि जननम्, पुनरपि मरणम्, पुनरपि जननीजठरे शयनम् त्याच्या नशिबीं आलें. त्या ब्राह्मणाला काय वाटलें असेल ? पुन्हां तोच प्रवास, पुन्हां त्याच यातना. सर्वच माणसांना मला वाटतें, असा पुनरावृत्तीचा शाप सतावीत आहे. मात्र आदिमानवानें एक उःशाप मागून घेतला असावा, "मी पुनरावृत्ति करीन; पण तिला सुखाची झिलई देण्याची परवानगी मला दे." अशी विधात्याची करुणा त्यानें भाकली असावी. यामुळें पुनरावृत्ति ही पुनरावृत्ति भासूंच नये, अशी सोय त्यानें करून घेतली.

मानवी जीवनांत उद्योग आहे, पराक्रम आहे, कौशल्य आहे, पण 'सुख' नांवाचा पदार्थ खरोखरच आहे कीं नाहीं, याबद्दल मला संशय येतो. पण जो पाहावा तो माणूस सुख-विचारांतच दंग असतो. सुख-विचार याचा अर्थ 'सुख कां मिळत नाहीं ?' हा विचार. 'तें मिळणार नाहीं,' असें उत्तर या प्रश्नाचें आलें तर त्याला आपण 'दुःख' म्हणतो. 'मला पूर्वी सुख मिळालें,' अथवा 'भविष्यकाळांत मिळेल' अशा प्रकारचा विचार चित्तांत असला तर तो माणूस स्वतःला 'सुखी'

समजतो. सुखाच्यामागें या ना त्या प्रकारें माणूस धांवत असतो. पण सुखाला हातांत घट्ट पकडलें आहे, असा क्षण आपल्या आयुष्यात कधीं येतच नाहीं. सुख हातांत आलें न आलें तोंच तें निसटून जाऊं लागतें; नव्हें तें निसटतेंच. पुरुरवा आणि उर्वशी यांचें रविवर्म्यनें काढलेलें चित्र वाचकांनीं पाहिलें असेल. त्या चित्रांतली उर्वशी कांहीं पुरुरव्याला सांपडत नाहीं; तिला तो धरून ठेवूं शकत नाहीं. अगदीं तसाच प्रकार सुखाचा आहे. रामजोश्यांच्या एका कवनांत 'आम्ही विषयविचारीं असूं" अशा अर्थाची एक ओळ आहे. खरेंच आहे तें. विषयाचा विचार म्हणजेच ज्याला आपण 'विषयसुख' म्हणतो तें आहे. कोणत्यातरी वस्तूचा (अथवा अनुभवाचा) विचारच सुख देतो. खुद्द ती वस्तु जरी प्रत्यक्ष आपल्यासमोर येऊन उभी ठाकली, तरी ती जें सुख देते तें तिच्याबद्दलच्या विचारांतूनच निर्माण होते. जी वस्तु कोणाततरी विचार जागृत करीत नाहीं ती आपल्याला अगदींच नीरस वाटेल याचा अर्थ असा कीं, **विचारांतच सुखाचा प्रक्षोभ** (sensation) **उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे.** कृष्णमूर्ति जेव्हां विचारांतूनच सुखसंवेदना निर्माण होते (Thought is sensation) असें म्हणतात, तेव्हां आपणांला धक्का बसतो. कारण, सुखाला स्वतंत्र अस्तित्वच नाहीं असा याचा एक अर्थ होतो. दुसरा अर्थ असा कीं, निव्वळ विचारापासूनहि–मग तो विचार कोणत्याहि गंभीर विषयाचा असो–जें समाधान लाभतें, तीसुद्धां एक फसवणूकच आहे.

ज्या वेळेला एखाद्या सुखाचा अनुभव आपण घेत असतों, त्या वेळेला जरा सूक्ष्म निरीक्षण केलें तर काय आढळतें? एकदम लक्षांत येतें कीं, चिंतन चालूं आहे म्हणून सुखाचा अनुभव येतो. कांहीं कारणानें चिंतनांत खंड पडला कीं सुखहि निसटतें. चिंतनाचा हा अभेद्य संबंध, सुखद वस्तु हीहि एक चिंतनच असते तेव्हां जास्त ठळकपणानें लक्षांत येतो. पुष्कळदां आपण या सुखाच्या मागें लागतों. परदेशीं गेलेल्या मुलाचा चेहरा आठवीत आई तासन्तास बसून राहते. या चिंतनांत भूतकाल आणि भविष्यकाल यांचें बेमालूम मिश्रण असतें. चिंतनाचा उगम नेहमीं भूतकालांतूनच होतो. पण पूर्वी दिसलेला पुत्राचा तो प्रिय चेहरा पुन्हा दिसणार आहे, ही विचारधाराहि सतत चालूं असते. ही धारा जर खंडित झाली तर चिंतन चालूंच राहतें; पण मग त्या चिंतनाला दुःख, शोक, अशीं नांवें आपण देतों. सुखाचा दुसरा प्रकार असा आहे कीं, गतकालांत आपण जीं सुखें अनुभविलीं त्यांचें चिंतन करणें. या चिंतनापासून सुख होण्याला दोन अटी आहेत. पहिली अट अशी कीं, आपणांला मिळालेलें सुख इतर कोणाला तरी मिळालेलें नाहीं व आपण भाग्यवान् आहोंत अशी तुलना मनांत आली पाहिजे. दुसरी अट अशी कीं, चालू वेळ दुःखाची नसली पाहिजे नाहींतर गतसुखचिंतन हें दुःखाची तीव्रता अधिक वाढवतें.

सुखाचा तिसरा प्रकार सर्वांत महत्त्वाचा आहे. कारण, जीवनांत सुख म्हणूनच खरोखर कांहीं आहे व त्याच्यामागें आपलें धांवणें अगदीं नैसर्गिक आहे, असें हाच प्रकार वाटायला लावतो. आपण गृहितच धरतों कीं, रूप, रस, स्पर्श, गंध व श्रवण यांपासून प्रत्यक्ष सुखाची व आपली गांठ पडते. 'ज्या क्षणाला हे पांच विषय अथवा त्यांपैकीं कोणतातरी विषय प्रत्यक्ष आमच्या संगतीला असतो, त्या क्षणांतहि खरें सुख नाहीं असें तुम्ही कां म्हणतां ?' असा प्रश्न वाचकांच्या मनांत उभा राहिला असेल. कारण 'सुख हें चिंतनजन्य आहे' हा सिद्धान्त मग लुळा पडतो. पण सूक्ष्म निरीक्षणानंतर काय दिसतें तें पाहा. ज्या वेळेला जिलबीची चव आपली जीभ घेते, त्या वेळेला दोन क्रिया होतात. जिभेंत असा कांहीं धर्म आहे कीं, जो 'रस' या विषयाशीं तिचा संबंध जोडतो, व 'रस' तिला गोड लागतो. पण फक्त जिभेलाच जिलबी गोड लागत नाहीं; तेथें मनहि येतें. मन म्हणतें कीं "वाः, काय गोड आहे ! जिलबी असावी तर अशीच. तिची गोडी पूर्वी चाखली होती. मला माहीत आहे ती. त्या गोडीपासून मला फार आनंद झाला होता; तोच हा आनंद." 'तोच हा आनंद', 'तेंच हें सुख', असा निर्णय मनानें दिल्याखेरीज कोणतेंतरी सुख अथवा आनंद आपल्या प्रत्ययाला येतो काय ? असा प्रश्न आहे. मला म्हणायचें आहे कीं, **आपलीं सर्व सुखें ओळखीचीं असतात. तीं कुठेंतरी पूर्वी आपल्याला भेटलेलीं असतात.** त्या सुखाशीं पूर्वी झालेला परिचय केव्हां समोरासमोर झालेला असतो; तर कांहीं वेळां कल्पनेनें म्हणजे इतरांचें वर्णन अथवा पुस्तकांतले शब्द ऐकून तो करून घेतलेला असतो. एखाद्या सुखापैकीं कांहीं भाग प्रत्यक्ष अनुभवाचा, तर उरलेला संपूर्ण भाग उसनवारीचा. असाहि प्रकार आढळतो. हा संपूर्ण भागहि एकाच ठिकाणाहून येतो असें नाहीं. निरनिराळ्या अनुभवांचे तुकडे गोळा करून ते एकत्र केले जातात. सारांश असा कीं जें सुख मला आतांच मिळालें असें आपण समजतों, तें अथवा त्याचे निरनिराळे भाग आपल्याला आधीच परिचित असतात. म्हणजे प्रत्येक सुखाचा अनुभव, ही कोणत्यातरी गतसुखाची पुनरावृत्ति असते. 'नवें सुख मला मिळालें,' असें क्वचित् आपण म्हणतों; पण तें खरें नसतें. पुनरावृत्तीमध्येंच हा भास निर्माण करण्याचें सामर्थ्य असतें.

"प्रथम जिलबी चाखतांना जो अनुभव येतो त्याचें काय ?" अशी शंका वाचकांच्या मनांत आली असेल. खरें म्हटलें तर, कोणतातरी गोड पदार्थ जन्मांत **प्रथम** चाखला असेल तेव्हांचें काय, अशा अर्थाचा हा प्रश्न आहे. कारण वर सांगितलेंच आहे कीं, अनेक अनुभवांच्या स्मृतींचें एकीकरण करूनहि आपलें भागतें. पंचविषयांपैकीं एखाद्या विषयाशीं आपला प्रथम संपर्क येतो, तेव्हां काय होतें ? हा प्रश्न असा आहे कीं, त्याचें उत्तर आपणांला देता येत नाहीं. कारण,

ही अवस्था बाल्यावस्थेंतच येऊन गेली. आपल्या स्मृतींत या प्रश्नाचें उत्तर सांपडत नाहीं. पण यामुळें फारसें बिघडत नाहीं. कारण हल्लीं आपल्या जीवनांत ज्या सुखांचा (अथवा तीं न मिळाल्यामुळें ज्या दुःखांचा) प्रश्न आहे, तीं सर्व पूर्वपरिचित अशींच आहेत; व या सुखांना स्वतंत्र अस्तित्व आहे काय, हा विचार आपल्यापुढें आहे.

पंचविषय ज्या संवेदना देहांत अगर इंद्रियांचे ठिकाणीं निर्माण करतात, त्या कोणीच नाकारीत नाहीं. पण या संवेदना पहिल्या क्षणांतच संपून जातात. नंतर जें सुरू होतें तें महत्त्वाचें आहे. भारतीय न्यायशास्त्रांत 'अनुकूलवेदनीयम् सुखम्' अशी व्याख्या केली आहे. पहिल्या क्षणांत जी इंद्रियांना सुखसंवेदना होते, तिला अनुलक्षून ही व्याख्या असावी. पण या संवेदनेची व स्मृतीची दुसऱ्या क्षणांतच गांठ पडते; स्मृतीच्या मदतीनें तिची 'जुनी ओळख' पटते; त्याच क्षणांत तिसरी मैत्रीण भाषा तेथें हजर होते व एकदां का संवेदनेचें वर्गीकरण व नामकरण (classification and naming) झालें कीं, मग "अमकें सुख मला मिळालें" असें आपण म्हणूं लागतों. याचा अर्थ असा कीं, इंद्रियांना होणारी संवेदना हें पुनरावृत्तीकडे वळण्याकरतां फक्त निमित्त असतें तें निमित्त मिळतें केव्हां याची आपण सारखी वाट पाहात असतों.

जीवनांत घटना जशा घडतील तशा घडूं द्याव्यात, अशी मुळीं आपली भूमिकाच नसते. येतील तसे अनुभव--ज्ञानेश्वर म्हणतात तसे 'अवसरें करूनि प्राप्त' असतील तसे अनुभव घेण्याची आपली तयारी नसते. आपणांला अनुभव कशाकरता पाहिजे असतात? तर त्यांनीं गत अनुभवांची आठवण द्यावी म्हणून. हें एकदां ठरलें कीं, मग जीवनाचा तोंडवळाच बदलतो. सुखाची कल्पना बदलते. सर्वं कांहीं बदलतें.

'सुखाचा अनुभव' असें ज्याला आपण म्हणतों, तो चालूं असतांना वर सांगितल्याप्रमाणें जुन्या अनभवांचें नांव देऊन आपण पुनरावृत्ति करतों हें स्पष्ट झालें तरी प्रश्न असा उद्भवतो कीं, यांत बिघडलें काय? पहिलें बिघडलें असें कीं, घटना जशी घडते तशी न पाहतां तिच्या रंगरूपांत आपण आपल्या सोयीप्रमाणें बदल केले; व तिचें असत्य स्वरूप कवटाळून बसलों. दुसरें बिघडलें असें कीं, पुनरावृत्तीची यंत्रणाच अशी आहे कीं, ती एकदां चालू झाली कीं हव्यासाला जन्म देते. संवेदनेला एकदां का कोणत्यातरी सुखाचें नांव मिळालें कीं, तें अधिक हवें, आणखी दुसऱ्या वेळेला हवें, कायमचें हवें, असें वाटायला लागतें. नामकरणानें स्मृतींत सुख सांठविण्याची सोय होते; व या सोयींतूनच विचार (thinking) उद्भवतो. या सुखविचारांतून जिला आपण 'वासना' म्हणतो ती सुरू होते. सुखाला जें आकर्षक स्वरूप प्राप्त होतें तें खरोखर विचारांतून येतें. विचाराच्याच

ठिकाणीं माणसाला सुखाकडे ढकलण्याचें सामर्थ्य आहे. आपण समजतों कीं, जी वस्तु सुखद असते त्या वस्तूमध्यें हें सामर्थ्य आहे. तसें दिसत नाहीं. म्हणूनच कृष्णमूर्ति म्हणतात, "विचारांतून सुखसंवेदना निर्माण होते." (Thought is sensation.)

पुनरावृत्ति अनेक तऱ्हेनें माणसाचा छळ करते. हें मनोरंजक उदाहरण पाहा. मी सकाळीं उठलों. नुकतेंच स्वप्न पडलें होतें. त्या स्वप्नांत मी झोंपाळ्यावर बसलों होतों, झोंपाळा मोठ्या दिवाणखान्यामध्यें बांधला होता. या दोन गोष्टी मला चटकन् आठवल्या. पण दिवाणखान्यांतलें फर्निचर कांहीं आठवेना. तसेंच तो बंगला दुमजली का तिमजली, हेंहि नीटसें आठवेना. माझा पोषाख कसा होता, हेहि स्मरणांत येईना. मग मी करतों काय ? झोंपेंतून उठल्यानंतर एक तासभर जरी मी प्रातर्विधि, स्नान वगैरे उरकीत असतों तरी माझ्या मनाचा उद्योग निराळाच चालूं राहतो. स्वप्नघटनांचा जो तपशील आठवत नाहीं तो आठवण्याचा प्रयत्न करीत, मी इतर कामें करतों. "हें कां आठवत नाहीं ? तें नक्की काय बरें असेल ?" असे प्रश्न विचारून मी मनाला अगदीं बेजार करतो. या घटना पूर्ण साग्रसंगीत आठवून माझा फायदा काय, हा विचारच मला शिवत नाहीं. अर्धें लक्ष आठवणी हुडकण्यांत व अर्धें घरांतल्या माणसांकडे, असें कित्येकदां होतें. मनाला हा असा चाळा कां लागतो ? स्वप्नाबद्दल हा उद्योग मी नेहमींच करतों; अशांतला भाग नाहीं. पण मनाची ही एक प्रवृत्ति आहे. केव्हां स्वप्नाबद्दल, तर केव्हां काल केलेल्या कामाबद्दल, केव्हां भेटलेल्या प्रिय व्यक्तीबद्दल, तर केव्हां रागानें पाहात पाहात रस्त्यानें निघून गेलेल्या प्रतिस्पर्ध्याबद्दल, माझें मन सहज न आठवणारा तपशील शोधून काढण्याच्याच खटपटींत असतें. स्वप्न खोटें व म्हणून निरुपयोगी हें बऱ्याच वेळां माझ्या लक्षांत येतें; व ती खटपट थांबते. पण गतघटनांच्या आठवणींबद्दल काय ? त्या मीं संपूर्ण थांबविल्या असें कधीं घडतच नाहीं. या आठवणींत मी सदैव रमतों. असें कां ? त्या आठवणी जें जग उभें करतात तें जग सत्य का आहे ? का निराळ्या अर्थानें तीहि एक **स्वप्नसृष्टीच** आहे.

कृष्णमूर्ति म्हणतात,

"Thought moves through the present to the future and back again; like a restless animal tied to a post, it moves within its own radius, narrow or wide, but it is never free of its own shadow. This movement is the occupation of the mind with the past, the present and the future. *The mind is the occupation..... Occupation gives to the mind a feeling of activity, of being alive.* That is why the mind stores up or renounces; it sustains itself with occupation. The mind must be busy with something. What it is busy with is of little

importance; the important thing is that it is occupied, and the better occupations have social significance.

(*Commentaries on Living* (1956) p. 167).

आठवणींचें जग हें खरोखरच स्वप्नसृष्टीसारखें असत्य आहे. पण मग मी तें सोडीत कां नाहीं ? तर्कानें सहज पटण्यासारखी ही गोष्ट आहे. असें असूनहि या जगांतला मुक्काम मी हालवीत कां नाहीं ? याचें कारण असें आहे की, मनाचा मनपणा. " मी जिवंत आहे " ही भावनाच मुळीं कोणतीतरी अठवण अथवा विचार मनांत चालू असण्यावर मीं अवलंबून ठेवली आहे. या स्थितीखेरीज दुसरी स्थिति आपण पाहिलेलीच नाहीं. म्हणून " कसलें का चिंतन असेना, तें आम्हाला चालू ठेवू द्या !" असा आपला आग्रह असतो. कारण मनाची चिंतन-रहित अवस्था ही एक भयंकर पोकळी आहे, असें आपणांला वाटतें.

एकूण असें दिसतें कीं, जेव्हां आपणांला सुख मिळतें असें वाटतें तेव्हां तें खरोखर पुनरावृत्ति (recognition) करायला मिळाली, याबद्दलचें समाधान असतें. तसेंच सुखाचा अनुभव येत नसतांना देखील आपलें मन, पुनरावृत्तीच्याच मागें लागतें. जें होऊन गेलें तें कसकसें झालें, जें दिसलें त्याचीं अंगप्रत्यंगें काय होतीं, कशीं होतीं, याचाच विचार करीत मन बसतें.

" एखाद्या गंभीर विषयाचा अगर समस्येचा साधकबाधक असा विचार आम्ही करतों, तेव्हां त्यांततरी पुनरावृत्ति नसते ना ?" असा प्रश्न वाचक विचारतील.

या प्रश्नाचेंहि उत्तर आपल्या अपेक्षेप्रमाणें नाहीं. व्यवसायांतले प्रश्न, अथवा बाह्य परिस्थितीशीं मुकाबला करतांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याकरतां जो विचार करावा लागतो, त्यांत पुनरावृत्ति होतेच. कांहींतरी आठवावें लागतें; व ती स्मृति सांगेल त्याप्रमाणें कृति करावी लागते. हें **सर्व अपरिहार्य** आहे. पण आंतरजीवनांत अगर समाजजीवनांत जे संघर्ष उत्पन्न होतात, ते मिटविण्याकरतां कांहींतरी **नवीन** विचार आम्ही करतों, समस्येचें उत्तर **नवें** शोधून काढतों, अशी जी आपली समजूत आहे, तीहि खोटीच दिसते. आपण कांहीं उदाहरणें घेऊं.

" समाजाची आर्थिक रचना कशी असावी ?" हा प्रश्न विचाराकरता घेऊं. दोन मित्र या विषयावर बोलत आहेत व सत्यसंशोधन हाच त्यांचा हेतु आहे, अशी कल्पना करूं. एकजण मार्क्स काय म्हणतो अथवा मार्क्सवादाचा अर्थ अमक्या विचारवंतानें कसा स्पष्ट केला आहे हें सांगेल; तर दुसरा मार्क्सवादांतल्या चुका कोणातरी तज्ज्ञानें दाखविलेल्या कशा बरोबर आहेत, हें सांगेल. प्रथमच लक्षांत येतें कीं, अशा वादांत, जो विचार वाचलेला असतो तोच माझा विचार, अथवा

माझें मत, म्हणून मांडण्यांत येतें. मला आवडणारें 'पुस्तकांतलें सत्य' हेंच सृष्टींतलेंहि शाश्वत सत्य आहे, असा आग्रह धरण्यांत येतो. कित्येक वेळां, "हें मत अमक्यानें मांडलें आहे," असा उच्चार न करतां, तें माझेंच मत म्हणजे 'मीं शोधलेलें सत्य आहे.' असें सांगितलें जातें. केव्हां हें जाणूनबुजून केलें जातें; तर केव्हां माझ्या एकंदर तर्कपद्धतीवर कुणाच्यातरी लेखनाचा अथवा भाषणाचा एवढा प्रभाव पडलेला असतो कीं, मी जरी शब्द बदलून त्यांतले विचार मांडतो, तरी ते विचारहि माझेच आहेत, असें मला वाटतें. लोकांनाहि तसेंच वाटतें. या सर्व प्रकरणांत सत्यसंशोधन नसतें, फक्त पुनरावृत्ति असते. "मीं हें तर्कानें शोधून काढलें," असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां त्याचा अर्थ इतकाच असतो कीं, **कुणाला तरी सांपडलेलें सत्य निराळ्या शब्दांत कसें मांडावें, हें मी शिकलों.** हा उद्योग करतांना, एकाच्या विचाराला दुसऱ्याच्या विचाराचीं ठिगळें मी जोडूं शकतों. कारण पुनरावृत्ति ही हुबेहुब जशीच्या तशी नसते. पुनरावृत्तीच्या नाटकांतसुद्धां प्रयोगाच्या सोयीसाठीं फेरबदल करण्याचे सर्व अधिकार असतात.

कित्येकदां असें वाटतें कीं, सुसंगत व मुद्देसूद विचार करतां येणें, हें माणसाचें भूषण नाहीं; त्याच्या बुद्धींतलें तें व्यंग आहे. (याचा अर्थ असा नाहीं कीं, वेडचा माणसाप्रमाणें विसंगत अथवा अव्यवस्थित विचार करावा. सुसंगतपणाला बांधलेली बुद्धि असूं नये, एवढेंच म्हणावयाचें आहे.) "मी एकदां बोललों तें कायमचें, त्यांत बदल होणार नाहीं," असें जेव्हां मोठ्या दिमाखानें सांगितलें जातें, तेव्हा अपरिपक्व बुद्धीचाच तो आविष्कार असतो. जें पूर्वी सांगितलें त्याला चिकटून राहिलों नाहीं तर मी भलतीकडेच वाहावत जाईन अशी भीति मनांत असते. या भीतीमुळेंच माणूस पुनरावृत्तीला बांधून घेतो. "नको तें नवें, त्यांत धोके फार; त्यापेक्षां जुनेंच धरून बसावें, त्यांत सुरक्षितपणा आहे," असें आपलें मन सारखें बजावीत असतें. (हा अनुभव वृद्धपणीं विशेष येतो.) 'महान् क्रांतिकारक' म्हणून ज्याचा लौकिक असतो, त्याच्याच ठिकाणीं स्वतःच्या पूर्व वयांतल्या विचारांचा असा अभिमान उत्पन्न होतो कीं, त्यांची पुनरावृत्ति हेंच त्याचें जीवितकार्य बनतें. तसेंच त्याचे अनुयायीहि त्या जुन्या विचारांचें चर्वितचर्वण करण्यांत धन्यता मानतात. 'अंधेनैव नीयमाना यथांधाः' असा हा प्रकार. सारेच पुनरावृत्तीचे बंदे गुलाम !

भीति, काळजी, राग, यासारखे मनाला सतावणारे प्रश्न–ज्यांना आपण जीवनांतल्या समस्या (psychological problems) म्हणतों.––सोडवितांना जर पुनरावृत्तीचा आश्रय केला तर जास्तच अनर्थ ओढवतो. सुटका होत नाहीं; पण केव्हांतरी सुटका होईल, अशी आशामात्र सारखी वाटत राहते. **या आशेवर माणूस जगतो; म्हणजे पुनरावृत्तीचा उद्योग सतत चालूं ठेवतो.** रागाचें उदाहरण घेऊं.

रागाचेंच परिणत स्वरूप म्हणजे द्वेष; व तो कृतींत प्रगट होऊं लागला म्हणजे तिला आपण 'हिंसा' म्हणतों. हा हिंसेचा प्रश्न मानवजातीला हजारों वर्षें त्रस्त करीत आहे. "हिंसा नको," हा उपदेशहि हिंसेबरोबरच जन्माला आला असला पाहिजे. असें असूनहि आपल्या चित्तांतली हिंसा निपटून कां निघत नाहीं ?

"पुनरावृत्तीचें आकर्षण," हेंच या प्रश्नाचें उत्तर आहे. स्मृतियंत्राचे कांहीं फायदे आहेत; तसे तोटेहि आहेत. हें यंत्र सारखें चालूं राहावें, तें कधीं बंद पडूं नये, असें माणसाला सतत वाटत असतें. हा खरा शाप आहे. "काल आलेला राग फार वाईट; मी माझा राग हळूहळू जिंकणार आहे," असें जेव्हां मी म्हणतों, तेव्हां त्याचा अर्थ रागाची पुनरावृत्ति मला सोडायची नाहीं, असा असतो. रागापासून चित्तांत जो प्रक्षोभ निर्माण होतो, त्यांत एक प्रकारचें सुख (sensation) असतें; व तें मला हवें असतें. **कोणत्याहि सुखाचा एक धर्म लक्षात ठेवला पाहिजे. तो हा कीं, त्याची स्मृति, तें पुन्हां मिळावें, असें वाटायला लावते.** राग सुटत नाहीं याचें कारण, या स्मृतीचें आपण गुलाम होतों. रागाचे दुष्परिणाम काय होतात, याबद्दलचें जमा केलेलें ज्ञानहि उपयोगाला येत नाहीं. हें ज्ञान म्हणजे इतरांच्या शब्दांची पुन्हां पुनरावृत्ति ! इकडे, मनाचा गाभा त्या प्रक्षोभाच्या सुखांत अडकलेला; आणि वरच्या बाजूस मात्र तें शब्दज्ञान, अशी स्थिति असते. प्रक्षोभाच्या सुखापासून मनाला अलग होतां आलें पाहिजे. त्याकरतां **रागाच्या क्षणांतच** अशी कांहीं क्रिया झाली पाहिजे कीं, राग स्मृतियंत्रांत न शिरला पाहिजे. म्हणजे, "हाच तो माझ्या ओळखीचा राग; धर्मग्रंथांतून सर्वांत मोठा रिपू म्हणून ज्याचें वर्णन केलें आहे तोच हा राग," असे उद्गार मनानें न काढले पाहिजेत. चांगलें–वाईट, सद्वासना-दुर्वासना असें एकदां नामकरण (naming) झालें कीं, स्मृतियंत्राचा उपद्रव सुरूच झाला. राग आला कीं, समर्थन करणें अथवा दूषण देणें यांपैकीं कोणतीतरी क्रिया सुरू होते. हा विचार (thinking) मनाला गुंतवून टाकतो. रागाबद्दल कांहींतरी **नवे उत्तर**, हा विचार घेऊन येईल अशी आशा प्रत्येक वेळीं वाटते. पण विचार नेहमीं भूतकालांतून येतो हें आपण विसरतों. रागासारख्या समस्या सोडवितांनाहि पुनरावृत्तीचें गंजलेलें व मुंडलेलें हत्यारच आपण वापरतों. त्याचा कांहींहि उपयोग होत नाहीं. कृष्णमूर्तीचे हे शब्द पाहा:–

"..... If you are ambitious, you say you will gradually change—that has been the habit which society approves : Society has invented all kinds of ways and means to get rid of your ambition slowly—; and yet at the end of your life you are still ambitious, you are still in conflict–which is so utterly infantile, immature. What is maturity is to face the fact and end it immediately. And you can end it immediately *when you observe the fact without*

thought, without knowledge. Knowledge is the accumulation of the past from which thought springs; and therefore–thought is not, the way to bring about mutation, *thought prevents mutation.*

(*Talks in India* (1962) page 118)

एकूण काय, तर जीवनांत पुनरावृत्तीशिवाय दुसरें कांहीं आपण करीतच नाहीं. "पुनरावृत्तीच्या या शापापासून मुक्तता कशी व्हावी ?" हाच काय तो मुख्य प्रश्न आपणांपुढें आहे.

* * *



चार

काळजी

लहानपणीं एका जाहिरातींत मी एक संस्कृत श्लोक वाचला होता. 'चिंतासमम् नाऽस्ति शरीरशोषणम्,' असा त्याचा एक चरण होता. श्लोक सर्वांनाच ठाऊक आहे. ही जाहिरात देणाऱ्यानें मात्र त्याचा उपयोग मोठ्या हुशारीनें केला होता. ह्या श्लोकाचा आधार घेऊन वाचकांना त्यानें असें सुनावलें होतें कीं, कां उगाच मधुमेहाची काळजी करतां व जास्तच खंगत जातां? मधुमेहावर रामबाण औषध असतांना, काळजी करत बसणें हें मूर्खपणाचें नाहीं का? त्या औषधाबद्दल तेव्हां फारसें कुतूहल मला वाटलें नाहीं; व जाहिरात देणाऱ्याची "औषध खपावें कसें?" ही चिंता कमी करण्यास मी हातभार लावला नाहीं. पण या श्लोकानें मात्र माझ्या मनांत कायमचें स्थान पटकावलें आहे.

लहानपणापासूनच माणूस कसलीतरी काळजी करण्यास शिकूं लागतो. ही विद्या त्याला कोण शिकवतें? बालवयांत अथवा तारुण्यांत काळजी तितकी भासत नाहीं. पण माणूस प्रौढ वयांत पाऊल टाकतो न टाकतो तोंच त्याला कळूं लागतें कीं, चित्ताचा बराचसा भाग काळजीनें व्यापला आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, दर क्षणाला माणूस काळजीनें हैराण होतो. पण एवढें खरें कीं मधून मधून ही काळजी अशा तऱ्हेनें बोचते कीं, ती चित्तांत खोल कुठेतरी कायमची रुतून बसली आहे, अशी आपणांला जाणीव होते. काळजीचें बीज अंतःकरणांत प्रथम

कसें पेरलें जातें ? त्याला खतपाणी कसें मिळतें ? त्याचें पोषण एवढ्या प्रमाणांत होईपर्यंत हा 'रोग' आपल्या ध्यानांत कसा येत नाहीं ? हे सर्वच प्रश्न फार महत्त्वाचे आहेत. वार्धक्यांत तर, ही काळजी माणसाला सतत सतावणारी वैरीण बनते आणि मग तिच्यापासून सुटका होईल का, असा विचार माणूस करूं लागतो.

जेव्हां एखादी काळजी आपणांला लागते, तेव्हां आपल्या चित्ताचे व्यापार कशा तऱ्हेनें होऊं लागतात ? या प्रश्नाचा, आपण स्वतःशींच विचार करूं लागलों तर प्रथम असें नजरेस येतें कीं, एक ठराविक कल्पना आपल्या मनांत एकसारखी पुन्हां पुन्हां येऊं लागते व त्या कल्पनेनें आपल्या मनाच्या दालनांत पाऊल टाकलें कीं, तिचे मागोमाग अनेक प्रक्षोभक विचार येऊं लागतात. या विचारांचा विस्तार पुढें पुढें एवढा मोठा होतो कीं, आपण अगदीं बेचैन होऊन जातों. अशा तऱ्हेनें त्या पहिल्या कल्पनेनंतर येणाऱ्या विचारांमध्यें असें कांहीं सामर्थ्य असतें कीं, भीतीनें आपली गाळण उडून जाते या विचारांची संख्या अमर्याद असूं शकते; व त्यांच्या शृंखलेंत एकदां का चित्त अडकलें कीं, मग किती काळ त्या भयग्रस्त अवस्थेंत जाईल, हें सांगतां येत नाहीं या शृंखलेंत मनाचा गाभा अडकलेला असतांनासुद्धां, आपण नित्याचे दैनंदिन व्यवहार उरकू शकतों; पण आपली आपल्याला सारखी जाणीव होत असते कीं, आपलें चित्त इतर कशांतच रमत नाहीं व कोणतेंहि काम हातून चांगलें होत नाहीं. आपलें खरें लक्ष त्या कल्पनेंत व तज्जन्य शृंखलेंत असतें. असा बराच काळ जाऊं लागला व या शृंखलेची व आपली गांठ वरचेवर पडूं लागली कीं, आपण समजतों कीं, 'काळजीनें आपल्या चित्तांत घर केलें आहे' व लोकहि म्हणू लागतात, "याला कसलातरी हृद्रोग लागला आहे."

लोक काय म्हणतात याला फारसें महत्त्व नाहीं; पण काळजीनें एकदां का माणसाची सोबत केली कीं, त्याचें सारें जीवन काळवंडून जातें. त्याला कशांतच उत्साह, आनंद वाटत नाहीं; तो नुसते दिवस मोजीत असतो. ही अशी जी काळजी माणसाला लागते, ती आयुष्यभर एकाच विषयाची असते अशांतलाहि भाग नाहीं. कांहीं माणसांना वर्षानुवर्षें एकाच काळजीनें घेरलेलें असतें, तर दुसरें कांहीं असे असतात कीं, त्यांच्या आयुष्यांत, "आज ही काळजी तर उद्या ती काळजी," असा प्रकार असतो.

"कांहीं माणसांना काळजी कशी ती माहीतच नसते," असें आपण केव्हां केव्हां म्हणतों व त्यांचा मनांतून हेवा करतो. पण ही गैरसमजूत आहे. अशा माणसाची काळजी आपल्या काळजीइतकीं तीव्र असल्याचें बाहेरून दिसत नाहीं, एवढाच त्याचा अर्थ असतो.

मनांत पुन्हां पुन्हां हट्टानें प्रवेश करणारी, वर सांगितलेली ठराविक कल्पना, हीच काळजीचें बीज आहे. त्या बीजाचाच पुढे मोठा वृक्ष होतो, व त्याची कृष्ण-

छाया साऱ्या जीवनावर पडते. काळजीचें हें बीजारोपणच होऊं न दिलें तर ? पण हें शक्य आहे का ?

काळजीला जन्म देणारी वर दर्शविलेली कल्पना मुळांत कशी उद्भवते, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. प्रथम आपण श्रीमंत माणसांच्या काळजीचा विचार करूं. " त्यांना कसली काळजी ?" असा प्रश्न एकदम वाचकांच्या मनांत उभा राहिला असेल; पण श्रीमंत माणसेंहि काळजीनें वाळतात, हें आपण पाहतों. काळजी नेहमीं भविष्यकालाविषयीं असते. आजची श्रीमंती कायम राहील का ? सरकारी कायद्यामुळें तिच्यांत कमीपणा येईल का ? इतरांच्या आक्रमणापासून तिचें रक्षण करतां येईल का ? मुलें कर्तबगार निघालीं नाहींत तर ती टिकेल का ? आपल्या श्रीमंतीला अनुरूप असा लौकिक व बडेजाव, आपल्या वांट्यास सतत येत राहील ना ? श्रीमंतीचा चांगला उपभोग घेण्यासारखी प्रकृति शेवट-पर्यंत राहील ना? शतायुषी होतां येईल ना, कां अकालींच हें सर्व सोडून जाण्याचा प्रसंग येईल ? अशा अनेक काळज्या श्रीमंतांनासुद्धां हैराण करीत असतात. आतां येथें प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, या साऱ्या काळज्या त्यांनीं कां कराव्या? कोणत्या आग्रहांतून त्यांचा उगम होतो ? या श्रीमंत सद्गृहस्थांचा आग्रह एकच असतो; आणि तो हा कीं, त्यांनीं आपल्या मनांत स्वतःबद्दलची जी प्रतिमा (image) उभी केलेली असते, तिला कदापिहि धक्का लागतां उपयोगी नाहीं. ही प्रतिमा बाहेर दिसत नाहीं, पण तिनें त्यांच्या चित्तांत कायमचें ठाण मांडलेलें असतें; आणि असा एकहि क्षण नसतो कीं, जेव्हां ती प्रतिमा त्यांच्या मनश्चक्षूंसमोर नसते. प्रत्येक क्षणांतलें त्यांचें बोलणें, वागणें आणि विचार करणें, हें सर्व त्या प्रतिमेला अनुलक्षून असतें. मिनिटामिनिटाला ते एवढेंच पाहात असतात कीं, प्रतिमा कोणत्यातरी बाजूला डागळली जात नाहीं ना ? हें पाहतांना त्यांच्या जीवाची जी तगमग होत असते, ती काळजी नाहीं तर दुसरें काय आहे ? ' उद्यांची भ्रांति ' म्हणून आपण गरीब माणसें ज्या अर्थानें समजतों, त्या अर्थानें त्यांना नसेल; पण म्हणून काळजीपासून श्रीमंत माणसें मुक्त असतात, असें थोडेंच आहे ?

श्रीमंत माणसांच्या काळजीचा विचार प्रथम एवढ्याचकरतां केला कीं, **एका गैरसमजुतीनें या युगाला पछाडलें आहे.** " मानवी जीवनांतले आर्थिक प्रश्न सोडवा, मग काम झालेंच. सर्व माणसें सुखी होण्याचीं ही एकच हमी आहे. " अशा तऱ्हेचे सिद्धांत चालू काळांत लोकमान्यता पावलेले आहेत. या प्रचारामुळें सर्वसामान्य माणसालाहि असें वाटूं लागतें कीं, आर्थिक समस्या ही एकच समस्या माझ्या जीवनांत आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. आर्थिक दृष्टीनें अगदीं सामान्य परिस्थितींतला माणूस घेतला तरी त्याच्या जीवनांतली मुख्य समस्या ही अर्थविषयक नसते. मानवी जीवनांतलीं सुखदुःखें हीं, एका निराळ्याच कारणानें उत्पन्न होत असतात. आपण

असें समजतों कीं, धनाशेनेंच सर्व माणसांना गुलाम केलें आहे. "धन आहे तर सर्व कांहीं आहे. दारिद्र्य हें सर्व दुःखांचें मूळ आहे." अशीं विधानें आपण ऐकतों. पण रोगाच्या फक्त कांहीं बाह्य लक्षणांवरून केलेलें असें, हें चुकीचें निदान आहे. धनाचें मानवी जीवनांतलें नक्की स्थान कोणतें या विषयाकडे न वळतां, फक्त काळजीपुरताच जर आपण विचार करूं लागलों तर एवढें ठाम दिसतें, कीं खरोखर रोजच्या भाकरीची चिंता ज्यांना आहे अशीं सर्व माणसें जरी वगळलीं, तरी राहिलेलीं बाकीचीं माणसेंसुद्धां, कशाची ना कशाची तरी काळजी करीतच असतात. मग हें असें कां व्हावें ?

धनाचा आणि काळजीचा अपरिहार्य असा संबंध दिसत नाहीं. जरुरीपुरतें धन न मिळाल्यामुळें, त्याबद्दलची काळजी बरींच माणसें करीत असतात हें आपण पाहतों; पण एवढ्यावरून काळजीचें खरें कारण सांपडलें असें म्हणतां येणार नाहीं. फार तर असें म्हणूं कीं, वरील वर्गांतल्या माणसांच्या काळजीनें धनाच्या अभिलाषेचें रूप धारण केलें आहे. गरीब-श्रीमंत सर्वच माणसांना ज्याअर्थीं काळजीची व्यथा आहे, त्याअर्थीं तिचें मूळ कारण दुसरीकडेच शोधलें पाहिजे.

मनुष्य काळजी करतो ती एकाच गोष्टीची; व ती म्हणजे त्याच्या प्रतिमे-(image) च्या संरक्षणाची. लहानथोर, उच्चनीच, दरिद्री–श्रीमंत, विद्वान्-अविद्वान्, सत्ताधीश–गुलाम, कोणत्या का वर्गांतला माणूस असेना, **प्रत्येकानें आपल्या हृदयांत एक प्रतिमा जतन करून ठेविली आहे.** माणूस आपल्या शरीराच्या गरजा भागवतो; पण त्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक लक्ष, तो या त्याच्या आवडत्या प्रतिमेच्या गरजांकडे पुरवितो.

या प्रतिमेला धक्का लागेल असें, भोंवतालच्या परिस्थितींत जेव्हां कांहींतरी घडूं लागतें, तेव्हां त्याच्या चित्तांत काळजी प्रवेश करते; आणि क्षणाक्षणाला त्याच्या मनांत एकच विचार उठतो. तो हा कीं, "माझें जीवन ज्या पद्धतीनें जावयास पाहिजे असें मीं ठरविलें आहे, म्हणजे जी माझी स्वतःची प्रतिमा हृदयांत आहे, तिच्यांत कांहीं बिघाड तर होणार नाहीं ना ? तसें जीवन जर मला जगतां आलें नाहीं, तर जगण्यांत अर्थ काय ?" वर, जी ठराविक कल्पना मनांत एकसारखी येऊं लागते, असें म्हटलें आहे ती कल्पना ही अशा प्रकारची असते. या कल्पनेच्या मागोमाग, जे तिचे सवंगडी असे इतर प्रक्षोभक विचार, मनांत शिरतात त्यांचें स्वरूप थोडेसें भिन्न असतें. वरील प्रतिमेची मोडतोड किती प्रकारांनी होऊं शकेल, ही गोष्ट नजीकच्या काळांत होईल का त्याला बराच वेळ लागेल, आपल्या प्रतिमेवर प्रहार करणारे इतके उलटचा काळजाचे कसे, ते इतके कृतघ्न कसे, त्यांना धडा शिकवावयास नको का, असे अनेक प्रश्न माणूस स्वतःलाच विचारूं लागतो; व या प्रश्नांची मालिका इतकी लांबते कीं, बोलण्याची सोय नाहीं.

भविष्यकाळाचें चित्र त्याच्या डोळ्यांसमोर फारच भयानक असें दिसूं लागतें. माणूस हे जे नंतरचे विचार करूं लागतो, ते सर्व फारच अतिरंजित असे असतात. त्याच्या प्रतिमेचा जवळ आलेला मृत्यु म्हणजे जणू जगाचा प्रलयकाळच, असें तो समजतो. माणसाच्या हृदयांत ही जी प्रतिमा असते ती कशी निर्माण होते, याचा विचार करण्यापूर्वी काळजी लागलेल्या माणसाच्या मनाची क्रिया बऱ्याच वेळां एखाद्या यंत्राप्रमाणे कशी होते, हें पाहणें अगत्याचें आहे. गणकयंत्रांच्या (computors) या युगांत, माणसाचा मेंदू कोणत्या पद्धतीनें आपलें काम करतों, हें समजून घेणें सोपें झालें आहे. मेंदूचे कांहीं व्यापार तरी कोणत्या तऱ्हेनें होतात, हें गणकयंत्रावरून सहज समजतें. गणकयंत्रांत ज्याप्रमाणें माहिती (data) भरून ठेवलेली असते, त्याचप्रमाणें आपल्या मेंदूत स्मृतींचा साठा करून ठेवलेला असतो. या स्मृतिसंचयांतच, मला वाटतें, कल्पना (ideas) मिसळलेल्या असतात. गत घटनांचे जे अवशेष स्मृतींच्या रूपानें मेंदूंत सांठविलेले असतात, त्या प्रत्येक स्मृतीला चिकटलेली अशी एक कल्पना (idea) असते; व **ही कल्पना ती स्मृति दुःखद का सुखद, भयप्रद का उत्साहवर्धक, हें ठरवीत असतें.** जेव्हां एखादी स्मृति, नवीन दिसलेल्या घटनेमुळें, उत्तेजित होते तेव्हां ती एकटी कधींच बाहेर येत नाहीं. ती तिचेशीं संलग्न असलेल्या कल्पनेसह बाहेर येते. यानंतर आणखी असें दिसतें कीं, मेंदूमध्ये दडून बसलेल्या स्मृतींना एक संवय लागलेली आहे. ती अशी कीं, सारख्या तोंडावळ्याच्या आठवणी या बहिणीप्रमाणें एकमेकींचा हात धरूनच कायमच्या बसलेल्या असतात त्यामुळें कोणतीहि स्मृति बाहेर आली कीं तिचे पाठोपाठ तिची बहीण आलीच असें समजावें. यापुढची गोष्ट अशी कीं, मेंदूला एकाच प्रकारच्या आठवणी बाहेर काढण्याचें काम सतत दिलें तर त्या मेंदूचा यांत्रिकपणा (mechanical action) इतका वाढतो कीं, थोडासा स्पर्श होण्याचा अवकाश, क्षणार्धांत ठराविक छापाच्या असंख्य स्मृति, त्यांना चिकटलेल्या कल्पनांसह, बाहेर येतात; व आपले तांडवनृत्य सुरू करतात. हें सर्व इतक्या त्वरेनें होतें कीं, माणूस असें समजू लागतो कीं, श्वासोच्छ्वासासारखी न कळत (unconsciously) होणारी, माझ्या मनाची ही स्वाभाविक अवस्था आहे.

एकदां का चित्तांत, 'माझी प्रतिमा मोडून पडण्याच्या बेतांत आहे,' असा विचारानें ठाण मांडलें कीं, मग तो विचार सारखा बळावत जातो; व त्या विचाराचा मनांत पुन्हां पुन्हां होणारा प्रवेश, त्यामागून येणाऱ्या स्मृति व संलग्न कल्पना, आणि डोळ्यांपुढें बदलून पण भयानक असेंच सतत उभें राहणारें भविष्यकालाचें चित्र, **या सर्वांना मिळून काळजी, असें नांव आहे.** वरील विचारामुळें, ज्या स्मृति जागृत होतात त्या, नुसत्या गतघटनांचे सत्यस्वरूप दर्शविणाऱ्या असत्या तर कांहींच बिघडलें नसतें. पण स्मृतींना चिकटलेल्या कल्पना त्यांचें स्वरूपच विपरीत करून

टाकतात. जें झालें, होऊन गेलें, तें लहान असलें तरी फारच मोठें होतें, असें भासूं लागतें. त्याचे रंग फिकट असले तरी ते फारच भडक वाटूं लागतात. त्या घटनांतून खरोखर पुढें कांहींहि परिणाम होण्यासारखे नसले तरी, कांहींतरी भयंकर उत्पात हमखास होणार, असें वाटूं लागतें.

काळजीचा रोग बहुतेक सर्वच माणसांना असतो. पण तो प्रमाणाबाहेर वाढला व शरीराचें शोषण करूं लागला, तरच त्या रोगाची रोग्याला व इतरांना जाणीव होते. अशा चिंताग्रस्त माणसाला हरतऱ्हेचे उपाय सुचविले जातात. "माणसानें नीट विचार करावा व विनाकारण काळजी करू नये", हें ठराविक औषध जो तो सांगतो. असें सांगणाऱ्याचा हेतु, काळजी करणाऱ्याच्या विचारांत कांहींतरी चूक होत आहे असें दाखविण्याचा असतो. पण हें कोणाच्याच लक्षांत येत नाहीं कीं, विचारांतूनच (thought) काळजीचा उगम होतो. वर सांगितल्याप्रमाणें काळजीचा अतिरेक झाल्यानंतर तिच्यामध्यें जो यांत्रिकपणा (automatic action) येतो, तो कदाचित् माणसाच्या चुकीच्या दृष्टिकोणामुळें (due to wrong thinking) येत असेल; व विचाराची दिशा बदलून तो कमी करतां येईल. पण अतिरिक्त काळजीचेच परिणाम तेवढे वाईट, व प्रमाणांत (?) काळजी करणें हें जणूं प्रत्येकाचें कर्तव्य आहे, अशी जी साधारण समजूत आहे ती बरोबर आहे का? जीवनांतून काळजी अजिबात नष्ट करणें शक्य नाही असें जें आपण धरून चालतों, त्याला काय आधार आहे?

ही अशी समजूत मोठमोठ्या विचारवंतांच्या ठिकाणींहि आढळते. त्याला कारण असें आहे कीं, जीवनाला देहाची जितकी आवश्यकता आहे तितकीच आवश्यकता वर सांगितलेल्या प्रतिमेचीहि आहे, असें आपण मानतों. आपलें सारें जीवन, या प्रतिमेला केंद्रबिंदु धरून तिच्या भोंवतींच फिरत असतें. आपल्या जीवनाची नौका काळजीच्या भोंवऱ्यांत सांपडून प्राण कासावीस होत आहेत, अशी स्थिति आज दिसत नसली तर तिचा अर्थ एवढाच असतो कीं भोंवऱ्याची व त्या नौकेची गांठ अद्याप पडलेली नाहीं. आयुष्यांत केव्हां कोणता प्रसंग उद्भवेल व त्या प्रतिमेला धक्का लागेल याचा कांहींच नेम नसतो; व असा प्रसंग समोर येऊन उभा ठाकला तर प्रत्येक मनुष्य काळजीच्या अगदीं आहारीं जातो. हें सारें विवेचन करण्याचा हेतु एवढाच आहे कीं, जगांत कांहीं माणसें काळजीनें अगदीं गांजून गेलेलीं व बाकीचीं विशेष काळजी न करणारीं, असे दोन वर्ग जरी वरवर दिसत असले, तरी त्यांचेमध्यें मूलभूत असा फरक कोणताच नाहीं. आज ज्यांचेवर वाईट प्रसंग नाहीं अशा लोकांच्या अंतःकरणांतसुद्धां स्वतःसंबंधी जी प्रतिमा असते तो, कोणती ना कोणती तरी काळजी उत्पन्न केल्याशिवाय राहात नाहीं. ही प्रतिमा, जेथें जेथें असते तेथें तेथें, कमी-अधिक प्रमाणांत काळजी ही असतेच.

आतां ही प्रतिमा नक्की कशानें उत्पन्न होते, हें पाहू. कृष्णमूर्ति म्हणतात :–

"Most people are ambitious; they want to be somebody, authors, painters, businessmen or politicians. Priests want to become archbishops. Thought has created this Society, and sees the advantage of becoming powerful, dominant and important person, which happens only through ambition. *Thought has created the image through observation of the man in power*, and wants the pleasure of owning a big house, having a picture appear in the papers and all the rest of it..... The thinker has been built on the basis of pleasure; I want this and I don't want that....."

(*Talks in Europe* (1966) p. 49).

विचाराला (thought) आपण आपला मोठा सखा समजतों; पण त्याचा उपद्रव कसा होतो, इकडे आपलें लक्ष जात नाहीं. आपणाला, सारखें 'कोणीतरी' (somebody) व्हावें, असें वाटत असतें. त्याचबरोबर आपण 'कोणीतरी' आहोंत व त्या कोणीतरीचा दर्जा कमी होतां उपयोगी नाहीं, असाहि आपला आग्रह असतो. हें सर्व वाटणें विचारापोटीं असतें. विचारच आपणांला सांगतो कीं, "पाहा, त्या मोठ्या माणसाकडे पाहा; कसा अलिशान बंगला आहे त्याचा ! बंगल्यासमोर मोठी मोटार आहे. नोकरचाकर आहेत. माणसांची सारखी ये जा आहे. केवढा सुखी माणूस ! त्याच्यासारखी आपली परिस्थिति कधीं होणार ? काय या दारिद्री जीवनांत अर्थ आहे ?" हें जें विचारांचें सांगणें असतें, त्यांतूनच काळजीचा जन्म होतो. इतरांच्या तथाकथित सुखी जीवनाशीं, स्वतःच्या जीवनाची तुलना करीत बसणें हा एकच उद्योग मन सारखें करीत असतें. अशा रीतीनें माणसाच्या मनांत सुखाबद्दल जो हव्यास निर्माण होतो, त्यांतच काळजीचें बीज असतें.

विचारानें दिलेला हा कानमंत्र आपण न ऐकला तर ? तर काय होईल ? जीवन अशक्य होईल का, हा यापुढचा प्रश्न आहे. समाज तसें आपणांला सांगतो असें दिसतें. कारण समाजाची रचनाच मुळीं तुलनेवर आणि चढाओढीवर आधारलेली आहे. समाजाचेंच ऐकावयाचें ठरलें तर जीवनांतून काळजी नष्ट होणें शक्य नाहीं; ती आशाच सोडून दिली पाहिजे. परंतु 'समाजानें सांगावें व आपण निमूटपणें ऐकावें' हा आजपर्यंतचा प्रघात सोडून देऊन, नव्या पद्धतीनें जीवन जगता येईल का, हें पाहिलें पाहिजे

एक विचारवंत म्हणतो :–

"Our fears, worries and anxieties are not for facts—(a fact is, as it is); but for our *ideas about facts*. We are constantly influenced by our past prejudices, preconceptions, and biases.'

आपल्या जीवनांत ज्या कांहीं शुद्ध घटना असतात, त्यांच्याशीं आपण फारसा संबंध ठेवीतच नाहीं. काळजीचा रोग वाढल्यानंतर पुढें पुढें असें होतें, कीं शुद्ध घटना आपणांला प्रतीतच होईनाशा होतात. पुष्कळदां, वृद्ध माणसांशीं बोलतांना हा अनुभव येतो. ते जें बोलत असतात तें आपणाला समजतच नाहीं; कारण ते एका निराळ्याच जगांत, कल्पनांच्या जगांत वावरत असतात. त्यांचा वस्तुस्थितीशीं संबंध तुटलेला असतो. फक्त वस्तुस्थितीशीं–आणि वस्तुस्थितीशिवाय इतर कशाशींहि नाहीं– संबंध ठेवणें ज्यांना जमतें, त्यांनाच काळजीपासून मुक्त होण्याची आशा आहे.

आपण असें समजतों कीं, मनुष्यानें नीट विचार केला तर त्याला वस्तुस्थिति संपूर्णपणें समजूं शकेल. ही गैरसमजूत माणसानें शतकानुशतकें उराशीं बाळगली आहे. **विचारांचें शस्त्र अधिकांत अधिक तीक्ष्ण कसें करतां येईल, इकडेच सारे लक्ष माणसानें आजपर्यंत पुरविलें आहे.** पण विचार करणारा कोण असतो, इकडे मात्र त्याचें लक्ष गेलेलें नाहीं. विचारांचें शस्त्र ज्याच्या हातांत द्यावयाचें, त्याची नीट ओळख अगोदर करून न घेतां त्याला आपला शस्त्रधारी सेवक बनविण्यांतला धोका, माणसानें ओळखलाच नाहीं. याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला, व पश्चात्तापाची पाळी माणसावर आली आहे. पण हा 'सेवक' तरी विचाराहून निराळा आहे का? 'गुळाचा गणपति व गुळाचाच नैवेद्य' अशी स्थिति विचार आणि विचार करणारा (thinker) यांच्या बाबतींत आहे. कृष्णमूर्ति म्हणतात :–

"The thinker, you say is different from thoughts. But is there a thinker without thought? If you have no thought, where is the thinker? *Thought divides itself and creates the thinker for its own convenience;* seeing itself as—transient, though creates the Thinker as a premanent entity."

एखाद्या विशेष आपत्तीमुळें, काळजीनें अगदीं हैराण झालेलीं माणसें अथवा वार्धक्यामुळें ज्यांचा मेंदू नीट काम करीत नाहीं अशीं माणसें, यांच्या विचार-शक्तींतला दोष आपल्या नजरेस येतो; व आपण म्हणतों कीं, "यांच्या विचारांत एक प्रकारचा यांत्रिकपणा आला आहे. त्याच त्याच घटनेची अथवा कल्पनेची पुनरावृत्ति करण्याची संवय यांना जडली आहे. तर्कशुद्ध विचारपद्धतीची व यांची फारकत झाली आहे." पण विचारशक्तींतला हा दोष कशाचें अतिरिक्त स्वरूप आहे, हें आपल्या ध्यानांत येत नाहीं. **घटना होऊन गेली तरी, ती तिथेंच न सोडतां, तिच्या स्मृतीचें दीर्घीकरण करण्याची जी खोड** माणसाला असते, ती म्हातारपणींच लागते अशांतला भाग नाहीं. माणसाला कळूं लागल्यापासून त्याचा हाच व्यवसाय चालूं आहे. "सत्य वस्तूंचाच (facts) विचार करावा;

त्यांत आपल्या पदरच्या कल्पना मिसळूं नयेत. अशानें तर्कदुष्ट सिद्धांत खरे वाटूं लागतात." अशी घोषणा करून आम्ही आपल्या विचाराला सुरुवात करतों; पण ज्या विचाराचें (thinking) एक टोंक सुखप्राप्तीच्या ध्येयाला बांधलेलें आहे, तो विचार स्वतंत्र असा असूं शकेल का? आणि हें सुख कोणाचें? तर हृदयांत कल्पिलेल्या प्रतिमेचें.

एकूण असें दिसतें कीं, सुख आणि काळजी यांचा फार जवळचा संबंध आहे. समजा, सुखाची अभिलाषा एखाद्याला सोडून गेली, तर त्याचे ठिकाणीं काळजी संभवते का? सामान्य समजत अशी आहे कीं, 'प्रतिकूल परिस्थिति' हीच काळजीचें खरें कारण आहे. अनपेक्षित येणाऱ्या आपत्ति, घरांत होणाऱ्या अपमृत्यूमुळें रोजच्या जीवनांत होणारी उलथापालथ, शत्रुत्वामुळें आक्रमणाची सतत वाटणारी भीति, जीवनांतली अशाश्वतता, इत्यादि गोष्टींशीं असणारें काळजीचें साहचर्य पाहून आपण एकदम सिद्धांत मांडतों कीं, "परिस्थितीच काळजीला कारण होते. काळजीवर उपाय एकच; आणि तो हा कीं, नेहमीं अनुकूल परिस्थिति राहील अशी तरतूद करणें; आणि ती प्रतिकूल झालीच तर शक्य तेवढी कमी काळजी करणें." पण हा सिद्धांत सांगणें म्हणजे रोगावर उपाय काय, तर आजारी न पडणें, असें सांगण्यासारखेंच आहे! या भोंगळ विचारसरणीवरच माणसें भागवून नेतात असें दिसतें. एक प्रकारची अगतिकता (helplessness) सगळीकडे दिसते, कारण, 'सुख हें जवापाडें दुःख पर्वताएवढें,' असें मानवी जीवनाचें स्वरूपच आहे, असें धरून आपण चालतों.

माणसाच्या भोंवतालची परिस्थिति सारखी बदलत असते, हें तर आपण विसरतोंच; पण हेंहि विसरतों कीं, अनुकूल कशाला म्हणावें आणि प्रतिकूल काय समजावें याबद्दलच्या आपल्या कल्पनाहि रोज बदलत असतात. या अशा गतिशील जीवनांत स्थिर असें काय आहे? बाहेरच्या जगांत एकामागून एक नव्या नव्या घटना घडत राहतात; व त्यांचा संबंध आपल्या आंतरजीवनाशीं म्हणजे हृदयस्थ प्रतिमेशीं दर क्षणाला येऊं लागतो. बाहेर होणाऱ्या या क्रियेचा आपल्या प्रतिमेशीं संपर्क घडतांच तिची जी प्रतिक्रिया होते, तींतूनच सुख अथवा दुःख जन्माला येतें. या प्रतिमेचा मात्र कायमचा हट्ट असा असतो कीं, तिला सदा सुखच प्राप्त झालें पाहिजे. या तिच्या हट्टामुळें व ती ज्या परिस्थितीला त्या क्षणीं अनुकूल समजते, ती प्राप्त होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आल्यामुळें तिला जी व्यथा होते, तिला आपण 'काळजी' असें नांव देतों.

थोडा जरी विचार केला तरी आपल्या असें ध्यानांत येतें कीं, आपल्या अंतःकरणांत आसनस्थ असलेली ही जी प्रतिमा, तिलाच 'मी' हें नांव आहे. पण ही

प्रतिमा तरी अगदीं स्थिर आहे का ? लहानपणाचा 'मी' ज्या सुखांच्या मागें लागतो त्या सुखांचें महत्त्व तरुण 'मी'ला अथवा वृद्ध 'मी'ला कांहींतरी वाटतें का ? फार कशाला, वयाच्या एका अवस्थेंतसुद्धां असें दिसतें कीं, कांहीं दिवस एका ठराविक सुखाच्या मागें आपण धांवतों; तर त्यानंतरच्या दिवसांत दुसरीच एखादी सुखद वस्तु आपलें चित्त आकर्षून घेते, व तिच्यामागें जाण्यांत आपण धन्यता मानतों. यापलीकडे जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, काल ज्या गोष्टीचें महत्त्व सुखसंपादनाकरतां आपणांला वाटत होतें, तिचें महत्त्व आज तसें वाटेलच अशी खात्री नाहीं. आपल्या अपेक्षा अशा तऱ्हेनें सारख्या बदलत असतात, पण आपण मात्र ठाम असें समजतों कीं, या सर्व अपेक्षा एका सूत्रांत गोवलेल्या आहेत व त्यांच्यामध्यें पूर्ण सुसंगति आहे. तसेंच या साऱ्या अपेक्षा, 'मी'नांवाच्या आपल्या शरीरांत कायमचें वास्तव्य करणाऱ्या एकाच व्यक्तीच्या आहेत, अशी आपली खात्री असते.

विचाराचें (thought) कार्य अशा प्रकारें विविध असतें. कोणतेंहि सुख अनुभवास आलें कीं, त्याची पुनरावृत्ति कशी होईल याची विवंचना विचार करूं लागतो. ज्या क्षणाला सुखाचा अनुभव आला, त्या तेवढ्या क्षणानें विचाराची भूक भागत नाहीं. त्या सुखाची अधिक प्राप्ति व्हावी, तें न जमलें तर निदान त्या सुखाची स्मृति आणखी कांहीं काल जवळ बाळगावी, असें विचाराला वाटूं लागतें. तसेंच इतरांच्या परिस्थितीशीं तुलना करण्याचें काम विचारच करतो; व तुलनेनें सुखाचा हव्यास अधिकच वाढतो. या दुहेरी कामगिरीबरोबरच आणखी एक कार्य विचार करीत असतो. तें हें कीं, सुखाचा अनुभव ज्याला वरचेवर येतो असा 'मी' म्हणून, विचाराखेरीज व स्मृतींखेरीज निराळा कोणीतरी आहे व त्याला सुखप्राप्ति व्हावी, याकरतांच हा मानवजन्म आहे, अशी समजूत तो चित्तांत उत्पन्न करतो. विचाराचें हें यंत्र सारखें फिरत असतें. झोंपेंत जो काल जातो, त्या काळाचासुद्धां कांहीं भाग या विचारयंत्राच्या कृतीनें व्यापलेला असतो. हें यंत्र केव्हां उघडपणानें, म्हणजे त्याच्या क्रियेची जाणीव आपल्याला होऊं शकेल अशा तऱ्हेनें चालतें; तर केव्हां त्याची क्रिया गुप्त म्हणजे unconscious mind च्या रूपानें चालूं राहते. पण असें नक्की विसतें कीं, या यंत्राला गति मिळतांच त्यांतून जो जीवनाचा पट विणला जातो, त्याचे धागे वर दिल्याप्रमाणें तीन प्रकारचे असतात.

हे तीन रंग असल्याखेरीज जीवनचित्र पूर्ण होणारच नाहीं, असें जें आपण समजतों, त्यांतच काळजीचें बीजारोपण आहे. आपण खूप समजतों कीं, माणसाला सुखाचीच सतत प्राप्ति होत राहिली तर, काळजीचा स्पर्श जीवनाला होणार नाहीं. पण सुखरूपी नाण्याच्या दुसऱ्या बाजूला दुःख असतें, हें आपण विसरतों.

सुखाची आकांक्षा ज्या वाटेनें चित्तांत शिरते त्याच वाटेनें मागून दुःख चालत येतें; व हें दुःख आपल्या वाटचास येऊं नये, किंवा तें येणारच असलें तर त्याचें येणें शक्य तेवढें लांबणीवर पडावें, याकरतां जी धडपड मन करूं लागतें, तीच 'काळजी' होय. सुखाची कल्पना विचार कसा उत्पन्न करतो आणि त्यामुळेंच दुःखाची प्राप्ति कशी होते, हें पुढील उताऱ्यांत कृष्णमूर्तींनीं फार समर्पक रीतीनें दाखविलें आहे :—

"There is thinking, thinking consciously or thinking unconsciously.....within that field we act. And within that field there is sorrow, pleasure, pain— there is the conscious sorrow, or the deep undiscovered brooding sorrow..... So, as long as thought is functioning, within that field, thought being time, thought cannot produce a change at all. It can only bring about a modification, a continued modified activity, an adjustment. But within that field, there is no possibility of radical change at all. I think this must be very clearly understood between us, because, in that field every action is the result of thought, conscious or unconscious and *that thought creates certain values and those values are based on pleasure. All our values are based on pleasure*.....Thought is the whole machinery of accumulating memory. Through experience, through knowledge, through various forms of pressures, stresses and influences. That throught cannot under any circumstances bring about a radical revolution. Why can't it? Because that thought is essentially based on pleasure, and where there is pleasure, there is always pain. All our social, moral and ethical values are based on pleasure.....So man has always exercised thought, as a means to get rid of sorrow *by right effort, by right thinking*..... The exercise of thought has been his game..... thought with intellect and all the rest of it."

(*Talks in India* (1966) p. 58–59).

या सर्व विवेचनावरून एवढें स्पष्ट होण्यास हरकत नाहीं कीं, आपल्या जीवनांत कांहींतरी क्रांतिकारक बदल झाला पाहिजे. आतांपर्यंत विचारावरच आपली सर्व मदार होती. जीवनांतली कोणतीहि समस्या पुढें उभी ठाकली कीं, ती सोडविण्याकरतां 'निर्दोष पद्धतीनें विचार करणें,' हा एकच उपाय आपणांला माहीत होता, आणि म्हणूनच जीवनांत काळजीनें प्रवेश केला कीं, सुविचाराची कांस धरावी एवढा एकच मंत्र आपण जपत होतों. हा 'सुविचार' म्हणजे जास्तींत जास्त तर्कशुद्ध विचार; याशिवाय दुसरें कांहीं नाहीं, असें आपण समजत होतों. पण

प्रत्येक विचाराचें ध्येय सुखप्राप्ति हेंच असल्यामुळें आणि सुखांतच दुःखाचें बीज असल्यामुळें, विचारानें संपूर्ण दुःखनिवृत्ति अथवा काळजीचा निरास होणें अशक्य आहे, हें आपल्या ध्यानांतच आलें नाहीं. तसेंच विचार म्हणजेच विचार करणारा (thinker) एकदां का उत्पन्न झाला कीं, तो भूतकाळांत तरी वावरूं लागतो, नाहीं तर भविष्यकाळाचा गुलाम होतो. निव्वळ सत्य घटनांचा अनुभव घ्यावा व त्यांस अनुसरून जरूर तेवढीच कृति करावी, हें त्याला कांहीं केल्यानें जमतच नाहीं; आणि म्हणूनच विचाराची संगत सोडून कालातीत झालें पाहिजे, व तसें झाल्याखेरीज काळजी संपूर्ण नष्ट होणार नाहीं.

टीप : या प्रकरणात 'कल्पना' आणि 'विचार' हे दोन शब्द संदर्भाप्रमाणें निरनिराळ्या अर्थानें वापरले आहेत.

* * *



पाच

चिंतन म्हणजे काय व त्याची वेळ कोणती ?

सुदैवानें एक गोष्ट माझ्या लक्षांत आली आहे. ती ही कीं, गीता, दासबोध, तुकाराममहाराजांचे अभंग, ज्ञानेश्वरी अथवा संत एकनाथांचे ग्रंथ, हे सर्व (आणि सर्व द्रष्टे तत्त्वज्ञ) चिंतनावर भर देतात. चिंतन म्हणजे चिंता नव्हे; ती तर आम्ही नेहमींच करतों. चिंतन म्हणजे ग्रंथांतले शब्द वाचणें अथवा आठवणें नव्हे, चिंतन हें कांहींतरी निराळें आहे. सकाळीं उठल्यापासून झोंपेपर्यंत आम्ही अनेक उद्योग करतों, पण खऱ्या अर्थानें चिंतनमात्र कधींच करीत नाहीं. जर केलेंच तर तें फार थोडा वेळ करतों. इतकें अल्प कीं, त्याचा स्पर्श आपल्या मनाला होतो न होतो तोंच, तें संपून जातें.

वर उल्लेख केलेले ग्रंथ व इतर ग्रंथहि कांहीं गोष्टी आवर्जून सांगतात " जीवन क्षणभंगुर आहे, पुत्रवित्तादिकांच्या लोभांत अडकून पडूं नये, मानापमानामुळें हुरळून जाऊं नये, अथवा दुःखी होऊं नये, भ्रमांत अथवा अज्ञानांत आपण जन्मभर राहतों; त्यामुळें खऱ्या सुखाची व आपली गांठ पडत नाहीं. " इत्यादि.

आपण हे शब्द मुखोद्गत करतों. त्यांचेबद्दल विवेचनहि करूं शकतों. शिकंदरासारखा बादशहाहि शेवटीं दुःखीच कसा राहिला, याचें रसभरित वर्णन

करून कोणातरी 'मंदबुद्धि' माणसाची कानउघाडणी करण्यासहि मागेपुढें पाहात नाहीं. पण स्वतःवर प्रसंग आला कीं, सगळेंच बाजूला राहतें. शोकाची तीव्रता कमी होत नाहीं, क्रोधाची धार बोथट होत नाही, अगर वासनेची मगरमिठी ढिली पडत नाहीं. हें असें कां व्हावें ? मला वाटतें, चिंतन म्हणजे काय व त्याची वेळ कोणती, हें न समजल्यामुळेंच आम्ही जेथें होतों तेथेंच राहतों

'चिंतन' हा शब्द, सगुण ईश्वराच्या ध्यानालाहि लावतात. पण आज तो आपला विषय नाहीं. भक्तिमार्गी संतांनींहि, संसार ज्या पद्धतीनें आपण करतों; ती पद्धत भ्रमामुळें अथवा अज्ञानामुळें आहे, यावर पानेंचीं पानें खर्चीं घातलीं आहेत. ध्यानाइतकेंच चिंतनालाहि त्यांनीं महत्त्व दिलें आहे. मोहाचा अथवा दुःखाचा क्षण जेव्हां समोर येऊन उभा ठाकतो, तेव्हां जी क्रिया आपल्या हातून होते, त्या क्रियेंतच कांहींतरी चूक होत असावी. त्या क्षणाची गांठ पडतांच चिंतनाची मदत घेतां आली पाहिजे. याचाच अर्थ असा कीं, त्या क्षणाकडे एका निराळ्या दृष्टीनें पाहतां आलें पाहिजे. हें पाहणें म्हणजेच चिंतन.

चँग-कै-शेकच्या एका चरित्रकारानें त्याची दिनचर्या सांगतांना, सकाळचा पहिला तास तो एका बंद खोलींत चिंतनांत घालवितो, असें सांगितलें आहे. पण त्या चिंतनामुळें पुढच्या तासांवर कांहीं परिणाम होतो कीं नाहीं, याबद्दल मौन पाळलें आहे. कांहीं जुलमी राजेहि चिंतनाची ही अशी कवाईत करीत होते, असें दिसतें. प्रश्न असा आहे कीं, आपलें चिंतन त्या बंद खोलीच्या बाहेर कां येत नाहीं ? तें आपली दिवसभर सोबत कां करीत नाहीं ?

गीतेमध्यें स्वाध्यायाची फार महति वर्णन केली आहे. स्वतःविषयीचें अध्ययन म्हणजेच खरा स्वाध्याय. हें अध्ययन सतत चालू राहिलें पाहिजे, हें उघड आहे. कारण चिंतनाच्या खोलींतून बाहेर पडतांच 'स्व' संपतो, असें थोडेंच आहे ? आपला 'स्व' एकांतांत कसा दिसतो, स्वकीयांशीं बोलतांना कसा दिसतो, परकीयांशीं बोलतांना कसा दिसतो, परकीयांशी व्यवहार करतांना त्याचे रूप कसें होतें, व शत्रुत्व करणाऱ्यांशीं संबंध आला तर तो कसा फुलतो, हें सर्व पाहात राहिलें पाहिजे.

'चिंतन' या शब्दाचा अर्थ असा न घेतला तर कितीतरी अडचणी येतात. बंद खोलींत मी आहें, तोंपर्यंत मी सज्जनपणानें वागूं शकतों. कारण, तेथें आव्हान (challenge) कोणाचेंच नाहीं. आतां हें खरें कीं, एकांतांतहि मन नाना खटपटी करतें. विषय जवळ नसले तरी त्यांची स्मृति केव्हांहि बोलावून आणतां येते. एका अर्थानें विषयांचा उपभोग त्यांची प्रत्यक्ष गांठ न पडतांहि घेतां येतो. म्हणूनच एकांतांत का होईना, मन निर्विषय करतां येणें ही एक अवघड कला आहे. तिचें महत्त्व नाकारतां येत नाहीं. पण चिंतनाकरतां ठराविक वेळ बाजूला काढल्यानें कांहीं दोष उत्पन्न होतात. हे दोष, विशेष सावध असणाऱ्या थोड्या लोकांना

कदाचित् स्पर्शहि करीत नसतील. पण बहुतेक चिंतकांना ते चांगलेच सतावतात. इतकें कीं केलेलें सारें चिंतन वायाच जातें कीं काय, असें वाटूं लागतें. पृथक् चिंतनामुळें आपल्या (इतर वेळच्या ?) अज्ञानाचें दृढीकरण तर होत नाहीं ना असा प्रश्नहि केव्हां केव्हां डोकावतो.

ही मोठीच पंचाईत आहे. एकांतांत दिवसाचे कांहीं क्षण घालविणें, झोंपेसारखेंच नैसर्गिक व आल्हाददायक आहे. म्हणूनच तें आवश्यकहि आहे. पण झोंपेंतलें जीवन निराळें व जागेपणीचें निराळें, असें आपण समजत नाहीं. त्या दोन कालाखंडांमध्यें द्वैत नाहीं. त्यांना जोडणारा सांधा शोधावा लागत नाहीं.

एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत, कसें अगदीं सहजपणें आपण जातोंयेतों. झोंपेंतला 'मी' हाच जागेपणींहि माझा 'मी' असतो. समजा, ते दोन असले, तरी त्यांच्यामध्यें भांडण नसतें. तसें, चिंतनाचें नाहीं. चिंतनकालांत मी सज्जन असतों. निदान निरुपद्रवी असतों. तर बाकीच्या कालांत मी कठोर व स्वार्थी बनूं शकतों. (व्यवहाराकरतां हें जरूर आहे, ही सबब मजजवळ तयार असते.) चिंतनकालांत मी शांत असतों, तर इतर वेळीं मी कमालीचा प्रक्षुब्ध असा राहतों. चिंतनकालांत माझ्या मनांत एकहि वासना नसते, निदान ती प्रभावी नसते; तर दिवसाचा इतर सारा वेळ वासनांच्या मागें धांवण्यांतच निघून जातो.

हें असें कां व्हावें ? वर्षानुवर्षें चिंतन करूनहि जीवनांत एकजिनसीपणा कां येत नाहीं ? जीवनांत क्रांति कां होत नाहीं ?

वरील प्रश्नांचें उत्तर दोन प्रकारचें असू शकेल. चिंतन करतांनाच कांहींतरी चूक होत असेल; अथवा तें केव्हांतरी मी थांबवतों यांतच सारा अनर्थ होत असेल.

दिवसभर विषयांचेंच चिंतन चाललेलें असतें. मनांतला पहिला विषय टाकून दुसरा बोलवावा केव्हां व कोणता, इकडेच माझें लक्ष सर्वकाळ असतें. माझी सारी बुद्धिमत्ता अथवा संपादिलेलें ज्ञान एकच गोष्ट मला शिकवितें. ती ही कीं, विषयांची निवड कशी करावी ? पहिला विषय किती वेळ मनांत घोळवावा, त्यांत इतर कोणत्यातरी विषयाची अथवा त्याच्या भागाची मिसळ करावी किंवा नाहीं; का अगदीं नव्याच भासणाऱ्या विषयाकडे धांवावें, यांतच माझें सारें नैपुण्य आहे. आपण दिवसभर अशा तऱ्हेनें वागतों कीं, जें मन कोणत्या तरी कामांत अथवा विषयांत गुंतलेलें नाहीं, तें मन जिवंत माणसाचें असूंच शकत नाहीं, अशी आपली धारणा आहे. म्हणूनच मन शांत, रितें, राहू शकतें, मनाची तशी एक अवस्था आहे, याची ओळख मनाला केव्हांतरी पटविली पाहिजे. हें पटविण्याकरतां तरी चिंतनाचा काळ बाजूला काढणें जरूर आहे. नाहींतर अष्टौप्रहर धांवपळच करीत आम्ही राहणार ! धांवपळीशिवाय अल्पकाल का होईना जीवन जगतां येतें, याची

खूण पटण्याकरतां ठराविक वेळांत (मग ठराविक स्थलहि आलेंच) चिंतनाला बसणें, जरूरच आहे.

✓ या चिंतनाला अनुकूल असें स्थळ व वेळ असावी, एवढें सांगितलें कीं, पुरें. त्यांत सर्व कांहीं आलें. मनांतून विषय घालवितां येतात कीं नाहीं हें पाहण्याकरतां जो काळ आपण निवडतों, त्या काळांत इतर उद्योग चालूंच राहिले तर काय साधणार ? पण दिवसाचा प्रारंभ व निद्रेच्या आधींची वेळ, यांचा उल्लेख करणें जरूर वाटतें. झोंपेंतून उठल्यावर प्रथमच्या क्षणांतच, " मी निर्मळ मनानें दिवसाची सुरुवात करीत आहे का ? " हा प्रश्न विचारण्यास संधि मिळते. मन तसें करीत नसल्यास त्याला छेडण्यासहि, पुढचे व्याप सुरू झाल्यावर उसंत मिळत नाहीं. पण मनाला छेडणें म्हणजे काय ? त्याला दोष देणें, अथवा त्याचेवर दाब आणणें, असें कांहीं आपण करीत बसलों, तर त्या अवस्थेला ' निर्विषय ' अवस्था म्हणतां येईल काय ? मग त्यांत जो काळ जाईल तो चिंतनांत गेला, असें मानतां येईल काय ? मनाची समोरासमोर गांठ घेणें, एवढेंच काम सकाळच्या चिंतनांत झालें पाहिजे. आजचें काम करणारा मनोरमी सेवक किती मरगळलेला आहे, तो लंगडा आहे कीं त्याची शक्ति शाबूत आहे, यांचा खरा अजमास घेणें या वेळींच शक्य आहे. पण मनाचे यंत्र कुरकुरत असलें तरी त्याचा तसाच स्वीकार (acceptance) करण्यांत वरील दर्शनाची परिणति होतां कामा नये. मन प्रक्षुब्ध कां ? याचा तलास घेऊन त्या प्रक्षोभाचीं कारणें भूतकालांतूनच येतात ना, हें पाहिलें पाहिजे. तीं तशीं येत असलीं तर हा मूर्खपणा झटकून टाकता आला पाहिजे.

पण निद्रेच्या आधींचें चिंतन मात्र कधींच चुकूं देऊं नये. या चिंतनाच्या वेळीं, " माझ्या मनांत कशानें तरी मूळ धरलें आहे का ?" हा शोध घेतला पाहिजे. दिवसभरच्या व्यापारांत अनेक अनुभव येतात. क्षणोक्षणीं कसलें तरी आव्हान (challenge) समोर येऊन उभें ठाकतें. प्रत्येक वेळीं आपण जागरूक पाहिजे; व आव्हानाला समर्पक व संपूर्ण उत्तर (response) दिलें पाहिजे. खरें पाहिलें तर चिंतन कधींच थांबवता येत नाहीं. पण हा मुद्दा पुढें पाहूं. अनवधानानें, चालू असलेलें काम गुंतागुंतीचें असल्यामुळें, अथवा मध्यें उसंतच न मिळाल्यामुळें, मनावरचे कांहीं आघात चित्तांत खोल रुतून बसतात. अंतर्मनाच्या तळघरांत हें सामान जाऊन पडलें असेल, याची जाणीवसुद्धां आपणांला असत नाहीं. दिवसाच्या शेवटीं मनावरच्या या जखमा नीट पाहिल्या पाहिजेत. नव्हे, त्या संपूर्ण बुझविल्या पाहिजेत. नाहींतर, पुढें केव्हांतरी चिघळून त्या बाहेर वाहूं लागतील. मला तर वाटतें कीं, निसर्गानें झोंपेची योजना सर्वच प्रकारच्या व्यथा दूर करण्याकरतां केली असावी. शारीरिक कष्ट सारखे करीत असतांना, शरीराला विश्रांती मिळत नाहीं. शरीराला झालेले क्लेश निद्रेनें दूर होतील, पण मनावरचे प्रहार ? हे प्रहार उजेडांत

न आणतां त्यांच्यावर अनेक पडदे लपेटून घेण्याची संवय आपल्याला लागली आहे. चिंतनाचा एक उद्देश, अंतर्मनाची खोली धुऊन स्वच्छ करण्याचा आहे, हें आपण विसरून चाललों आहोंत.

पण खरा शाप दिवसभराच्या अनवधानाचा (inattention) आहे. हें अनवधान आपण सारखें वाढवीत चाललों आहोंत. जगांत वैज्ञानिक सुधारणा आली, यंत्रयुग अवतरलें, अनेक नव्या सुखसोई उपलब्ध झाल्या, प्रचाराचीं साधनें कल्पनेबाहेर वाढलीं व कित्येक नव्या विचारप्रणालि व चळवळी उदयाला आल्या. पण यामुळेंच अनवधानाची विशेष सोय झाली कीं काय, कळत नाहीं. जीवनाचा वेग (म्हणजे रोजच्या कामांची संख्या) इतका वाढला आहे कीं, आपण काय करतों हें समजण्याच्या आधींच पहिलें काम संपून जातें, व दुसरें काम हातांत घ्यावें लागतें. अत्यंत वेगानें, सर्वांत अधिक कामें जो उरकतो तो खरा कर्तबगार माणूस, अशी हल्लींची व्याख्या आहे. म्हणूनच, " चिंतनाला आम्हांला वेळ मिळत नाहीं. पेन्शन घेतल्यावर तें करण्याचा विचार आहे," असे उद्‌गार ऐकूं येतात. पेन्शन घेण्यास हरकत नाहीं; पण चिंतनाशिवाय जो दिवस जातो त्या दिवसांत जीवनाची व आपली गांठ तरी पडते का, असा प्रश्न आहे. चिंतनाचें महत्त्व यांतच आहे कीं, तें आयुष्यांत घडणाऱ्या घटनांतच मन अडकूं न देतां जीवनाचा प्रकाश आपणाला दाखवितें.

" मी नेमानें चिंतन करतों; पण माझ्या मागचें दुःख व चित्तांतला संघर्ष-मात्र कांहीं केल्या मिटत नाहीं." असे उद्‌गार केव्हां केव्हां ऐकूं येतात. रोजच्या जीवनाची पूर्वतयारी एवढाच अर्थ चिंतनाचा नाहीं. " मी खूप अभ्यास करतों, पण पेपर लिहितांनामात्र मला कांहीं आठवत नाहीं, " अशी तक्रार करणारे कांहीं विद्यार्थी असतात. त्यांनीं ' अभ्यास ' हा, विषयाच्या ज्ञानापासून वेगळा काढलेला असतो; म्हणून त्यांची अशी पंचाईत होते. जीवनाच्या बाबतींत तर अशी फारकत मुळींच करतां येत नाहीं. चिंतनाला बरोबर घेऊनच प्रत्येक क्षणांतलें जीवन जगलें पाहिजे. " जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती," असें चिंतनाबद्दलहि म्हणतां आलें पाहिजे. पण याकरतां ज्या जगांत मनानें आपण जगतों तें जग सोडलें पाहिजे. एका निराळ्या जगांत अथवा जीवनांत प्रवेश करून, देहानें मात्र याच जगांत वावरतां आलें पाहिजे.

मुख्य अडचण एकच आहे. ती ही कीं, स्वतःशीच सतत संवाद करणाऱ्या मनानें आपण सगळे व्यवहार करीत असतों. ज्याला आपण ' सारासार विचार ' हें नांव देतों, तोसुद्धां या संवादांतून निर्माण होतो. हातानें काम करताना, ' हें बरें, हें वाईट,' ' हें चुकीचें, हें बरोबर ' असें सारखें मन आंतून सांगत असतें. यंत्र दुरुस्त करीत असतांना, एखादी क्रिया चुकली अगर बरोबर जमली, हें लक्षांत येतें. तें

लक्षांत येणें जरूरच आहे; कारण त्याशिवाय कामच पार पडणार नाहीं. पण दिवसभरांत असे अनेक प्रसंग येतात कीं, जेव्हां आपण 'हें मला हवेसें वाटतें, व हें नकोसें वाटतें.' 'मला हें सुख देतें' 'हें दुःख देतें' अशा प्रकारची निर्णयशक्ति वापरीत असतों; व या निर्णयाला अनुसरून पुढील कृति करीत असतों. यांत, मनावर जे अनुकूल प्रतिकूल आघात होतात, त्यांतून जीवनांतल्या साऱ्या समस्या उभ्या राहतात. या समस्यांशी मुकाबला करतांना जें उपयोगी पडतें तें खरें चिंतन.

समस्या उत्पन्न झाली कीं ती सोडविण्याकरतांहि आम्ही एक प्रकारचें चिंतन करीत असतों. (बऱ्याच वेळीं ती निव्वळ चिंता असते.) पण त्या चिंतनांत किती चुका आम्ही करतों, हें पाहण्यासारखें आहे. पहिली महत्त्वाची चूक अशी कीं, 'समस्या झटपट निकालांत कां निघत नाहीं?' अशी विवंचना शक्य तेवढ्या तीव्रतेनें करणें. या विवंचनेंत मन एकदां गुंतल्यावर समस्या समजून घेण्याकरतां, त्या मनाजवळ फारशी शक्ति उरतच नाहीं, हें आपण विसरतों. शिवाय समस्येचें स्वरूप यथार्थपणें समजल्याखेरीज ती सोडविणार कशी? समस्या तिच्या सर्व अंगांनीं लक्षांत घेणें, ही एकच क्रिया खरोखर आपल्या हातून व्हावयास पाहिजे. निदान ती या व्यवहारांतली पहिली शर्त आहे, यांत मुळींच संशय नाहीं. जो शत्रु नीट दिसत नाहीं त्याचेशीं लढणार कसें? त्याचे हात, त्याचीं आयुधें दिसलीं तर पाहिजेत? पण डॉन क्विक्झोटसारखें वर्तन आपण करतों. पवनचक्कीचे लांब पंख त्याला शत्रूचे भाला धरणारे हात वाटले; व ती चक्की त्याला 'रस्ता अडवणारा राक्षस' वाटला. मग त्यानें स्वतःच्या भाल्याची फेंक मोठ्या कौशल्यानें पण अशा तऱ्हेनें केली कीं, तो स्वतःच त्या पंखांत अडकला व गरगर फिरूं लागला. समस्येचें सम्यग्दर्शन झालें नाहीं तर आपण असेंच तींत अडकतों; व नुसते फिरत राहतों. हें फिरणें जितका काळ चालूं राहील तितका काळ समस्येचा उकल करण्यांत घालविला, असें आपण समजतों. पण अशानें समस्या सुटत नाहीं.

समस्या सोडविण्याकरितां तिचें नीट दर्शन होणें जरूर आहे, हें वाचक कबूल करतील. पण "असें दर्शन आम्हांला घेता येत नाहीं, हें कशावरून?" असा प्रश्न विचारतील. कुटुंबांतली व्यक्ति मृत झाल्यामुळें जी दुःखाची समस्या उत्पन्न होते, तिचें उदाहरण घेऊं या. दुःखांत कितीतरी गोष्टी आहेत. व्यक्तीच्या वियोगामुळें वाटणारा एकलेपणा, तिच्या भेटीकडे धांव घेणारें, मन या प्रसंगांत सहानुभूति दाखवावी अशी हृदयाची हांक, वगैरे अनेक पैलू या प्रश्नाला आहेत. मनाचे होणारे हे विविध व्यापार कशांतून उगम पावतात, हें प्रत्यक्ष त्या वेळीं उमगल्याखेरीज दुःखांतला खरा भाग कोणता व भ्रमावर आधारलेला कोणता हें कसें कळणार? हा उकल नुसत्या बुद्धीनें होऊन उपयोगी नाहीं. 'जीवन क्षण-

भंगुर आहे, त्यामुळें मरण अटळ आहे." असें उत्तर बुद्धि चटकन् देते. पण हें उत्तर, मरणाचे प्रत्येक घटनेचे वेळीं आठवूनहि दुःख कपाळचें चुकत नाहीं. दुःखाची संपूर्ण प्रक्रिया, अशा तऱ्हेनें पाहतां आली पाहिजे कीं, त्यांतला असत्यावर आधारलेला भाग तत्क्षणीं गळून गेला पाहिजे. होऊन गेलेल्या घटनेची स्मृति पुन्हां पुन्हां उजळणी करीत आहे, हें लक्षांत आलें पाहिजे. ज्या क्रिया निरर्थक म्हणून खरा उमज पडला, त्या तशाच चालूं राहणें शक्य नाहीं. हा उमज पडण्याकरतां चित्ताचा गाभा शांत असा राहिला पाहिजे. प्रत्येक समस्येच्या वेळीं, ही अशी शांति माझ्या चित्तांत आहे कीं नाहीं याचा तलास घेणें, म्हणजेच चिंतन होय. अशा चिंतनाची मदत न घेतां वरच्यासारख्या घटनेच्या वेळीं आपलें चित्त भलतीकडेच धांव घेतें. मृत व्यक्तीचें परलोकांत काय झालें असेल याची विवंचना तें करूं लागतें. हा विक्षेप होय. अंतःकरणांतली समस्या कायम ठेवण्याची ती एक सोय, याशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

वरच्या बाजूला दुःखाची समस्या केव्हां एकदां सुटते अशी तळमळ, पण मनाच्या मध्यांत मात्र दुःखद घटनांचेंच घुसळण, अशी स्थिति कित्येक वेळां असते. मनाला स्वतःशींच संवाद करण्याची जी संवय आहे, ती समस्येकडे पाहण्याच्या क्रियेला मोठा अडथळा आहे. हा संवाद संपूर्ण थांबणें, म्हणजेच चिंतन सुरू होणें होय.

एकंदरींत असें दिसतें कीं, चिंतन सर्वकाल चालू राहणें अगदीं जरूर आहे; व चिंतनाचा अर्थहि नीट समजून घेतला पाहिजे.

मुद्दा असा आहे कीं, चित्तांत जुन्या समस्यांचा मागमूसहि न राहतां, नवीन अनुभवांतून नवी समस्या निर्माण होत नाहीं ना, इकडे आपलें सतत लक्ष पाहिजे. कारण, अनुभव येणार नाहींत, घटना घडणार नाहींत, अशी व्यवस्था करतां येत नाहीं. घटना जितक्या वेगानें घडतात, तितकीच जागरूकता अधिक हवी. याला 'आत्मनिरीक्षण' असेंहि दुसरें नांव देतां येईल. ही कृति, जुन्या विचाराचे व नवीन विचाराचे, दोघेंहि सारखेच टाळीत आहेत. "अंतिम सत्याकडे आम्हांला धांव घ्यावयाची आहे; त्याचें स्वरूप सांगा," अशी मागणी कांहीं करतात. तर दुसरे कांहीं, "मुक्तीचा उपाय सांगा," म्हणून हट्ट धरतात. पण अगोदर मन समस्यामुक्त झाल्याखेरीज पाऊलच टाकतां येत नाहीं, हें सर्वच विसरतात. इकडे, एकामागून एक अशा अनेक समस्या, संघर्षाचे शंभर प्रकार रोज आम्हाला हैराण करतात; व तिकडे आम्ही चिंतन करतों, असें चालणार नाहीं. चिंतनाचा सुगंध अहर्निश दरवळत राहिला पाहिजे. तो प्रवाह खंडित होता उपयोगी नाहीं.

* * *



सहा

कर्मयोगाचा अर्थ तरी काय असावा ?

'कर्मयोग' हा शब्द आपल्या इतका परिचयाचा आहे कीं त्याच्या अर्थाकडे आपलें फारसें लक्षच जात नाहीं. शब्द आणि त्याचा अर्थ यांचा परस्परसंबंध तरी काय असावा ? फार वेळां ऐकलेला शब्द पुन्हां ऐकावयास मिळाला कीं, एकदम वाटतें कीं, शब्दाचा अर्थ समजला. पण हा नुसता भास असतो. बऱ्याच वेळां असें होतें कीं, शब्दाचें पुनः श्रवण म्हणजेच अर्थाची प्राप्ति, अशी समजूत आपण करून घेतों व ही समजूत खऱ्या अर्थाकडे आपणांला जाऊंच देत नाहीं.

कर्मयोगाचा अर्थ समजून घेण्याचा उद्योग सुरू करावयाचा, असें जर आपण ठरविलें तर किती पथ्यें पाळावयास पाहिजेत, हें प्रथम पाहिलें पाहिजे. या विषयाबद्दल विचारवंत जेव्हां लिहितात, किंवा बोलतात तेव्हा, समाजावर शत्रूनीं आक्रमण केलें तर कसें वागावयाचें, एवढ्याच दृष्टीनें ते विवेचन करतात जणू काय, कर्मयोगाचा प्रश्न लढाई पुकारल्यानंतरच उत्पन्न होतो. या प्रश्नाचा धागा अर्जुनाशीं व अहिंसेशीं कायमचा असा, आपण जोडून टाकलेला आहे. त्यामुळें राजानें कसें वागावें, क्षत्रिय-धर्म म्हणजे काय, हत्त्या केली तरी पाप का लागत

नाहीं, अशा चौकटींतूनच कर्मयोगाकडे पाहण्याची संवय आपणाला लागलेली आहे. यामुळें होतें असें कीं, सामान्य माणसाच्या रोजच्या जीवनांत न उद्भवणारा असा हा एक विषय आहे, असें आपण धरून चालतों; व 'तत्त्वज्ञानाची चर्चा' म्हणूनच त्याकडे बघतों. याचाच अर्थ असा कीं, आपण जें जीवन रोज जगतों, त्या जीवनाला याचा स्पर्श न होईल, अशी काळजी आपण घेतों. अर्जुन हा आपल्यासारखाच माणूस होता, हें आपण विसरतों. त्याचेपुढें उभा राहिलेला पेंच अथवा संघर्ष, महापुरुषांच्या आयुष्यांत येणारा, म्हणजेच आपल्या आयुष्यांत न येणारा असा आहे, असें गृहीत धरून नंतरच या पेंचप्रसंगातून बाहेर पडण्याची वाट श्रीकृष्णानें त्याला कशी दाखविली, याची पृच्छा आपण करतों. मला वाटतें कीं, अशा पद्धतीनें आपण हा सर्व प्रश्न अंगाबाहेर टाकतों.

कर्मयोगाचा आणखी एक अर्थ कांहीं लोकांना सोयीचा वाटतो. तो असा कीं, आपलें कर्तव्य कोणतें हें एकदां ठरलें कीं, मग सत्यासत्य, शुभाशुभ असें कांहींच राहात नाहीं. तें कर्तव्य पार पाडीत असतांना, वाटेल तें करावयास हरकत नाहीं. काळजी एवढीच घ्यावयाची कीं, फलाची आसक्ति मनांत ठेवावयाची नाहीं. यालाच निष्काम कर्म असें ते समजतात. "फक्त कर्तव्यभावनेनें केलें जाणारें हें कर्म मनांतला संघर्ष मिटवितें. एवढेंच नव्हे, तर माणसाची क्रियाशक्ति (efficiency) वाढविते. कारण, कर्तव्यभावनेचा आवेश माणसाला विशेष सामर्थ्य देतो," असें या लोकांना वाटतें पण ते हें विसरतात कीं, कर्तव्य हें कांहीं आकांक्षांमधूनच जन्माला आलेलें असतें.

आणखी एक समजूत आहे. ती अशी कीं, सिद्ध अथवा पूर्णज्ञानी झाल्यानंतर कशा पद्धतीनें कर्म होतात, हें सांगणारें शास्त्र म्हणजें कर्मयोग. माणसाला ही जिज्ञासा फार मोठी असते. त्याला सारखें वाटत असतें कीं, ज्ञानी म्हणून ज्यांचा गौरव केला जातो, त्यांचें कसें काय जमतें, तें समजून घ्यावें. आपणापुढें ज्या अडचणी येतात त्या अडचणींतून हे ज्ञानी लोक कसा काय मार्ग काढतात, हें जाणून घेण्याची तळमळ प्रत्येकाला अगदीं अस्वस्थ करते जो तो हेंच विचारतो कीं, ज्ञानानंतर देहयात्रा चालेल काय ? त्याकरितां कांहीं कर्म करावेंच लागणार नाहीं काय ? तें ज्ञानाशीं विरोधी असणार नाहीं का ? ज्ञानी माणसाच्या कुटुंबियांची वाट काय ? हे सर्व प्रश्न मनाच्या एका चमत्कारिक अवस्थेंतून विचारले जातात. ते विचारतांना, माणूस स्वतःशीं पुढील प्रकारचा संवाद करीत असतो. "मला आतां ठरवलें पाहिजे कीं, मीं ज्ञानी व्हावयाचें कीं नाहीं ? सर्व ग्रंथ आणि विचारवंत ज्ञानी माणसाची महति गातात. परमेश्वराची प्राप्ति ज्ञानवान् माणसालाच होते, इतरांना नाहीं. परमेश्वरप्राप्ति हें तर मानवी आयुष्याचें ध्येय आहे. हें ध्येय मीं डोळ्यांपुढें ठेवलेंच आहे. तेव्हां आतां प्रश्न एवढाच उरला आहे कीं, कालांतरानें जेव्हां मी

ज्ञानी होईन, तेव्हां त्या अवस्थेंत कांहीं धोका आहे का ? ज्ञानी झाल्यानंतरसुद्धां माझा देह राहिला पाहिजे, बायकामुलांची व्यवस्था लागली पाहिजे. माझा धंदा व्यवस्थित चालला पाहिजे. कांहीं लोकसेवाहि हातून घडली पाहिजे. तेव्हां या सर्व गोष्टी ज्ञानी माणसाच्या हातून कोणत्या युक्तीनें पार पडतात हें मला समजून घेतलेंच पाहिजे." या अशा मनोवृत्तींतून कर्मयोग म्हणजे काय, असें जेव्हां आपण विचारतों, तेव्हां त्या विषयाचें खरें ज्ञान आपण स्वतःपासून किती दूर ठेवूं इच्छितों, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. आपल्या वरील विचारसरणीचा अर्थ एवढाच नाहीं का, कीं माझें जें हल्लीं चाललें आहे, तें कायम ठेवून, कर्मयोगासारख्या विद्वन्मान्य विषयाचें ज्ञान, मला जर गांठीं बांधतां आलें तर तें हवें आहे. दुसऱ्या शब्दांत हीच गोष्ट सांगावयाची तर असें म्हणतां येईल कीं, माझें हल्लीचें अज्ञान कायम ठेवून, कर्मयोगासंबंधीचें फक्त शब्दज्ञान मला पाहिजे.

कर्मयोगाचा खरा अर्थ समजून घ्यावयाचा असला, तर वरील तीनहि प्रकारची दृष्टि आपण टाकून दिली पाहिजे एकाच दृष्टीनें या विषयाकडे पाहिलें पाहिजे; व ती ही कीं, माझ्यासारखा सामान्य माणूस रोज जें कर्म करतो तें करण्याच्या पद्धतींत कांहीं चूक होत आहे का ? ही चूक समजून येण्याकरतां, प्रथम मला माझें दैनंदिन जीवन नीट न्याहाळून पाहिलें पाहिजे. आपण कशा पद्धतीनें कर्म करतों याबद्दलचें कृष्णमूर्तींचें पुढील विश्लेषण फार महत्त्वाचें आहे:–

"We act from an idea. First there is the idea and then action in conformity with that idea or rather there is an effort to approximate action to the idea or to bridge the gap between them; the idea being a reaction, a response from the background of experience, of knowledge, of tradition and so on."

(*Talks at New Delhi* (1960) p. 90)

आपण खूप समजतों कीं, कोणतें कर्म करावयाचें याबद्दलचा जो निर्णय आम्ही करतों, तो स्वतंत्र बुद्धीनें केलेला असतो. पण वस्तुस्थिति तशी दिसत नाहीं. प्राप्त परिस्थितींत जें योग्य व जरुरीचें, तेंच कर्म माणसाच्या हातून कां घडत नाहीं ? हा एकच प्रश्न समाजधुरिणांना प्राचीन कालापासून सतावीत आला आहे. या प्रश्नाचें उत्तर सांपडावें म्हणून त्यांनीं केलेली सर्व खटपट वाया गेलेली दिसत आहे. माणसें अजूनहि नीट वागत नाहींत. हें असें कां व्हावें ? याचें कारण एवढेंच दिसतें कीं, माणूस हा शृंखलाबद्ध आहे; आणि असें असूनहि त्याची धांवधांव मोकळ्या माणसासारखी फार जोरांत व वाटेल त्या दिशेला चालू आहे. यामुळें त्याची दिशा तर चुकतेच, पण शरीरहि रक्तबंबाळ होतें. या शृंखला तरी कोणत्या, कीं ज्यांच्या योगानें 'कर्मसु कौशलम्' माणसाच्या अंगीं येत नाहीं ?

या शृंखला बाहेर नसून माणसाच्या मनांत आहेत. मनांत कर्माबद्दल जेव्हां प्रेरणा निर्माण होते, तेव्हां आपलें मन मोकळें असें कधीं असतच नाहीं. **गत अनुभवाची कसली तरी प्रतिक्रिया, अथवा संपादन केलेल्या ज्ञानामुळें उत्पन्न झालेली मनीषा अगर गतानुगतिकतेचा मनावर पडलेला आसर, यांनीं आपले संपूर्ण मन आधींच व्यापलेलें असतें.** या अशा मनांत 'कर्म करावें' असा विचार येतो, तेव्हां तो कशा स्वरूपाचा असेल ? त्या कर्माचें स्वरूप आधींच निश्चित झालेलें असणार नाहीं का ? याला कर्मस्वातंत्र्य म्हणतां येईल का ?

अर्जुनाचें कसें काय झालें असेल तें असो; पण आम्ही सकाळीं उठल्यापासून झोंपेपर्यंत जें कर्म करतों त्याचा उगम कोठून होतो, हें सहज पाहतां येण्यासारखें आहे. आमचें कर्म तीन प्रकारचें असतें :—

(१) **पहिला प्रकार प्रतिक्रियेंतून उद्भवणाऱ्या कर्माचा.** याचें सर्वांत सोपें उदाहरण, सूडबुद्धींतून होणाऱ्या कर्माचें. कोणींतरी केव्हांतरी आपला अपमान केलेला असतो. ते त्याचे शब्द जेव्हां आपण ऐकले, तेव्हांच संपून जात नाहींत; तर ते हृदयांत घर करून बसतात. त्या शब्दांचा अर्थ आपण चित्तांत उगाळीत बसतों व आपल्या मनाची या क्रियेंतून जी धारणा होते ती आपणांला सांगते कीं, "आतां उत्तम संधि आली आहे, करून टाक परतफेड !" या अशा वृत्तींतून होणारें कर्म, हें भूतकालांतून जन्माला आलेलें असतें. तें सहज व क्रमप्राप्त तर मुळींच नसतें. या कर्माचा हेतूच मुळीं धडा शिकविण्याचा असतो. आपल्या बोचक शब्दांनीं शत्रूचा गोरामोरा झालेला चेहरा व त्याची लोकांत उडालेली फजिती, यांचें एक रम्य चित्र आपल्या मनःपटलावर उमटतें व तें सुखद वाटतें कांहीं वेळां, हें असें करणें स्वसंरक्षणाकरतां जरूर आहे, अशी मखलाशीहि आपण करतों; पण ती स्वतःची व लोकांची फसवणूक असते.

(२) **गतानुभवाच्या प्रतिक्रियेंतूनच वासना निर्माण होते.** सबंध दिवसभर ज्या क्रिया आपण करतों, त्यांपैकीं बहुतेक सगळ्या क्रियांचा जन्म, वासनेच्या पोटीं असतो. शेजारच्या शेटजींची ॲम्बॅसेडर गाडी आपण पाहतों. त्या सुंदर गाडीचें दृश्य दिसलें कीं संपलें, असें होत नाहीं. डोळ्यांना ती गाडी दिसूंच नये, असे कोणी म्हणत नाहीं; त्या गाडींत मालकाच्या परवानगीनें एखादे वेळेस बसावयासहि हरकत नाहीं. पण तो अनुभव तेथेंच तुटत नाहीं. गाडीचें तें नयनमनोहर स्वरूप, पुढेंहि आठवत राहतें. तिच्यांतल्या पराच्या गाद्यांचा मऊ स्पर्श, पुढें तसाच स्मृतींत घोळत राहतो व या गोड स्मृति आपल्या चित्त-सागरांत फार मोठी खळबळ उत्पन्न करतात; नानाप्रकारच्या लाटा तेथें उठतात. त्यांतल्या दोन लाटा तर स्पष्ट दिसतात. एकीचें नांव 'असूया,' तर दुसरीचें नांव 'महत्त्वाकांक्षा' – मोठेपणाची हांव. त्या शेटजीविषयींच्या असूयेमुळें अथवा आपण त्यांच्यासारखे

मोठे, श्रीमंत झालें पाहिजे अशा इच्छेमुळें, आपल्या हातून अनेक प्रकारचीं कृत्यें घडत राहतात. **कोणतातरी सुखद अनुभव आल्यानंतर तो आणखी अधिक मिळावा, असें वाटावयास लावते ती वासना.** ही वासना निरनिराळीं रूपें धारण करते, व आपणांला कार्यप्रवृत्त करते. पण एवढें खास कीं, वासनेचा जन्महि भूतकालांतून झालेला असतो.

(३) आणखी एका तऱ्हेनें आपण कर्म करतों. कर्म करण्याची ही रीत फार चांगली, असें आपण समजतों. आपण पुष्कळ वाचलेलें अथवा ऐकलेलें असतें. इतिहासाचा अभ्यास केलेला असतो. कोणतें कर्म करावें व कोणतें करूं नये, याबद्दलहि आपण पुष्कळ ज्ञान संपादन केलेलें असतें. हा अशा प्रकारचा ज्ञानाचा जो संग्रह आपण जमा केलेला असतो, त्यांतून आपल्या प्रवृत्तीला अनुकूल असेल, तेवढेंच ज्ञान आपण निवडून बाजूला काढतों; व तेंच खरा मार्ग दाखविणारें ज्ञान असें समजतों. नंतर तें ज्ञान जें सांगेल तें कर्म आपण करूं लागतों. बतावणीमात्र आपण अशी करतों कीं, अगदीं अचूक सत्य आपणांला सांपडलेलें आहे; व त्या सत्याकडे जाणें आतां अपरिहार्य आहे. बहुजनांवर प्रभाव पाडण्याचें सामर्थ्य निसर्गानें ज्याला दिलें आहे, असा समर्थ माणूस जर ही बतावणी लोकांपुढें करूं लागला, तर त्याला हिटलरची प्रतिष्ठा प्राप्त होते. मग तो एक वाद अथवा विचारप्रणालि (ideology or ism) शोधून काढतो. त्याचे अनुयायी, त्या विचारप्रणालीचा तो सांगेल त्या दिशेनें व सांगेल तेवढाच अभ्यास करतात व त्यानें काढलेलें सत्य हेंच अंतिम समजून, त्या सत्याच्या चौकटींत बसतील अशींच कर्में करूं लागतात. या सर्व प्रकारच्या कर्मांचा जन्महि भूतकालापासूनच झालेला असतो.

कर्माचा तिसरा प्रकार आपल्या जास्त परिचयाचा आहे प्रत्येकाला असें दिसून येईल कीं, त्याच्या दैनंदिन जीवनात यांत्रिकपणा फार मोठ्या प्रमाणावर आहे. "इतके दिवस मी हेंच करीत आलों तेव्हां आतां यापुढेंहि मला तेंच केलें पाहिजे," या भावनेनें आपण बरींचशीं कामें करतों. कालचींच कामें अथवा त्या कामासारखींच कामें आजहि न केलीं, तर भागणार कसें, असें आपणांला वाटतें. जणू काय नवीन कांहीं केलें तर आपण आणि जग, दोन्हींहि साफ बुडून जाऊं! "आमचीं कामें यंत्राप्रमाणें अगदीं बिनबोभाट होतात," अशी प्रौढी जेव्हां कर्तबगार (efficient) समजलीं जाणारीं माणसें मिरवतात, तेव्हां त्यांचें हंसूं येतें. त्यांच्या हें लक्षांतच येत नाहीं कीं, **ज्या दिवशीं यंत्राइतका कार्यक्षम झालेला माणूस बिसेल तोच दिवस त्याचा मृत्युदिन असेल.** निर्वाहाकरिता करावा लागणारा व्यवसाय म्हणून, अथवा समाजानें अगर कुटुंबानें टाकलेली जबाबदारी म्हणून, माणूस त्याच त्याच गोष्टी रोजच्या रोज करीत असतो. तसेंच या दोन प्रकारां-

खेरीज इतरहि बरींच कर्मे, पूर्वी इतरांनीं केलीं म्हणून, अथवा आजूबाजूचे लोक करतात म्हणून, माणूस करीत असतो. अनुकरणामुळें जें कर्म उत्पन्न होतें, तें भूतकालांतून पुढें येतें, हें स्पष्ट करण्याची जरुरी नाहीं. या कर्माची प्रेरणा कोणत्याच स्वतंत्र अथवा नव्या विचारांतून मिळालेली नसते. पण बऱ्याच वेळां माणसाला वाटतें कीं, मी एक नवी कार्यपद्धति (उदा० फॅशन) इतरांकडून घेत आहें. तो हें विसरतो कीं, दुसऱ्याचा अगदीं नवा विचारसुद्धां आपणाकडे येतांना जुना झालेला असतो.

कर्म करण्याच्या आपल्या पद्धति या अशा प्रकारच्या आहेत. थोडक्यांत सांगावयाचें तर असें म्हणता येईल कीं, **अगोदर आपल्या चित्तांत ज्या कर्माची कल्पना** (idea) **तयार नसते, असें कोणतेंच कर्म आपल्या हातून होत नाहीं.** येथें 'कल्पना' हा शब्द नेहमींपेक्षां निराळ्या अर्थानें वापरला आहे. प्रत्यक्ष कृति होणें जरूरच आहे असें ठरल्यानंतर, त्या कृतीचीं अंगोपांगें कोणत्या क्रमानें व कशा पद्धतीनें हातांतून घडावयाचीं, याबद्दलची योजना (planning) कर्म सुरू होण्याच्या अगोदर तयार असावी लागते. तशी योजना केल्यामुळें कर्म बाधक होतें, अशांतला भाग नाहीं. तसेंच शरीरधारणेकरतां, अथवा कुटुंबपोषण व्हावें म्हणून आणि फक्त एवढ्याच उद्देशानें ज्या कृती आपण करतों, त्यांचाहि विचार हल्लीं आपण करीत नाहीं. ज्या कर्मांतून सुखदुःख निर्माण होतें, अशाच कर्माबद्दल विवेचन आपण करीत आहोंत. आपल्या जीवनाचा फार मोठा भाग याच कर्मांनीं व्यापलेला आहे.

अमुक एक कर्म करावें, असा जो संकल्प आपण करतों, तो संकल्प मनाच्या ज्या पार्श्वभूमींतून ((back-ground) तयार होतो, त्या पार्श्वभूमीला उद्देशून "कल्पना" हा शब्द या प्रकरणात वापरला आहे. कर्माबद्दलची ही कल्पनाच (idea) संघर्ष निर्माण करते; आणि आशानिराशा, यशापयश, यांच्या द्वंद्वांत आपणाला अडकवते.

आपल्या मनाच्या बाहेर, द्रुतगतीनें ज्या घटना घडत असतात, त्या घटना आणि कर्माची प्रेरणा देणारी कल्पना (idea) यांच्यामध्यें संघर्ष कसा निर्माण होतो, हें पाहणें महत्त्वाचें आहे **जीवन हा एक फार मोठ्या वेगानें सारखा पुढें वाहात राहणारा प्रवाह आहे.** या प्रवाहाबरोबर आपण वाहात नाहीं; तर प्रवाहाच्या पाण्यापैकीं कांहीं पाणी आपण बादलींत भरून घेतों व त्या बादलींतहि खरें जीवन सांपडावें, अशी अपेक्षा करतों. ही अपेक्षा व तिला अनुसरून होणारी आपली विपरीत कृति, संघर्षाला जन्म देते. जीवनप्रवाह खंडित करून त्यांतला कांहीं भाग ज्या बादलींत आपण सांठवितों त्या बादलीलाच, कल्पना (idea)

०१३५९ - निवड - २१६६ - 9/7/02 ५१

असें नांव वर दिलें आहे. ही कल्पना प्रवाही जीवनाला ठराविक सांच्यांत ओतूं पाहते, व तिचा हा प्रयत्नच आपल्या आयुष्यांतल्या सर्व प्रकारच्या दुःखांना कारणीभूत होतो.

कल्पना एकीकडे व जीवन दुसरीकडे, असें हें द्वैत निर्माण होतें. ही कल्पना म्हणजेच आपला "मी" असें म्हटलें तरी चालेल. या 'मी' च्या भूमिकेवर ठाम उभें राहूनच, आपण सर्व कर्में करूं इच्छितों. जीवनप्रवाहापासून अगदीं अलग राहूं पाहणारा हा 'मी' च, अर्जुनाच्या अथवा आपल्या सर्व समस्यांना जन्म देतो. हा 'मी' जीवनाला आदि आणि अंत यांच्या कक्षेंत आणून बसवितो अथवा तें तसें मर्यादित आहे, असें भासवितो. हा 'मी' कोणत्या भ्रमांतून कसा निर्माण होतो, हें लक्षांत आल्याखेरीज, जीवन-सत्याशीं सुसंगत अशींच कर्में करण्याचें कौशल्य (म्हणजेच कर्मयोग) आपल्या अंगीं कसें येणार? 'मी' उमजल्याखेरीज कर्मयोगाचा अर्थसुद्धां समजत नाहीं, अशी परिस्थिति आहे. असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, 'मी' चा निरास होतांच कर्मयोगाची प्राप्ति आपोआप होते.

'मी' आणि जीवनाचा अनाद्यनंत प्रवाह यांचें वर्णन करतांना श्री. जे. कृष्णमूर्ति म्हणतातः–

"We have to begin, surely, by seeing that life is infinitely wide, that it has no beginning and no end. Life has a beginning and an end only when it is 'Yours,' that is when you function from a centre....."

(*Talks at New Delhi*, (*1960*) p. 100)

जीवनाचें हें धांवतें स्वरूप ध्यानांत न घेतल्यामुळें कर्मयोगाची चतुःसूत्री म्हणून ओळखला जाणारा, गीतेंतील 'कर्मण्येवाधिकारस्ते... .!' हा श्लोक, आपल्या मनांत नाना प्रकारच्या शंका उत्पन्न करतो.

या श्लोकांत कांहींतरी भलतेंच व अगदीं अशक्य असें सांगितलें आहे असें आपणांला वाटूं लागतें. कर्माचें फल डोळ्यांपुढें ठेवल्याखेरीज, म्हणजेच कर्माची योजना (planning) केल्याखेरीज, कर्म करतांच येणार नाहीं, असें आपलें मन सांगतें. असें असूनहि कर्म करीत राहावयाचें हें कसें जमणार, असा संशय येतो. कर्मफलाबद्दलचा हेतु म्हणजे प्रत्यक्ष कर्माची योजना अगर रूपरेषा नव्हे, तर अमुकच कर्म करावें असा संकल्प ज्या फलाच्या अपेक्षेमुळें आपण करतों, ती वासना होय. या वासनेनें आपलें चित्त व्यापलेलें असतें. याचें कारण एकच आहे. तें हें कीं, तें चित्त भूतकालांत गेलेलें असतें. भूतकालांतल्या घटनेची स्मृति व तिच्यामुळें होणारी प्रतिक्रिया या बोहोंमधून कर्मसंकल्प जन्माला येतो. त्याचाच

ग्रंथ संग्रहालय

अर्थ असा कीं, चालू क्षणांतल्या जीवनप्रवाहाशीं या संकल्पाची फारकत झालेली असते. हा संकल्प म्हणजे आपल्या 'मी' चें दुसरें नांवच आहे, म्हणाना !

एक गोष्ट फार महत्त्वाची आहे. ती ही कीं, ही भूमि कर्मभूमि आहे. कर्म करण्याचा माणसाला अधिकार आहे; एवढेंच नव्हे तर कर्माखेरीज माणूस जिवंतहि राहूं शकत नाहीं. यामुळें प्रश्न एवढाच उरतो कीं, जीवनप्रवाहापासून अलग न पडतां कर्म कसें करावें ? एकच कर्म माणसानें टाळलें पाहिजे; तें म्हणजे चालू क्षणापासून वेगळें पडण्याचें. हा वेगळेपणा केव्हां उत्पन्न होतो ? अर्थात् भूतकाळांत अगर भविष्यांत, आपलें चित्त गुंतलेलें असेल तेव्हां. भविष्यकालाला खरोखर कांहींच अस्तित्व नाहीं; कारण भूतकालांतल्या सुखानुभवांना अनुसरून मनानें रचलेली जी इमारत असते, तिला आपण भविष्यकालांत येणारी स्थिति असें समजतों. खरोखर पाहिलें असतां, भविष्याबद्दलची मनोराज्यें हीं गतानुभवांचीं चितनें असतात. एकूण असें दिसतें कीं, आपलें मन नेहमीं भूतकालांतच घिरट्या मारीत असतें. मनाच्या या व्यापारांतून 'मी' निर्माण होतो. या 'मी'च्या अपेक्षा असतात. त्यांना आसक्ति असें नांव आहे, परंतु **'मी' आणि त्याची आसक्ति, या दोन भिन्न अशा वस्तु नाहींतच.** एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. याचा अर्थ असा कीं, आसक्तिरहित कर्म करणें म्हणजे 'मी'रहित होऊन कर्म करणें होय. या 'मी'रहित अवस्थेंत कर्म करतां येतें, एवढेंच नव्हे तर तें अगदीं बिनचूक आणि सामर्थ्ययुक्त असें असतें. ही कला ज्याला साधली, त्याच्या अंगीं कर्मयोग बाणला असें समजावें.

* * *



सात

समस्या आणि संघर्ष

जिकडे पाहावें तिकडे माणसें त्रस्त दिसतात. कुणी बोलतो, कुणी बोलत नाहीं, एवढाच फरक. या लोकांपैकीं जे थोडे लोक एखाद्या शारीरिक व्याधीनें ग्रस्त असतात त्यांना वगळून, इतरांचाच विचार आपण करूं.

प्रत्येकजण काळजीनें काळवंडलेला दिसतो. कसलीतरी समस्या (problem) प्रत्येकाच्या मागें लागलेली असते. कोणतातरी संघर्ष जिवाला हैराण करीत असतो. एक समस्या सुटते न सुटते तोंच दुसरी उत्पन्न होते. एक संघर्ष मिटला म्हणून सुटकेचा उद्‌गार काढावा, तोंच दुसऱ्या प्रकारचा संघर्ष जीवनांत उत्पन्न होतो. माणसाला फक्त कांहीं क्षण अथवा फार तर कांहीं दिवसच निवांतपणा लाभावा, अशी नियतीची योजना दिसते. पण हा निवांतपणा तरी मनाच्या तळापर्यंत असतो का ? नाहीं, तशीहि खात्री देतां येत नाहीं. कांहीं वेळां, कुणी भेटायला आलें व "काय चाललें आहे ?" असें त्यानें आपणांस विचारलें, तर आपण म्हणतों, "कांहीं नाहीं, निवांत बसलों आहें." पण या वाक्यांतले शेवटचे दोन शब्द खरे असतात. त्या वेळीं आपण इकडे पळ, तिकडे धांव अशी शरीराची हालचाल करीत नसतो, एवढाच काय तो खरा भाग असतो. मन निवांत नसतें, तें कोणत्या तरी गतघटनेचा विचार करीत असतें, अथवा पुढील काळाबद्दलची योजना ठरवीत असतें. शरीर जरी स्वस्थ असलें, तरी मन कधीं स्वतःच्या ठिकाणीं स्थिर राहात

नाहीं. जेव्हां आपण निवांत आहोंत असें आपणांला वाटतें तेव्हां त्याचा अर्थ इतकाच असतो कीं, मनांत, बाहेर दिसण्यासारखा प्रक्षोभ निर्माण झालेला नाहीं. पण मनाच्या आंतल्या गाभाऱ्यांत कसलीतरी चिंता, कसलातरी विचार चाललेलाच असतो. एक प्रकारची सूक्ष्म आशा त्या विचाराला चिकटलेली असते; व ती असा भास निर्माण करते कीं, 'सर्व कांहीं ठीक चाललें आहे.' पण हा ठीकपणा केव्हां बिघडेल याचा नेम नसतो.

वर सांगितलेला मर्यादित निवांतपणासुद्धां, फारच क्वचित् अनुभवास येतो, असें बहुतेक वाचक कबूल करतील. पण या निवांतपणाच्या वेळांत जो उद्योग आपलें मन करीत असतें, त्याचें स्वरूप पुढें येणाऱ्या लढाईची पूर्वतयारी अथवा मागल्या लढाईंत झालेल्या जखमा भरून कशा निघतील याबद्दलची तरतूद, असेंच असतें. दोन लढायांच्या दरम्यानचा हा संधिकाल असतो, व या संधिकालाला 'निवांतपणा' अगर 'शांतता' असें नांव देण्याचा प्रघात पडला आहे, एवढेंच काय तें. हे संधीचे क्षण मनाला थोडी विश्रांति देत असतील, कदाचित्; पण आपलें मन गाढ झोंपेचा काल सोडला तर, नेहमींच कोणत्या ना कोणत्या समस्येशीं झगडा करीत असतें, असें विधान केलें तर तें मुळींच चूक होणार नाहीं. कळूं लागल्यापासून, मरणापर्यंत करावें लागणारें हें युद्ध टाळण्याचा कांहीं मार्ग आहे का ?

समस्यांशीं झगडतां झगडतां माणूस अगदीं मेटाकुटीस येतो. त्याचें मन थकतें, आयुष्य संपतें; पण समस्या कांहीं संपत नाहींत. हें असें कां व्हावें ? कितीहि दूर धांवा, क्षितिज आपलें पुढें आहेच, असा हा प्रकार आहे. समस्या बदलतात, पण समस्यायुक्त जीवन कायमच असतें. आपणांला वाटतें, बाहेरची परिस्थिति अगर बाहेरचा कुणीतरी आपल्या जीवनांत प्रत्येक वेळीं नवी समस्या उत्पन्न करतो. पण हें खरें आहे का ? एकपात्री नाटकांत एकच व्यक्ति सर्व भूमिका करते त्याप्रमाणें, एकच समस्या निरनिराळीं रूपें घेऊन पुन्हां पुन्हां आपल्यापुढें उभी ठाकते, असें तर होत नसेल ? तसें जर असलें तर समस्यामुक्त होण्याचें आपलें काम, फारच सोपें होईल, नाहीं का ? कुणाला माहीत तें सोपें होतें का अवघड होतें ? जो शत्रु असंख्य रूपें धारण करूं शकतो व कोणत्या रूपांत तो पुढें येणार आहे याची आधी कल्पनाहि येत नाहीं, तो जिंकणें सोपें असें तरी कसें म्हणावें ?

सोपें असो अगर अवघड असो, हें काम आपल्याला केलेंच पाहिजे. प्रथमदर्शनीं एक गोष्ट आपल्या लक्षांत येते. ती ही कीं, प्रत्येक समस्येचा धागा कोणत्यातरी घटनेशीं अथवा व्यक्तीशीं जोडलेला असतो. आयुष्यांत असंख्य समस्या उत्पन्न होतात. याचें कारण, आपला संबंधच मुळीं असंख्य घटनांशीं व

अनेक व्यक्तींशीं येतो. आपल्या भोंवतीं घडणाऱ्या घटना अजिबात थांबविणें तर दूरच; पण त्यांची संख्या कमी करणें, हेंसुद्धां आपल्या हातांत नाहीं. फारतर घटनांचा प्रकार बदलतां येईल. पण मौज अशी आहे कीं, सुरुवातीस एखादी घटना अगदीं निरुपद्रवी, किंबहुना रमणीय वाटेल, पण तिचा रंग केव्हां पालटेल याचा कांहीं अंदाजच बांधतां येत नाहीं. तेव्हां नव्या नव्या घटना या आपल्याभोंवतीं घडत राहणारच. एवढेंच नव्हे, तर एखादी घटना कांहीं काल कायम टिकली असें दिसलें, तरी तिचें स्वरूप सारखें बदलत राहणार असें धरून आपण चाललें पाहिजे. आपलें मन ही वस्तुस्थिति कबूल करण्यास तयार होत नाहीं; व इथेंच खरी अडचण उत्पन्न होते.

आपल्या आयुष्यांत घडणाऱ्या सर्वच घटना नव्या असतात. परंतु आपणांला तसें वाटत नाहीं. फक्त कांहीं महत्त्वाच्या घटना आपण नव्या मानतों. विद्यालयांत मिळविलेलें एखाद्या परीक्षेंतलें उज्ज्वल यश, विवाह, धंद्यांतलें पदार्पण, अगर पुत्रप्राप्ति, यासारख्या कांहीं घटना आपण नव्या मानतों. पण त्यांचें हें नवेंपण सुद्धां, अगदीं नऊ दिवसांपुरतें नसलें तरी फारच अल्पकाल टिकतें, यांत संशय नाहीं. जोंपर्यंत एखादी घटना नवी असते तोंपर्यंत ती समस्या बनूं शकत नाहीं. कारण, तिच्याशीं आपणांला झगडा करावा असें वाटत नाहीं. जेव्हां एखादी गोष्ट जुनी आणि नीरस होऊन बसते, पण तिचा त्याग तर करतां येत नाहीं, तेव्हां तिला 'समस्या' असें नांव प्राप्त होतें. आपलें जीवन समस्याविरहित, असें जर व्हावयाचें असलें तर, **घटना जुन्या न होतील अशी काळजी घेतली पाहिजे.**

घटना जुन्या होतात, का आपलें मन भूतकालांत गुंतून राहिल्यामुळें अडचण उत्पन्न होते ? पुत्रोत्पत्तीच्या वेळचा आनंद अथवा पुत्राच्या विवाहाच्या वेळीं वाटलेला उत्साह कोणीकडे, आणि वृद्धावस्थेंत त्याच्याशीं सतत होणाऱ्या मतभेदामुळें पित्याची उद्विग्न झालेली मुद्रा कोणीकडे ? एकाच व्यक्तीची संगति प्रथम हवी वाटते, पण नंतर ती डोळ्यांपुढेंसुद्धां नकोशी होते, असें कां व्हावें ? ती व्यक्ति बदललेली असते, का गतकालावर आधारलेल्या आपल्या अपेक्षा अनर्थाला कारण होतात ? असे विसंवाद जेव्हां उत्पन्न होतात तेव्हां त्यांचें मुख्य कारण आपल्या मनाला कशावर तरी भिस्त ठेवून बसण्याची (dependence) जी संवय लागलेली आहे, ती असते. " हें असेंच असलें पाहिजे " असा मनाशी प्रथम निश्चय करून, नंतरच माणूस प्रत्येक घटनेकडे अथवा व्यक्तीकडे पाहूं लागतो. मग त्याच्या मनांतल्या कल्पनेशीं, सत्याचा मेळ बसला नाहीं कीं लगेच त्याचें चित्त खवळतें. त्या पुढच्याच क्षणाला, तो स्वतःच्या परिस्थितीची इतर कोणाच्या तरी परिस्थितीशीं तुलना करूं लागतो; आणि त्याच्या चित्तांत जो प्रक्षोभ अगर उद्विग्नता निर्माण होते, तिलाच आपण, " जीवनांतली समस्या " असें नांव देतों.

वरवर जरी पाहिलें, तरी हें उघड दिसतें कीं, चित्तांत जें असतें त्याचा बाहेरच्या सत्याशीं मेळ बसला नाहीं कीं संघर्ष सुरू होतो. संघर्ष सुरू करतांना आपला हेतु एकच असतो. तो असा कीं, बाहेरच्या सत्याला अथवा व्यक्तीच्या वर्तनाला असा कांहीं आकार द्यावा कीं, त्याच्या योगानें चित्तांतली अपेक्षा पूर्ण व्हावी. हें नक्की जमेल असेंच जो तो धरून चालतो. बाहेरच्या सत्याच्या अंगीं, स्वतःचें कांहीं सामर्थ्य असेल, असें कुणालाच वाटत नाहीं; आणि इथेंच फसगत होते. प्रत्येकाचा अहंकार हेंच सांगतो कीं, वरील हेतु साध्य करण्यांत यश, आज ना उद्यां मिळणारच. बाहेरच्या परिस्थितीशीं भांडण असतें तेव्हां हा संघर्ष कमी तीव्र असतो; पण इतर व्यक्तींशीं जेव्हां संबंध येतो तेव्हां दोन्ही बाजूंचा अहंकार हा बुद्धिमत्ता, संपत्ति इत्यादि आयुधांची मदत घेतो; आणि मग तें युद्ध अधिक व्यापक व जास्त भयानक प्रमाणावर लढलें जातें.

समस्येचें संघर्षांत रूपांतर झाल्यावर त्यांत यश कसें मिळेल यांची चिंता करण्यापेक्षां समस्येच्या प्रथमावस्थेकडेच जास्त लक्ष दिलें तर? हा मूलग्राही विचार करण्यास जर आपण शिकलों तर बरीच अनर्थपरंपरा टळेल, असें वाटतें. कृष्णमूर्ति म्हणतात :–

"A problem exists only when it has taken root in the mind. Once an issue takes root in the mind, it becomes a problem, and then the mind will have to solve the problem, but having its root in the conditioned mind, the problem becomes insoluble. *And is it possible not to allow any issue to take root in the mind, but to deal with it directly and immediately as it arises ?* But we cannot deal with it directly *if we condemn it, if we are identified with it,* if we in any way judge it, because our judgment, out condemnation, our comparison is the outcome of our conditioning and therefore it only *strengthens* the problem!..... We are brought up from childhood to compare, to judge, to evaluate and thereby we create duality and hence conflict."

(*Talks in America,* (1954) p. 23).

जीवनांत उद्भवणाऱ्या प्रश्नांशीं मुकाबला करतांना आपल्या काय काय चुका होतात, हें वरील उताऱ्यांत फारच स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. जीवनांत नाना प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात. त्यांतले कांहीं थोडे प्रश्न असे असतात कीं, त्यांच्याशीं आपल्या मनोविकारांचा कांहीं संबंध नसतो; असलाच तर तो दूरान्वयानें असतो. उदाहरणार्थ, पोट दुखूं लागलें तर जो प्रश्न निर्माण होतो, तो कसा सोडवावा, हें सहज समजण्यासारखें आहे. कोणत्यातरी डॉक्टरकडे जावें हा त्यावर उपाय. पण आपल्या आवडीच्या डॉक्टरकडे जावें का खऱ्या तज्ज्ञाकडें जावें, असा

जर पेंच पडला तर प्रश्न सोडविणें अवघड होतें. पण या अशा प्रश्नांना जीवनांतल्या समस्या, असें कोणी म्हणत नाहीं. ज्या प्रश्नांनीं मन हैराण होतें अथवा प्रक्षुब्ध होतें, त्यांचाच विचार आपण या प्रकरणांत करीत आहों. माणूस स्वतःला सुखी अथवा दुःखी ज्या प्रश्नांच्यामुळें समजतों, त्यांचाच विचार खरा महत्त्वाचा आहे.

प्रथम, असें सांगून टाकण्यास हरकत नाहीं कीं, निखळ सत्य (pure facts) असें ज्या घटनांचें वर्णन करतां येईल त्यांचेशींच माणासानें संबंध ठेवला, तर समस्या (problem) अशी उत्पन्नच होत नाहीं. पण **सत्य असें बाजूला काढणें** फार अवघड गोष्ट आहे. सत्याचा अपलाप कसा करावा, हीच विद्या आपण लहानपणापासून शिकत आलों आहोंत. पुष्कळदां जें प्रिय तेंच सत्य, निदान तें मिळविण्याचा आपला हक्क आहे, अशी समजूत आपल्या मनाची असते; आणि हेंच मन अप्रिय अथवा प्रतिकूल घटनांकडे विपरीत दृष्टीनें पाहावयास आपणाला शिकवितें. निव्वळ सत्य जें असतें तें कल्पनांनीं कसें झांकलें जातें व दुःखाला कारण होतें, याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कुटुंबांत घडणारा मृत्यु, हें होय. ही घटना. सत्यस्वरूपांत समजून घेतली तर तिच्यांतून कुटुंबियांनीं आपल्या दैनंदिन जीवनांत कांहीं बदल करण्याची जरुरी, कांहीं फेरव्यवस्था, यापेक्षां अधिक कांहीं परिणाम घडावयास नको. पण मृत्यु केवढें दुःख निर्माण करतो, हें आपण पाहतों. या घटनेला, हें जें भयंकर समस्येचें रूप येतें, त्याचें कारण असें आहे कीं, कुटुंबांतलीं माणसें मनानें त्या मृत्यूला म्हणजे मृत माणसाच्या स्मृतीला कवटाळूनच बसतात. त्यांचें मन गत अनुभवांची सारखी उजळणी, आंतल्या आंत करूं लागतें; व पूर्वीच्या काळाची हल्लींच्या परिस्थितीशीं तुलना करण्याचा उद्योग सुरू होतो, मनाचा हा उद्योग जोंपर्यंत सुरू असतो तोंपर्यंत कुणालाच चैन पडत नाहीं. मृत्यूमुळें होणाऱ्या शोकाचें स्वरूप, हें असें आहे. पुष्कळदां आपली समजूत अशी होते कीं, मृत्यु म्हणजे काय हें न समजल्यामुळें दुःख अनुभवाला येतें; पण तसें दिसत नाहीं. आपल्या चित्ताची कुटुंबांत घडणाऱ्या मृत्यूमुळें जी अवस्था होते ती अवस्था नीट समजून न घेतल्यामुळें दुःख आपल्या मानगुटीस बसतें, असें म्हटलें तर तें अधिक बरोबर होईल. जीवनांतल्या प्रत्येक समस्येबद्दल हीच परिस्थिति आढळून येईल. एखादी घटना घडते याला तितकें महत्त्व नाहीं, कारण स्वतंत्रपणें ती बरीचशी निरुपद्रवी असते. पण आपलें मन त्या घटनेबद्दल जें काय करतें, त्यांतून दुःखाची निर्मिति होते. आपलें मन अशा घटनेला स्पर्श न करतां, अगदीं **स्तब्ध असें बाजूला** राहिलें तर ? कदाचित् अगदीं निराळा अनुभव येईल, असें वाटतें. कृष्णमूर्तीचे शब्द असे आहेत :-

" Actually, how do we meet sorrow ? Do we ever meet it ? We do not know what sorrow is, we are forever running away

from it. That is all we know. If I know how to meet it, how to meet the fact, then the fact will do something to me. I cannot do anything about the fact, but I want to do something about it. So my very desire to translate, to interpret the fact, helps me to run away from it. So the mind is everlastingly active about the fact. The fact is, my son is dead. And I cannot face it..... So the mind is everlastingly finding ways, devices, not to meet the fact. *And yet sorrow can only be understood when I meet it. And it is only possible to meet, it when the mind is really still.....*"

(*Talks in America* (1954) p. 14)

थोडक्यांत असें दिसतें कीं, आपल्या जीवनांत जेव्हां कोणत्याहि प्रकारचें दुःख निर्माण होतें, तेव्हां त्याच्यापासून आपण जें पलायन करतों त्यांतूनच समस्या जन्माला येते. किंबहुना, या पलायनाच्या प्रकारालाच समस्या असें नांव आहे, असें म्हटलें तरी चालेल. हें पलायन थांबवून घटनांकडे नीट पाहण्याची कला, जर आपणांला हस्तगत झाली तरच समस्यामुक्त होण्याची आशा बाळगतां येईल.

आतांपर्यंत आपली अशी समजूत होती कीं, प्रतिकूल घटना घडल्या कीं, जीवनांत समस्या येणारच. समस्या, मनाच्या व्यापारांमुळें तयार होतात, ही गोष्ट तितकीशी आपल्या लक्षांत आली नव्हती; आणि म्हणूनच भोंवतालच्या घटनांचें नियमन करण्याकडेच सारें लक्ष आपण पुरविलें, व मन काय करतें हें पाहिलेंच नाहीं. मनाच्या सामर्थ्यानें आपणांला भुरळ पाडली; आणि मनानें निर्माण केलेले प्रश्न मनानेंच सोडवावेत, अशी व्यवस्था जीवनांत आपण करून टाकली.

माणसाच्या जीवनांत दोनच महत्त्वाच्या गोष्टी दिसतात. घटना घडत राहणें ही एक, आणि त्यांतून समस्या उभी राहणें ही दुसरी. घटनेंतून सुख (pleasure) अगर दुःख उत्पन्न होणें, यालाच मी "समस्या उभी राहणें" असें म्हणतों. कारण, कोणत्याहि घटनेचें स्वतःचें असें जें स्वरूप असतें, तें अनुकूलहि नसतें व प्रतिकूलहि नसतें. घटना घडली कीं, लगेच तिला अनुकूल असें नांव आपण देतों. तिनें आपणांला सुखी केलें अथवा दुःखी केलें, असें म्हणूं लागतों. तिला 'सुख' असें जरी म्हटलें तरी तिचें रूपांतर समस्येंत कसें होतें हें थोडा विचार केला असतां ध्यानांत येईल. तथाकथित 'सुखद' घटनेशीं प्रथमचा संपर्क (contact) ज्या क्षणांत होतो, त्यानंतरच्या क्षणापासून आपल्या मनांत एक निराळी हालचाल सुरू होते. ती ही कीं, या घटनेचें सुख टिकवून कसें धरावें, ही विवंचना मन करूं लागतें; अथवा या चालू सुखाची तुलना कोणत्या तरी तत्सदृश सुखाशीं (स्वतःच्या अगर इतर कोणाच्या तरी) मन करूं लागते. मनाचा हा उद्योग ज्या क्षणाला सुरू

होतो, त्याच क्षणाला 'सुख' हें त्या घटनेचें स्वरूप जाऊन त्या ठिकाणीं समस्या निर्माण होते. कांहीं वेळां ही समस्या 'दुःखजन्य' समस्येइतकी तीव्र नसेल कदाचित्. पण सुखें (pleasures) फार वेळ टिकत नाहींत, अशी तक्रार कित्येकदां आपण मनापासून करीत असतों. पूर्ण तृप्ति होईपर्यंत सुख जागेवर राहात नाहीं हें तर खरेंच; पण पुष्कळदां असें होतें कीं, सुख आपणाला नुसतें तोंड दाखवितें व इतक्या जोरानें धूम ठोकतें कीं, त्याचा आपणाला राग येतो. "हें सुख माझ्या आयुष्यांत आलें नसतें तरी बरें झालें असतें," असे उद्वेगाचे उद्गार आपण कितीतरी वेळां ऐकतों.

ज्या घटनेला आपण दुःख म्हणतों, तिला दुःख देण्याखेरीज, इतर कांहीं गुणधर्म असतील अशी शंकासुद्धां आपणांला येत नाहीं. तिचें स्वतंत्र अस्तित्व आपल्या खिजगणतींतच नसतें तिचें नांव 'दुःख' आणि स्वरूपहि दुःखमयच, अशी आपली ठाम समजूत असते. वर दिलेलें मृत्यूचें उदाहरण या प्रकारचें आहे. अशा घटनांचें रूपांतर समस्येंत होतें, हें आपण सहज कबूल करतों. मृत्यूसारखी घटना दुहेरी समस्येला जन्म देते, असें दिसतें. ही घटना समजत नाहीं, हा या समस्येचा एक भाग. ती दुःखाला कारण होते, हा दुसरा भाग. कसें का असेना, प्रत्येक घटनेचें रूपांतर समस्येंत व्हावें, असा नियतीनें जणू मानवाला शापच दिला आहे कीं काय, कळत नाहीं.

समस्या नेहमीं चित्तांत निर्माण होते; फक्त कोणत्यातरी घटनेचें निमित्त तिला हवें असतें, असें विधान आतां करण्यास हरकत नाहीं. चित्ताच्या कोणत्या व्यापारांमुळें, घटना ही निव्वळ घटना राहात नाहीं याचें दिग्दर्शन वर केलें आहे. पण होऊं नये ती चूक झाली, आणि समस्या चित्तांत उभी राहिली, तर पुढें काय करावयाचें? ज्याप्रमाणें मनाच्या बाहेरच्या घटनांना स्वतंत्र अस्तित्व असतें, तसेंच स्वतंत्र अस्तित्व, "समस्या" या घटनेला आपल्या चित्तांत आहे, असें धरून समस्येकडे पाहण्यास आपण शिकलें पाहिजे. तिचें संपूर्ण पण सत्य स्वरूप, आपण समजून घेतलें पाहिजे. हें केव्हां शक्य आहे? पुष्कळदां असें होतें कीं, समस्या असते एका आकाराची व आपलें मन तिला निराळाच आकार देतें. आपल्या मनानें निश्चल राहिलें तरच, समस्येचें खरें प्रतिबिंब मनाच्या आरशांत पडेल, हें उघड आहे. आरसा जर सारखा वेडावाकडा हालू लागला तर त्यांतलें प्रतिबिंब, समस्येच्या सत्य स्वरूपाची कल्पना आपणांला येऊं देणार नाहीं व आपली दिशाभूल करील, हें सहज समजण्यासारखें आहे. त्या समस्येची जी काय हालचाल असेल, ती तशीच चित्तांत उमटली पाहिजे; व याकरतां चित्त तटस्थ राहिलें पाहिजे. कृष्णमूर्तींचें एक वाक्य फार मार्मिक आहे. ते म्हणतात– "There must be movement in the mind and not of the mind."

कोणतीहि समस्या लवकर, कायमची व बिनचूक रीतीनें सुटावी, याकरतां **चित्त पूर्णपणें स्थिर राहिलें पाहिजे.** हें पथ्य पाळणें, फारच महत्त्वाचें पण तितकेंच अवघड आहे.

दिसायला सोपें पण करायला सर्वांत अवघड असें कोणतें काम असलें, तर तें चित्त स्थिर करून मनाला पडलेल्या कोड्याचें निरीक्षण करणें, हें होय. मनाला जो प्रश्न त्रस्त करीत असतो त्याचेकडे पाहतांना, आपण भूतकालांतला कोणतातरी विचार (अगर स्मृति) बोलावून आणतों व त्याच्या मदतीनें अथवा त्या विचाराच्या चष्म्यांतूनच मनांतल्या प्रश्नाकडे पाहतों. हें पाहणें नव्हेच, हें मूल्यमापन असतें. कांहीं वेळां मनांतल्या समस्येला तेथून हाकून कसें देतां येईल, एवढीच विवंचना मन करीत राहतें. हा प्रतिकार, जितक्या जोरानें होईल तितकी, समस्येची पकड अधिक घट्ट होते, हा तर प्रत्येकाचा अनुभव आहे; आणि मानसशास्त्राचें म्हणणेंहि तसेंच आहे.

वर सांगितल्याप्रमाणें, जें जें आपण करतों तें तें आपल्या अंगाशींच येतें. समस्या मनांत जास्तच खोल जाते व रुतून बसते. समस्येशीं मुकाबला करण्याची ही पद्धत नव्हे. **समस्या उत्पन्न झाली तरी, तिला चित्ताच्या कडेवरच ठेवतां आलें पाहिजे;** व चित्ताचा गाभा अथवा मध्यबिंदु, शांत आणि अलिप्त असा राहिला पाहिजे. मग होतें असें कीं, चित्त समोरासमोर (directly) समस्येवर चाल करून जातें; व चापल्यानें (immediately) तिचा निकाल लावतें. तिचा माग-मूसहि शिल्लक राहात नाहीं. पुढें येणाऱ्या नवीन समस्येचा, चित्ताला मग फारसा त्रास होत नाहीं. कारण तें ताजेतवानें असतें. पण हें होईल केव्हां ? जेव्हां भूत-कालांत जाण्याची आपल्या मनाची बालपणापासूनची खोड, जाईल तेव्हां. एकदां का मन, भूतकालांत शिरून तेथून नव्या प्रस्तुत घटनांकडे (facts in the present) पाहूं लागलें कीं, जुन्यानव्याचा संघर्ष सुरू झालाच म्हणून समजावें.

* * *



आठ

मौनाचा अर्थ तरी काय असावा ?

'मौनावतारी मेहेरबाबा' हा प्रसादमधला विस्तृत चरित्रलेख सर्वांनींच वाचला होता. आणखी असें झालें कीं, त्या दिवशीं आमच्या कंपूमधल्या एका मित्रानें बराच वेळ तोंडच उघडलें नाहीं. साहजिकच मौन म्हणजे काय असावें, याचा बराच खल झाला. कोणी म्हणाले, "आपल्या प्राणशक्तीचा (vital energy) विनाकारण जो व्यय होत असतो, तो मौनानें थांबतो." दुसऱ्यानें त्याला उत्तर दिलें, "'Home they brought her worrier dead' ही कविता तूं विसरलास काय ?" तिसऱ्यानें संस्कृत वचन पुढें केलें, "'स्निग्धजनसंविभक्तम् दुःखं सह्यवेदनं भवति', हें अगदीं खरें आहे. जीं माणसें गप्प बसतात त्यांचें मन मोकळें असतें असें का तुम्हांला वाटतें ? तीं मनांत कुढत असतात. कोणतीतरी काळजी त्यांना हैराण करीत असते; अथवा त्यांच्या मनांत कोणतीतरी इष्टवस्तु कशी साध्य करून घ्यावी याबद्दलचे बेत चाललेले असतात," असें तो म्हणाला. मी त्याला उत्तर दिलें, "अरे, नेहमींच असें असत नाहीं. गप्प असलेला माणूस कांहीं वेळां आपलें चुकलें कोठें हें शोधून काढण्यांत गुंतलेला असतो, आणि बोलघेवडीं माणसें असा शोध कधींच घेत नाहींत. ते, आपले अपरिपक्व विचार सारखे दुसऱ्यांवर लादीत असतात. सत्यशोधनाकरितां त्यांना सवडच मिळत नाहीं. कारण, त्यांना वाटतें, जग शहाणें करण्याकरतांच आपला जन्म आहे."

या चर्चेनंतर, मौनाचा अर्थ काय असावा, या विषयाचा जों जों मी विचार करूं लागलों तों तों मी भांबावून गेलों. कारण या विषयाचें स्वरूप, इतकें अफाट असेल याची मला कल्पना नव्हती. शब्दांचें सामर्थ्य केवढें आहे व निरनिराळ्या क्षेत्रांत शब्दांचा प्रभाव कसा पडतो, हें नीट समजून घेतल्याखेरीज त्यांचा उपद्रव कसा होतो हें कसें समजणार ? पण शब्दांचा प्रभाव व उपद्रव ही झाली या विषयाची एक बाजू. दुसरी बाजूहि तितकीच महत्त्वाची आहे. ती ही कीं, शब्द थांबले तरी चित्तांत मौन अथवा स्तब्धता असेलच, अशी खात्री कुणी द्यावी ? शब्द थांबल्यामुळेंच, चित्तांतली खळबळ वाढत असेल तर ?

थोर पुरुषांचें मौन कसें असतें, ते मौनाचा आग्रह कां धरतात, हा विषय आज विचाराकरतां घेतलेला नाहीं. तुमच्या आमच्यासारख्यांचें मौन हेंहि महत्त्वाचें आहे. कारण जीवनांत घडणाऱ्या अनेक घटनांपैकीं ही घटना अशी आहे कीं, ती जर मला नीट समजली, तर माझ्या जीवनावर नवा प्रकाश पडण्याचा संभव आहे.

आपण जें जें करतों, तें तें नीट समजून घेतलें तर त्या प्रत्येक क्रियेपासून आपण मुक्त होत जातों, असें दिसतें. मला तर असें वाटू लागलें आहे कीं, प्रत्येक क्रियेबद्दल असें सत्यशोधन होत न गेलें, तर त्या क्रियेचे परिणाम जे इतरांना भोगावे लागतात ते तितकेसे महत्त्वाचे नसतात; तर आपणांवर होणारे परिणामच अधिक भयानक असतात. माझ्या लहानपणीं एक वृद्ध ब्राह्मण आमच्या घरीं येत असे. त्याचा एक नियम होता. तो, असा कीं, तोंडांतून ईश्वराच्या नांवाखेरीज इतर कोणताहि शब्द येऊं द्यावयाचा नाहीं. हा नियम त्यानें जेव्हां केला तेव्हां त्याचा हेतु शुद्ध होता. पण पुढें असें झालें कीं, त्यानें एक नवी भाषाच स्वतःकरतां बनविली; आणि ती भाषा तो इतक्या लीलेनें बोलत असे कीं, ऐकणारा थक्क होऊन जावा. तो भांडत असे, इतरांना दूषणें देत असे, स्वतःला राग आला आहे असें बजावीत असे; पण हें सारें त्याच्या अभिनव भाषेंत. राग आला आहे असें सांगतांना तो 'जमदग्नि' या शब्दाचा उपयोग करी, तर पैशाच्या देवघेवीबद्दल बोलणें निघालें तर 'दोन' 'चार' असे आंकडे तोंडानें न उच्चारतां, 'अश्विनी कुमार' अथवा 'ब्रह्मदेव' यांचा उल्लेख तो करी.* मला त्याची कींव येत असे. कारण तो इतरांपेक्षां स्वतःचीच अधिक फसवणूक करीत होता. त्याच्या चित्तांतलें विकारांचें थैमान मुळींच कमी झालें नव्हतें. उलट भितीच्या आडोशानें चोर लपून

---

* अश्विनीकुमार हे नेहमीं जोडीनें असतात म्हणून त्या शब्दाचा अर्थ "दोन" असा होतो, तर ब्रह्मदेवाला चार तोंडें म्हणून त्या शब्दाचा अर्थ "चार" असा होतो.

बसतात ना, तसें हरिनामाचा आधार घेऊनच ते विकार त्याच्या मनांत पाय रोवून बसलेले आहेत, असा भास होई.

मनाच्या ठिकाणीं असें विलक्षण सामर्थ्य आहे कीं, आंतल्या 'मी' च्या संरक्षणाकरतां कशाचेंहि कवच तें निर्माण करूं शकतें. माझ्या मनांत काय चाललें आहे, याचा पत्ता लोकांना लागूं नये म्हणून मी शब्दांची गुंफण करतों. हे शब्द, लोकांचें चित्त दुसरीकडे वेधण्याकरतां तरी असतात, नाहींतर दुसऱ्यांना कांहींतरी शिकवावें या एकाच हेतूनें, ते वापरले जातात. या दोन्ही क्रियांपैकीं कोणतीहि क्रिया मी करीत असलों तरी तिचा उपयोग, मला माझा 'मी' सुरक्षित ठेवण्याच्या कामांत होऊं शकतो. शब्द इतरांची दिशाभूल करूं शकतात. शब्दांनीं अंतःकरण व्यक्त होतें अशी समजूत आहे; पण केव्हां केव्हां असें वाटतें कीं, अंतःकरणांत काय आहे हें लपवून ठेवण्याकरतांच भाषा आहे कीं काय ? भाषेचा जन्म झाला तेव्हां तो मनाला काय वाटतें हें प्रकट करण्याकरतां झाला यांत संशय नाहीं; पण हल्लीं ज्या तऱ्हेनें भाषा वापरली जाते त्यावरून असें दिसतें कीं, मनांतलें सत्य उघड करण्याची तिची शक्ति मागेंच संपली आहे. एवढेंच नव्हे, तर असें एक नवीन सामर्थ्य शब्दांच्या अंगीं आलेलें आहे कीं, ज्याच्या योगानें शब्द चित्तांत उभा ठाकण्याचा अवकाश, त्यांनीं सत्याचा अपलाप केलाच म्हणून समजावें. सत्यावरचें हें आच्छादन लोकांची फसवणूक करतें यांत विशेष कांहींच नाहीं; पण तें स्वतःमध्येंहि भ्रमाची उत्पत्ति करते.

शब्दांचे चांगले परिणाम अथवा विपरीत परिणाम यांच्याकडे वळण्यापूर्वी, आणखी एका गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. आपली अशी समजूत आहे कीं, सर्व प्राण्यांमध्यें माणूस हा अधिक समाजप्रिय आहे. कांहीं प्राणी कळप करून राहतात. मुंग्यांसारखे प्राणी तर समाजाची गुंतागुंतीची रचना करून राहतात. परंतु इतर सर्व प्राण्यांपेक्षां, माणसांच्या समाजाची संघटना अधिक दृढ असून तिचा विस्तार मोठा आहे. यावरून एक समज प्रचलित झाला आहे. तो असा कीं, माणसांमध्यें परस्परसाहाय्य जास्त आहे. संघटनांचे प्रचंड स्वरूप पाहिल्यावर तसें वाटतेंहि. पण परस्परसाहाय्य याचा अर्थ 'एकमेकांच्या सुखदुःखांत सहभागी होणें', असा जर कुणी केला तर तें चुकीचें होईल. मला तर वाटतें कीं, माणसाइतका एकलकोंडा प्राणी दुसरा कोणताच नाहीं. स्वतःच्या 'मी' ला कशाचाहि स्पर्श अशा तऱ्हेनें होऊं नये कीं, ज्याच्यायोगानें त्या 'मी' ची मजबुती कमी होईल, एवढी एकच काळजी माणूस अहर्निश घेत असतो. त्या 'मी' च्या बांधणीमध्यें बारीकसुद्धां छिद्र पडूं नये; असा कोणताहि आघात त्याच्यावर होऊं नये कीं, जो त्याला खिळखिळा करील, एवढेंच तो नेहमीं पाहात असतो. "माझ्या 'मी' ला हात लावूं नका, मग मी तुमचें वाटेल तें ऐकण्यास तयार

आहे," अशी एकच विनवणी माणूस आपल्या जीवश्च कंठश्च मित्रांनाहि करीत असतो, असें दिसतें. या 'मी' ची बळकटी कमी न होतां, विचारांची जी देवाण-घेवाण होईल तेवढीच माणसाला हवी असते. एवढेंच नव्हे, तर जो मित्र या 'मी' ला अधिक पुष्ट करील त्यालाच 'प्रियतम मित्र' असें स्थान प्राप्त होतें. मित्रांमध्यें, गुरुशिष्यांमध्यें, घरांतल्या माणसांमध्यें, अथवा समाजांतल्या निरनिराळ्या व्यक्तींमध्यें शब्दांची जी देवघेव चालते तिचा पसारा पाहून आपणांला असा भास होतो कीं, शब्दांच्या मदतीनें, माणसें सारखीं एकमेकांच्या जवळ येत आहेत; अथवा एकमेकांचें जीवन बदलीत आहेत. पण खरोखर तसें कांहींच घडत नाहीं. यात्रेच्या गर्दींत अंग चोरून बसलेल्या चोराप्रमाणें, शब्दांच्या या अफाट संमर्दींत चित्तांतला 'मी' तसाच अबाधित राहतो. त्याच्या अंगाचा एक टवकाहि निघत नाहीं. शब्दांचा धबधबा अंगावर पडत असतांनाहि, तो अगदीं कोरडा राहूं शकतो. कितीहि शक्तिशाली शब्द असेनात, ते चित्ताच्या वरच्या पापुद्र्यालाच स्पर्श करतात; थोडा वेळ तेथें घुटमळतात आणि नंतर निघून जातात. थोड्क्यांत असें दिसतें कीं, 'मी' भोंवतींचें कवच अधिक पातळ केल्याखेरीज शब्दांनी हृदयाचा वेध घेतला जात नाहीं. "हें सहकार्य द्यावयाचें नाहीं" अशी जणू प्रतिज्ञा करूनच जो तो समाजांत वागतो, बोलतो, चालतो, अथवा प्रवचनें ऐकतो.

एकूण असें दिसतें कीं, मौन अथवा वाचाळता यांपैकीं जी कोणती क्रिया मी करतों तिची परिणति 'मी' रक्षणांत होत आहे काय, एवढा एकच प्रश्न मीं स्वतःला सतत विचारीत राहिलें पाहिजे. थोर पुरुषांचें मौन कसें असतें व तें कोणतें कार्य करतें, हा प्रश्न आपणांपुढें मुळींच नाहीं, हें पुन्हां एकदां आवर्जून सांगितलें पाहिजे.

थोर पुरुषांचें अनुकरण म्हणून कोणतीहि क्रिया केली तर स्वतःची फसवणूक अधिक होते, असें दिसतें. असें अनुकरण कितीतरी क्षेत्रांत आपण करीत असतों. पण अध्यात्माच्या क्षेत्रांत अनुकरण म्हणूनच मौन पत्करलें तर होईल काय, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. शब्दांच्या अंगीं विकार जागृत करण्याची शक्ति आहे, यांत शंकाच नाहीं. म्हणून शब्द वापरण्याचें स्वतः टाळलें तरी त्याचा कितीसा फायदा होणार? इतरांचे शब्द आपल्या चित्तांत विकारांची निर्मिति करीतच राहतील, त्याची वाट काय? आपल्या मौनानें निर्माण होणारे गैरसमज कसे दूर होणार? या गैरसमजांना आपण जणू बोलावून आणलें, असेंच नाहीं का? व्रत म्हणून पत्करलेलें मौन बाजूला ठेवलें तरी एखाद्या घटनेमुळें जेव्हां माणसें मौन धारण करतात तेव्हां गैरसमज वाढीस लागतात, असेंच नाहीं का दिसत? आणखी एका दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहणें जरूर आहे. ज्या भांड्यांत वाफ भरली आहे, अशा भांड्याला छिद्र नसलें तर काय होईल? 'मला काय वाटतें,' हें प्रगट

केल्यानें माझ्या चित्तांतला क्षोभ कमी होतो, असा माझा अनुभव आहे कीं नाहीं? 'मी' च्या रक्षणाची व त्याच्या संवर्धनाची कामगिरीच जर माझें मौन करीत असेल, तर माझ्या मौनानें काय साधलें? मग वर उल्लेख केलेल्या वृद्ध ब्राह्मणाच्या पंक्तींतच मी जाऊन बसलों कीं नाहीं? असे अनेक प्रश्न मौनाच्या बाबतींत विचारतां येण्यासारखे आहेत. पण शब्दांचा उपद्रव नक्की कोणत्या कारणांमुळें होतो हें अगोदर समजून घेतलें नाहीं, तर मौनाचें खरें मर्म लक्षांत येणार नाहीं.

माणसानें स्वतःकरतां अनेक शस्त्रें निर्माण केलीं आहेत, व त्यांच्या उपयोगांचें शास्त्रहि आत्मसात् केलें आहे. पण 'शब्द' हें एक शस्त्र असें आहे कीं, तें जरी सर्वांत जुनें असलें तरी त्याचा उपयोग स्वतःच्या हितकरतां कसा करावा, हें माणसाला अजूनहि उमगलेलें नाहीं. जें शस्त्र, तें धारण करणाऱ्यावर संपूर्ण हुकमत चालवतें, व त्यालाच जास्त इजा करतें, असें शस्त्र कोणतें म्हणाल, तर तें 'शब्द' हेंच होय.

शब्दांची मोहिनी ऐकणाऱ्यांवर पडते, असें म्हणतात; पण मला वाटतें, शब्द त्यांच्या जनकाचा आधीं बळी घेतात व नंतर जग जिंकायला निघतात. स्वतःच्या सुंदर चेहऱ्यावर आपण तितकें प्रेम करीत नाहीं, कीं जितकें आपण आपल्या शब्दांवर करतों. एखादा गायक श्रोत्यांपेक्षां स्वतःच आपल्या गायनानें भारावून जावा, तसेंच कांहींसें बोलूं लागलें कीं प्रत्येकाचें होतें. समोरचा श्रोतृवर्ग जितका मोठा, तितका वक्त्यावरचा प्रभाव अधिक. हें प्रेम जो आवाज कंठांतून निघतो त्याच्यावर असतें कीं शब्दांतून व्यक्त होणाऱ्या 'विचारसौंदर्यावर' असतें, हें सांगणें कठीण आहे. पण बहुतेक असें असावें कीं, माझे विचार इतरांपेक्षा अधिक निर्दोष आहेत या जाणिवेमुळेंच, वक्ता स्वतःच्या भाषणावर लुब्ध होत असावा. इतर कोणत्याहि प्रकारचा अभिमान ज्याला शिवला नाहीं, अशा माणसालादेखील 'मी अधिक निर्दोष असें मार्गदर्शन करूं शकतों' हा अभिमान चिकटलेलाच असतो. Mark Twain चें एक मार्मिक वाक्य आहे. "He had only one vanity; he thought he could give advice better than any other person." अशा पद्धतीनें जे शब्द आपल्या कंठांतून निघतात, त्यांचें कार्य दुहेरी असतें प्रत्येक शब्द आंतल्या 'मी' ला अधिक दृढ करीत जातो, पण त्याचबरोबर इतरांच्या जीवनांत ढवळाढवळ करण्याचें कार्य तो करीत असतो. हें जें इतरांवर अतिक्रमण असतें, त्याला 'उपदेश' असें नांव कधीं कधीं दिलें जातें. या उपदेशाच्या वेळीं वक्ता आपल्या मनाकडे संपूर्ण डोळेझाक करीत असतो. कांहीं वेळां, आपल्या बोलण्याला उपदेशाची धार येऊं न देतां, समान पातळीवरून संभाषण चाललें आहे, असा भास निर्माण करतां येतो. आपल्या मित्राचें जीवन आपण फक्त समजून घेत आहोंत, अशी भूमिका धारण करतां येते. प्रश्न असा निर्माण

होतो कीं, या जिज्ञासेच्या मुळाशीं काय आहे ? कितीतरी वेळां असें दिसतें कीं, हीं जिज्ञासा फक्त तुलनेकरता असते. प्रश्नाचें उत्तर कोणतें का येईना, तें येतांच मी स्वतःला असें आश्वासन देतों कीं, " पाहा, प्रत्येक बाबतींत तू अधिक शहाणा आहेस, जास्त कर्तबगार आहेस, निदान अधिक सुदैवी आहेस ! " हीं आश्वासनें घेत असतांना मनाला जो अपूर्व आनंद होत असतो, त्या आनंदाच्या हव्यासामुळेंच कितीतरी संभाषणें तासन्तास चाललेलीं आपणांला आढळतात.

कृष्णमूर्ति म्हणतात :–

" Why this desire to interfere with others ? To know what others are doing, saying ? It is a very superficial mind that gossips isn't it ?—an inquisitive mind which is wrongly directed. The questioner seems to think that others are revealed to him by his being concerned with them, with their doings, with their thoughts, with their opinions. *But do we know others if we don't know ourselves?* Can we judge others, if we do not know the way of our own thinking, the way we act, the way we behave ? Why this extraordinary concern over others ? ... Generally, when we gossip, it is to condemn others, but, stretching it charitably, it is, perhaps, to imitate others. Why do we want to imitate others ? Doesn't it all indicate an extraordinary shallowness on our own part ? *It is an extraordinarily dull mind that wants excitement, and goes outside itself to get it.* In other words, gossip is a form of sensation, isn't it, in which we indulge ? It may be a different kind of sensation, but there is always this desire to find excitement, distraction."

(*First and Last Freedom*, pp. 197 and 198.)

ज्या वेळेला, तुलनेनें मी अधिक सुखी आहें असा निष्कर्ष काढण्याकरतां बोलणें नसतें, तेव्हां तें अधिक शहाणें होण्याकरतां असतें. वरवर पाहिलें असतां, हा हेतु मोठा उदात्त दिसतो. पण ' शहाणे ' कोणत्या पद्धतीनें ? फक्त अनुकरण करूनच मी अधिक शहाणा होईन, अगर जास्त सुखी होईन, अशी माझी समजूत असते, व या अनुकरणाची सोय व्हावी म्हणून मी माझ्या मित्राच्या बारीकसारीक हालचाली अथवा त्याच्या जीवनांतले प्रसंग, यांची माहिती घेतों आणि त्यांत रस घेतों. कांहीं वेळां असें होतें कीं, माझें जीवन नीरस वाटल्यामुळें त्यांत माझें मनच रमत नाहीं. मग तें करतें काय ? वर्गांत चाललेल्या धडपाकडे ज्याचें लक्ष लागत नाहीं, तो विद्यार्थी काय करतो ? त्या विद्यार्थ्याप्रमाणेंच माझें चित्त बाहेर कांहीं रमणीय दर्शन दिसतें काय, हें हुडकीत बसतें. मी इतरांच्या जीवनांत एवढ्याकरतांच डोकावूं लागतों कीं, मन मोहून टाकणारें कोणतें तरी दृश्य दिसावें. प्रथमच्य

अवस्थेंत फक्त मनोविनोदनाचाच हेतु असतो. पण त्याचें रूपांतर असूयेंत होण्यास फारसा वेळ लागत नाहीं. एकूण काय, तर येन केन प्रकारेण आपलें चित्त एकच उद्योग सतत करीत असतें. तो हा कीं, स्वतःचें निरीक्षण न करतां इतर हजार व्यापांमध्यें तें स्वतःला गुंतवून टाकतें. त्या अनेक व्यापांपैकीं संभाषण, चर्चा अथवा उपदेश हा एक प्रकार आहे.

शब्दांचा उपयोग जास्त का उपद्रव जास्त, असा रोखठोक प्रश्न केला तर त्याचें उत्तर निदान कांहीं वाचक तरी, "उपद्रव" असेंच देतील. या उपद्रवाचें भयानक स्वरूप पाहावयाचें असेल तर चालू युगांतल्या प्रचाराकडे बोट दाखवतां येईल. प्रचार नाना तऱ्हांनीं करतां येतो. पण शब्द नसते तर प्रचार इतका प्रभावी मुळींच झाला नसता. प्रचाराची आणखी एक मौज आहे. प्रचाराचें व्यसन दारू-पेक्षांहि वरचढ आहे. कारण तें दुधारी शस्त्रासारखें आहे. प्रचाराला जे बळी पडतात असें आपण समजतों, त्यांना तर तें घायाळ करतेंच, पण त्यापेक्षांहि खुद्द प्रचार-कालाच ते जास्त मोहित करतें. प्रचाराची ज्याला एकदां चटक लागली, तो जन्मभर प्रचारच करीत बसतो. अपयशानें तो खचून जात नाहीं. आपलें शस्त्र अधिक तीक्ष्ण कसें होईल याचीच तो चिंता करतो. एका दृष्टीनें असेंहि म्हणतां येईल कीं, प्रचारकाला अपयश म्हणून माहीतच नसतें. दुसरें असें कीं, एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या अथवा पक्षाच्या प्रचाराला विटलेले लोक खुद्द प्रचाराच्या मगरमिठींतून स्वतःची सुटका करून घेतील, असें मुळींच घडत नाहीं. ते फक्त आपले तोंड वळवितात, आणि मग दुसऱ्या प्रचारकाच्या तावडींत सांपडतात. प्रचार-काच्या अगदीं आहारीं गेलेले लोक सोडले तरी, प्रचाराचा परिणाम समाजांतल्या सर्व थरांच्या लोकांवर जो होत असतो, तोसुद्धां कमी हानिकारक नाहीं.

आपल्या जिव्हाळ्याच्या गोष्टी कोणत्या व दूरच्या कोणत्या, हा विवेक करतां न येणें हें एक आधुनिक माणसाचें वैगुण्य आहे. माणसें जास्त सुशिक्षित झालीं तरी हा विवेक असेलच, अशी खात्री देतां येत नाहीं. पुष्कळदां असें होतें कीं, जो विषय मला आकर्षक वाटेल तोच माझ्या जिव्हाळ्याचा, असें मी धरून चालतों. जगांत घडत असलेल्या घटना, विशेषतः राजकीय घटना यांनीं आपल्या संभाषणाचा केवढा भाग व्यापलेला आहे, याचा विचार केला तर आश्चर्य वाटतें. कृष्णमूर्ति याला Global Gossip म्हणतात. त्यांचे या संबंधांतले शब्द असे आहेत:—

"Most of us who read daily newspapers are filled with gossip, global gossip. It is all an escape from ourselves, from our own pettiness, from our own ugliness. We think that through a superficial interest in world events, we are becoming more and more wise, more capable of dealing with our own lives. All these, surely, are ways of escaping from ourselves, are they not ? In

ourselves we are so empty, shallow; we are so frightened of ourselves. We are so poor in ourselves that gossip acts as a form of rich entertainment, *an escape from ourselves.*"

(*First and Last Freedom*, p. 199)

शब्दांचा गैरवापर किती प्रकारांनीं होतो, याचीं जास्त उदाहरणें देण्याची जरुरी नाही. पण एक सूत्र मात्र असें सांगतां येईल कीं, 'मी'चें संवर्धन करण्याकरतां व तें न जमलें तर निदान त्या 'मी'चें दर्शन समोरासमोर व्हायला नको, याकरतांच शब्दांचा आश्रय बहुतेक वेळां केला जातो.

कांहीं वाचक असा आक्षेप घेतील कीं, सुविचार व्यक्त करणारे शब्द उपकारक नसतात का? आपण फक्त असेच शब्द बोलावेत व ऐकावेत कीं, ज्यांच्या मदतीनें जीवनोपयोगी ज्ञान देतां येईल किंवा घेतां येईल. कांहीं वाचक असाहि पर्याय सुचवितील कीं 'मी' पुष्ट करणाऱ्या विकारांचा स्पर्श ज्या शब्दांना झालेला नाहीं, असेच शब्द जर वापरले तर कोणतीच हानि होणार नाहीं. या दोन्ही सूचनांमध्यें बराच तथ्यांश आहे. मात्र 'सुविचार' कशाला म्हणावयाचें व जीवनाला खरोखरच उपयोगी पडणाऱ्या ज्ञानाच्या मर्यादा कोणत्या, हें अगोदर निश्चित झालें पाहिजे. तसेंच मनांतला विकार म्हणजे भावना यांचें प्रकटीकरण नैसर्गिक प्रेरणेमुळें व तेवढ्यापुरतेंच होत आहे, का त्यामागें कांहीं हेतु आहे, याचाहि नीट तपास केला पाहिजे. पुष्कळदां असें होतें कीं, मी समजतों अथवा बतावणी करतों कीं, माझ्या नैसर्गिक विकारांना मी फक्त वाट मोकळी करून देत आहें. पण असतें निराळेंच. माझा जो आविष्कार होतो, त्याचा हेतु इतरांवर हुकमत चालविण्याचा असतो; किंवा त्यांच्या माझ्याविषयींच्या भावनांना आवाहन करून, त्यांच्याकडून मला हवें तें मिळविण्याचा असतो. भावनांचें उद्दीपन अथवा प्रकटीकरण हें फारच थोड्या वेळां अगदीं निर्हेतुक असें असतें. भावना कशा उत्पन्न होतात व त्यांच्या द्वारें काय साधलें जातें, हा एक स्वतंत्रच विषय आहे व त्याचा विचार बाजूला ठेवू. तसेंच शास्त्रीय अथवा व्यवसायविषयक ज्ञान देणारे शब्द यांचाहि विचार वगळून, माणसाच्या जीवनांत उत्पन्न होणारे मूलभूत प्रश्न सोडविण्याच्या कामांत, संभाषण कितपत उपयोगी पडतें, एवढ्यापुरताच आज विचार करूं.

संभाषण किंवा चर्चा यांच्या योगानें अहंकार कसा पुष्ट होऊं शकतो, हें वर सांगितलें आहे. शब्दांचे हे दुष्परिणाम पाहिल्यावर माणूस हतबल होणार नाहीं तर काय होईल? ज्या शब्दांना आपण उत्पन्न केलें त्यांचाच भस्मासुर होऊन सर्वनाशाची पाळी आली असें दिसतांच, **शब्दांविषयीं जो उबग माणसांच्या मनांत आला त्यांतून मौनाची कल्पना जन्माला आली असावी.** निदान, सामान्य माणूस जेव्हां मौनाचा आश्रय करतो तेव्हां तो, "नको ते शब्द आणि त्यांतून होणारा

अनर्थ" असें म्हणूनच मौनाच्या वाटेला जातो. पण असें करण्यानें प्रश्न सुटला असें होत नाहीं, हें स्पष्ट करण्यापुरताच हा एवढा प्रपंच आहे.

मात्र कांहीं वेळां दुसऱ्याचें दुःख शब्दांनीं समजून घेतां येतें, यांत शंका नाहीं. हें दुःख समजतें, याचा अर्थ त्या दुःखाची मला माहिती लागली एवढाच असला, तर माझ्या संग्रहीं असलेल्या ज्ञानांत ही अशी भर पडल्यानें **'मी' चें संवर्धनच होतें**, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पण जर माझें अंतःकरण खुलें असलें तर त्या दुःखाच्या अनुभवांत मी सहभागी होऊं शकतों. माझ्या मित्राचें दुःख, मग त्याचें दुःख असें राहातच नाहीं. अशा तऱ्हेनें जर दुःखाची एकच अनुभूति झाली, तर तें दुःख **त्याचें स्वरूप स्पष्ट झाल्यामुळें** कमी होऊं शकतें. सुरुवातीस दिलेल्या संस्कृत वचनाचा अर्थ, जर अनुभवांत आणावयाचा असला तर दुसऱ्याच्या दुःखांत प्रवेश करतां आला पाहिजे. माझा 'मी' जोंपर्यंत जाडजूड आणि प्रभावी आहे, तोंपर्यंत हा प्रवेश करतांच येत नाहीं. मी शब्दांनीं काय सांगतों, याला कांहीं महत्त्वच नाहीं. जेव्हां दुसऱ्याची संवेदना खरोखरच माझ्या हृदयांत जाते, तेव्हां जें काय बोललें जातें अथवा ऐकलें जातें, **तेंच खरें संभाषण.** हें संभाषण एकाच्या दुःखाची निवृत्ति करतें एवढेंच नव्हे, तर तें दुसऱ्याचाहि हृदयपालट करतें. **असें संभाषण जर करतां आलें, तर त्याच्यापुढें मौनाची मातब्बरी ती काय ?**

पण शब्दांचा खरा उपद्रव आपणांला अजून समजलेलाच नाहीं. तो इतका मूलगामी आहे कीं, **शब्दांच्या घाऱ्यांनींच आपलें जीवनवस्त्र विणलें आहे कीं काय,** असें वाटतें. वस्तु दिसली कीं, ताबडतोब तिच्याबद्दलचा शब्द चित्तांत उभा ठाकतो. हा शब्द ज्या क्षणाला येतो, त्याच क्षणाला तो वस्तूच्या सत्यस्वरूपापासून आपणांला दूर नेऊं लागतो. केव्हां केव्हां शब्दाचा हात धरून तो नेईल तिकडे आपण इतक्या वेगानें जातों कीं, वस्तूचें भानहि आपणांला राहात नाहीं. वस्तु असते एक, आणि शब्द तिच्याबद्दल आपणाला कल्पना देतात ती भलतीच ! वस्तूचें नुसतें नांव आठवलें तरी त्या नांवाला चिकटलेल्या कितीतरी सुखद अथवा दुःखद स्मृति असतात. एक मणि उचलला कीं, त्याला जोडलेले माळेंतले सर्व मणि जसे उचलले जातात, तसें एका शब्दानें अनेक स्मृति आपणांपुढें नाचूं लागतात. त्या स्मृतींचें रमणीय नृत्य अथवा तांडव नृत्य पाहण्यांत आपण गुंतून जातों. या स्मृतींना अनुकूल अथवा प्रतिकूल असा जो रंग असतो तोच रंग त्या वस्तूचा खरोखर आहे, असें आपण ठरवतों. वस्तूचें जें दर्शन आपणांला होतें, तें अशा तऱ्हेनें अनुकूल अथवा प्रतिकूल या रूपानें होतें. नाहींतर "अमक्या वर्गांतली व अमुकतमुक उपयोगाची" असातरी शिक्का त्या वस्तूवर बसतो. **या तिन्हींपैकीं कोणत्यातरी एका वर्गांत प्रत्येक वस्तु बसलीच पाहिजे, असा आपला आग्रह असतो.** नव्हे, तसा आग्रह वस्तुवाचक शब्दाचा असतो व त्या शब्दाचेच आपण गुलाम

असतों. त्या शब्दाचें जें मत तेंच आपलें मत असतें. यामुळें होतें काय ? तर शब्द मध्यें आल्यानें कोणत्याच वस्तूचें खरें स्वरूप अथवा खरें सौंदर्य आपल्या प्रत्ययास येत नाहीं.

शब्दाचा यापुढचा उपद्व्याप पाहण्यासारखा आहे. लाडक्या मुलानें बापाचा हात घट्ट धरून ठेवावा त्याप्रमाणें, शब्द करतो काय ? तर, त्यानें ज्या स्मृति जागृत केलेल्या असतात त्यांच्यापासून बराच वेळ माणसाला तो हालूंच देत नाहीं. वस्तूचें दर्शन संपून गेलें तरी, त्या स्मृतींच्या संगतींत माणूस रममाण होतो; इतका कीं, त्याचें पाऊल पुढें पडतच नाहीं ! जीवन तर सारखें पुढें धांवत असतें. माणसाला जीवन म्हणतें, "अरे बाबा, मजबरोबर पुढें चल. मागें वळून पाहूं नकोस." पण माणूस भूतकालाकडे म्हणजे त्यांतून निघणाऱ्या स्मृतींकडे पुन्हां पुन्हां पाहात राहतो. प्रथमच सासरीं निघालेल्या जुन्या काळांतल्या नववधूप्रमाणें त्याची स्थिति होते. माणूस जीवनाबरोबर चालतो असें फक्त बाहेरून दिसतें; पण त्याचें चित्त गतघटनेनें उत्पन्न केलेल्या स्मृतींमध्येंच रेंगाळत असतें. या स्मृतींनीं त्याच्या चित्तावर जो आसर घातलेला असतो तो कांहीं केल्या निघत नाहीं. असें हें मरगळलेलें मन, भूतकाल आणि चालू क्षण यांच्यामधल्या झगड्यांत सांपडतें. हा झगडा फारच तीव्र झाला कीं, **त्याचा उद्रेक संतापांत अथवा इतर कोणत्यातरी विपरीत कृतींत अथवा विकृत मनःस्थितींत होतो.** शब्दापासून ही जी अनर्थपरंपरा निर्माण होते ती थांबवावी कशी, हाच काय तो जीवनांतला मुख्य प्रश्न आहे. शब्दापासून आपली हानि होते तरी कोणती ? **शब्द सत्याची व आपली ताटातूट करतो,** हें ज्यांनीं ओळखलें त्यांनीं ठरविलें असलें पाहिजे कीं, ही तूट पडू द्यावयाची नाहीं. त्यांनीं शब्द जरी वापरले तरी ते त्यांच्या खऱ्या मौनांत विक्षेप आणीत नाहींत. याचा अर्थ असा कीं, वस्तूचें दर्शन होतांच चित्तांत उभा ठाकणारा शब्द, त्यांना स्मृतींत गुंतवून ठेवीत नाहीं **मौनाचा खरा अर्थ हा असा असावा,** असें मला वाटतें.

पण मग समाजांत जगतां कसें येईल ? आपलें चित्त तत्काळ प्रश्न करतें. कृष्णमूर्तींना ही अडचण वाटत नाहीं. ते म्हणतात :–

"And *from this silence there is action*– 'not having learnt, act'. Because then every action is non-productive of conflict. Then life, living in this world, going to an office every day, doing everything into it there comes a joy, there is a bliss which is not pleasure, there is an ecstasy which is not the product of time. And without that, do what you will, social order and disorder, wars, conflicts will not bring about a happy human being.

(*Talks in India*, (1966) p. 74)

* * *



नऊ

सत्य कोणतें व साधन म्हणजे काय ? (पूर्वार्ध)

त्या दिवशीचा वाद चांगलाच रंगला होता. माझ्या एका मित्राचें भाषण तर इतकें आवेशपूर्ण व प्रदीर्घ झालें कीं, शेवटचे दोन तास आम्ही सगळें तें नुसतें ऐकतच होतों. त्याचें थोडक्यांत म्हणणें असें होतें कीं, " या विसाव्या शतकांत तरी अशी भाषा बोलूं नका. जीवनाबद्दलचें सत्य आज आम्हांला सांपडलेलें नाहीं ना ? मग तें कोठें असतें व कसें शोधावयाचें म्हणजे कोणत्या मार्गानें त्या सत्याकडे जावयाचें, हें तुम्हीं आम्हांला सांगितलेंच पाहिजे. कृष्णमूर्ति हा प्रश्न कां टाळतात हें मला समजत नाहीं. एक वेळ, गुरूच्या हातांतून, हें सत्य झाडावरच्या पक्व फळासारखें शिष्याच्या हातांत अलगद पडतें, हें माझ्या बुद्धीला पटूं शकेल; पण चालू जीवनाचें असत्य स्वरूप तुम्हांला एकदां का पूर्ण उमजलें कीं, तुम्ही सत्याच्या प्रांतांतच शिरलांत, असें जेव्हां कृष्णमूर्ति म्हणतात तेव्हां तें मला समजतच नाहीं. ताजमहालासारखी इमारत कशी असते हें तुम्ही नुसतें ध्यानांत आणा, इतर कोणताहि खटाटोप नको; लागलीच ती इमारत उभी राहिलीच म्हणून समजा, असें म्हणण्यासारखेंच हें नाहीं का ?"

कृष्णमूर्तींचें सत्य आणि आपण यांचेमध्यें जी दरी निर्माण झाली आहे,

तिचें स्वरूप तरी काय आहे ? ही दरी ओलांडण्यास आपणांजवळ साधनें नाहींत, एवढीच आपली अडचण आहे का इतर कांहींतरी आपणांला मागें खेचीत आहे ?

हल्लीं जें जीवन आपण जगतों तें कोणत्या प्रकारचें आहे, हें तरी आपण नीट समजून घेतों का ? हे श्रम न करतांच सत्याकडे जाण्याची आपणांला घाई झालेली आहे. पुष्कळदां ही घाईच अंगाशीं येते. लहान मूल ज्याप्रमाणें रोपटें कुंडींत रुजण्याची वाट न पाहतां तें पुन्हां पुन्हां उपटतें व तें अजून कां मूळ धरीत नाहीं असें विचारतें, त्यासारखाच प्रकार आपणहि पुष्कळदां करतों. ही घाई म्हणजे सत्य समजण्याची तळमळ नसून एकदम कांहींतरी फळ (result) आपल्या पदरांत पडलें पाहिजे, असा आग्रह असतो; व हा आग्रहच आपणांला नुसती धांवपळ करावयास लावतो व दमवितो. अध्यात्माच्या क्षेत्रांत ही अशी घाई उपयोगाला येत नाहीं, असें दिसतें.

अध्यात्माचें ज्ञान म्हणजे आपल्या आंतर व बाह्य जीवनाचें खरें स्वरूप समजून येणें, याशिवाय दुसरें कांहींच नाहीं. जें स्वरूप या जीवनाचें आहे असें आपण हल्लीं धरून चालतों, तें असत्य कां हें जर उमगलें, तर करावयाचें असें कांहीं शिल्लकच राहात नाहीं.

वर दिल्याप्रमाणें सत्यज्ञानाची जरी सुटसुटीत अशी व्याख्या करतां आली' तरी आपल्या अडचणींना खरी सुरुवात कोठून होते हें पाहणें जरुरीचें आहे. मला तर वाटतें कीं, आपणां सर्वांची पहिली अडचण अशी आहे कीं, जीवनाविषयींचें जें कांहीं अज्ञान असतें, तें सर्व आपल्या मनांतच सांठवलेलें असतें; व हें अज्ञान दूर करण्याकरतां या पंगु झालेल्या मनाशिवाय दुसरें कोणतेंहि हत्यार आपण वापरीत नाहीं. मन हें काम नीट करूं शकेल का नाहीं, याचा विचार न करतां आपण मनाकडेच जेव्हां ही कामगिरी सर्वस्वीं सोंपवितों, तेव्हांच खरी चूक होते. एखाद्या सावकाराच्या घरांत झालेल्या चोरीचा तपास करण्याचें सगळें काम, चोरी करणाऱ्या सेवकाकडेच द्यावें, तशांतला हा प्रकार होतो. तो सेवक स्वतःच्या अस्तित्वावर गदा न येईल अशा तऱ्हेनेंच सर्व तपास करणार, हें आपल्या लक्षांतच येत नाहीं. आपणांला वाटतें कीं, आपलें इतर प्रकारचें अज्ञान ज्या पद्धतीनें आपण घालवितों ती एकच पद्धत ज्ञानप्राप्तीची असावी. गणिताबद्दलचें अज्ञान कशा तऱ्हेनें आपण नाहींसें करतों ? ज्या कोणाला गणित चांगलें येतें अशी आपली समजूत असते, अशा तज्ज्ञाकडे आपण जातों, तो जीं प्रमेयें शिकवतो त्यांची साठवण चित्तांत करतों; आणि यापुढें एवढी एकच व्यवस्था आपण करतों कीं, जीं नवीन प्रमेयें आपण शिकलों त्यांची उजळणी जरूर तेवढा काळ व्हावी. हें काम पुरेसें झाल्यावर आपणांला असें दिसून येतें कीं, काम पडेल तेव्हां नवीन सांठविलेलीं प्रमेयें आठवतात व त्यांचा उपयोग आपण व्यवहारांत करूं शकतों.

ज्ञानसंपादनाचा हा जो प्रकार सांगितला आहे, त्यांत दोन क्रिया असतात. पहिली क्रिया अशी कीं, जें नवीन प्रमेय सांगितलें जातें तें समजन घेणें. येथें थोडा आणखी विचार केला तर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अगदीं संपूर्णतः नवीन असें प्रमेय जर कोणीं आपणांला सांगितलें तर तें आपण समजूं शकूं काय? जें आपल्याला त्याच्या कोणत्याहि अंगानें परिचित नाहीं, तें आपण ग्रहणच करूं शकत नाहीं. जें फूल, अथवा ज्या फुलासारखें फूल, आपण पूर्वी कधींहि पाहिलेलें नाहीं तें फूल म्हणून आपल्याकडे आलें, तर त्याच्या स्वरूपाचें ग्रहण आपल्या बुद्धीला होऊं शकेल काय? "कांहींतरी न पाहिलेलें पाहिलें" एवढी फक्त जाणीव, आपणांला त्या प्रथम दर्शनाच्या क्षणांत होऊं शकेल; व सर्व कांहीं तेथेंच संपून जाईल. या अशा वस्तूचें ज्ञान आपणाला झालें, अशी भाषाच करतां येत नाहीं. कारण त्या वस्तूचें जें कांहीं आपण पाहिलेलें असतें, त्याचा संबंध ज्ञात वस्तूंपैकीं कोणत्या तरी वस्तूशीं जर आपणांला लावतां आला नाहीं, तर ती वस्तु दुसऱ्या क्षणींच विराम पावेल व तिची आणि तिच्याबद्दलच्या ज्ञानाची सांठवण मेंदूंत करण्याचा प्रकार सुरूहि होणार नाही.

"मला अमुक एका वस्तूचें ज्ञान झालें," असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां आपल्या म्हणण्याचा अर्थ एवढाच असतो की, जें कांहीं मीं पाहिलें तें अशा प्रकारचें होतें कीं, तें मला ओळखतां आलें. माझ्याजवळ असलेल्या ज्ञात वस्तूंच्या संग्रहांतून मी कोणतीतरी एक अशी वस्तु बाहेर काढूं शकलों, कीं जिच्याशीं या नवीन वस्तूची तुलना करून त्या तुलनेच्या मदतीनें, ही नवीन वस्तु मी समजून घेऊं शकलों. या नवीन वस्तूची जात मला ठरवितां आली, आणि म्हणूनच तिला कांहीं नांव (naming) मी देऊं शकलों व हें नांव मी देऊं शकलों यांतच माझी सर्व सोय झाली. कारण नाव देतां आलें म्हणूनच मला ती वस्तु समजली आणि तिचा संग्रह माझ्या स्मृतींत करतां आला. आतां मी तुम्हांला सांगूं शकेन कीं, "ती वस्तु अशा अशा प्रकारची होती."

गणितासारख्या विषयाचें ज्ञान तज्ज्ञाकडून संपादन करतांना जरी असा भास होतो कीं, आपण कांहीं तरी नवीन शिकत आहोंत, तरी तें अत्यंत नूतन असें नसतेंच. जुन्या ज्ञात प्रमेयांच्या मदतीनें, त्यांचा हात धरूनच फक्त एक पाऊल प्रत्येक वेळीं पुढें टाकलें जातें, व हें नवीन टाकलेलें पाऊल म्हणजेच 'नवें ज्ञान', असें आपण समजत असतों. तांत्रिक विषयांच्या क्षेत्रांतले सर्व ज्ञानसंपादन म्हणजे, जुन्या ज्ञात वस्तूंच्या मदतीनें तत्सदृश पण ज्यांचा आकार वाढविलेला आहे अथवा ज्यांचे रंग बदललेले आहेत, किंवा ज्यांच्या रूपांत थोडाबहुत बदल केलेला आहे, पण ज्यांची जात बदललेली नाहीं अशा 'नवीन' वस्तूबद्दलची माहिती गोळा करणें होय. या क्षेत्रांतील प्रमेयांचें अथवा वस्तूंचें ग्रहण होऊन त्यांना नांव देण्याची

व्यवस्था झाल्याबरोबर, तें ज्ञान आपल्या स्मृतींच्या कोठारांत जाऊन पडतें. ज्ञान-संपादनाची ही क्रिया संपली कीं, त्याच क्षेत्रांत दुसरी एक क्रिया सुरू होते. मिळालेल्या ज्ञानाची प्रसंग पडेल तेव्हां (व प्रसंग नसतांना देखील) उजळणी करणें, ही ती क्रिया होय. या उजळणीचा अर्थ नेहमीपेक्षां फारच व्यापक असा घेतला पाहिजे. 'वस्तुज्ञानाची जशीची तशी पुनरावृत्ति करणें' एवढाच उद्योग आपण करीत नाहीं. त्या ज्ञानाचा इतर वस्तुज्ञानाशीं संबंध जोडणें, अथवा अशीं वस्तुज्ञानें एकमेकांत मिसळणें, आणि अशीं मिश्रणें पुन्हां एकमेकांत मिसळणें, अशा निरनिराळ्या क्रिया आपण करीत असतों. स्थूल अर्थानें, मिळालेल्या माहितीची (accumulated knowledge) ही उजळणीच नव्हे काय? प्रत्येक वेळीं जुनें कायम ठेवून, त्यांत इतर कोणतेंतरी दुसरें जुनें आपण मिसळीत असतों. जन्मल्यापासून या जगांत जो आपला प्रवास सुरू होतो त्या प्रवासांत ज्ञानसंपादनाचा जो उद्योग आपण करतों, त्या उद्योगाचें स्वरूप हें असें आहे. वर गणिताबद्दलच्या ज्ञानाची जी पद्धत सांगितली तीच पद्धत, जीवनाबद्दलचें ज्ञान मिळण्याकरतां आपण वापरतों. या पद्धतीखेरीज दुसरी पद्धत आपणांला माहीतच नाहीं, असें दिसतें; व म्हणूनच "साधन सांगा" असा हट्ट आपलें मन धरून बसतें.

First of all, we carry over the mentality of industrial technology to meet life. That is, we want to meet life efficiently and to meet efficiently, we think we need a method; and most religious societies, most teachers offer a method, how to be peaceful, how to be happy, how to have a tranquil mind, how to concentrate and so on, so on ..... Efficiency which means the cultivation of a technique, of a method, implies the constant practice of a habit psychologically..... But if we are consumed, taken up, with the cultivation of technique, obviously we shall never find the other. Therefore the way becomes important, because the way points the goal, therefore, the goal is separate from the way. Is that so?

(*Talks at Ojai* (1949), page 89–80)

आपली चूक अशी होते कीं, ज्या मला जीवनाचें ज्ञान व्हावयाचें तो 'मी' जीवनाच्या बाहेर कोठेंतरी उभा आहे, अशी आपण कल्पना करतों. तसेच तो 'मी', एका ठराविक पविऱ्यांत उभा आहे, तो स्थिर आहे, आणि जें समजून घ्यावयाचें तें जीवनहि स्थिर आहे, असें आपण धरून चालतों. पुष्कळदां, 'माणसाचें जीवन सारखें बदलत असतें', अशासारखे वाक्यप्रयोग आपण करतों. पण असें जेव्हां आपण बोलतों, तेव्हां माणसाच्या भोंवतालच्या परिस्थितीला अनुलक्षून तें

आपलें बोलणें असतें. परिस्थिति ही बदलत राहणारच व हें लक्षांत घेऊन शहाण्या माणसानें तिचेशीं जमवून घ्यावें, एवढाच अर्थ शहाणपणाचा आपण करीत असतों. पण अशा शहाण्या माणसाला, बाहेरची परिस्थिति लक्षांत न घेतल्यामुळें बसणारे कांहीं धक्के जरी टाळतां आले तरी, त्याचें जीवन दुःखापासून मुक्त झालें असें म्हणतां येईल काय ? तें तसें होत नाहीं, हें कबूल करण्यांतच खरा शहाणपणा आणि शिवाय प्रामाणिकपणाहि नाहीं काय ?

आमच्या मागचें दुःख सुटावें, जीवनांतला संघर्ष टाळावा, आणि निराशेची व आपली गांठ पडूं नये, याकरतांच हा सारा खटाटोप नाहीं काय ? माणसानें मागेंपुढें पाहावें, एकदम अविचारानें वागूं नये, फार लांबचा विचार करावा, तरतमभाव लक्षांत आणावा, परिस्थितीचें समग्र स्वरूप ध्यानांत घ्यावें, जी उडी झेपणार नाहीं ती घेऊं नये, अशासारखा उपदेश आपण कितीतरी ऐकत आलों आहोंत. हा उपदेश नेहमीं लक्षांत ठेवण्याची व प्रसंगाच्या नेमक्या वेळीं तो न विसरण्याची कला जरी आपणांला शिकतां आली, तरी या कलेनें फारसें कांहीं साधत नाहीं, हें आपण पाहतोंच. "हा एक सज्जन माणूस आहे." असें लोकांचें उद्‌गार कानांनीं ऐकण्याचें भाग्य केव्हां केव्हां या कलावंताला मिळतें, एवढेंच काय तें. यापलीकडे या सज्जनपणाची मजल जात नाहीं. असे सर्व सज्जन, मनांत कशानेंतरी जळत असतात, कोणतीतरी काळजी त्यांना हैराण करीत असते, व नशिबानें शेवटपर्यन्त हात दिला तर लोकांच्या नजरेस येण्यासारखी अविवेकाची कृति त्यांच्या हातून न घडतां ते जीवितयात्रा संपवितात पण "जीवन समजलें नाहीं" ही तक्रार न मिटवितांच ते इहलोक सोडतात.

यावरून असें म्हणण्यास हरकत नाहीं, कीं नुसती बाहेरची परिस्थिति नीट समजून घेणें म्हणजे जीवनाचें सत्य समजणें नव्हे. जीवनाबद्दलच्या ज्ञानांत परिस्थिति अनुषंगानें येत असावी. मानवी जीवन हें बऱ्याच अंशानें त्याच्या अंतःकरणांत असतें. एका अर्थानें, माणूस ज्या जगांत राहतो, तें संपूर्ण जग त्याच्या मनांतच आहे, असें म्हटलें तरी चालेल. दुसरें असें दिसतें कीं, जीवनाबद्दलचें सत्य माणसाला समजूं लागलें कीं, तें सत्यच त्याचें जीवन बनतें. दिव्याला प्रकाशानें स्पर्श केला कीं, तो स्वतःच प्रकाशमय होऊन जातो, यासारखा हा प्रकार असावा.

'जीवनाबद्दलचें ज्ञान म्हणजे स्वतःच्या मनाचेंच संपूर्ण ज्ञान', असें जर खरोखर असलें, तर हें ज्ञान मिळविण्याकरतां बाहेरचीं साधनें कां तोकडीं पडतात, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. हा तोकडेपणा, कृष्णमूर्तींनीं पुढील उताऱ्यांत फारच स्पष्ट करून दाखविला आहे—

"Now, how one is to have that capacity, how does one come by it ? Surely no information can give it. Though you may study

all the books written about how to meet life, *that very factual understanding is really an impediment;* because having the facts (from the books) you try to meet the challenge with that framework of information. And, obviously, (such) facts do not create or bring about that capacity. Without the capacity to meet life fully, life becomes a constant source of pain. So it is not facts, it is not knowledge—you may read the Bhagavat Gita, you may read all the sacred books, listen to the talks given by all the Saints, practise innumerable disciplines—that will help to have that capacity, with which to meet life.

So, if it is not facts, if it is not knowledge, what is it that is required ? Before we can find that out, we have to discover– have we not ? What is life itself ? What is living ? If we can understand that, perhaps we shall have the capacity to meet the challenge, which is life itself..... "

(*Talks in India*, (1949) page 40).

ज्ञान ज्याला व्हावयाचें तो 'मी' कायम ठेवून, ग्रंथांपासून जें ज्ञान आपण मिळवितों, तें ज्ञान काय काय अनर्थ करतें, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. हा 'मी' जेव्हां ग्रंथ वाचू लागतों, तेव्हां तो कोरा नसतोच मुळीं. त्या 'मी'च्या पाटीवर अनेक चित्रें आधींच उमटलेलीं असतात. कांहीं जास्त स्पष्ट तर कांहीं पुसट; पण अक्षरशः असंख्य चित्रांनी लिडबिडलेलें आपलें मन जेव्हां एखाद्या ग्रंथांतलें जीवनविषयक ज्ञान ग्रहण करूं लागतें, तेव्हां त्या मनांत खरोखर काय उतरतें हें पाहिलें तर चटकन् लक्षांत येईल कीं, आधींच्या ज्ञानाच्या चाळणींतून जेवढें गाळून घेतां येईल तेवढेंच ज्ञान, आपल्या चित्तांत उतरेल. प्रथम दर्शनींच, आपलें मन जें नवीन सांगितलें जात आहे त्याच्याशीं, जुन्या ज्ञानाची तुलना करूं लागतें व जुन्या ज्ञानाच्या कसोटीला उतरेल तेंच अचूक ज्ञान, अशी खूणगांठ बांधतें. एका दृष्टीनें असेंहि म्हणतां येईल कीं, जे ग्रंथ आम्हांला आधींच पटलेलें ज्ञान सांगत नाहींत अथवा तेंच जुनें ज्ञान अधिक स्पष्ट करून सांगत नाहींत, ते आम्हांला समजूंच शकत नाहींत; अथवा समजलेच तर "तें त्याज्य" एवढा निर्णय करण्यापुरतेंच ते समजू शकतात. या सर्व अडचणी, आमचें मन प्रथम निर्लेप होऊन नंतर अध्यात्मज्ञानाच्या प्रवासाला निघत नसल्यामुळेंच उत्पन्न होतात. जरी समजा, मन खरोखर निर्लेप झालें तरी त्याच्या अडचणी संपत नाहींत. 'साधन करूं पाहणें' हीच सर्व अडचणींची जननी असावी. कृष्णमूर्तींनीं वरील उताऱ्यांत ग्रंथज्ञानाचा अडथळा होतो असें जें म्हटलें आहे, त्यांत फार खोल अर्थ आहे. नुसतें शब्दज्ञान खरें ज्ञान देऊं शकत नाहीं, हें आम्हीहि जाणतों; पण

कृष्णमूर्तींना यापुढें जाऊन म्हणावयाचें आहे कीं, तुम्ही आपलें जीवन कुणाच्याच– सत्यज्ञान झालेल्या महात्म्यांच्यासुद्धां शब्दांच्या चौकटींत बसवूं शकत नाहीं. तुम्हीं स्वतःच्या जीवनाकडे स्वतंत्रपणें पाहिलें तरच तें समजेल, अन्यथा मुळींच नाहीं. स्वतःच्या जीवनाचें दर्शन घेण्याकरतां इतरांचे शब्द शेवटपर्यंत उपयोगी पडतील, ही आशा फार घातक आहे. अध्यात्माच्या क्षेत्रांतला प्रवास, मन स्वतंत्र झाल्यानंतरच सुरू होतो असें दिसतें.

* * *



दहा

सत्य कोणतें व साधन म्हणजे काय ? (उत्तरार्ध)

स्वतःच्या जीवनाचें दर्शन आपणांला अलिप्तपणानें (choicelessly) घेतां आलें पाहिजे, एवढा एकच आग्रह कृष्णमूर्ति धरतात. पण ते, 'जीवन' कशाला म्हणतात, हें प्रथम समजून घेणें अगत्याचें आहे. सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंपेपर्यंत ज्या ज्या घटनांशीं आपला संबंध येतो त्या त्या घटनांचे पडसाद (reactions) आपल्या चित्तांत कसे उमटतात तें अत्यंत काळजीपूर्वक पाहण्यास आपण शिकलें पाहिजे. डोळ्यांना कांहीं दिसलें किंवा कानांनीं ऐकलें कीं, चित्तांत कोणते तरंग उठतात, ते तसे कां उठतात, त्यांचा उगम कोठून होतो, गतघटनांच्या स्मृतींतूनच हे तरंग येतात कीं नाहीं, का दुसरें कांहीं त्यांचें कारण आहे. हें ज्याचें त्यालाच समजणें शक्य आहे. जो काय उमज पडावयाचा तो, ही कृति प्रत्यक्ष हातून (म्हणजे मनानें) झाल्याखेरीज कसा पडणार ? क्षणोक्षणीं घडणाऱ्या घटनांचे आपल्या मनावर होणारे संपूर्ण परिणाम, चटकन् लक्षांत आले पाहिजेत; व त्याकरितां चित्त सदैव जागरूक असलें पाहिजे. हा उद्योग सतत पण कोणताहि हेतु मनांत न धरतां चालूं राहिला पाहिजे. हें असें झालें म्हणजे जें अनुभवास येतें तेंच, आपल्या जीवनाचें सत्यस्वरूप. या सत्याशीं संपर्क न ठेवतां इतर कोणतीहि आणि केवढीहि मोठी साधना तुम्ही वर्षानुवर्षें करीत राहिलां, तरी तिचा यत्किंचिन्हि उपयोग नाहीं असें कृष्णमूर्ति निक्षून सांगतात.

आपल्या जीवनाकडे पाहतांना, जें निर्हेतुकपणाचें पथ्य सांगितलें आहे, त्यांत फार मोठा अर्थ भरलेला आहे. आम्हीहि एका अर्थानें आमच्या जीवनाकडे पाहातच असतों. "आतां काय झालें, कोणता अनुभव आला, त्यापासून मला पुरेसें सुख कां मिळालें नाहीं, कालचा अनुभव किंवा शेजाऱ्याचा अनुभव किती सुखद होता, छे, माझी कांहीं तरी चूकच झाली, माझा प्रयत्न कमी पडला, नाहीं तरी माझें नशीबच वाईट, कांहींहि करा, सुख कसें तें माझ्या कपाळीं नाहींच ! तें कांहीं नाहीं, आतां अगदीं जिवाचें रान करायचें, मग बघूं कसें यश मिळत नाहीं तें ! यश मिळाल्यानंतर केवढा उज्ज्वल भविष्यकाल माझ्या वांट्यास येईल, माझ्या वैभवाकडे पाहून विशेषतः आज यशस्वी होणारे हे नालायक लोक, माझा हेवा करतील, उः, मग मी तेव्हां त्यांच्याकडे ढुंकूनहि पाहणार नाहीं." अशा प्रकारचें जें चिंतन आपल्या चित्तांत सदैव चालूं असतें, तें एका अर्थानें आपल्या जीवनाचें निरीक्षणच असतें. पण हें निरीक्षण सहेतुक असतें, व म्हणूनच त्याला निरीक्षण असें खऱ्या अर्थानें म्हणतां येत नाहीं. आपण आपल्या चित्ताचें एक टोंक भूतकालांत अडकवून टाकतों व मगच त्याला "जीवनाकडे पाहा" असें सांगतों. येथेंच काय ती चूक होते. हा 'वदतो व्याघात' आहे. पतंगाची दोरी एका हातांत घट्ट धरून ठेवायची व आकाशांत तो फार दूर कां जात नाहीं, अशी तक्रार करावयाची, अशांतला हा प्रकार आहे. अशा प्रकारच्या निरीक्षणानें जें आपल्याला दिसतें तें फारच जवळचें म्हणजे एकांगी असें असतें ! एवढेंच नव्हे, तर तें 'सत्य' असेलच अशीहि खात्री देतां येत नाहीं.

ज्या प्रकारचें चिंतन वर दर्शविल्याप्रमाणें आपण करीत असतों, त्यांत स्मृति आणि वासना, अथवा भूतकाल आणि त्यावर आधारलेला भविष्यकाल; यांचा फार मोठा भाग असतो. हें **सर्व चिंतन 'मी' कायम ठेवून त्या 'मी' चा मोठेपणा वाढविणारें असेंच असतें.** किंबहुना चिंतन करणारा मी (thinker) ठाण मांडून आपल्या भूमिकेवर स्थिर असा उभा राहिल्याखेरीज, आपल्याला परिचित असलेलें कोणतेंच चिंतन सुरू होत नाहीं. ज्या चिंतनाचा उगम 'मी' पासून होतो, तें सारें चिंतन **सकाम असल्यामुळें तें सत्याकडे आपणांला घेऊन जाईल ही आशा करणेंच वेडेपणाचें आहे.** 'मी' पासून सुरू होणारें सर्व चिंतन टाकून द्यावयाचें, असा आपला निश्चय जर कधीं काळीं खरोखर झालाच तर जीवनाचें संपूर्ण स्वरूपच बदलून जाणार नाहीं का ? या प्रश्नाचा जों जों विचार करावा तों तों त्याचें स्वरूप इतकें मनोहर दिसूं लागतें कीं, हा निश्चय आपण कां करीत नाहीं, याचें आपलें आपल्यालाच आश्चर्य वाटूं लागतें.

आपल्या चालू जीवनाचें स्वरूप कसें आहे, हें अचूक समजल्याखेरीज कोणतीहि साधना सुरू करतां येणें अशक्य आहे. जीवन बाजूला ठेवून हट्टानें जर कांहीं

साधन आपण करूं लागलों तर, रोगाचें निदान न करतां औषधयोजना करणाऱ्या वैद्यासारखी नाहीं का आपली स्थिति होणार? तेव्हां, चालू जीवन म्हणजेच आपल्या मनाचे हरघडीं होणारे व्यापार समजून घेण्याचा प्रयत्न प्रथम होणें जरूर आहे, येथपर्यंत आपण आलों. पण हे व्यापार समजणार कोणाला व कोणत्या परिस्थितींत, हेच काय ते अध्यात्मांतले कूटप्रश्न आहेत.

मनाचे व्यापार समजण्याकरतां त्यांचें निरीक्षण करण्याखेरीज दुसरा उपाय नाहीं; आणि हें निरीक्षण 'मी'ला तर बिनचूक करतां येत नाहीं. असा हा अवघड पेंच आपल्यापुढें आहे. यांतून कांहीं मार्ग आहे का? का माणसाच्या नशिबीं सत्यदर्शन लिहिलेलेंच नाहीं?

मनाच्या व्यापारांतून म्हणजेच गतघटनांच्या स्मृतींतून 'मी' जन्माला येतो, हीच काय ती खरी अडचण आहे. भूतकालांतल्या घटनांचे प्रिय वाटणारे संस्कार एकत्र करून, त्यांना घोटून घोटून त्यांचा जणू काय अर्क काढून जो 'मी' नांवाचा पदार्थ तयार होतो, त्या पदार्थाचे गुणदोष लक्षांत न घेतां, 'परमार्थसाधन' असें उदात्त नांव देऊन या पदार्थाच्या मदतीनें कांहीं क्रिया आपण केल्या, तरी त्यांचा काय उपयोग? मग या पदार्थाचे गुणदोष जिकडे नेतील तिकडे जाणें, आपणांला भाग आहे.

परमार्थाचें साधन करण्याकरितां का होईना, पण 'मी' पाय रोवून उभा राहिला कीं तो आपला प्रभाव दाखविल्याखेरीज सोडीत नाहीं. 'मी' एकदा अस्तित्वांत आल्यावर तो कशाचें चिंतन करणार? त्यानें जो विचार, ध्येय (idea) म्हणून चित्तांत बाळगला असेल, त्या विचाराचेंच तो चिंतन करणार हें उघड आहे. पण हें ध्येय भूतकालांतून जन्माला आलेलें असतें; व तें 'मी'ला प्रिय असतें म्हणूनच निवडलेलें असतें. अशा ध्येयानें भारलेला 'मी,' "जीवनाचें सत्य हुडकून काढीनच काढीनच" अशी प्रतिज्ञा करून जरी तपश्चर्येला बसला, तरी त्याच्या हातीं तें सत्य लागेल काय? त्याच्या नजरेपुढें तें 'ध्येय' हेंच सारखें दिसत राहील; व या ध्येयाचें चिंतन सतत करीत राहण्याचा छंद जरी या 'मी'ला लागला, तरी त्यांतून फलनिष्पत्ति काय होणार? असा मूलग्राही प्रश्न कृष्णमूर्ति विचारतात. ज्या पद्धतीनें अध्यात्माकडे आपण पाहात आलों, त्या पद्धतीवर संपूर्ण आघात करणारा असा हा प्रश्न आहे. ध्येयाची निर्मिति आपलें मनच करतें; व असें 'मनोनिर्मित' (projected) ध्येय गच्च धरून ठेवून त्या ध्येयाच्या कसोटीवर जीवनांतली प्रत्येक घटना आपण पारखून घेऊं लागलों, तर त्यातून सत्यदर्शनाच्या दृष्टीनें कांहींच लाभ होत नाहीं. कारण ध्येय हें जुन्यांतून जन्मलेलें असतें व प्रत्येक घटना, ही अगदीं संपूर्ण नवीन अशी असते. या अशा नवीन घटना, जुन्या (ध्येयाच्या) सांच्यांत बसविण्याचा उद्योग मग सुरू होतो.

आपल्या डोळ्यांपुढें कोणतेंहि नवें दृश्य दिसलें कीं, त्याचें रूपांतर (translation) त्या तथाकथित ध्येयाच्या मदतीनें आपण करतों; व एका दृष्टीनें जास्तच गडद अशा अंधकारांत आपण जाऊं लागतों. आपण आपली समजूतमात्र अशी करून घेतों कीं, परमार्थाची ही साधना चालली आहे; व तिला दीर्घकाल हा लागणारच.

ईशावास्योपनिषदांत हा पेंच फारच मार्मिक तऱ्हेनें दाखविला आहे:—

अन्धं तमः प्रविशन्ति ये अविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः ॥

वरील श्लोकाचा अर्थ लावतांना, 'विद्या' या शब्दाचा अर्थ 'देवताज्ञान' असा श्रीशंकराचार्यांनीं दिला आहे. जोंपर्यंत देवताज्ञानापर्यंतच साधकाची मजल जाते, तोंपर्यंत 'मी' कायम राहतो, आणि खरी विद्या 'मी'नाशानंतरच सुरू होते, असें त्यांना म्हणावयाचें आहे असें वाटतें.

चालू जीवनांत जें दुःख आमच्या अनुभवास येतें, तें अज्ञानामुळें येत असेल हें आपण सहज समजूं शकतों; पण या अशा अज्ञानाचा उबग आल्यानंतर आपलें मन पुढें काय करतें, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. मन एका अविद्येंतून मुक्त होतें, पण दुसऱ्या अविद्येचा आश्रय करतें; व या दुसऱ्या अविद्येला 'विद्या' अथवा 'ज्ञान' असें सुंदर नांव देतें. नंतर त्या ज्ञानांत रममाण होऊन, "अजून मी मुक्त कां होत नाहीं?" अशी वाट पाहात बसतें. मनाच्या हें लक्षांतच येत नाहीं कीं ज्या क्षणाला, 'मी' ने अविद्येचा त्याग करून मुक्तीचें साधन म्हणून कांहीं स्वीकारलें, त्याच क्षणाला तो 'मी' दुसऱ्या एका अज्ञानांतच सांपडला. हें दुसरें अज्ञान स्वीकारतांना तें, आपणांला मुक्त करील अशी आशा त्याला वाटली खरी; पण लोखंडी पिंजऱ्याचें दार उघडतांच सोन्याच्या पिंजऱ्यांत पाऊल पडावें, तसें हें झालें. माणसाचें नेहमीं असेंच होतें कारण, 'मी' जोंपर्यंत कायम असतो, तोंपर्यंत तो स्वतःच्या नाशाचा कोणताच उद्योग हातून घडूं देत नाहीं.

जीवनाबद्दलचें सत्य समजून घेण्याकरतां, जीवनांतल्या घटनांकडे अलिप्तपणानें पाहिलें पाहिजे, व हा अलिप्तपणा 'मी' आपल्या अंगीं येऊं देत नाहीं. कारण, कोणतेंतरी ध्येय निर्माण करून त्या ध्येयाला अनुसरून 'मी' चें निरीक्षण नेहमीं चालत असतें, येथपर्यंत आपण आलों. पण हा असा **साधन करणारा मी म्हणजे मनांतला एक विचारच नव्हे काय?** या विचारानें आपल्या ठिकाणच्या संवित्ला मर्यादा पडत नाहींत काय? ही अशी मर्यादित होणारी जाणीव, तिच्या कक्षेंत न येणारी कोणतीतरी गोष्ट समजून घेऊं शकेल काय? जें समजलें असें तिला वाटलें, त्याला तिचाच रंग चढलेला असणार नाहीं का? आणि हें रंगीत सत्य म्हणजे असत्यच नव्हे काय?

थोडक्यांत असें दिसतें कीं, मनामध्यें जाणूनबुजून व "आतां असें केलेंच पाहिजे," अशी प्रस्तावना प्रथम होऊन, नंतर जो उद्योग सुरू होतो, तो निरीक्षणासारखा वाटला तरी तें खरें निरीक्षण नसतें. वरील प्रस्तावनेखेरीज व अगदीं सहजपणें जीवनाकडे पाहण्यास आपण शिकलें पाहिजे. हें असें पाहणें यासच 'साधन' असें म्हणावेसें वाटलें तर त्यास हरकत नाहीं. पण मग 'साधन' या शब्दाचा आपल्या भाषेंतला संपूर्ण अर्थ आपण सोडून देत आहोंत, हें लक्षांत घेणें जरूर आहे. साधन करणारा साधक, कांहींतरी जाणूनबुजून व सहेतुक अशी होणारी क्रिया, व कालांतरानें होणारी साध्याची प्राप्ति, या सर्व गोष्टी ज्यांत अजिबात नाहींत असें हें जगावेगळें साधन आहे.

अलिप्तपणानें होणारें निरीक्षण कसें असतें, हें स्पष्ट करतांना कृष्णमूर्ति म्हणतात :--

"One has to understand what is, before one can perceive that which is other than what is ... We are concerned with understanding the mind; and in understanding there is no condemnation, no demand for a pattern of action. You are merely observing; and observation is denied when you concern yourself with a pattern of action, or merely explain the inevitability of a slavish life. What matters is to observe your own mind without judgment, just to look at it, to watch it, to be conscious of the fact that your mind is a slave and no more; because *that very perception releases energy*, and it is this energy that is going to destroy the slavishness of the mind. But if you merely ask "How am I to be free from my slavery to routine, from my fear and boredom in everyday existence?" You will never release this energy. We are concerned only with perceiving what is; and it is the perception of what is, that releases the creative fire.

(*Talks in Bombay*, (1960) page 4)

कृष्णमूर्ति आपल्या जीवनाचे दोन भाग असे करीतच नाहींत. दैनंदिन जीवनापासून परमार्थसाधनाची क्रिया ही कांहींतरी निराळी आहे; दिवसाचा जो वेळ त्या साधनेंत आपण घालवितों त्या वेळीं मनाला कांहींतरी निराळें शिकवावें लागतें, अशी कल्पना आपण करून घेतलेली आहे. कृष्णमूर्तींना तसें वाटत नाहीं. **हरघडीं जी आपल्या मनाची स्थिति असते त्या स्थितींतूनच परमार्थाचें दार उघडतें**, असें ते म्हणतात; आणि म्हणूनच त्यांच्या प्रतिपादनांत अंतिम सत्याच्या प्राप्तीबद्दलचें स्वतंत्र असें विवेचन आढळत नाहीं. ही पद्धत आपणाला अपरिचित आहे, आणि म्हणूनच कित्येकांचा गैरसमज होतो. आपली अशी समजूत आहे कीं,

मानवी जीवनाचें अखेरचें ध्येय "अंतिम सत्य" अगर "मोक्ष" या नांवाचें कांहींतरी असून तें फार दूरच्या अंतरावर कोठेंतरी आहे; व तेथें जाऊन पोंचण्याकरतां दिवसांतून कांहीं वेळ, ठराविक क्रिया करावी लागते. बाकीचा वेळ आपण कसा घालवितों, याला फारसें महत्त्व नाहीं. या बाकीच्या वेळांत आपल्या हातून अनीतीचें आचरण घडतां कामा नये एवढीच दक्षता आपण घेतों. हें बाह्य आचरण झालें व त्याचा संबंध समाजाशीं येतो. पण दिवसाचे चोवीस तास आपलें मन, जें काय करीत असतें तिकडे आपण लक्ष देत नाहीं.

कृष्णमूर्तींचा कटाक्ष दरक्षणीं होणाऱ्या मनाच्या व्यापारावर आहे. मनाचें यंत्र वापरतांना आपल्या हातून कांहींतरी भलतीच चूक होत आहे. या चुकीमुळें आपल्या जीवनाचें संपूर्ण स्वरूपच बदललें आहे. 'मी'चे हुकूम पाळणें एवढेंच आतां आमचें जीवन ठरलें आहे; व खरें जीवन या खोट्या जीवनानें सगळेंच आच्छादून टाकलें आहे. या खोट्या जीवनाबद्दल नुसती तक्रार करून तें संपत नाहीं; पण तें खोटें आहे, अशी मनोमन खात्री पटली तर तें वितळून जातें व त्याच्या जागींच खरें जीवन उदयास येतें. चालू जीवनाचा जो काय खोटेपणा आहे तो सर्व 'माझें जीवन' या भावनेंत आहे **'मी' असा कोणी नाहींच, आहे तें फक्त जीवन आहे,** असें कृष्णमूर्तींना सांगावयाचें आहे, असें वाटतें. आपल्या या खोट्या जीवनाकडे पाहणारा असा, निराळा कोणीतरी कल्पिण्याची आपणांला संवय लागली आहे. हें असें द्वैत निर्माण केल्याखेरीज जणू आपलें भागतच नाहीं. आपण जें वासनामय जीवन जगतों तें खोटें आहे, असा बुद्धीनें जरी निर्णय केला तरी तेवढ्यानें मुक्त होतां येत नाहीं, तर याच्यापुढें जाऊन "हें असें जीवन नष्ट करणारा साधकहि जागेवर नाहींच" अशी मनाची खात्री पटली पाहिजे.

कृष्णमूर्तींचा हा आग्रह आपणांला घोंटाळ्यांत पाडतो. आपल्याला वाटतें कीं, हा तत्त्वज्ञ भलतीच अपेक्षा आमच्याकडून करीत आहे. पण आपण हें विसरतों कीं, द्वैत हीच मानवी जीवनांतली खरी समस्या आहे व ती सुटली नाहीं तर अज्ञान अथवा वासना समूळ नष्ट होण्याची आशाच नाहीं. 'मी' म्हणून कोणीतरी आहे, असें वाटावयास लावणारें अज्ञानच संघर्षाला जन्म देतें व तेंच वासनेच्या मागें आपणांला पिटाळतें. 'मी' ला 'साधक' हें उदात्त नांव जरी आपण दिलें तरी त्याचा उपद्रव थांबत नाहीं; त्याच्या वासनेचें क्षेत्र बदलतें, एवढेंच काय तें

दुसरें असें कीं, मनांत कोणताहि विचार उत्पन्न झाला कीं, तोच विचार करणारा (thinker) निर्माण करतो व मग मन लहान बनतें. या लहान मनांत कोणतेंच सत्य पूर्णत्वानें ग्रहण करण्याची शक्ति मग राहात नाहीं. एका अर्थानें मन पंगू बनतें, अथवा तें रोगग्रस्त होतें. अशा रोगग्रस्त मनानेंदेखील आपण पंचांतले उद्योग करूं शकतों, व कांहीं वेळां तर लोकांचे डोळे दिपवणारे

असे कार्याचे डोंगरहि उभे करूं शकतों; व यामुळेंच आपली फसगत होते कीं, जीवनाचें स्वरूप हें असेंच आहे. पण खरें समाधान, संपूर्ण आनंद असा आपल्या वांट्याला कधींच येत नाहीं. विचाररहित अशी मनाची एखादी अवस्था असूं शकेल व तीच त्याची निरोगी स्थिति असेल, अशी शंकासुद्धां आपणांला येत नाहीं. येथेंच सांगून टाकण्यास हरकत नाहीं कीं, साधन पाहिजे असा जेव्हां आपण आग्रह धरतों, तेव्हां आपणांला विचार करणारा (thinker) अथवा सर्व प्रकारचा विचार, मनांतून समूळ नाहींसा करावयाचा नसतो, तर विचार करणारा 'मी' कायम ठेवून, त्या 'मी' ला कोणत्यातरी उदात्त विचारांत अडकवून टाकण्याची आपली इच्छा असते. या अशा अवस्थेंत आपलें मन लहान (petty) म्हणजे बद्धच राहतें, हें आपल्या लक्षांत येत नाहीं.

आपल्या जीवनांतून विचार करणारा (thinker) जर खरोखर निघून गेला तर साधनांचा खटाटोप संपलाच; पण मग संघर्ष, वासना आणि दुःख यांचाहि मागमूस राहणार नाहीं कृष्णमूर्तींचे शब्द असे आहेत :–

" At present our life is a conflict, a series of battles between the thinker and the thought—what to do and what not to do, what should be and what should not be. The thinker is always, separating itself as the ' me ' remaining outside of action. But when we see that there is only thought, have we not then removed the cause of conflict ? Then we are able to be choicelessly aware of thought and not as the thinker observing thought, from outside. When we remove the entity that creates conflict, surely then there is a possibility of understanding thought. When there is no thinker observing, judging, moulding thought, but only choiceless awareness of the whole process of thinking, without any resistance, without battle, without conflict, *then the thought-process comes to an end.*"

(*Talks at Paris*, (1950) p. 10)

वर सांगितल्याप्रमाणें 'मी'रहित मनानें निरीक्षण केल्यानंतर मन शांत बनतें, आणि ज्याला 'अतिम सत्य' असें आपण आजपर्यंत म्हणत आलों, तें मनाच्या अशा शांत अवस्थेंतच प्रतीत होतें; किंबहुना हें **अशा पद्धतीनें शांत होणारें मन जगाला व्यापून टाकणाऱ्या त्या सत्याशीं एकरूप होऊन जातें**, असें म्हटलें तर चूक होणार नाहीं.

" There is no technique, no special posture, no acquired method of breathing, nor any of the tricks that one learns from books or from others.....But to know yourself, there must be

constant watchfulness not with a stick, not with condemnation or justification, but just awareness, a passive alertness, in which you see things as they are. In seeing things as they are, you understand yourself, which leads to perfect tranquillity of mind and only in that tranquillity, that stillness of the heart and mind, can Reality be.

(*Krishnamurti's Talks* (1950) at Now York and Seattle, page 71.)

* * *



अकरा

एकलेपणा

एकलेपणाची व्यथा ज्यानें आयुष्यांत एकदांहि अनुभविली नाहीं, असा मनुष्य सांपडेल का ? प्रत्येकाला केव्हांना केव्हांतरी ही व्यथा स्पर्श करून जाते. कांहींजणांच्या जीवनांत तिचें स्वरूप फारच भयाण बनतें, तर कांहीं थोडे लोक असे असतात कीं, तिची जाणीव त्यांना फारच पुसट आणि क्वचित् होते.

आतां हें खरें कीं, " मला एकाकी वाटतें, " असें कबूल करणारीं माणसें थोडीं आढळतात. याचें कारण असें कीं, या कबुलीमुळें कांहींतरी कमीपणा आपल्या अंगाला चिकटतो, अशी बऱ्याचजणांची समजूत आहे. वरील प्रकारची कबुली जर आपण दिली तर " मी एक कर्तृत्ववान्, सुसंस्कृत आणि सर्व बाजूंनीं सुखी असा मनुष्य आहे " अशी जी माझी प्रतिष्ठा आहे, तिला तडा नाहीं का जाणार ? अशी भीति कित्येकांना वाटते. त्यांना आपला लौकिक कायम ठेवावयाचा असतो; आणि म्हणूनच ' त्यांचें कांहींतरी चुकलें आहे, ' असा निष्कर्ष इतरांनीं दूरान्वयानें का होईना, काढूं नये अशी काळजी ते घेत असतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बरेचजण आपला एकलेपणा (loneliness) झांकून ठेवीत असतात.

एकलेपणाच्या भावनेचें स्वरूपच असें आहे. ती सारखी माणसाला ओरडून सांगते कीं, " बाबारे, मला झांकून ठेव, माझ्याकडे सरळ पाहूं नकोस. माझ्यापासून जितकें दूर तुला जातां येईल तितकें दूर जा. " माणूसहि मग घाबरतो व एकले-

पणा झांकून ठेवण्याकरतां नानाप्रकारच्या क्लृप्त्या काढतो. एकलेपणापासून पळून जाण्याकरितां माणसानें ज्या पळवाटा (ways of escape) शोधून काढल्या आहेत, त्या अक्षरशः असंख्य आहेत व आणखी नव्यानव्या पक्षवाटा माणसाला सांपडतच आहेत. 'अर्वाचीन संस्कृति' (modern civilization) असें जिला आपण म्हणतों, त्या संस्कृतीचा फार मोठा भाग या अशा पळवाटांचाच बनलेला आहे. परंतु या पलायनाचा विचार करण्यापूर्वी, एकलेपणाची भावना चित्तांत कोणत्या वाटेनें शिरते हें पाहूं.

एकलेपणा मूळचाच चित्तांत दडी मारून बसलेला असतो का तो कांहीं कारणामुळें नवीन उत्पन्न होतो, या प्रश्नाचें उत्तर देणें अवघड आहे. परंतु या चिकित्सेकडे न वळतां, एकलेपणाचा अनुभव जेव्हां मनाला येतो तेव्हां होतें तरी काय, हें समजून घेणें जास्त महत्त्वाचें आहे. मित्राशीं बोलतांना केव्हां केव्हां तळमळीनें आपण म्हणतों, "बाबारे, मला फार उदास वाटतें. तूं माझ्याशीं सारखा बोलत राहा. निदान तुझा सहवास मला लाभूं दे. तूं नसलास म्हणजे मला अगदीं करमत नाहीं. घर खावयाला उठतें, धंदा सुचत नाहीं, काम जमत नाहीं. तुझ्या उत्तेजनाची मला फार जरुरी आहे." हे असे उद्‌गार, एखाद्या आर्थिक आपत्तींत सांपडलेल्या माणसानें काढले तर त्यांचा अर्थ असा कीं, "मी इतका गोंधळून गेलों आहें कीं, व्यवहारांत पुढचें पाऊल कसें टाकावें हेंच मला समजत नाहीं. एखादा चुकीचा निर्णय घेतला जाईल, अशी मला भीति वाटते; व शांत मनानें मी विचार करूं शकत नसल्यामुळें तुझ्या मार्गदर्शनाची मला जरूर आहे." खरोखरच अशा वेळीं उत्तेजनाचे शब्द मन थोडें शांत करतात व मार्ग दिसूं लागतो. पुष्कळदां गोंधळलेल्या मनःस्थितीला 'एकलेपणा' असें नांव आपण देतों. असें दिसतें कीं, नदींत बुडणाऱ्या माणसानें, कोणी हात देतो का, असें ओरडावें त्याप्रमाणें आपलें मन आधार शोधीत असतें व हा शोध करतांना मनाची अवस्था अशी होते कीं, त्याला वाटतें "मी निराधार आहें, एकटा आहें." कांहीं वेळां मित्राचा अगर इतर कोणाचा आधार मिळाला तरी तो क्षणभरच टिकतो, आणि पुन्हां मन उदास बनतें. ही अशी स्थिति बरेच दिवस राहिली म्हणजे तिच्या सातत्यामुळेंच मन अधिक भीतिग्रस्त होतें; व जीवनांत कांहीं रस वाटेनासा होतो. **जीवनांत कांहीं राम न वाटणें, हें एकलेपणाच्या भावनेचें मुख्य लक्षण आहे.** कारण, असें वाटूं लागतांच घरांतल्या माणसांपासून अथवा समजापासून माणूस अलग पडतो. त्यांच्याबद्दल त्याला जिव्हाळा वाटेनासा होतो; आणि मौज अशी कीं, अगदीं याच वेळीं इतरांना माझ्याबद्दल प्रेमभावना अजिबात नाहीं, ही त्याची तक्रार सुरू होते.

एकलेपणाच्या भावनेचें स्वरूप स्थूलमानानें हें असें आहे. संकटामुळें त्यांतून

मुक्त होण्याचा उपाय शोधतांना जशी एकलेपणाची व्यथा अनुभवास येते, तशी इतर कोणतीहि अपेक्षा असली व ती मनाप्रमाणें पूर्ण झाली नाहीं, तरीहि हीच व्यथा उत्पन्न होते. थोडक्यांत अपेक्षेच्या पोटींच एकलेपणाचा जन्म होतो, असें म्हटलें तरी चालेल. संकट नसतांनादेखील, मला ज्या गोष्टीची मित्रांपासून अपेक्षा असते ती गोष्ट जर त्यांच्यापासून मिळाली नाहीं, तरीदेखील मी त्यांच्यापासून अलग पडतो व एकलेपणाच्या गर्तेत जातों. तेव्हां माझ्या आवडीचीच गोष्ट माझा मित्र करीत असतो, तेव्हां माझ्या आनंदाला उधाण येतें व यामुळें होणारें दोघांचें सहकार्य म्हणजेच 'मित्रप्रेम' असें मी समजतों. जें मित्राबद्दल तेंच इतर संबंधितांबद्दल म्हणतां येईल. एकलेपणाची भावना समजून घेण्याकरतां मित्राचें उदाहरण विशेष सोईचें आहे, म्हणून त्याच उदाहरणाचा प्रस्तुत प्रकरणांत प्रामुख्यानें उपयोग केला आहे.

एकलेपणाची भावना दोन तऱ्हांनीं प्रत्ययास येते. इतरांच्या संगतींत पूर्णपणें समरस होतां न येणें हा एक प्रकार, आणि कोणत्याहि परिस्थितींत मनांतला भकासपणा कायम राहणें हा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकाराचा आतां थोडक्या विस्तारानें विचार करूं.

आत्मनिरीक्षणाची संवय ज्याला आहे अशा कोणत्याहि माणसानें "मी अलग केव्हां पडलों?" असा प्रश्न स्वतःला विचारला तर त्याचें त्यालाच असें दिसून येईल कीं, ज्या क्षणाला त्याच्या मित्राचें वागणें चित्तांत धरलेल्या प्रतिमेशीं विसंगत वाटलें, त्याच क्षणाला ही गोष्ट घडली. प्रतिमेचा (image) आणि एकलेपणाचा अत्यंत निकटचा संबंध आहे. मी माझ्या मित्रावर प्रेम करतों म्हणजे मी नक्की काय करीत असतों? "माझा मित्र हा एक चांगला माणूस आहे. तो लबाड नाहीं, गर्विष्ठ नाहीं, फार मोकळचा स्वभावाचा आहे, आणि शिवाय तो फार हुषार आहे, चतुर आहे, आणखी विद्वानहि पण आहे. श्रीमंती असूनहि गरिबांना तो तुच्छतेनें वागवत नाहीं. त्याची राहणी अगदीं साधी आहे." अशासारखे उद्गार आपण काढतों. पण या उद्गारांचा खरा अर्थ काय असतो? वरील विधानांपैकीं कांहीं विधानें फक्त गुणग्रहणच दर्शवितात आणि स्वार्थाचा लवलेशहि त्यांना चिकटलेला नाहीं, असा भास होतो हें खरें, पण जास्त खोल गेलें तर काय दिसतें? 'मित्र कसा असावा,' याबद्दल माझ्या कांहीं ठराविक कल्पना असतात, त्या कल्पनांशीं न जुळणारा मित्र मला आवडेल काय, हा खरा प्रश्न आहे. अशा माणसाशीं माझी मुळांतच मैत्री जमणार नाहीं, हें एकदम कबूल करण्यास हरकत नाहीं. पण खरा मुद्दा पुढेंच आहे. एकदां मैत्री जमल्यानंतर तरी, माझें वर्तन मित्रांशीं–परक्यांची गोष्टच सोडून देऊं,–सतत निःस्वार्थीपणाचें राहतें का? आणि जर तें तसें राहात नसलें, तर त्याला कारण काय?

'अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र' म्हणून अनेक वर्षें प्रसिद्धि पावल्यानंतर एकमेकांचे शत्रु बनले, अशा लोकांचा विचार आज आपण करीत नाहीं. त्यांच्या बाबतींत स्वार्थ कसा आडवा आला, हें कुणीहि सांगूं शकेल. परंतु स्वार्थी भावनेचें स्वरूप किती सूक्ष्म असूं शकतें, हें आपणांस पाहावयाचें आहे.

गुणग्रहण म्हणजे मैत्रीची भावना नव्हे, हें आपल्या लक्षांतच येत नाहीं. मैत्रीची खरी भावना जेथें असतें तेथें मित्राच्या अंगच्या गुणांची जाणीव असते हें खरें, पण सद्गुणांवर आपलें प्रेम असणें निराळें व मित्रप्रेम निराळें. थोडा जरी विचार केला तरी सहज लक्षांत येईल कीं, मित्रप्रेम आधीं जन्माला आलेलें असतें व मित्राच्या अंगच्या गुणांमुळें तें सारखें वृद्धिगत होत जातें. मित्र आधीं असतो व नंतर त्याचे गुण कळूं लागतात. याचाच अर्थ असा कीं, मैत्रीची खरी भावना जेव्हां सुरू होते तेव्हां ती गुणनिरपेक्ष असते. ही भावना कशांतून उत्पन्न होते हें समजणें फार अवघड आहे. कवि जन्मावा लागतो, तसे मित्रहि परमेश्वर जन्मालाच घालतो कीं काय, कळत नाहीं. मैत्रीला सुरुवात कशी होते हें न समजतांदेखील, मैत्रीच्या खऱ्या भावनेचा अनुभव घेतां येणें शक्य आहे. आईचें मुलावर जें प्रेम असतें, त्या प्रेमाचा बराचसा भाग असा गुणनिरपेक्ष असतो.

मैत्रीची सुरुवात ज्या शुद्ध स्वरूपांत होते तें तिचें स्वरूप सतत कां टिकत नाहीं, हा खरा प्रश्न आहे. आईचें प्रेमसुद्धां स्वार्थानें कसें गढूळ होतें, हें आपण पाहतों. असा काय अंतराय येतो, असा कोणता पडदा निर्माण होतो कीं, जो मूळच्या शुद्ध भावनेला झांकून टाकतो ? जें साहचर्य नैसर्गिक आकर्षणानें सुरू होतें, तें सुरुवातीस तरी स्वार्थी भावनेपासून बरेंचसें अलिप्त असतें. साहचर्य सुरू होतें न होतें तोंच, एक प्रकारचा स्वार्थ प्रत्येक मानवी संबंधामध्यें कां निर्माण व्हावा, हें एक मोठें कोडें आहे. पण तसें दिसतें हें मात्र खरें. सुरुवातीचा क्षणदेखील स्वार्थानें झांकाळलेला असण्याचा संभव आहे. पण इतकें खोल न जातां, मानवी नात्यांच्या (human relationships) बाबतींत एका नव्या दृष्टिकोणाची जरूर आहे.

मी जेव्हां इतरांपासून अलग पडतों, तेव्हां मी अत्यंत आत्मकेंद्रित असतों. माझे सर्व विचार स्वतःच्या सुखाभोंवतींच जेव्हां फिरत असतात तेव्हांदेखील मी मित्रप्रेमाची बतावणी करूं शकतों; पण मैत्रीच्या भावनेचा ओलावा माझ्या अंतःकरणांत यत्किंचित्हि नसतो. माझ्या मनाची अवस्था ही अशी असतांनादेखील, मी माझ्या मित्राची स्तुति करूं शकतों, अथवा त्याच्या गुणांची जाणीव दाखवूं शकतों. अशा तऱ्हेनें जो शब्दांचा फुलोरा निर्माण होतो त्याचा मोह माझ्या मित्रालाहि पडतो. त्याला खरेंच वाटतें कीं, ज्याअर्थीं माझें इतकें गुणवर्णन होत आहे त्याअर्थीं त्याचा उगम प्रेमांतूनच आहे. मग तोहि आपल्या परीनें माझे गुण

घेऊं लागतो, आणि अशा तऱ्हेनें होणारें परस्परविनोदन हाच मैत्रीचा पाया आहे असें वाटूं लागतें. समाजांत अशा कितीतरी जोड्या (अथवा कंपू) दिसतात कीं, ज्यांचें अस्तित्व आत्मप्रशंसेवर पूर्णपणें अवलंबून असतें. ही प्रशंसा अथवा इतर प्रकारचें परस्पर-साहाय्य जोंपर्यंत चालूं असतें, तोंपर्यंतच ती मैत्री कायम राहते व एकदां का कांहीं विक्षेप निर्माण झाला कीं, ती मैत्री एकदम तुटते. मित्राबद्दल स्वतःच्या ठिकाणीं असलेल्या भावनेचें नीट निरीक्षण केलें, तर तिच्यामध्यें या प्रशंसेच्या अपेक्षेचा लवलेश यत्किंचितहि नाहीं, असें छातीठोकपणें कुणीतरी सांगूं शकेल काय ? याचाच अर्थ असा कीं, बहुतेकांच्या बाबतींत मैत्रीची भावना ही खरी नसते; तर कोणत्यातरी अपेक्षेनें 'मैत्री' चा सुंदर वेष परिधान केलेला असतो. जोंपर्यंत परस्परांकडून अपेक्षापूर्ति होत राहते, तोंपर्यन्त कोणालाच एकाकी वाटत नाहीं. अपेक्षाभंग झाला कीं, त्याच क्षणीं सर्व स्नेहबंधनें तुटतात, प्रेम नाहींसें होतें, व "माझेबद्दल कुणालाच जिव्हाळा नाहीं" असा आक्रोश सुरू होतो.

महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, माझ्या मनांत स्वतःबद्दलची एक प्रतिमा (image) असते. ती प्रतिमाच मित्राशीं अथवा खरें म्हटलें तर मित्राच्या प्रतिमेशीं संबंध ठेवते. मित्राच्याहि मनांत माझ्याविषयीं एक प्रतिमा असते व या दोन प्रतिमांचें जें साहचर्य त्यालाच मी 'मैत्री' हें नांव देतों. **माझें खरें प्रेम माझ्या प्रतिमेवर असतें, मित्रावर नसतें.** मित्राचा उपयोग एवढाच कीं, तो मला माझ्या प्रतिमेचें संरक्षण व संवर्धन करण्यास फार मदत करतो. इतर माणसें या प्रतिमेवर सारखे हल्ले करतात, म्हणून ती मला आवडत नाहींत. हें प्रतिमासंवर्धन जोंपर्यंत चालूं असतें, तोंपर्यन्त मित्राशीं मी 'समरस' होऊं शकतों. त्याच्याशीं प्रेमळ गप्पा तासन् तास मारूं शकतो. पण या माझ्या प्रतिमेला यत्किंचितहि तडा गेलेला मला खपत नाहीं. लगेच, 'मला कुणी नाहीं व मी कुणाचा नाहीं,' असें मी जाहीर करतों, व 'मी एक दुर्दैवी प्राणी आहें व एकलेपणाच्या आगीनें होरपळून निघत आहें' असें मानूं लागतों, आणि अत्यंत दुःखानें व्याप्त झाल्यामुळें आणखी कुणाचातरी आधार अगर एखादें व्यसन, मी शोधूं लागतों.

आतां हा प्रश्न असा आहे कीं, माझें चुकलें कोठें ? जी मैत्रीची भावना म्हणून मी समजत होतों, ती खरोखर मित्राविषयींची भावना होती का प्रतिमेविषयीं ? जर ही प्रतिमा नसती तर काय झालें असतें ? मित्राकडे, बायकोकडे, मुलांकडे, आप्तांकडे अथवा समाजांतल्या व्यक्तींकडे, प्रतिमेखेरीज जर मी पाहूं शकलों असतों तर ? असें पाहणें शक्य आहे का ? मग कोणत्या प्रकारचे संबंध या लोकांशीं माझे निर्माण झाले असते, का माझे इतरांशी संबंधच राहिले नसते ? असे अनेक

प्रश्न आपणांपुढें उभे राहतात, व त्यांचीं उत्तरें शोधून काढल्याखेरीज, या एकलेपणापासून आपली मुक्तता होईल असें दिसत नाहीं.

जी प्रतिमा माझ्या चित्तांत सतत असते, तिच्यांतच एकलेपणाचें बीज आहे. ती प्रतिमा, मला वेळोवेळीं आलेल्या अनुभवांच्या साखळींतून निर्माण होते अथवा पुष्ट होत जाते. तिच्यामुळेंच मला कांहीं व्यक्ति जवळच्या वाटतात, तर कांहीं दूरच्या अगर नकोशा वाटतात. आपल्या अनुभवास येणारी प्रेमभावना अथवा द्वेषभावना यांची ही प्रतिमाच जननी आहे. ही प्रतिमा भूतकालांतून जन्माला येते. भूतकालांत आलेल्या अनुभवांच्या स्मृति, भविष्यकालाबद्दल कांहीं अपेक्षा निर्माण करतात. त्या स्मृति, त्या अपेक्षा, त्या अपेक्षांशीं सुसंगत असणारीं भविष्याचीं चित्रें, व त्या चित्रांत दिसणारी माझ्या मित्राची मला हवी तशी दिसणारी मूर्ति, या सर्वांचा समुच्चय म्हणजे ही प्रतिमा होय. या प्रतिमेंत माझ्या मित्राचें जें चित्र असतें, तेंच मला 'मित्र' म्हणून हवें असतें. त्या चित्रांत बदल झाला कीं, चालू क्षणांत मला खेटून बसलेल्या मित्रापासूनहि मी कित्येक मैल दूर जाऊं शकतों.

एकूण असें दिसतें कीं, जी भावना भूतकालावर इतकी अवलंबून असते, ती सौहार्दाच्या फारशी उपयोगी नाहीं. ज्या धाग्याचें एक टोंक भूतकालानें एवढें गच्च धरून ठेवलें आहे, तो धागा केव्हां तुटेल याचा नेमच नाहीं, आणि म्हणूनच मैत्रीचा खरा शत्रु भतकाल आहे. **हा भूतकालच माणसामाणसांमध्यें खरें नातें निर्माण होऊं देत नाहीं.** ज्या व्यक्तीशीं आपला संबंध येतो त्या व्यक्तीचा भूतकाल अथवा त्या व्यक्तीसमवेत आपण घालविलेला काळ हा आपल्या विचारांतूनच गेला तर ? असें झालें तर कदाचित् खऱ्या प्रेमभावनेची व आपली गांठ पडण्याचा संभव आहे, व प्रेम करण्यास कुणी मिळत नाहीं अशी तक्रार करण्यासहि जागा राहील असें दिसत नाहीं. आपली तक्रार 'मी कुणावर प्रेम करूं' अशा स्वरूपाची नसते, तर 'मजवर कुणी प्रेम करीत नाहीं' अशी असते, आणि असें दिसतें कीं, जेव्हां 'माझ्यावर कुणी प्रेम करो अगर न करो, मला प्रेम करावयाचें आहे,' एवढीच मागणी आपलें चित्त करतें, तेव्हां त्या चित्ताला एकलेपणाचें दुःख भोगावें लागत नाहीं. कारण, ज्या कोणावर प्रेम करावयाचें तो बदलला तरी प्रेम कायम असूं शकतें, आणि मग तें चित्त इतरांच्या संगतीत सदैव संपूर्णपणें समरस होऊं शकतें. केव्हांच तें एकाकी पडत नाहीं.

आतां एकलेपणाच्या दुसऱ्या प्रकाराचा विचार करूं. कांहीं माणसें खदखदून हसलेलीं अशीं, कुणीं पाहिलेलींच नसतात. ते सदा उदास असतात. ते कोणाला उपद्रव देत नाहींत, कुणावर आक्रमण करीत नाहींत, कुणाच्या आड येत नाहींत, आणि कुणावर प्रेमहि करीत नाहींत. समाजाला त्यांचा उपसर्ग होत नाहीं, आणि समाजाचीहि पीडा त्यांना होत नाहीं. नागरिक या दृष्टीनें ते नमुनेदार असतात;

पण व्यक्ति म्हणून त्यांचें जीवन भकास असतें. हा भकासपणा त्यांच्या जीवनांत का यावा, याचें आपणांला राहून राहून आश्चर्य वाटतें. कारण, त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असते. त्यांना मुलेंबाळें असतात आणि प्रकृतीहि धडधाकट असते. "हे असे उदास कां ?" अशी पृच्छा आपण करीत असतों; व केव्हां केव्हां आपण यांच्यापेक्षां कितीतरी सुखी आहोंत, असें स्वतःचें अभिनंदन करण्याचाहि मोह आपणांला होतो. पण आपण हें विसरतों कीं, हा उदासपणा, हा एकलेपणा, आपणांपासून तितकासा दूर नाहीं. कोणत्या प्रसंगानें तो केव्हां वर येईल, हें कुणालाच सांगतां यावयाचें नाहीं.

वर उल्लेख केलेल्या उदास लोकांपैकीं कांहींजणांची व्यथा, त्यांच्या जीवनांत घडलेल्या अथवा घडूं पाहणाऱ्या कोणत्यातरी घटनेमुळें उत्पन्न झालेली असते. म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावरचा उदासपणा कसल्यातरी चिंतेमुळें अथवा भीतीमुळें दिसत असतो, व आपणांला ती घटना माहीत नसते. पण या उदासपणाचा विचार आज आपण करीत नाहीं. जो उदासपणा कांहींहि कारण घडलें नसतांना चित्ताला व्यापून टाकतो, त्याची तऱ्हा कांहीं और आहे.

"माझें चित्त कोठेंच रमत नाहीं" असें जेव्हां एखादी व्यक्ति म्हणते, तेव्हां तिच्या मनांत होत असतें तरी काय ? कोणत्यातरी कारणानें त्या व्यक्तीला एकदम अशी जाणीव होते कीं, "आपलें कुणी नाहीं, कशाचाच आधार आपल्या जीवनाला नाहीं." ही जाणीव सुरू होते न होते तोंच, तिचें रूपांतर होऊं लागतें. 'ज्याअर्थीं कुणीच माझी पर्वा करीत नाहीं, त्याअर्थीं माझें जीवन अगदीं भकास आहे. माझ्या जीवनांत फार मोठी पोकळी आहे," असें मन सांगूं लागतें. पुढच्याच क्षणाला मन बोलूं लागतें कीं, "मी फार दुर्दैवी आहें. मी एकाकी आहें. छे, ही अवस्था मला अगदीं सहन होत नाहीं. इतर लोक पाहा, कसे मजेंत आहेत, चैन करीत आहेत, हंसतखिदळत आहेत. मला अगदीं करमत नाहीं. उदास वाटत आहे. मन रंजविण्याकरतां कांहींतरी केलेंच पाहिजे. स्वस्थ बसून भागणार नाहीं. कांहींतरी करमणूक शोधून काढली पाहिजे," येथपर्यन्त मनाची मजल येऊन ठेपली कीं, मग पुढचा रस्ता ठरलेला आहे. मनोविनोदनाच्या नाना तऱ्हा वाटच पाहात असतात. करमणुकीचे अनेक खेळ व व्यसनांचे शंभर प्रकार, यांच्याकडे मग मन धांव घेऊं लागतें. एकलेपणापासून दूर नेणाऱ्या या ज्या पळवाटा असतात, त्यांनाच केव्हां केव्हां निरनिराळ्या कलांचीं नांवें प्राप्त होतात; व 'कलेची अभिरुचि,' 'रसिकता' अशा सुंदर नांवांनीं आवाहन करून त्या, मनाचें रंजन करण्याचा उद्योग सुरू करतात. परंतु हेंहि नमूद केलें पाहिजे कीं, बऱ्याच वेळां पलायनाच्या प्रवृत्तींतून कलेकडे धांव घेतली जाते हें जरी खरें असलें, तरी नवनिर्मितीच्या प्रेरणेंतूनहि कला जन्माला येऊं शकते, व त्या कलेचा आनंद हा रंजनापुरता

नसतो. त्या आनंदाची जातच निराळी असते. पलायन (escape) म्हणून आपण कलेकडे वळलों आहोंत, का नवनिर्मितीची ओढ तिकडे आपणांस नेत आहे, हें आपलें आपल्यालाच पुष्कळदां समजत नाहीं; मग इतरांची फसवणूक होते यांत कांहींच आश्चर्य नाहीं. प्रस्तुत प्रकरणांत, फक्त पलायनाच्या प्रवृत्तीचाच आपणांला विचार करावयाचा आहे.

मनामध्यें वर दर्शविल्याप्रमाणें जे तरंग उठतात, त्यांच्याकडे आपण फार लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. हे तरंग नीट न्याहाळले तर काय दिसतें ? कशाच्यातरी व कुणाच्यातरी आधारावर (dependence) आपण जीवन जगत असतों व हा आधार आपल्या इतका अंगवळणीं पडलेला असतो कीं, जीवनाचा तो एक अपरिहार्य असा भाग बनून जातो. ज्याचें आयुष्य सारख्या धांवपळीनें भरलेलें आहे, अशा एखाद्या लोकप्रिय पुढाऱ्याचें उदाहरण आपण घेऊं. भोंवतीं सारखीं माणसें बसून आहेत, त्यांच्याशीं चर्चा करणें, माहिती मिळविणें, त्यांना सूचना देणें, निर्णय घेणें अथवा दोरे काढणें, लोकक्षोभाच्या ठिकाणीं हजर राहणें, पुन्हां नवे निर्णय घेणें व ते जुन्या निर्णयाशीं कसे सुसंगतच आहेत, हें अनुयायांना पटवून देणें, अशी सारखी धडपड चालूं राहणें, हेंच त्या पुढाऱ्याचें जीवन असतें. हें असें सतत चालूं राहणारें काम व त्यांतून उत्पन्न होणारी लोकप्रियता या दोन्हींवर तो पुढारी किती अवलंबून राहतो हें पाहण्यासारखें आहे. खरोखर, 'माणूस' म्हणून त्याचें जें जीवन असतें, त्याच्याशीं या गोष्टींचा कितीसा संबंध आहे ? शरीर चालूं राहण्याकरतां अन्नाची जशी जरूर आहे, तशी त्याच्या मनाचा जिवंतपणा चालूं राहण्याकरतां वरील गोष्टींपैकीं एकीची तरी जरूर आहे काय ? या दोन्ही गोष्टी आगंतुक अशा, त्याच्या जीवनांत आलेल्या नाहींत काय ? म्हणजे एका अर्थानें त्यानेंच त्या बाहेरून बोलावून आणलेल्या नाहींत काय ? पण हें न समजल्यामुळें होतें असें कीं, त्या पुढाऱ्याचें पुढारीपण कांहीं कारणानें नष्ट झालें तर लागलीच पायाखालची जमीन सरकल्यासारखी निराधार अशी स्थिति, त्याच्या मनाची होते व एकलेपणाचा प्रवेश चित्तांत होतो. अगदीं हीच अवस्था, ज्या बाईनें स्वतःला घरकामांत अगर मुलाबाळांचें करण्यांत रात्रंदिवस अडकवून घेतलें आहे तिची, तें काम नाहींसें झालें कीं होते. निवृत्तीच्या दिवसापर्यंतची पस्तीस वर्षें ज्यांनीं ऑफिसचें काम रोज आठ-दहा तास नियमानें केलें, त्यांनाहि निवृत्तीनंतरचे दिवस असेच उदास वाटूं लागतात. प्रश्न असा आहे कीं, शरीराचा एखादा अवयव जणू गळून पडावा, अशी अवस्था मनाची कां होते ? प्रथम असें होतें कीं मनाला ज्यावर सदा अवलंबून अथवा आधारून राहण्याची संवय लागली आहे, तें निघून जातांच मन बावरतें, गोंधळून जातें. ठराविक दिनचर्येची चाकोरी सुटली व अपेक्षित अनुभवांची साखळी तुटली, कीं मन इकडे तिकडे पाहूं लागतें.

'हें काय नवीन झालें ?' असा प्रश्न तें स्वतःला विचारूं लागतें. **मनाच्या हें ध्यानीं येत नाहीं कीं, त्याची ही सहजावस्था आहे.** कोणत्यातरी घटनांच्या सांखळींत सारखें अडकलेलें राहणें, ही मनाची मूळची अवस्था नाहीं. या मूळच्या अवस्थेकडे मनानें आजपर्यन्त कधीं पाहिलेलेंच नसतें, म्हणून ती त्याला नवीन वाटते. पण या अशा निरामय अवस्थेकडे आपण पाहूंच इच्छित नाहीं. एखादें नवजात सुंदर बालक जन्मतांक्षणींच, त्याच्या कुमारी मातेनें, तें दृष्टीआड कसें होईल, याचीच विवंचना करावी आणि लगेच त्याचे उलट बाजूला तोंड फिरवावें, तसा प्रकार आपल्या मनाचा होतो !

आणखी असें होतें कीं, मनाच्या या कोंडमाऱ्याला एक वाईट नांव देण्याची घाई आपल्याला होते. जो सर्वच जण टाळीत आले, तो हाच 'भकासपणा' असें नामविधान (naming) एकदम आपण करून टाकतों. अपरात्रीं ज्याअर्थी कुणीतरी दार ठोठावीत आहे त्याअर्थी तो चोरच असला पाहिजे, असा निर्णय करण्यासारखेंच हें आहे. इतरांनीं केलेलें या अवस्थेचें वर्णन मग आपणांला आठवूं लागतें; व "जास्त पंचाईत न करतां या अवस्थेपासून लगेच दूर पळावें कसें ?" एवढाच प्रश्न आपणांपुढें उभा ठाकतो. एकदां का हें नामकरण झालें कीं, लगेच तुलना (comparison) सुरू होते. "मी एकाकी झालों, जगापासून अलग पडलों यांत तर संशय राहिलाच नाहीं, पण माझेंच नशीब इतरांपेक्षां इतकें वाईट कां ?" असा पुढचा प्रश्न मनाला त्रस्त करूं लागतो. एकदां तुलना सुरू झाली कीं, मग मन इतकें जोरानें धांवूं लागतें कीं, विचारतां सोय नाहीं. तें मागें वळून पाहील ही आशाच मग खुंटते.

"मला या एकलेपणापासून दूर जावयाचें आहे, शक्य तितकें लांब जावयाचें आहे," असें का मनानें एकदां घेतलें कीं, मग मी जें जें करतों तें बाहेरून किती जरी चांगलें दिसलें, तरी आंतून तें नासलेलें असतें. माझी कृति, जर समाजाला उपद्रवकारक नसली आणि रूढ नीतिकल्पनांच्या विरुद्ध नसली, तर समाज माझ्या आड येत नाहीं. माझें पलायन (escape) कोणत्या प्रकारचें असावें, हें ठरविण्याचें वरील मर्यादेंत मला संपूर्ण स्वातंत्र्य आहे. पलायनाचे इतके विविध प्रकार शिष्टसंमत आणि लोकप्रिय असतात कीं, मला माझी निवड करण्यास कांहींच अडचण पडत नाहीं. ज्या समाजांत अशा पलायनप्रकारांची (ways of escape or entertainment) संख्या जास्त असून त्यांत थोडेंबहुत कौशल्य मिसळलेलें असतें, तो समाज सुधारलेला आहे, असें मानलें जातें. ही समजूत चुकीची का बरोबर या विषयाकडे न वळतां, एवढें विधान करण्यास हरकत नाहीं कीं, मनांत उद्भवलेली एकलेपणाची भावना झांकून ठेवण्यास पुढारलेल्या समाजाची मदत अधिक

होते. एवढेंच नव्हें तर, " मला एकाकी वाटतें, " अशी कबुली देणें अथवा तसें दिसूं देणें, हीच एक मागासलेपणाची खूण होऊन बसते.

हा एकलेपणा झांकून ठेवण्यांत यश आल्याचा भास कांहीं वेळ जरी झाला, तरी हृदयाचें आक्रंदन पूर्णपणें थांबलेलें नसतें त्या आक्रंदनाकडे लक्ष न देण्यांत आपण फार मोठी चूक करीत असतों.

कृष्णमूर्ति म्हणतात :

" Now the question I should like to ask is whether you have ever felt, very deeply, the sense of despair, the sense of complete loneliness, when there is no answer, no relationship to anything, — without the mind seeking any escape, without the mind seeking any explanation.

(*Talks in India* (1958) p. 125)

कृष्णमूर्तींचें म्हणणें असें आहे कीं, ही अशी एकलेपणाची भावना हृदयांत उत्पन्न होणें, हें एक **वरदान** आहे. आपण तो शाप समजतों, ही आपली चूक आहे. जीवनाला जें आगंतुकपणें चिकटलेलें होतें, नसता आधार ज्याचा वाटत होता, तें जर नाहींसें झालें आणि शुद्ध जीवन व आपण असे दोघेच जागेवर उरलों तर त्यांत बिघडलें कोठें ? ही एक इष्टापत्तीच नव्हे काय ! आलेली ही अमूल्य संधि आपण दवडणार काय ? त्या एकलेपणाच्या क्षणांतच समरस होऊन आपण कां राहात नाहीं ? तो क्षण नको, असें आपणांला कां वाटतें ? कृष्णमूर्तींचा वरील प्रश्न फार मूलगामी आहे. ' चालू क्षणांतलें जें जीवन तेंच खरें जीवन,' हें सत्य जर कधीं काळीं आपणांला उमगावयाचें असेल तर या एकलेपणाचा अव्हेर करून चालणार नाहीं. आपलें मन असंख्य व्यापांत आणि जिव्हाळ्याच्या देखाव्यांत सदा सर्वकाळ गुंतलेलें असतें. त्यांचे लेपामागून लेप मनावर चढलेले असतात; इतके कीं, मनाचा मूळचा पिंड अथवा गाभा (core) कोणता, हेंच आपल्या प्रत्ययास येईनासें होतें. दैवयोगानें हे लेप जर गळून पडले तर तो क्षण, शुद्ध संवित्‌शीं (pure consciousness) आपली ओळख होण्याचा नव्हे काय ? मग तो आपणांस नकोसा कां वाटावा ? हें असें ' एकाकी पडणें ' नको वाटतें याचें कारण असें आहे कीं, मनांत सारखें कांहींतरी भरीत राहणें (accumulate), त्या संचयाला जीवनाचा धागा समजणें, व त्या धाग्याच्या आधारानेंच जीवनाची शेवटपर्यंत वाटचाल करणें, ही जगण्याची सर्वमान्य पद्धत ठरून गेली आहे. काठीच्या आधाराशिवाय चालणें म्हणून कांहीं असतें, याची आंधळ्याला जशी कल्पना नसते, तसें आपलें झालें आहे. जिवंत राहण्याचा प्रत्येक क्षण असाच पाहिजे कीं, ज्या क्षणांत भूतकालांतल्या सुखद संबंधांची (relationships) कोणतीतरी स्मृति सुखवीत

राहिली पाहिजे, असा आपला आग्रह असतो. हें **स्मृतिमय जीवनच आपणांला खऱ्या जीवनापासून अलग पाडतें**, अशी वस्तुस्थिति असतांना स्मृतिसुखाची व आपली ताटातूट होतांच, 'आतां आपण अलग पडलों' असें आपण मानूं लागतों.

एकलेपणाच्या पहिल्या प्रकारांत भूतकालांतून उत्पन्न झालेल्या प्रतिमेची मोडतोड हें कारण असतें, तर दुसऱ्या प्रकारांत अगदीं निराळ्या तऱ्हेनें कालाचा संबंध येतो. **कालावर जीवन अवलंबून ठेवण्यांतच आपली मुख्य चूक होत आहे.** अशा निरालंब जीवनाचा निर्देश, पुढील उताऱ्यांतच कृष्णमूर्तींनी केला आहे :–

"Surely the first thing to realize is that nobody is going to help you—nobody; one has to stand completely alone. After all, when one sees how crowded the mind is with alternation of hope and despair, how the mind is bound by tradition, by knowledge, by every influence known and unknown, being possessive, possessed and dispossessed! when you begin to investigate, understand all that, you will find–will you not ?—that the mind must be alone, uncontaminated, untouched, become innocent, fresh, new.

(*Talks in India* (1958) p. 126)

जर चालू क्षणांतच राहण्याची कला, आपणांला साध्य झाली तर एका अर्थानें **कालातीत** अशा अवस्थेंत आपण जाऊं. त्या अवस्थेंत आपल्या चित्तांत आपली अगर इतर कोणाचीहि प्रतिमा अशी शिल्लक राहणार नाहीं. मग जी शुद्ध संवित् उरेल तिचा धर्मच असा आहे कीं, तिच्या ठिकाणीं इतरांबद्दल अत्यंत प्रेमभावना अशी राहील. या प्रेमभावनेवर–अपेक्षेवर नव्हे–आधारलेले संबंध जेव्हां मानवामानवांमध्यें प्रस्थापित होतील, तेव्हां एकलेपणाची अवस्था, व्यथा म्हणून राहणार नाहीं.

* * *



बारा

बुद्धि ही वैरीण तर नसेल ?

प्रत्येक माणसाला आपल्या बुद्धीचा फार अभिमान वाटतो; पण जीवनांत आपली सोबत करतांना बुद्धि ही बहुशः वैरिणीचेंच कार्य करते, ही गोष्ट आपल्या तितकीशी लक्षांत येत नाहीं, आणि म्हणूनच तिचें आपण एवढें कोडकौतुक करतों.

बुद्धीबद्दल एकदा शंका उत्पन्न झाली कीं, मग साहजिकच आपण तिच्या वर्तनाकडे जरा बारकाईनें पाहूं लागतों. बुद्धि ही चाकरी तरी कोणाची करते ? असा प्रश्न प्रथम मनांत उभा राहतो. आतांपर्यंत आपली समजूत अशी होती कीं, आपल्याला संशोधनाच्या कामांत मदत करण्याकरितां बुद्धीचा जन्म आहे. पण तसें दिसत नाहीं. वरवर पाहिलें असतां बुद्धि ही आपली सेवा करते, असें दिसतें. पण ही सेवा ती प्रामाणिकपणानें करते काय, हाच काय तो मुद्दा आहे. कांहीं वेळां शत्रुराष्ट्रांत हेर पाठविले जातात. त्यांचें काम असें असतें कीं, त्या राष्ट्राच्या राजाचा विश्वास प्रथम संपादन करून त्याची नोकरी पत्करावयाची, व मग या नव्या धन्याचें काम अशा रीतीनें करावयाचें कीं, खरें काम मूळच्या धन्याचें (म्हणजे शत्रुपक्षाच्या राजाचें) व्हावें. काम (urge for fulfilment) हा आपला शत्रु आहे असें दिसतें; व बुद्धि जरी आपल्या सेवेंत रात्रंदिवस असते तरी तिच्यामार्फत साधतें कार्य कुणाचें ? तर या **कामराजाचें**. कसें तें आतां पाहूं.

बुद्धीच्या अंगीं खरोखरच कांहीं महत्त्वाचे गुण आहेत. या गुणांमुळेंच ती

आपला विश्वास संपादन करते; अथवा खरें म्हटलें तर आपणांला मोहित करते. हे गुण नसते किंवा अशी गुणवती सखी आपल्या मदतीला नसती, तर जीवनाचा हा दुस्तर मार्ग चालून जाणें आपणांला जमलें नसतें. बुद्धीचा पहिला गुण असा कीं, जें दिसलें अथवा ऐकलें तें तत्क्षणीं उचलून सांठवून ठेवणें. ही जपणूक किती वेळ करावयाची तें मात्र नक्की ठरलेलें नाहीं. पण प्रत्येक अनुभव कांहीं वेळ तरी बुद्धीच्या पेटींत जाऊन बसतोच. नंतर असें दिसतें कीं, या पेटींतल्या कांहीं वस्तु हरवल्या असा भास आपणांला होतो. पण केव्हां केव्हां असें होतें कीं, जी हरवली असें आपण समजत होतों तीच वस्तु, बुद्धि एकदम पुढें आणून ठेवते व आपण आश्चर्यचकित होतों. कांहीं वेळां नको त्या वस्तु दृष्टीसमोर आणून ठेवण्याची, या बुद्धीला खोड आहे. तेव्हां ती वैरीण भासते. पण आपण खडसावून तिला विचारलें तर चक्क सांगून टाकते कीं, तुम्हीच ही वस्तु मागितली होती हें उत्तर अगदीं खरें असतें. पण तसें कबूल करण्याचा प्रामाणिकपणा बहुधा आपणांजवळ नसतो; व आपण चरफडूं लागतों कीं, "माझ्या बुद्धीनें (म्हणजे स्मरणशक्तीनें) माझा छळवाद आरंभला आहे. ती मला कांहीं केल्या चैनच पडूं देत नाहीं."

वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं, 'बुद्धि' हा शब्द प्रस्तुत प्रकरणांत फारच व्यापक अर्थानें वापरलेला आहे. बुद्धि या शब्दाचा शास्त्रशुद्ध अर्थ काय हा प्रश्न बाजूला ठेवून, व्यवहारांत जिला आपण 'बुद्धि' म्हणतों तिचाच विचार येथें केला आहे. तरीपण कांहीं वाचक म्हणतील कीं, स्मरणशक्तीला आम्ही बुद्धि समजत नाहीं. पण मला तें खरें वाटत नाहीं. निदान मराठी भाषेंत तरी बुद्धीमध्यें स्मरणशक्तीचा समावेश करूनच, "हा बुद्धिमान् आहे", "हा डोक्यानें मठ्ठ आहे" असे उद्गार काढले जातात. यापुढें जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, "मजजवळ स्वतंत्र अशी तीव्र बुद्धि आहे. नुसत्या स्मरणशक्तीवर मी अवलंबून राहात नाहीं." असें मोठ्या दिमाखानें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां बहुधा तो बुद्धिचातुर्याचाच एक प्रकार असतो. बुद्धीच असा भास निर्माण करते कीं, तिनें शोधून काढलें आहे तें अगदीं नवें आहे; तें तिच्या पेटींतलें मुळींच नाहीं. पण खरें पाहिलें असतां पेटींतलीच जुनी वस्तु तिला झिलई अथवा नवा रंग देऊन अथवा बऱ्याच जुन्या वस्तूंचें मिश्रण करून, त्या मिश्रणाला नवें नांव देऊन, आपणांपुढें ठेवलेली असते. आपणहि समजतों कीं आपल्या बुद्धीनें अगदीं नवें सत्य शोधून काढलें आहे. आपल्या बुद्धीचा आपणांला जो अभिमान वाटतो तो यामुळें.

साधारण माणसाची बुद्धि, स्मरणशक्तीच्या मदतीनेंच आपलें बरेंचसें कार्य करते. शास्त्रज्ञ जेव्हां अगदीं नवा व क्रांतिकारक असा शोध लावतो, तेव्हां त्याची बुद्धि स्मरणापासून अलग होत असावी, पण आपणांला, तुमच्या आमच्या रोजच्या जीवनांत बुद्धि कशा तऱ्हेनें काम करते, एवढेंच पाहावयाचें आहे.

वस्तु दिसली कीं तिची नोंद करावयाची, एवढेंच काम बुद्धि करीत नाहीं. ही नोंद करतांना ती भाषेचा उपयोग करते, म्हणजे त्या वस्तूचें वर्गीकरण करते. चांगली-वाईट, सुंदर-कुरूप, उपयोगाची अथवा निरुपयोगी असा कोणता तरी शिक्का त्या वस्तूवर बुद्धि मारते. हें काम एकदां झालें कीं, त्या वस्तूची स्मृति पेटींत स्वानगी करण्याचें काम सोपें होतें. नामकरण (naming) केल्याखेरीज वस्तु पेटींत टाकायची नाहीं, अशी बुद्धीची प्रतिज्ञाच आहे. भाषा नसती तर हें काम बुद्धीला करतां आलें असतें कीं नाहीं, याची शंका आहे. बुद्धि आणि भाषा यांचें परस्पर सहकार्य असतें. हें सहकार्य माणसाला उपकारक होतें का उपद्रवकारक होतें, हें अजून ठरावयाचें आहे.

बुद्धीमध्यें स्मरणशक्तीचा समावेश होतो असें वर म्हटलें आहे. स्मरणशक्तीनें बुद्धीचा नक्की केवढा प्रांत व्यापला आहे, हें सांगणें कठीण आहे. आपली कल्पना अशी आहे कीं, बुद्धि ही एक स्वतंत्र शक्ति आहे व तिच्या हातांत दिलेलें गणक यंत्रासारखें (computer) साधन म्हणजे स्मरणशक्ति होय. स्मरणशक्ति स्वतंत्रपणें हालचाल करूं शकत नाहीं, अशी आपली समजूत आहे. तिला गति देणारी व शक्तिस्वरूप (energy) अशी बुद्धि ही निराळीच असली पाहिजे, असें आपण मानतों. तसेंच स्मृतीचें जें कोठार असतें, त्यांतली कोणती स्मृति केव्हां बाहेर काढावी हें ठरविणारी एक निराळी शक्ति मानणें आपणाला सोईचें वाटतें. नाहींतर सगळ्याच स्मृति एकदम बाहेर पडल्या असत्या, अथवा कांहीं जरूर नसलेल्या व कांहीं जरुरीच्या अशा स्मृति बाहेर पडून, त्यांनीं एकच गोंधळ उडवून दिला असता. ज्याअर्थीं तसें होत नाहीं, त्याअर्थीं निवड करणारी बुद्धि स्मरणशक्तीच्या बाहेर स्वतंत्र अशी असली पाहिजे, असें आपण ठरवून टाकतों. यांत आपली आणखी सोय अशी होते कीं, ही निवड बिनचूक व त्वरेनें करतां येणें हा एक विशेष पराक्रम वाटतो; व इतरांपेक्षां "मी अधिक बुद्धिमान् कां ?" हें समजावून सांगणें सुलभ होतें. पण स्मृतीचेंच हें काम नसेल कशावरून ? कसली तरी उद्दीपक वस्तू पुढें आल्याखेरीज स्मृति जागृतच होत नाहीं; व उद्दीपक वस्तूला अनुरूप एवढ्याच स्मृति बाहेर ढकलण्याचें काम खुद्द स्मरणशक्तीलाच करतां येतें, असें म्हटल्यावर स्वतंत्र शक्तीचा प्रश्न कुठें उरतो ? यावर कांहीं वाचक असें विचारतील कीं, "कोणतीहि वस्तु न दिसतां कांहीं स्मृति जागृत होतात त्यांची वाट काय ? बुद्धीखेरीज त्यांना बाहेर काढणार कोण ? तसेंच अगदीं नवे विचार मेंदूमध्यें उत्पन्न होतात, अथवा स्मृतीमध्यें साठवलेल्या ज्ञानांतून असे कांहीं निष्कर्ष माणसाला काढतां येतात कीं, ते इतर कोणालाच सुचलेले नसतात. या दोन्ही क्रिया निव्वळ स्मरणांतून होतात, असें कसें म्हणावें ?" पण हा आक्षेप निरर्थक आहे. नव्या विचारांबद्दल ते खरोखर नवे असतात काय, हीच

शंका आहे. सांठवलेल्या ज्ञानांतून अथवा स्मृतिसंचयांतून, कांहीं स्मृतींची अथवा स्मृतिखंडांची निवड करून त्यांचें मिश्रण आलटून पालटून (by a process of permutations and combinations), एका विशिष्ट तऱ्हेनें केल्यास अगदीं नवा वाटणारा विचार पुढें आणतां येईल. नवा विचार कशाला म्हणायचें हाच मुख्य प्रश्न आहे. नवीन म्हणजे पूर्वी कधींहि प्रतीत न झालेलें असें सत्य, बुद्धि शोधून काढते काय ? इतरांना न सुचलेलें मला सुचतें, एवढ्याच कारणावरून मजजवळ स्वतंत्र बुद्धि आहे आणि इतर नुसत्या स्मरणशक्तीवर भिस्त ठेवतात, असें तरी कसें म्हणतां येईल ? माझ्या स्मरणशक्तीचें यंत्र जास्त कार्यक्षम आहे, एवढाच याचा अर्थ आहे.

इतरांपेक्षां मी अधिक बुद्धिमान् आहे अथवा स्वतंत्र बुद्धीचा आहे, असा भास जो मला होतो व इतरांच्या ठिकाणींहि निर्माण करतां येतो, याचें मुख्य कारण **भाषानैपुण्य** हें आहे पुण्कळदां असें होतें कीं, जें इतरांच्या स्मृतिकोठरांत आहे व माझ्याहि स्मृतींतूनच मीं बाहेर काढलें आहे तें, 'अगदीं नवें, मीं आतां शोधून काढलेलें सत्य आहे,' अशी बतावणी मी करूं शकतों. मला भावेंतले शब्द अशा कौशल्यानें वापरतां येतात कीं, अगदीं नवीनच कांहींतरी आपल्यापुढें आलें आहे, असें ऐकणाऱ्यांना वाटूं लागतें. एवढें झालें कीं, तें नवीनच असें मीहि धरून चालतों. पण भाषा शिकणें, ती चित्तवेधक रीतीनें वापरतां येणें, वगैरे कामें स्मरणशक्तीचींच नव्हेत काय ?

एकूण असें दिसतें कीं, जिला आपण बुद्धि म्हणतों तिचें सर्व काम स्मृतीच्या मदतीनेंच चालत असावें. वस्तूंच्याच तेवढ्या स्मृति असतात असें नव्हे; तर विचार-कल्पना (ideas), भावना (emotions) यांच्याही स्मृति असतात. **स्मरणाखेरीज सत्यशोधनाची अशी निराळी शक्ति बुद्धीजवळ दिसत नाहीं.** स्मरणाचें हें हत्यार बुद्धि अशा चापल्यानें फिरवते कीं, तें दिसतसुद्धा नाहीं. ती असा भास निर्माण करते कीं, तिला दरक्षणीं कांहींतरी नवीन सांपडत आहे

वर सूचित केल्याप्रमाणें, स्मरणशक्तींतच स्मृतींची निवड वगैरे करण्याचें सामर्थ्य आहे, असें मानल्यावर त्या कामाकरतां 'बुद्धि' म्हणून निराळी वस्तु कल्पिण्याचें कांहींच कारण नाहीं. पण बुद्धीकरतां आणखी कांहीं कार्यक्षेत्र उरतें काय, तें आतां आपण पाहूं सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर मेंदूंतून येणारी आठवण, बाहेरच्या वस्तूसारखी एक घटना (an objective fact) वाटते; तर बुद्धि मला जें सांगते त्याला "माझा विचार," असें मी म्हणतों. विचाराचा (thought) संबंध, विचार करणाऱ्याशी (thinker) येतो इंग्रजी भाषेंतले शब्द घेतले, तरीहि I remember व I think या दोन भिन्न कृति वाटतात. यानंतर 'बुद्धि' हा शब्द power of thinking एवढ्याच मर्यादित अर्थानें आपण वापरूं.

५९३५९ विवेक
२१९९ २१/१०/६२१०१

आतां जो प्रांत सुरू होतो तो एकट्या बुद्धीचा आहे, असें सुरुवातीस तरी धरून चालण्यास हरकत नाहीं. या प्रांतांत बुद्धि जें काम करते, तेंच आपल्या जीवनांत सुखदुःख निर्माण करतें. स्मरणशक्तीचें यंत्र सुखदुःखांची निर्मिति करते, असें दिसत नाहीं. बुद्धीचीच ही करामत आहे. मात्र असें दिसतें कीं, हा आपला उद्योग करतांना बुद्धि स्मरणशक्तीला वेठीला धरते. या प्रांतांतला बुद्धीचा धुडगूस एवढा मोठा आहे आणि इतका उपद्रवकारक आहे कीं, तिला आपली वैरीण मानणेंच योग्य दिसेल.

बुद्धि आपल्याशीं शत्रुत्व करते, ती आपलें हित पाहात नाहीं हें भगवद्-गीतेंतहि एका निराळ्या दृष्टिकोणांतून मांडलें आहे. तिसऱ्या अध्यायांतला पुढील श्लोक पाहा :–

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २८४९
शाखा (स्थळ)

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

कामरूपी राक्षस, बुद्धीवर आरूढ होऊन, ज्ञानी माणसालासुद्धां मोह पाडतो, असें वरील श्लोकांत सांगितलें आहे. जवळ ज्ञान असतांनासुद्धां, सत्याचें दर्शन होऊं न देणारी व अधिकच मोहांत पाडणारी अशी बुद्धि आहे, असें दिसतें. " माझ्या मानगुटीवर कामराक्षस बसला आहे व तो जिकडे चल म्हणतो, तिकडे तुम्हांला नेणें मला भाग आहे, " अशी सबब बुद्धि कदाचित् सांगेल. पण **सबबी हुडकून काढण्यांत बुद्धि मोठी पटाईत आहे.** तिच्या सर्व सबबी खोट्या असतात.

एखाद्या सुंदर फुलाचा वास मी घेतों, तेव्हां काय होतें ? पहिल्या सेकंदाला त्या फुलांतले परमाणु नाकांत जातांच कांहींतरी संवेदना होते. ही संवेदना घ्राणेंद्रियाला होते, अथवा मेंदूकडे कांहीं संदेश गेल्यामुळें ती मेंदूला होते, असें म्हटलें तरी चालेल. मेंदूकडे ही संवेदना पोंचण्याचा अवकाश, तिचें नामकरण (naming) झालेंच म्हणून समजावें. पूर्वी अनुभवलेल्या कोणत्यातरी सुगंधाशीं या संवेदनेचें नातें जोडलें जातें. अर्थात् येथें स्मृतीची मदत होते. नंतर पुढें काय होतें ? हा सुगंध प्रथम फुलाच्या आसपासच दरवळत होता. पण तो आतां फुलापासून मी दूर गेल्यानंतरहि, माझ्या स्मृतींत अथवा मेंदूंत तसाच दरवळत राहतो. हें जें, वस्तु नसतांना देखील तिचें दर्शन अथवा स्मरण, जरूर म्हणून नव्हे तर सुखद म्हणून माझ्या मेंदूंत चालूंच राहतें, तें बुद्धीचें कार्य आहे. मेंदूच्या ठिकाणीं वस्तूंची फक्त संवेदना नोंदण्याची जी शक्ति आहे, तिच्याशिवाय येथें कांहींतरी अधिक आहे. तसेंच जरूर तेव्हां स्मृति उत्पन्न करण्याचा गुण जो मेंदूंत आहे, त्याशिवायहि येथें कांहींतरी अधिक आहे. हें जें ' अधिक ' असें कार्य बुद्धि करते, तें खरोखर शत्रुत्वाचें कृत्य आहे. पण हा अधिकपणा माझ्या कल्पनेप्रमाणें सुखद असला, तर मी बुद्धीला

मैत्रीण मानणार, हें उघड आहे. विषकन्येप्रमाणें माणसाला मोहांत पाडणारी बुद्धि आहे, असें गीता म्हणते, तें उगाच नव्हे.

जें फूल मागेंच दृष्टीआड झालें व फारच दूर राहिलें त्याचा सुगंध, प्रथम क्षणानंतरहि चालूं ठेवण्यानेंच काय तो बुद्धीचा उपद्रव होतो, अशांतला भाग नाहीं. फुलाकडे माझा दृष्टिक्षेप ज्या क्षणांत जातो त्याच क्षणांत, बुद्धि आपला पहिला वार करते. फुलाचे पहिले परमाणु नाकांत शिरतात न शिरतात तोंच बुद्धि घात करते. कारण, लगेच त्या अनुभवाचें, स्मृतीच्या मदतीनें ती नामकरण व वर्गीकरण (verbalization) करते. हें काम एकदां झालें कीं, मग बुद्धि मला म्हणते, "बाबा रे, पूर्वी अशाच प्रकारच्या गुलाबाचा वास घेणाऱ्या तुलाच हा आतां सुगंध येत आहे. तूं मोठा भाग्यवान् आहेस, कारण हा सुगंध असाच तुला आतां दीर्घकाल आपल्याजवळ बाळगता येईल." मी तिच्या गोड शब्दांना भुलतो व ती सांगते तें सारें खरें धरून चालतों. हा सर्व प्रकार अत्यंत वेगानें घडतो. एकाच वाक्यांत कृष्णमूर्ति तो अशा तऱ्हेनें सांगतात :- We mean by thought a verbalizing reaction to experience.

खरें पाहिलें असतां, चालू क्षणांत वास घेणारा पूर्वीचाच कोणीतरी आहे, याला काय आधार आहे ? स्मृतीला साथीदार करून बुद्धि हा फसवणुकीचा गुन्हा करते. मेंदूचा गुणधर्म माझ्या बोकांडीं बसतो. ज्याअर्थी या घटकेला, सदृश अनुभवाची स्मृति आणि आतांचा अनुभव या दोन्ही गोष्टी हजर आहेत, त्याअर्थी स्मृतिदर्शित स्थलकालीं हजर असणारा व आतांचा अनुभव घेणारा एकच कोणीतरी असला पाहिजे, असा निर्णय माझी बुद्धि करते. हा निर्णय म्हणजेच 'मी' ची उत्पत्ति. बुद्धीचें हें सर्वांत मोठें कार्य होय. Wisdom of Insecurity या पुस्तकांत Alan Watts या नामवंत तत्त्वज्ञानें हा मुद्दा चांगला स्पष्ट केला आहे :

"The notion of a separate thinker, of an 'I' distinct from experience comes from memory and from the rapidity with which thought changes. It is like whirling a burning stick, to give the illusion of a continuous circle of fire. If you imagine that memory is direct knowledge of the past, rather than a present experience you get the illusion of knowing the past and the present experience at the same time. This suggests that there is *something in you, distinct from both the past and the present experiences.*" (page 85)

चालू क्षणांत जी संवेदना होते, तिचें स्मृतीच्या मदतीनें नामकरण करून ती संवेदना लांबविणें, हें बुद्धीचें काम आहे असें वाटतें. संवेदनचें हें दीर्घीकरण 'मी' उत्पन्न केल्याखेरीज, बुद्धीला करतांच येत नाहीं. जर 'मी' उत्पन्न झालाच

नाहीं, तर प्रत्येक अनुभव पहिल्या क्षणांतच संपून जाईल, व मग जागेवर उरणार काय ? एक प्रकारच्या पोकळींत मनाला राहावें लागेल, व ही पोकळी म्हणजे जीवन नव्हेच, अशी समजूत बुद्धीनें आपली करून दिली आहे. देहसंरक्षणाची मानवामध्यें जी नैसर्गिक प्रेरणा आहे तिनेंच हें अतिरिक्त (exaggerated) स्वरूप धारण केलें असावें. पोकळी नको, म्हणून बुद्धीनें भ्रमनिर्मितीचें काम अंगावर घेतलें आहे एकदां का 'मी' उत्पन्न झाला कीं, त्याला विशेष प्रतिष्ठा येते. जीवन स्थिर असलें पाहिजे व त्याची प्रगतिहि सारखी होत राहिली पाहिजे, असें बुद्धीला वाटतें. हा आपला हेतु साध्य करण्याकरतां बुद्धि अनुभवाचे दोन तुकडे करते; व एका तुकडयाला 'मी' असें नांव देऊन त्यालाच पूर्वानुभवांच्या स्मृति चिकटविते. हा 'मी' पूर्वस्मृतींच्या बुरुजावर उभा राहून, मोठ्या ऐटीनें जीवन न्याहाळूं लागतो. कृष्णमूर्तीचे पुढील शब्द पाहा :–

"There is 'me' the superior entity, the soldier who is controlling, dominating. To me that process is destructive. It is an illusion and we know why we do that. I divide myself into the high and the low, in order to continue the desire to be secure."

(*Madras Talks* (1952) p. 51)

पुढील उताऱ्यांत हा मुद्दा, कृष्णमूर्ति अधिक स्पष्ट करतात :–

"Why does the mind seek security ? Because you realize that *thought suddenly changes any moment; there is no actuality in thought*, so thought creates the thinker as a permanent entity which will go on indefinitely; so, in the thinker, *it has vested interests*. And so the mind has found security in the thinker, certainty which is the old habit."

(*Madras Talks* (1952) p. 63.)

आणखी एका बाजूनें या प्रश्नाकडे पाहूं. अगदीं अल्पशिक्षित माणसालाहि विचारलें कीं, तुझी बुद्धि कोणतें काम करते ? तर तो चटकन् उत्तर देईल कीं, माझी बुद्धि खरें–खोटें, योग्य–अयोग्य, आणि महत्त्वाचे–बिनमहत्त्वाचें यांतून पहिल्या गोष्टीची निवड करते. अत्यंत विद्वान् मनुष्यहि हेंच उत्तर देईल. या निवडीलाच आपण सत्यशोधन म्हणतों. ही निवड (choice) नसती तर जीवनांत एकच गोंधळ माजून राहिला असता, अशी आपली समजूत आहे. (जणू काय, आतां गोंधळ अजिबात नाहीं !) तसेंच ही निवड करण्याचें सामर्थ्य म्हणजेच स्वातंत्र्य अशीहि आपली खात्री आहे. म्हणूनच बुद्धिमान् आणि विद्वान् मनुष्य हा अधिक स्वतंत्र असतो, असें लोक मानतात ! पण मूळ प्रश्न असा आहे कीं, एकदां बुद्धीनें 'मी' उत्पन्न केल्यावर, निवड करण्यास ती स्वतंत्र राहते का ? 'मी'नें

सांगावें आणि बुद्धीनें ऐकावें, अशीच परिस्थिति होत नाहीं का ? सत्य हस्तगत करण्याकरतां कोणत्या दिशेकडे जावें, हें सुद्धां 'मी' च नाहीं का बुद्धीला सांगणार? ही दिशा आधीं ठरल्यावर बुद्धीचें विशेष कर्तृत्व तें काय उरलें? व्यवहारांतसुद्धां पुष्कळदां आपण म्हणतों कीं, "त्याची बुद्धि चळली आहे." याचा अर्थ असा कीं, कोणत्यातरी कारणानें त्याच्या बुद्धीला अयोग्य तें योग्य वाटतें; व योग्य असलेली गोष्ट अयोग्य भासते. विशेषतः कामविव्हल माणसाची स्थिति अशी होते. काम जें सांगेल तें ग्राह्य, व नको म्हणेल तें अग्राह्य, असें त्याची बुद्धि मानते. एकूण, बुद्धीला असें फसवितां येतें तर ? बुद्धीचा बाण सुटला कीं, तो सत्यावरच जाऊन पडणार, अशी जी आपली समजूत ती खोटीच मग ? यावर कांहीं वाचक म्हणतील कीं, बुद्धीच्या बाणानें सत्याचा वेध केला असता, पण काम हा धनुर्धारी असल्यामुळें हें सारें बिघडलें. वर दिलेला गीतेंतला श्लोकसुद्धां हेंच सांगतों, असें आपल्याला वाटतें. पण, बुद्धीला काम राबवितो असें दृश्य, बुद्धीच्या टोंकाजवळ उभे राहून कामाकडे पाहिलें तरच दिसतें. कामाच्याहि मागें आपण गेलों, व तो कशांतून उत्पन्न झाला याची चौकशी केली तर काय दिसतें ? मग जें दृश्य दिसतें तें आपणांला कुंठित करून सोडतें.

बुद्धि कशा तऱ्हेनें, कोणता मालमसाला वापरून आपलें काम करते, याचा विस्तार वर केलाच आहे. गतानुभवांच्या स्मृतींखेरीज बुद्धीजवळच दुसरें कांहीं नाहींच. मौज अशी कीं, **काम हा देखील गतानुभवांच्या स्मृतींमधून उत्पन्न झालेला असतो.** कांहीं स्मृतींनीं (त्यांतल्या कांहीं शाबूत पण पुसट झालेल्या, तर कांहीं अर्धवट उरलेल्या अशा असतात) अथवा स्मृतिखंडांनीं एक विशिष्ट आकार धारण केला व त्या अनुभवांची पुनरावृत्ति व्हावी असें वाटूं लागलें कीं, मन तशी पुनरावृत्ति करण्याकडे धांव घेऊं लागतें. हें असें झालें म्हणजे चित्तांत काम उत्पन्न झाला, अथवा अमुक वासना माणसाला झाली असें आपण म्हणूं लागतों. पण खरा प्रकार असा असतो कीं, स्मृतीचेच दोन भाग झालेले असतात. एका भागानें 'स्मृति करणारा' असें नांव धारण केलेलें असतें; व दुसरा भाग जो उरतो त्याला आपण स्मृति अथवा वासना-विषय असें म्हणतों. पहिला भाग दुसऱ्याकडे धांव घेतो, असा भास होतो. (मग कांहीं वेळां शरीर खरोखरच त्या विषयाकडे धांवूं लागतें. कांहीं वेळां तसें होतहि नाहीं.) याच क्षणाला आणखी असें होतें कीं, 'स्मृति करणारा' या नांवाचा जो स्मृतिखंड असतो, त्यांत पूर्व जीवनांतल्या महत्त्वाच्या स्मृति मिसळल्या जातात, व तो फारच पुष्ट आणि स्थिरपद असा भासूं लागतो. मग आणखी नव्या स्मृति, नवे विचार, नवे अनुभव, हे वेगानें या स्मृतिखंडाभोंवतींच गरगर असे फिरूं लागतात. या त्यांच्या गतीमुळेंच, ते सर्व कोणत्यातरी केंद्रबिंदूभोंवतीं फिरत आहेत असा भास आपणाला होतो. या केंद्रबिंदूचेंच नांव 'मी' असें आहे. असा भ्रम

उत्पन्न होणें अशक्य आहे, असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. नदींतलें पाणी एका विशिष्ट चक्रावर गतीनें फिरूं लागलें कीं, तें कोणत्यातरी काडीसारख्या वस्तूभोंवतीं फिरत आहे असा भ्रम आपल्या दृष्टीला होतो. याला 'भोंवरा' असें म्हणतात व त्यांत सांपडूं नये म्हणून शहाणीं माणसें विशेष दक्षता घेतात! खरें पाहिलें असतां, त्या पाण्यांत मधोमध काडी अशी मुळींच नसते.

ज्याप्रमाणें फुलाचा वास घेणारा बुद्धीच निर्माण करते, त्याप्रमाणें वासना ज्याला झाली तोहि, बुद्धीच्या पोटींच जन्म घेतो. या गृहस्थाचें नांव 'मी' ठेवणेंच सोईचें आहे. 'काम' नांवाचा आणखी एक शत्रु आहे, असें मानण्यानें घोंटाळा होतो. आपला आंतला अनुभव पाहिला तरीहि, मी आणि मला हवें असणारें सुख अशा दोनच वस्तु दिसतात. हें द्वैत निर्माण करणारी वर उल्लेख केलेली जी गति आहे, तिलाच आपण बुद्धि म्हणतों. मुळांत नसलेलें द्वैत, बुद्धि निर्माण करते, व वासनेच्या मागें धांवावयास लावून आपणाला हैराण करते. ज्या सुखाकडे ती आपणांला पिटाळते, तें तरी एखादी स्थिर व सत्य वस्तु असावी? नाहीं, तसेंहि दिसत नाहीं. कोणत्यातरी गत अनुभवाच्या स्मृतीला अथवा तिच्या पुनरावृत्तीला आम्ही 'सुख' म्हणत असतों. मृगजळाप्रमाणें कधींच तृप्ति न देणारें जीवन आपल्या डोळ्यांपुढें सतत ठेवणारी, व त्याकरतां इतकी यातायात करावयास लावणारी ही बुद्धि, आपली वैरीणच आहे, यांत मला तर शंका वाटत नाहीं.

* * *



तेरा

अखंड सावधानता म्हणजे काय ?

[पूर्वार्ध]

त्या दिवशीं आमच्या कंपूतल्या सर्वच मित्रांनीं मजवर हल्ला चढविला. एकानें म्हटलें, 'तुमच्या कृष्णमूर्तींनीं संप्रदाय, अंधश्रद्धा, बाह्य आचार, यांचा खऱ्या अध्यात्माशीं संबंध नाहीं हें दाखविलें. कबूल. पण ही कामगिरी सर्वच प्रज्ञावंत संतांनीं इतिहासांत केलेली आहे. कृष्णमूर्तींचें वैशिष्ट्य कशांत आहे तें आम्हांला सांगा.' दुसरा म्हणाला, 'असें कांहीं सांगा कीं, जें **तत्त्व म्हणजे कृष्णमूर्तींची जगाला देणगी**, असें विधान केलें तर तें अगदीं सार्थ होईल. गौतम बुद्धानें अहिंसातत्त्व, शंकराचार्यांनीं मायावाद, ज्ञानेश्वरांनीं चिद्विलासवाद जगाला दिला. तसें कृष्णमूर्तींनींच जें जगाला दिलें आहे, असें काय आहे ?' तिसरा उपनिषदांचा प्रेमी होता. त्यानें बृहदारण्यकांतली ओळच म्हणून दाखविली. तो म्हणाला, 'कृष्णमूर्तींच्या सगळ्या विवेचनाचा मध्यबिंदु कोणता ? जो भाग समजला कीं. ते जें काय म्हणतात तें सर्वच सहज समजेल, असा भाग कोणता ? '**यथा सोम्यैकेन मृत्पिंडेन सर्वं मृन्मयं विज्ञातं स्यात्**,' अशा पद्धतीचें कांहीं असेल तर सांगा.'

कृष्णमूर्तींनीं जें काय सांगितलें आहे, त्यांतलें सर्वांत महत्त्वाचें असें कांहीं

शोधून काढतां येईल काय ? 'महत्त्वाचें' असें कशाला म्हणायचें ? प्रत्येक माणसाला एकाच गोष्टीचें महत्त्व वाटतें, असें थोडेंच आहे ? अशा कांहीं शंका माझ्या डोक्यांत येत होत्या; पण त्या सर्व बाजूला सारून मीं एक निर्णय घेतला. तो असा कीं, कृष्णमूर्तींचीं प्रवचनें ऐकतांना अथवा पुस्तकें वाचतांना आपल्या मनाची स्थिति काय असते व ती कशी असावयास पाहिजे, या एकाच प्रश्नाचा पिच्छा शेवटपर्यंत पुरवावयाचा. मग काय सांपडेल तें सांपडेल. अनेक ठिकाणीं कृष्णमूर्ति म्हणतात कीं, 'तुम्ही माझे शब्द ऐकतां, पण तें खरें ऐकणें (listening) नव्हेच. शब्दांच्या पलीकडे जातां आलें पाहिजे. शब्दांचा प्रत्यवाय बाजूला सारून मी जें सांगतों, त्यांतल्या सत्याशीं प्रत्यक्ष संपर्क तुम्हांला साधतां आला पाहिजे.'

कृष्णमूर्ति सतत सत्याचाच आग्रह धरतात. 'सत्य काय तें पाहा' एवढा एकच मंत्र ते जपतात. पण मग, आम्ही काय असत्याच्या मागें लागत असतों ? वेडयांच्या इस्पितळांतले लोक सोडा, पण कोणता शहाणा मनुष्य असत्याच्या मागें धांवेल ? आम्हांला सत्य सांपडावें, तें शोधण्याकरतां कृष्णमूर्तींनीं आम्हांला मदत करावी, सत्याकडे जाणारा व आम्हांला झेपण्यासारखा एखादा मार्ग कृष्णमूर्तींनीं दाखवावा, एवढ्याकरतांच तर आम्ही त्यांचीं प्रवचनें वर्षानुवर्षें ऐकतों आहोंत, पण अजून कांहीं जमत नाहीं. पदरांत कांहींच पडत नाहीं. ते जे सांगतात त्यांतली तर्कशुद्ध विचारसरणी आमचें मन वेधून घेते. त्यांची भाषा तर हृदयाचा ठावच घेते. पण सत्य अजून गवसत नाहीं. जीवनांतला संघर्ष तर मुळींच मिटत नाहीं.

कृष्णजींच्या बहुतेक श्रोत्यांची मनःस्थिति ही अशी असते. ते जेव्हां संपूर्ण अवधानपूर्वक ऐका (listen) असें म्हणतात आणि आम्ही आमच्या नेहमींच्या पद्धतीनेंच ऐकतों, तेव्हांच खरें म्हटलें तर त्यांची व आमची ताटातूट होते. ही ताटातूट झाल्यानंतरहि आम्ही त्यांना दरवर्षी भेटतों. त्यांचें प्रत्येक प्रवचन मोठ्या आस्थेनें ऐकतों. पण कृष्णजींचा संदेश कृष्णजींजवळच राहतो. कृष्णजींनाहि याची कल्पना आहे.

त्यांचे पुढील शब्द पाहा :—

"May I say something, Sirs ? First of all, it is very kind of you to have come and listened to these talks. And these talks will be utterly useless, absolutely worthless, will be *empty ashes*, if you merely lived by the word, if you merely treated it as an idea, as a theory which is added to the old theories which you already have. But if you listened so that the very listening is an act of self-enquiry, self-knowing, then these talks will have real significance, then they will take you infinitely far."

(*Talks in India* (1962) p. 60)

कृष्णजींचा खाक्याच कांहीं और आहे. त्यांचे शब्द ऐकतांना अथवा वाचतांना म्हणजे प्रथमदर्शनींच, ग्रापल्याकडून अशी कृति व्हावी असें ते म्हणतात कीं, जी अजूनहि आपल्याला जमत नाहीं. **चित्ताची सावधान स्थिति** (awareness) **म्हणजे काय** हें त्यांच्या श्रोत्यांना उमगावें व तिचा त्यांना लाभ व्हावा, एवढचा एकाच अपेक्षेनें ते इतके परिश्रम घेतात, असें दिसतें. एखादा सिद्धांत जगाला द्यावा, असा त्यांचा हेतुच दिसत नाहीं. पण ते जें काय म्हणतात तें खऱ्या अर्थानें समजून घेण्याकरतां, सावधानतेचोच गरज आहे. त्याशिवाय भागणार नाहीं, अशी अट जेव्हां ते सुरुवातीलाच घालतात तेव्हां आपली मोठी पंचाईत होते. वर्गांत प्रवेश देण्याआधींच परीक्षा पास झाली पाहिजे, असें का त्यांना म्हणायचें आहे ?

एक गोष्टमात्र कबूल केली पाहिजे. कृष्णजींच्या श्रोत्यांपैकीं बराच मोठा वर्ग, ज्याला जीवनाबद्दलचा शास्त्रीय दृष्टिकोण (scientific view of life) असें म्हणतां येईल, त्याच्या कांहींसा जवळ जातो. कांहीं भ्रम त्या श्रोत्यांच्या जीवनांतून हळूंहळूं गळूं लागतात. त्यांच्या जीवनांत अंशतः क्रांति (?) होऊं लागते. पण या परिणामाचें कृष्णमूर्तींना कांहींहि महत्त्व वाटत नाहीं. मानवाच्या चित्तांत (phyche) जी आमूलाग्र क्रांति झाली पाहिजे असें ते म्हणतात, तिची ही सुरुवात असावी अशी आशा कांहींजणांना वाटते. पण याबद्दल शंका आहे. जेव्हां कृष्णमूर्तींचा एखादा श्रोता, पूर्वीपेक्षां कमी तापट, अथवा अधिक विवेकशील झालेला दिसतो तेव्हां आपणांला वाटतें कीं, हा त्याच्या अवधानपूर्वक श्रवणाचा (listening) परिणाम असावा. जेव्हां दुसरा एखादा श्रोता पूर्वीप्रमाणें चालू राजकारणावर तावातावानें बोलत नाहीं असें दिसतें, तेव्हां आपणांला मोठें समाधान वाटतें. निदान पक्षाभिमान, देशाभिमान यांच्या जंजाळांतून हा सुटला, असें आपण म्हणू लागतों. कांहीं श्रोत्यांची धर्मवेडांतून मुक्तता झालेली आपण पाहतों. **पण कृष्णजींना यांतलें कांहींहि अभिप्रेत नाहीं, हें आपण विसरतों.** एखाद्या माणसाचा संपत्तीचा हव्यास कमी झाला, असेंहि केव्हां केव्हां आढळतें. पण वर दर्शविलेले अंशतः मुक्त झालेले सर्व प्रकारचे लोक, कृष्णमूर्तींच्या दृष्टीनें बद्धच आहेत. त्यांचें त्यांना कांहीं वाटत नाहीं. "मी पन्नास टक्के मुक्त झालों आहे," असें विधान कृष्णमूर्तींसमोर कुणी केलें तर ते त्याला म्हणतील, "अरे, पन्नास टक्के अंधार म्हणजे प्रकाश नव्हे." कृष्णमूर्तींच्या शाळेंत ज्याला शंभरपैकीं शंभर गुण मिळतात तोच पास होतो. बाकीचे सारे नापास ! किंबहुना त्या सर्वांना शून्य मार्कच ते देतात. हें असें कां ? याचा विचार करणें जरूर आहे.

वर दिलेल्या अर्धमुक्त लोकांच्या चित्ताची अवस्था काय असते ? त्यांच्या चित्ताला त्रस्त करणारा एक रोग बरा झालेला असतो; पण चित्त संपूर्ण निरोगी असें झालेलें नसतें. त्यांनीं एक मोह टाकलेला असतो, पण कशाकरतां ? त्या

मोहाच्या मागें लागल्यामुळें जें दुःख होतें तें टळावें म्हणून. कसल्याहि प्राप्तीचा अथवा दुःखनिवृत्तीचा हेतु नाहीं (no seeking) अशी जोंपर्यंत मनाची अवस्था होत नाहीं तोंपर्यंत चित्ताची सावधान (aware) अशी स्थिति नाहीं; आणि जोंपर्यंत सावधान असें चित्त नाहीं तोंपर्यंत महत्त्वाचें असें कांहीं घडतच नाहीं. ही **'सावधान स्थिति' म्हणजे काय हें जर उमजलें नाहीं, तर खरें बोलायचें म्हणजे कृष्णमूर्तींच्या प्रवचनांतलें कोणतेंहि विधान पूर्णपणें समजलें, असें होतच नाहीं.**

'चित्ताची अखंड सावधानता,' ही चीज तरी काय आहे ? केव्हां केव्हां असें वाटतें कीं, कृष्णमूर्तींचें कोणतेंहि प्रवचन घ्या, त्यांत एकच विषय असतो; आणि तो हा कीं, 'माणसाचें चित्त सतत सावध (aware) कसें राहील ?' श्रोत्यांना त्यांचें चित्त बेसावध कसें आहे, एवढी एकच गोष्ट कृष्णमूर्ति सांगतात. आपणांला वाटतें कीं, अनेक विषयांचा परामर्ष कृष्णमूर्तींनीं घेतला आहे. पण बेसावधपणाचे अनेक प्रकार वर्णिले जात असतांना, आपण आपल्या सोयीकरतां त्यांच्या प्रतिपादनाचे अनेक भाग पाडतों. असें करण्यांतहि करूं नये अशी चूकच आपण करतों कीं काय, कळत नाहीं. अर्धमृत अशा चित्तानेंच आपण त्यांचे शब्द ऐकतों. आपलें चित्त अगोदरच कुठेंतरी अडकलेलें असतें व त्याच्या समजुतीची दिशा अथवा मर्यादा ठरलेली असते. मग होतें काय ? तर त्या मर्यादेंत बसूं शकतील तेवढे कृष्णमूर्तींचे शब्द आपण ग्रहण करूं शकतों. म्हणजे त्यांचा अर्थ आपणांला पटतो, किंवा अग्राह्य वाटतो. पण एवढ्यानें भागत नाहीं. कृष्णमूर्तींच्या शब्दांची अथवा त्यावर आधारलेल्या कल्पनांची (ideas) भर आपल्याजवळ अगोदरच असलेल्या ज्ञानांत (accumulation of ideas or knowledge) पडते, यापेक्षां अधिक कांहींच होत नाहीं. या निमित्तानें ज्ञानसंपादनाचा आपला सनातन उद्योग पुढें चालूं ठेवण्याला एक संधि आपणांला मिळते, एवढेंच काय तें. म्हणूनच वर म्हटलें आहे कीं, कृष्णमूर्तींचे शब्द ऐकतांच अथवा वाचतांना आपल्या मनाची स्थिति असते काय व असावी कशी, एवढाच विचार आपण करूं. कदाचित् **या विचारांतच** कृष्णमूर्ति-रहस्य आपल्या हातीं लागण्याचा संभव आहे. कृष्णमूर्तींचें सांगणेंच तसें आहे :–

"All these talks are not meant to add more ideas and ideations, but rather to point out to you the operation, the working of your own mind and heart. So, please, if I may point, observe your own mind. And also, as I have said often, listening is an art. If you know how to listen rightly, there is an immediate perception and understanding; to listen to something totally with all your being; that is with all your senses, with your heart, with your mind, with your body, completely. Then you will see that

in that very act of listening, the thing that causes fear has completely gone away..... So, your mind is never quiet to listen, it is always agitated in listening. And a mind that is agitated can neither understand nor listen. And this is a problem of understanding immediately. Understanding does not come about through time, through comparison. Understanding comes when your mind is clear, sharp and rational. Then you understand immediately and *the immediacy of understanding is essential.*"

(*India Talks* (1962) page 101)

कृष्णमूर्तींचे शब्द ऐकतांना ते निर्लेप मनानें ऐकले पाहिजेत. 'निर्लेप' याचा अर्थ फार खोल आहे. कृष्णमूर्तींकडून अमुक एक ज्ञान मला मिळालें पाहिजे, अशा हेतूनें मी जर ऐकूं लागलों तर तें ऐकणें (listening) नव्हेंच. कोणताहि हेतु मनांत धरून जेव्हां मी एखादें दृश्य पाहतों, तेव्हां तें खरें पाहणें नव्हेच. **माझें चित्त जेव्हां हेतूनें ग्रस्त झालेलें असतें, तेव्हां त्याचा एक पाय भूतकालांत रोवलेला असतो.** कारण हेतु हा नेहमीं भूतकालांतल्या अनुभवांतूनच जन्माला येतो. असें चित्त स्थितिशील असल्यामुळें त्याच्या अंगीं अगदीं नवीन अशी कोणतीहि गोष्ट ग्रहण करण्याचें सामर्थ्य नसतें. जें कांहीं तें ऐकतें, त्याचें रूपांतर (translation or interpretation) करण्याची घाई त्याला लागलेली असते. कांहीं वेळेला आपलें चित्त श्रवणाचे वेळींच तुलनेच्या मागें लागतें. इतर ज्ञात्यांचे शब्द आठवतात; नाहींतर स्वतःचाच अनुभव पुढें उभा राहतो. आणि या जुन्या मालमसाल्यांतून कांहींतरी निवड करून तिच्या मदतीनें खऱ्याखोट्याचा निर्णय, आपलें मन करूं लागतें. वरील क्रियांपैकीं कोणतीहि क्रिया आपलें मन करीत असलें तर त्याचा अर्थ चित्त शांत नाहीं असा होतो. जें चित्त हेतूमुळें व्यग्र झालेलें आहे, तें निर्लेप असूंच शकत नाहीं.

'श्रवणाच्या वेळची सावधान अवस्था' म्हणजे काय हें समजून घेण्याचा आपण थोडासा प्रयत्न केला. हीच अवस्था आपली नेहमीं राहिली पाहिजे, असा कृष्णमूर्तींचा आग्रह आहे. एखादी घटना समजून घेण्याकरतां, अथवा जीवनांत ज्या समस्या उभ्या राहतात त्यांची सोडवणूक करण्याकरतां, मनाची ही अशी अवस्था सतत राहणें, एवढ्या एकाच गोष्टीची जरुरी आहे, असें ते म्हणतात. आपण जीवन जगतों हें खरें, पण बहुतेक प्रसंगीं मनांत धरावें एक आणि होतें भलतेंच असा अनुभव येतो. ज्या वेळीं मनासारखें कांहींतरी घडून येतें तेव्हांसुद्धां तें हरवेल कीं काय, ही चिंता लगेच सुरू होते. एकूण काय, तर मनासारखें न घडल्यामुळें होणारा 'मनस्ताप' अथवा मनासारखें घडलें म्हणून तें टिकविण्याची 'चिंता' या दोहोंपैकीं कांहींतरी आमच्या चित्ताला जाळीतच असतें.

कधींहि न संपणारा संघर्ष असाच का जीवनाचा अर्थ आहे ? संघर्षानें मन दुर्बल बनतें, मेंदूचा तल्लखपणा कमी होतो, हें आम्हालाहि समजतें. पण याला इलाज काय ? जीवनच तसें आहे, त्याला करणार काय ?

आम्ही जगतों तसेंच जीवन, म्हणजे जीवनाचें खरें अगर अंतिम स्वरूप आहे असें म्हटल्यावर, सारा ग्रंथच आटोपला ! **'संघर्ष म्हणजेच जीवन' असें जर समीकरण मांडलें, तर करावयाचें असें राहतेंच काय** ? संघर्षाच्या आहारीं जाणें एवढेंच उरतें, आणि संघर्षाबद्दल तक्रारहि करतां येत नाहीं. पण 'संघर्ष' या शब्दांतच तक्रारीचें, असमाधानाचें बीज आहे. हें बीज काढून टाकतां येईल का ? प्रत्येक वेळीं असें होतें कीं, चित्तांत कसला ना कसला तरी संघर्ष सुरू होतो; व तो लवकर मिटावा असें वाटूं लागतें. तो मिटण्याकरतां आम्ही करतों काय ? आम्ही तो दडपून टाकतों. त्याकरतां एखाद्या ध्येयाची अथवा नीतिशास्त्रांतल्या सिद्धांताची मदत घेतों. मन तात्पुरतें शांत झाल्याचा आभास होतो. पण पुन्हा दुसरा कसलातरी संघर्ष सुरू होतो. पुन्हां तोच उपाय. नाहींतर त्या संघर्षाच्या पकडींत सांपडून जीव हैराण होणें, यापेक्षां होणार काय ? हें असें जीवन जगत राहणें, एवढें एकच काम आम्ही करूं शकतों. ही भूमिका एकदां पक्की झाल्यावर, **संघर्षाचें समर्थन** करण्याचा उद्योग सुरू होतो. या संघर्षाचें अथवा या जन्मांत दुःख भोगण्याचें फळ पुढील जन्मांत मिळेल अशी आशा धरून संघर्षाची तीव्रता कांहीं कमी होते का, इकडे आपण लक्ष देऊं लागतों. चित्तांत संघर्ष चालूं असतांनाहि, किंबहुना कांहीं वेळेला तर संघर्षजन्य शक्तीमुळेंच आपल्या हातून मोठमोठीं कामें होऊन जातात. मग समाज आपला गौरव करतो. लोकांत मानमान्यता मिळते, धनाची अगर सत्तेची प्राप्ति होते, आणि इतर लोक आपल्या 'सुखाचा' हेवा करतात. इतर लोक आपला हेवा करतात या एकाच कारणामुळें, आपण स्वतःला मधून मधून खरोखरच सुखी मानूं लागतों. पण खरी अंदरकी बात आपणांला माहीत असते, हृदयांतली कोणतीतरी व्यथा, कोणतीतरी अतृप्ति त्या क्षणांतहि हळूंच आंतून डोकावते. मग, "हें असेंच चालायचें" असा सुस्कारा टाकून आपण दिवस कंठूं लागतों.

आपली चूक एकच होते. अशी कीं, जीवन अत्यंत वेगानें सारखें पुढें धांवत आहे ही गोष्टच आपण विसरतों. जीवनांत घडणारी प्रत्येक घटना ही अगदीं नवीन असते. किंबहुना मनांत उद्भवणारा कोणताहि विकार हासुद्धां संपूर्ण नवीन असाच असतो. **"जीवनांतली ही अपूर्वाई आपल्या अनुभवाला क्षणोक्षणीं येत आहे का नाहीं ?"** हा एकच प्रश्न स्वतःच्या मनाला आपण सतत विचारीत राहिलों, तरच खरें जीवन म्हणजे काय याचा उलगडा होऊं शकेल. पण जीवन जसें खरें असेल तसेंच स्वीकारण्याची आपली तयारी आहे काय ? याचा अर्थ असा कीं, चालू क्षणांत बाहेर जी घटना घडत आहे अथवा मनांत जें काय होत आहे,

कृष्णजींचा खाक्याच कांहीं और आहे. त्यांचे शब्द ऐकतांना अथवा वाचतांना म्हणजे प्रथमदर्शनींच, ग्रापल्याकडून अशी कृति व्हावी असें ते म्हणतात कीं, जी अजूनहि आपल्याला जमत नाहीं. **चित्ताची सावधान स्थिति** (awareness) **म्हणजे काय** हें त्यांच्या श्रोत्यांना उमगावें व तिचा त्यांना लाभ व्हावा, एवढचा एकाच अपेक्षेनें ते इतके परिश्रम घेतात, असें दिसतें. एखादा सिद्धांत जगाला द्यावा, असा त्यांचा हेतुच दिसत नाहीं. पण ते जें काय म्हणतात तें खऱ्या अर्थानें समजून घेण्याकरतां, सावधानतेचोच गरज आहे. त्याशिवाय भागणार नाहीं, अशी अट जेव्हां ते सुरुवातीलाच घालतात तेव्हां आपली मोठी पंचाईत होते. वर्गात प्रवेश देण्याआधींच परीक्षा पास झाली पाहिजे, असें का त्यांना म्हणायचें आहे ?

एक गोष्टमात्र कबूल केली पाहिजे. कृष्णजींच्या श्रोत्यांपैकीं बराच मोठा वर्ग, ज्याला जीवनाबद्दलचा शास्त्रीय दृष्टिकोण (scientific view of life) असें म्हणतां येईल, त्याच्या कांहींसा जवळ जातो. कांहीं भ्रम त्या श्रोत्यांच्या जीवनांतून हळूंहळूं गळूं लागतात. त्यांच्या जीवनांत अंशतः क्रांति (?) होऊं लागते. पण या परिणामाचें कृष्णमूर्तींना कांहींहि महत्त्व वाटत नाहीं. मानवाच्या चित्तांत (phyche) जी आमूलाग्र क्रांति झाली पाहिजे असें ते म्हणतात, तिची ही सुरुवात असावी अशी आशा कांहींजणांना वाटते. पण याबद्दल शंका आहे. जेव्हां कृष्णमूर्तींचा एखादा श्रोता, पूर्वीपेक्षां कमी तापट, अथवा अधिक विवेकशील झालेला दिसतो तेव्हां आपणांला वाटतें कीं, हा त्याच्या अवधानपूर्वक श्रवणाचा (listening) परिणाम असावा. जेव्हां दुसरा एखादा श्रोता पूर्वीप्रमाणें चालू राजकारणावर तावातावानें बोलत नाहीं असें दिसतें, तेव्हां आपणांला मोठें समाधान वाटतें. निदान पक्षाभिमान, देशाभिमान यांच्या जंजाळांतून हा सुटला, असें आपण म्हणू लागतों. कांहीं श्रोत्यांची धर्मवेडांतून मुक्तता झालेली आपण पाहतों. **पण कृष्णजींना यांतलें कांहींहि अभिप्रेत नाहीं, हें आपण विसरतों.** एखाद्या माणसाचा संपत्तीचा हव्यास कमी झाला, असेंहि केव्हां केव्हां आढळतें. पण वर दर्शविलेले अंशतः मुक्त झालेले सर्व प्रकारचे लोक, कृष्णमूर्तींच्या दृष्टीनें बद्धच आहेत. त्यांचें त्यांना कांहीं वाटत नाहीं. "मी पन्नास टक्के मुक्त झालों आहे," असें विधान कृष्णमूर्तींसमोर कुणी केलें तर ते त्याला म्हणतील, "अरे, पन्नास टक्के अंधार म्हणजे प्रकाश नव्हे." कृष्णमूर्तींच्या शाळेंत ज्याला शंभरपैकीं शंभर गुण मिळतात तोच पास होतो. बाकीचे सारे नापास ! किंबहुना त्या सर्वांना शून्य मार्कच ते देतात. हें असें कां ? याचा विचार करणें जरूर आहे.

वर दिलेल्या अर्धमुक्त लोकांच्या चित्ताची अवस्था काय असते ? त्यांच्या चित्ताला त्रस्त करणारा एक रोग बरा झालेला असतो; पण चित्त संपूर्ण निरोगी असें झालेलें नसतें. त्यांनीं एक मोह टाकलेला असतो, पण कशाकरतां ? त्या

मोहाच्या मार्गें लागल्यामुळें जें दुःख होतें तें टळावें म्हणून. कसल्याहि प्राप्तीचा अथवा दुःखनिवृत्तीचा हेतु नाहीं (no seeking) अशी जोंपर्यंत मनाची अवस्था होत नाहीं तोंपर्यंत चित्ताची सावधान (aware) अशी स्थिति नाहीं; आणि जोंपर्यंत सावधान असें चित्त नाहीं तोंपर्यंत महत्त्वाचें असें कांहीं घडतच नाहीं. ही **'सावधान स्थिति' म्हणजे काय हें जर उमजलें नाहीं, तर खरें बोलायचें म्हणजे कृष्णमूर्तींच्या प्रवचनांतलें कोणतेंहि विधान पूर्णपणें समजलें, असें होतच नाहीं.**

'चित्ताची अखंड सावधानता,' ही चीज तरी काय आहे? केव्हां केव्हां असें वाटतें कीं, कृष्णमूर्तींचें कोणतेंहि प्रवचन घ्या, त्यांत एकच विषय असतो; आणि तो हा कीं, 'माणसाचें चित्त सतत सावध (aware) कसें राहील?' श्रोत्यांना त्यांचें चित्त बेसावध कसें आहे, एवढी एकच गोष्ट कृष्णमूर्ति सांगतात. आपणांला वाटतें कीं, अनेक विषयांचा परामर्ष कृष्णमूर्तींनीं घेतला आहे. पण बेसावधपणाचे अनेक प्रकार वर्णिले जात असतांना, आपण आपल्या सोयीकरतां त्यांच्या प्रतिपादनाचे अनेक भाग पाडतों. असें करण्यांतहि करूं नये अशी चूकच आपण करतों कीं काय, कळत नाहीं. अर्धमृत अशा चित्तानेंच आपण त्यांचे शब्द ऐकतों. आपलें चित्त अगोदरच कुठेंतरी अडकलेलें असतें व त्याच्या समजुतीची दिशा अथवा मर्यादा ठरलेली असते. मग होतें काय? तर त्या मर्यादेंत बसूं शकतील तेवढे कृष्णमूर्तींचे शब्द आपण ग्रहण करूं शकतों. म्हणजे त्यांचा अर्थ आपणांला पटतो, किंवा अग्राह्य वाटतो. पण एवढ्यानें भागत नाहीं. कृष्णमूर्तींच्या शब्दांची अथवा त्यावर आधारलेल्या कल्पनांची (ideas) भर आपल्याजवळ अगोदरच असलेल्या ज्ञानांत (accumulation of ideas or knowledge) पडते, यापेक्षां अधिक कांहींच होत नाहीं. या निमित्तानें ज्ञानसंपादनाचा आपला सनातन उद्योग पुढें चालूं ठेवण्याला एक संधि आपणांला मिळते, एवढेंच काय तें. म्हणूनच वर म्हटलें आहे कीं, कृष्णमूर्तींचे शब्द ऐकतांच अथवा वाचतांना आपल्या मनाची स्थिति असते काय व असावी कशी, एवढाच विचार आपण करूं. **कदाचित् या विचारांतच** कृष्णमूर्ति-रहस्य आपल्या हातीं लागण्याचा संभव आहे. कृष्णमूर्तींचें सांगणेंच तसें आहे :–

"All these talks are not meant to add more ideas and ideations, but rather to point out to you the operation, the working of your own mind and heart. So, please, if I may point, observe your own mind. And also, as I have said often, listening is an art. If you know how to listen rightly, there is an immediate perception and understanding; to listen to something totally with all your being; that is with all your senses, with your heart, with your mind, with your body, completely. Then you will see that

in that very act of listening, the thing that causes fear has completely gone away..... So, your mind is never quiet to listen, it is always agitated in listening. And a mind that is agitated can neither understand nor listen. And this is a problem of understanding immediately. Understanding does not come about through time, through comparison. Understanding comes when your mind is clear, sharp and rational. Then you understand immediately and *the immediacy of understanding is essential.*"

(*India Talks* (1962) page 101)

कृष्णमूर्तींचे शब्द ऐकतांना ते निर्लेप मनानें ऐकले पाहिजेत. 'निर्लेप' याचा अर्थ फार खोल आहे. कृष्णमूर्तींकडून अमुक एक ज्ञान मला मिळालें पाहिजे, अशा हेतूनें मी जर ऐकूं लागलों तर तें ऐकणें (listening) नव्हेंच. कोणताहि हेतु मनांत धरून जेव्हां मी एखादें दृश्य पाहतों, तेव्हां तें खरें पाहणें नव्हेच. **माझें चित्त जेव्हां हेतूनें ग्रस्त झालेलें असतें, तेव्हां त्याचा एक पाय भूतकालांत रोवलेला असतो.** कारण हेतु हा नेहमीं भूतकालांतल्या अनुभवांतूनच जन्माला येतो. असें चित्त स्थितिशील असल्यामुळें त्याच्या अंगीं अगदीं नवीन अशी कोणतीहि गोष्ट ग्रहण करण्याचें सामर्थ्य नसतें. जें कांहीं तें ऐकतें, त्याचें रूपांतर (translation or interpretation) करण्याची घाई त्याला लागलेली असते. कांहीं वेळेला आपलें चित्त श्रवणाचे वेळींच तुलनेच्या मागें लागतें. इतर ज्ञात्यांचे शब्द आठवतात; नाहींतर स्वतःचाच अनुभव पुढें उभा राहतो. आणि या जुन्या मालमसाल्यांतून कांहींतरी निवड करून तिच्या मदतीनें खऱ्याखोट्याचा निर्णय, आपलें मन करूं लागतें. वरील क्रियांपैकीं कोणतीहि क्रिया आपलें मन करीत असलें तर त्याचा अर्थ चित्त शांत नाहीं असा होतो. जें चित्त हेतूमुळें व्यग्र झालेलें आहे, तें निर्लेप असूंच शकत नाहीं.

'श्रवणाच्या वेळची सावधान अवस्था' म्हणजे काय हें समजून घेण्याचा आपण थोडासा प्रयत्न केला. हीच अवस्था आपली नेहमीं राहिली पाहिजे, असा कृष्णमूर्तींचा आग्रह आहे. एखादी घटना समजून घेण्याकरतां, अथवा जीवनांत ज्या समस्या उभ्या राहतात त्यांची सोडवणूक करण्याकरतां, मनाची ही अशी अवस्था सतत राहणें, एवढ्या एकाच गोष्टीची जरुरी आहे, असें ते म्हणतात. आपण जीवन जगतों हें खरें, पण बहुतेक प्रसंगीं मनांत धरावें एक आणि होतें भलतेंच असा अनुभव येतो. ज्या वेळीं मनासारखें कांहींतरी घडून बेतें तेव्हांसुद्धां तें हरवेल कीं काय, ही चिंता लगेच सुरू होते. एकूण काय, तर मनासारखें न घडल्यामुळें होणारा 'मनस्ताप' अथवा मनासारखें घडलें म्हणून तें टिकविण्याची 'चिंता' या दोहोंपैकीं कांहींतरी आमच्या चित्ताला जाळीतच असतें.

कधींहि न संपणारा संघर्ष असाच का जीवनाचा अर्थ आहे ? संघर्षानें मन दुर्बल बनतें, मेंदूचा तल्लखपणा कमी होतो, हें आम्हालाहि समजतें. पण याला इलाज काय ? जीवनच तसें आहे, त्याला करणार काय ?

आम्ही जगतों तसेंच जीवन, म्हणजे जीवनाचें खरें अगर अंतिम स्वरूप आहे असें म्हटल्यावर, सारा ग्रंथच आटोपला ! **'संघर्ष म्हणजेच जीवन' असें जर समीकरण मांडलें, तर करावयाचें असें राहतेंच काय ?** संघर्षाच्या आहारीं जाणें एवढेंच उरतें, आणि संघर्षाबद्दल तक्रारहि करतां येत नाहीं. पण 'संघर्ष' या शब्दांतच तक्रारीचें, असमाधानाचें बीज आहे. हें बीज काढून टाकतां येईल का ? प्रत्येक वेळीं असें होतें कीं, चित्तांत कसला ना कसला तरी संघर्ष सुरू होतो; व तो लवकर मिटावा असें वाटूं लागतें. तो मिटण्याकरतां आम्ही करतों काय ? आम्ही तो दडपून टाकतों. त्याकरतां एखाद्या ध्येयाची अथवा नीतिशास्त्रांतल्या सिद्धांताची मदत घेतों. मन तात्पुरतें शांत झाल्याचा आभास होतो. पण पुन्हा दुसरा कसलातरी संघर्ष सुरू होतो. पुन्हां तोच उपाय. नाहींतर त्या संघर्षाच्या पकडींत सांपडून जीव हैराण होणें, यापेक्षां होणार काय ? हें असें जीवन जगत राहणें, एवढें एकच काम आम्ही करूं शकतों. ही भूमिका एकदां पक्की झाल्यावर, **संघर्षाचें समर्थन** करण्याचा उद्योग सुरू होतो. या संघर्षाचें अथवा या जन्मांत दुःख भोगण्याचें फळ पुढील जन्मांत मिळेल अशी आशा धरून संघर्षाची तीव्रता कांहीं कमी होते का, इकडे आपण लक्ष देऊं लागतों. चित्तांत संघर्ष चालूं असतांनाहि, किंबहुना कांहीं वेळेला तर संघर्षजन्य शक्तीमुळेंच आपल्या हातून मोठमोठीं कामें होऊन जातात. मग समाज आपला गौरव करतो. लोकांत मानमान्यता मिळते, धनाची अगर सत्तेची प्राप्ति होते, आणि इतर लोक आपल्या 'सुखाचा' हेवा करतात. इतर लोक आपला हेवा करतात या एकाच कारणामुळें, आपण स्वतःला मधून मधून खरोखरच सुखी मानूं लागतों. पण खरी अंदरकी बात आपणांला माहीत असते, हृदयांतली कोणतीतरी व्यथा, कोणतीतरी अतृप्ति त्या क्षणांतहि हळूंच आंतून डोकावते. मग, "हें असेंच चालायचें" असा सुस्कारा टाकून आपण दिवस कंठूं लागतों.

आपली चूक एकच होते. अशी कीं, जीवन अत्यंत वेगानें सारखें पुढें धांवत आहे ही गोष्टच आपण विसरतों. जीवनांत घडणारी प्रत्येक घटना ही अगदीं नवीन असते. किंबहुना मनांत उद्भवणारा कोणताहि विकार हासुद्धां संपूर्ण नवीन असाच असतो. **"जीवनांतली ही अपूर्वाई आपल्या अनुभवाला क्षणोक्षणीं येत आहे का नाहीं ?"** हा एकच प्रश्न स्वतःच्या मनाला आपण सतत विचारीत राहिलों, तरच खरें जीवन म्हणजे काय याचा उलगडा होऊं शकेल. पण जीवन जसें खरें असेल तसेंच स्वीकारण्याची आपली तयारी आहे काय ? याचा अर्थ असा कीं, चालू क्षणांत बाहेर जी घटना घडत आहे अथवा मनांत जें काय होत आहे,

त्याचेशींच–आणि फक्त त्याचेशींच–संबंध ठेवण्याची आपली खरी इच्छा आहे काय ? कृष्णमूर्तींनीं हा मुद्दा फारच स्पष्ट शब्दांत मांडला आहे :–

"So, to look at a fact is to be aware. In that awareness, there is no choice, no condemnation, no like or dislike. But most of us are incapable of doing this, because traditionally, occupationally, in every way, we have been brought up to condemn, to approve, to justify, so, *that is our background.* To look at something without a background is to face the fact. But as we are not capable of facing the fact without the background, we have to be aware of the background. We have to be aware of our conditioning and that conditioning shows itself when we observe a fact, and as you are concerned with the observation of the fact and not with the background, the background is pushed aside. *When the main interest is to understand the fact only, and when you see that the background prevents you from understanding the fact, then the vital interest in the fact wipes away the background.* If I am interested completely in fear, then I neither condemn nor justify it; there is fear, and I want to go into it; no background, no ideation will interfere with it, because my interest is in the understanding of fear.

(*Talks in India* (1962) page 35.)

सगळ्या अडचणी, **' चालू घडीच खरी ' हें मानवी जीवनांतलें एकच सत्य** बाजूला सारल्यामुळें उत्पन्न होतात, असें दिसतें. वरील वाक्य अनेक वेळां आपण उच्चारतों अथवा ऐकतों; पण त्याचा संपूर्ण अर्थ काय होतो, याचा कधीं आपण विचार केला आहे काय ? फक्त चालू घडींतच राहावयाचें, असा कधीं आपण निश्चय केला आहे काय ? खरें सांगायचें म्हणजे चालू घडी इतकी नीरस अथवा एवढी भयप्रद आपणांला वाटते कीं, बोलायची सोय नाहीं. एकच आक्रोश आपलें मन सदैव करीत असतें, ' देवा, मला या चालू क्षणांत ठेवूं नकोस ! ' पण कलि-काळालाहि प्रस्तुत क्षणांतल्या घटना बदलतां येत नाहींत. क्षण बदलला कीं घट-नाहि बदलतील. पण हा बदल होतो कीं नाहीं, हें ध्यानांत येण्याकरतां प्रत्येक क्षणाशीं समरस होतां आलें पाहिजे. तसेंच, होणारा बदल आपल्याला इष्ट असाच असेल, असेंहि धरून चालतां येणार नाहीं.

एवढें मात्र खरें कीं, आला क्षण राहात नाहीं; व नव्या क्षणांत जुनी घटना अथवा घटनेचें जुनें स्वरूप टिकत नाहीं. काळाचा हात धरून, भूतकालांत निघून जाण्याची घाई प्रत्येक घटनेला झालेली असते. पण होतें असें कीं, आपण या तिच्या

गतीला अवरोध करूं पाहतों. आपण समजतों कीं, जो क्षण निघून गेलेला आहे त्या क्षणांतच आपण जगत आहोंत. याचा अर्थ असा कीं, गत घटनेच्या स्मृतीला, अगर त्या स्मृतीपासून होणाऱ्या सुखाला अगर दुःखाला, आपण कवटाळून बसतों. इकडे घटना तर निघूनच गेलेली असते; व तिच्या जागीं जी नवीन घटना आलेली असते तिचें स्वरूप समजून घेणें तर दूरच, पण तिच्याशीं आपलें युद्धच सुरू होतें, जीवनाचें स्वरूप संघर्षमय होतें तें असें.

चालू क्षणांतली चालू घटना संपूर्ण समजून घेणें, एवढा एकच उद्योग सतत केला तर ? मग संघर्ष जीवनाला स्पर्श करणार नाहीं; कारण, चालू क्षणाशीं फारकत झाल्यामुळेंच संघर्ष वाढीस लागतो. पण हें जमावें कसें ? एका माणसानें चारचौघांत माझा अपमान केला, अशी कल्पना करूं. त्या गोष्टीला महिना झाला, पण झालेला व्रण कांहीं बुजत नाहीं. त्या माणसाचें नांव कोणीं काढलें कीं, माझ्या अंगाची लाही लाही होते. रात्रंदिवस त्या मानहानीच्या वेदना जिवाला जाळीत असतात. या दुःखापासून माझी केव्हां मुक्तता होईल, असें सारखें मला वाटतें. मला लागलेला हा द्रुदोग लवकर बरा झाला पाहिजे, असें मी म्हणतों. पण त्याकरतां मी करतों काय ? जें काय माझ्या मनांत घडत असतें त्याला 'अपमान' असें नांव देण्याची क्रिया (naming) मी प्रथम करतों. **असें नामकरण एकदां झालें, कीं अर्थाला सुरुवातच झाली. हें नांव मला पुन्हां पुन्हां भूतकालांत घेऊन जातें.** झालेला प्रसंग अनेक वेळां डोळ्यांसमोर उभा राहतो. आश्चर्य असें कीं, जी आठवण मला नको असते तीच मी पुन्हां पुन्हां बोलावून आणतो याच वेळीं एक क्रिया मनांत सुरू होते. दुसऱ्यानें अपराध केला तर त्याला क्षमा करावी, तसें न केलें तर चित्तशुद्धि होणार नाहीं, असें मीं कुठेंतरी ऐकलेलें असतें; तें मला आठवतें. मग मी मानहानीची ती स्मृति दडपून टाकण्याचा प्रयत्न करतों. आतां माझी व्यथा अधिकच वाढते. कारण, मधून मधून वर उसळणाऱ्या त्या स्मृतीबरोबर स्वतःच्या अपराधीपणाची जाणीवहि (sense of guilt) मला जाळूं लागते. हा मनस्ताप असह्य झाला कीं, मग मी व्यसनाकडे वळतों; अथवा दुसरें एखादें पलायनस्थान (escape) शोधतों. पलायनानें लाभलेलें तात्पुरतें समाधान संपलें कीं, मी पूर्वपदावर येतों. याचा अर्थ असा कीं, तेंच शल्य पुन्हां खुपूं लागतें; अथवा कांहीं वेळां काल माझ्या मदतीला आल्यामुळें ती जखम बुजते. पण त्याच प्रकारची घटना पुन्हां झाल्यास, वरच्याच चक्रांत मी पुन्हां सांपडतों. अपमानाची समस्या माझ्या जीवनांत कितीतरी वेळां उत्पन्न होते. ती कांहीं वेळ मला त्रस्त करते व निघून जाते. ज्याअर्थीं तशीच घटना होतांच माझी प्रतिक्रियाहि पूर्ववत् होते, त्याअर्थीं माझें जीवन संपेपर्यन्त मीं या समस्येचा निकाल लावलेला नाहीं, हें उघड आहे. **आपलें जीवन म्हणजे न सुटलेल्या समस्यांची**

सांखळीच आहे. आपली मदार फक्त कालावर आहे. कालांतरानें प्रत्येक जखम बरी होते; पण ती बरी होते न होते तोंच दुसरी जखम होते. मग तिसरी, चौथी, असा क्रम सारखा चालूच राहतो.

दुसरें उदाहरण मृत्यूचें घेऊं. घरांत झालेला कर्त्या मुलाचा मृत्यु आईच्या हृदयाला शोकग्रस्त करतो. त्या मुलाचें मरण ही एक बाहेरची घटना आहे; व त्यामुळें मातेला होणारें दुःख ही तिच्या आंतरजीवनांतली समस्या आहे. ही घटना व हें दुःख यांचा अर्थ समजून घेण्याकरतां काय केलें पाहिजे व काय केलें जातें? फक्त घटनेच्या क्षणांतच ती आई राहते काय? तसेंच पुत्राच्या मृत्यूमुळें होणाऱ्या नैसर्गिक दुःखापुरतीच आईची व्यथा असते काय? इतरांपेक्षां आईला होणाऱ्या दुःखांत स्वाभाविकतेचा भाग जास्त, हें केव्हांहि कबूल. पण आईसुद्धां एका समाजाचा घटक असते. त्या समाजानें केलेले संस्कार, तिचें दुःख वाढवितात; नव्हें, ते तिच्या दुःखाला एक निराळाच आकार देतात. ज्या समजांत स्त्रियांचें आर्थिक परावलंबन जास्त, त्या समाजांतल्या आईचा पुत्रशोक अधिक तीव्र व दीर्घ असतो, हें आपण पाहतोंच. पुत्राच्या मृत्यूची घटना होतांच आईचें मन भूत-कालांत जातें. पुत्राचा सुखद सहवास, त्याच्या बाललीला आठवतात. त्याच वेळीं त्याच्या भावी कर्तबगारीबद्दलचे केलेले मनोरथ स्मरतात. दिवंगत पतीनें हृदयाशीं धरलेला उत्कर्षाचा परमोच्च बिंदु, निदान हा तरी प्राप्त करून घेईल, अशी आशा त्या मातेनें जन्मभर बाळगलेली असते. मग स्वतःच्या अनाथ असाहाय अवस्थेची जाणीव तिला होते. 'आतां आपलें पुढें कसें होणार?' ही भीति तिचें अंतःकरण कंपित करते. इतर मातांचे झालेले हाल व समाजानें केलेला छळ, यांचीं दृश्यें तिच्यापुढें उभीं राहतात हें सर्व होत असतांना परलोकांत तरी तो मुलगा वैभव भोगील ना, हें जाणण्याची इच्छा तिला होते. 'त्याची व आपली गांठ तेथेंतरी पडेल ना?' असें आक्रंदन तिचें हृदय करूं लागतें. प्रत्यक्ष झालेली घटना व चालू क्षणांतलें दुःख यांपासून ती आई किती दूर गेली तें पाहा! या पलायनामुळेंच कोणत्याहि घटना आपणाला सत्य स्वरूपांत समजत नाहींत; व प्रत्येक घटनेची समस्या बनते, असें कृष्णमूर्तींचें सांगणें आहे जीवनांत फक्त घटना घडत असतात; व घटनांचें दर्शन समोरासमोर कसें घ्यावें हें न समजल्यामुळेंच, समस्यांच्या चक्रव्यूहांत आपण सांपडतों असें ते म्हणतात.

वरील दोन्ही उदाहरणांत चिंतनामुळें ज्या जंजाळांत मन सांपडलेलें दिसतें, त्याला पूर्वानुभव अथवा पूर्वस्मृति (background) असें नांव वरील उताऱ्यांत दिलें आहे. या पूर्वानुभवांनच आपल्या सर्व ध्येयविचारांचा (ideals) समावेश होतो. शिवाय, 'अमुक एक घडलें पाहिजे. कारण माझा तसा हक्क, माझा तसा दर्जा (status) आहे,' असें पहिल्या उदाहरणांत ज्याला वाटते तो 'मी,' अगर

स्वतःला इतरांपेक्षां दुर्दैवी समजणारा त्या आईचा 'मी' यांचाहि समावेश त्या पूर्वानुभवांतच होतो, हें उघड आहे.

एकूण असें दिसतें कीं, कांहींहि घडलें अगर कोणतीहि समस्या उभी राहिली कीं, एकदम आपलें मन भूतकालांत धांवूं लागतें. आपणांला भूतकालांत काय घडलें, याचीच गरज जास्त वाटते. प्रथम ही पक्की खात्री वाटली पाहिजे कीं, गतघटनांच्या स्मृतींपासून होणारा आनंद अथवा मनस्ताप, यांना खरें अस्तित्व नाहीं. नुसतें तर्कानें हें पटून फारसा उपयोग नाहीं. **ही खात्री, फक्त चालू घटनांवर लक्ष केंद्रित झालें तरच मनाच्या आंतल्या बाजूस पटेल.** मनाला वरवर काय वाटतें, कोणत्या ग्रंथांतले सिद्धांत आठवतां येतात, यालाहि कांहीं महत्त्व नाहीं. फक्त चालू क्षणाकडेच आपणांला पाहतां येतें कीं नाहीं, एवढाच काय तो प्रश्न आहे.

प्रश्न वरवर सोपा दिसतो, पण मग चालू क्षणांतच राहण्याचें आपणांला जमत कां नाहीं ? कोणत्यातरी पिशाचानें भारलेला मनुष्य त्याला न कळत जसा अलगद उचलला जातो व दूर कुठेंतरी एकदम फेंकला जातो, तसेंच आपल्या मनाचें होतें. एखादी घटना बाहेर अथवा मनाच्या अंतर्भागांत घडूं लागावी, तोंच मन एकदम भूतकालांत (अथवा तज्जन्य भविष्यकालांत) उडी घेतें; व तेथून मग चालू घटनेकडे पाहूं लागतें. मनानें ही बैठक एकदां का घेतली कीं, मग त्याचा एक निराळाच उद्योग सुरू होतो. तो उद्योग म्हणजे सत्याचा अपलाप करणें. जें घडत आहे, त्याचें स्वरूप विपरीत भासूं लागतें. होत असलेली घटना अगर मनांत आलेली स्मृति ही सुखद आहे का दुःखद आहे, तिचा माझ्या जीवनांत कांहीं उपयोग आहे का ती टाकाऊ आहे, हीच चौकशी मग सुरू होते; आणि तिला अनुसरून मी वर्तन करूं लागतों. या वर्तनांतला मुख्य भाग म्हणजे मी स्वतःला सुखी अगर दुःखी समजूं लागतों. लहानपणापासून ज्या समाजांत मी वाढलों त्या समाजानें, मला प्रत्येक घटनेचें हें असें मूल्यमापन करावयासच शिकविलें आहे; किंबहुना जीवन जगण्याची ही एकच रीत मला माहीत आहे. कृष्णमूर्ति म्हणतातः—

"But with us, the interferences have become tremendously strong and important and they interfere with the fact. We have emphasized the interferences and not the fact ..... If I allowed interferences to play all the time as I do, then there is no fact and I live with the interferences."

(*Talks in India* (1962) page 40)

"मूल्यमापनाशिवाय जगतां येईल का ?" असा मूलगामी प्रश्न कृष्णमूर्ति आपणांपुढें उभा करतात. "तुम्हांला सत्याशीं संबंध ठेवावयाचा आहे का सुख -

दुःखांच्या जगांत वावरावयाचें आहे, **याचा निर्णय आधीं करा**", असें ते बजावतात. या चालू घडींत राहून तिच्याशीं वैर करूं नका, असें ते म्हणतात. पण आजपर्यंत आम्ही हेंच करीत आलों आम्हांला खरोखरच असें वाटत होतें कीं, जीवन भूतकालांतल्या कोणत्यातरी बिंदूपासून सुरू होतें व नीट सरळ रेषेंत म्हणजे भूतकालाशीं सुसंगत अशा पद्धतीनेंच आपलें ध्येय गांठतें. प्रवासाला निघाल्यावर पहिल्या मुक्कामाशीं शेवटचा मुक्काम जोडलेला असतो; एवढेंच नव्हे तर मधल्या मुक्कामांचासुद्धां एकमेकांशीं संबंध असतो. अशाच प्रकारचें स्वरूप मानवी जीवनाचें असावें, असें आपण धरून चाललों. भूतकालांत जो अनुभव आला, त्याच्या मदतीनेंच जें जें काय जीवनांत घडतें, त्याचा अर्थ आपण समजून घेत आलों. पण असें करण्यांत आम्ही मूर्खांच्या नंदनवनांतच राहात आलों, असें दिसतें. एवढी मोठी चूक आपल्या हातून घडली असेल, 'सगळेंच मुसळ केरांत' अशी अवस्था आपली झाली असेल, अशी कल्पना नव्हती. मधूनमधून निराशा, दुःख यांचा अनुभव येत होता; तेव्हां रस्ता थोडा चुकला असेल या समजुतीनें आम्ही आमच्या प्रवासांत थोडाबहुत बदल (reform) केला. दुःख टाळण्याकरतां आम्हीं अनेक खटाटोप केले. पण सुखाची प्राप्ति हें एकच लक्ष्य आमच्या जीवनाचें राहिलें. सुख कशाला म्हणायचें हें ठरवितांना, आम्हीं नेहमीं भूतकालाचीच मदत घेतली सुखाचें रंगरूप वेळोवेळीं बदललें; पण प्रत्येक वेळीं 'सुखाबद्दलची कल्पना' तें येण्याच्या अगोदर आमच्या मनांत तयारच होती. असें करण्यांत **जीवन पुढें जातें व आम्ही मागें राहतों**, हें आमच्या लक्षांतच आलें नाहीं. नेमकी हीच गोष्ट पुढील उताऱ्यांत सांगितली आहे :—

"Now to understand the fact I must look at it without the background, obviously. Is this possible? And the fact will not remain as fact—it is moving, living. *To understand it I must move with it; my mind must be as rapid, as swift, as sensitive, as the fact.* And my mind is not so if it has a background, if it is conditioned. Please follow. The background must be *surgically operated on immediately*, to follow the fact. So, *there is no time to investigate the background.*" (*Talks in India* (1962) p. 39).

जीवनांतली प्रत्येक घडी अगदीं स्वतंत्रपणें जगतां आली पाहिजे; त्याशिवाय जीवनाचें कोडें उलगडणार नाहीं, असें दिसतें. आपल्या मनाचा धर्मच हा दिसतो कीं, नवीन कांहीं घडलें कीं प्रथम भूतकालाला (background) बोलावून आणायचें. हें संवयीमुळें होतें कीं, भूतकाल सत्य वाटतो म्हणून होतें, नक्की सांगतां येत नाहीं. संवयीचेहि दोन प्रकार असतात. एकांत, यांत्रिकतेबरोबरच उपयुक्तता असते; तर दुसरा प्रकार शंभर टक्के यांत्रिक अशा संवयींचा असतो. पण कोणतीही

संवय घेतली तरी तिचें संपूर्ण सामर्थ्य, पुनरावृत्तीमध्यें म्हणजे यांत्रिकतेंतच सांठवलेलें आहे. **पुनरावृत्ति हें असत्याचेंच दुसरें नांव आहे.** 'विनाकारण होणारी पुनरावृत्ति हा मूर्खपणा आहे,' हें कांहीं वेळेला आपल्या ध्यानांत येतें, पण बऱ्याच वेळां हें लक्षांतहि येत नाहीं. खरोखरच उपयुक्त असणाऱ्या संवयी टाकून द्या, असें कुणीहि म्हणत नाहीं. व्यवसायाचीं कामें करण्याचें कौशल्य, उपयुक्त अशा पुनरावृत्तीमधूनच प्राप्त होतें. पण खरा उपद्रव, उपयुक्ततेचा व कांहीं वेळां तर अपरिहार्यतेचा आभास निर्माण होण्यांतून होतो. कारण मग जरूर नसलेलेंहि अत्यंत निकडीचें असें वाटूं लागतें; व जें असत्य तेंच अगदीं ढळढळीत सत्य दिसूं लागतें. भूतकालांतूनच प्रस्तुत घटनांकडे पाहिलें पाहिजे, असा भ्रम अगदीं सहज होण्याचें आणि तो बद्धमूल होऊन राहण्याचें, एक महत्त्वाचें कारण आहे. तें असें कीं, भोंवतालचे सर्व लोक याच भ्रमांत असतात. एवढेंच नव्हे तर ज्या समाजांत आपण राहतों, त्या समाजाची रचनाच या भ्रमाच्या पायावर झालेली आहे. **सर्वजण हेंच करतात; व त्यांतलेच कांहीं समाजांत मान्यता पावतात.** कृष्णमूर्ति मूल्यमापनाच्या या सर्वमान्य पद्धतीलाच psychological structure of society (समाजनिर्मित मनोरचना) असें म्हणतात. प्रत्येक घटनेचें दर्शन ती घडत असलेल्या क्षणांतूनच जर आपण घेऊ लागलों, तर एका अर्थानें आपण समाजापासून एकाकी (alone) पडतों. 'ती घटना आणि आपण', एवढेच जाग्यावर उरतों. ती घटना मग चांगली–वाईट, सुख देणारी अथवा दुःख देणारी, अशी कांहीं म्हणतांच येत नाहीं. तिला अशा प्रकारचें कोणतेंच रूप प्राप्त होत नाहीं; अथवा तिच्या पूर्वपरिचित रूपांत संपूर्ण क्रांति होते. **समस्या मग समस्या राहात** नाहीं. कारण भूतकालाशीं जिचा संबंध अजिबात नाहीं, अशी समस्या अजूनपर्यंत जन्माला आलेली नाहीं. याचाच अर्थ, आपल्यापुढची समस्या अशा दर्शनानें नष्ट होते; अथवा वितळून जाते. कोणतीहि बाहेरची अथवा आंतली घटना, स्मृतींच्या मदतीनें लांबविली गेली नाहीं तर ती तत्क्षणीं संपते. हें असें घटनांचें येणें–जाणें सतत चालू राहतें. वर उल्लेख केलेल्या प्रवचनांतच कृष्णमूर्ति सांगतात :–

"Then you will find if you have gone so far, that you are moving with the fact and therefore *there is the ending of the fact, all the time;* and thereby your mind becomes astonishingly supple extremely sensitive."

कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेलें 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति' (प्रत्येक क्षणाला नवीन होणारें) असें जीवन आपल्या अनुभवास यावें, असें नुसतें वाटून त्याचा कांहीं उपयोग नाहीं. त्याकरतां जरूर ती किंमत दिली पाहिजे. मनाच्या इतक्या दिवसांच्या संवयीमुळें जरी भूतकाल पुढें उभा राहिला, तरी विद्युल्लतेच्या वेगानें

तो एकदम बाजूला सारता आला पाहिजे व सारला पाहिजे. मला केव्हां केव्हां वाटतें कीं, 'भूतकाल हा असत्य आहे' ही गोष्टच मुळीं आपणाला खरी पटलेली नाहीं. शब्दांनीं तसें जरी आम्ही म्हणत असलों, तरी अंतर्यामींची खात्री तशी नाहीं. विषारी नागाला कुणी कवटाळून बसत नाहीं. 'ही खात्री पटावी कशी ?' एवढा एकच प्रश्न आपणांपुढें आहे. आपण फक्त भूतकालाचें पृथक्करण करतों; व कोणते पूर्वानुभव ग्राह्य अगर अग्राह्य, तें ठरवीत बसतों. यांत जो काल जातो, तो सारख्या धांवणाऱ्या जीवनापासून आपणांला अलग पाडतो. पूर्वानुभवांपासून मुक्त होणें, ही सोपी गोष्ट नाहीं. कारण आपला 'मी' मग शिल्लक राहणार नाहीं; व 'मी' नसतांना 'अधांत्रीं जगावें कसें ?' हीच तर खरी पंचाईत आहे !

* * *



चौदा

अखंड सावधानता म्हणजे काय ?

[उत्तरार्ध]

जें तत्त्व म्हणजे 'कृष्णमूर्तीची जगाला देणगी,' असें विधान करतां येईल असें तत्त्व कोणतें ? तर 'अखंड सावधानतेचें,' हें आपण पूर्वार्धांत पाहिलें. ही अखंड सावधानता आपणांला साधत नाहीं याचें मुख्य कारण, "अधांत्रीं जगावें कसें ?" अशी वाटणारी भीति हेंच आहे. या भीतीचें स्वरूप अधिक समजून घेतलें पाहिजे. "अधांत्रीं जगा," "मीची जाणीव नसतांना जगा," असें जेव्हां कृष्णमूर्ति सांगतात, तेव्हां खरें म्हटलें तर आपणाला त्यांचा राग येतो. राग येण्याचीं कारणें दोन आहेत. पहिलें कारण असें कीं, जो 'मी' खरोखरच आमच्या अनुभवाला येतो तो नाहीं असें कां समजावें ? जी जाणीव रात्रंदिवस आमच्या हृदयांत सारखी आहे, ती जाणार कशी ? निसर्गाच्या विरुद्ध जाण्याचें सायास करण्यास कृष्णमूर्ति कां सांगतात, हेंच आपणांला कळत नाहीं. जें सत्य क्षणोक्षणीं आमच्या अनुभवाला येतें तें नाकारून, त्याच्या जागीं कोणत्यातरी कल्पित सत्याची म्हणजे असत्याची प्रतिष्ठापना करण्याचा आग्रह कृष्णमूर्तींनीं कां धरावा ? अशा शंका आपणांला व्यथित करतात. दुसरें कारण असें कीं, 'मी' गेला कीं, देहरक्षणच अशक्य होईल, अशी भीति आपणांला वाटते.

वरील शंकांचें निवारण कोण कसें करणार ? अगोदर 'अधांत्रीं' असें

आपण कशाला म्हणतों, तेंच स्पष्ट नाहीं. एकदां एखाद्या संवयीला बिलगून राहण्याचें अंगवळणीं पडलें कीं, मग ती संवय जरा बाजूला झाली कीं, अधांत्री फेकल्यासारखें वाटतें. खरें 'अधांत्रीं' कशाला म्हणायचें, तें आधीं ठरविलें पाहिजे. 'शरीर अधांत्रीं ठेवून जगा,' असें कृष्णमूर्ति सांगत नाहींत. मनाला वाटणारा अधांत्रीपणा हा वस्तुस्थितीला धरूनच असतो, असेंहि नाहीं. सिगारेटचें व्यसन ज्याला चांगलें जडलें आहे, त्याला एक ताससुद्धां सिगारेटशिवाय राहणें अशक्य वाटतें. त्याच्या शरीराची ती गरज नसते. पण त्याच्या मनाला सिगारेटचा आधार सतत लागतो. सिगारेटच्या आस्वादाच्या खुंटीला त्याचें मन सदैव टांगलेलें असतें. त्या खुंटीचा आधार सुटला कीं, मन डळमळूं लागतें; व जीवनांत पोकळी निर्माण होते. त्या पोकळींत राहण्यास मन नकार देतें. अगदीं असाच प्रकार 'मी' च्या व्यसनाचा आहे. दुसरें एक उदाहरण घेऊं. सरळ रेषेंत शंभर फूट अंतर चालत जाण्यास आपणांला सांगितलें, व आपल्या पदन्यासाच्या दोन्ही बाजूंला खडूनें रेषा मारल्या तर असें दिसून येईल कीं, फारतर फूट-सव्वाफूट रुंदीचा रस्ताच आपणांला पुरतो. पण तेवढ्याच रुंदीची फळी तयार केली व तिची दोन्हीं टोंकें खूप उंच अशा दोन ठिकाणीं अशा तऱ्हेनें ठेवली कीं, दोन्ही बाजूंची जमीन फारच खोल अशी आहे, तर त्या फळीवरून चालत जाण्याचें आपणांला जमेल का? मुळींच नाहीं. "आपण पडूं" अशी मनांत वाटणारी भीति, एवढें एकच कारण येथें आहे. केवळ या भीतीमुळें (जागा कमी पडली म्हणून नव्हे) आपले पाय लटपटूं लागतील. ही भीति निव्वळ विचारांतून (thinking) निर्माण होते. कारण, धोका पत्करण्याला आपलें मन तयार नसतें. मनाचा एकच उद्योग सतत सुरू असतो. टेकायला, गच्च धरून ठेवायला, कांहीं आधार आहे कीं नाहीं हेंच आपलें मन सदैव पाहात असतें.

'मी'चा आधार सुटला कीं, आपलें जीवन 'अधांत्री' होईल व मग तें कोसळणार नाहीं का? हा एकच प्रश्न अध्यात्मविचारांत पडलेला माणूस विचारीत असतो. 'मी' कायम ठेवून अध्यात्माकरतां वाटेल ते कष्ट सोसण्याची त्याची तयारी असते. पण हे सर्व कष्ट 'मी'लाच पुष्ट करतात, व 'मी'चेंच समाधान करतात; आणि 'मी' नाशाकरतां तर अध्यात्माचा अवतार आहे.

'मी'ची जाणीव आहे म्हणून 'मी' हा जागेवर खरोखरच आहे, असें आपण म्हणतों. पण 'मी' ची जाणीव म्हणजे तरी नक्की काय आहे? या प्रश्नाचा पिच्छा पुरविला तर कदाचित् 'मी' हीहि एक कल्पनाच आहे कीं काय, याचा निर्णय लागेल. प्रथमदर्शनींच असें आढळतें कीं, **मला कांहींतरी होत असल्याशिवाय 'मी' अनुभवास येत नाहीं.** शारीरिक अथवा मानसिक, कोणतीहि क्रिया चालू नसतांना 'मी'चा भास होत नाहीं, अशा निष्क्रिय कालांतसुद्धां माझें

जीवन चालूंच असतें. यावरून प्राणाचें स्पंदन संपलें कीं, जीवन जसें संपतें, तसें 'मी' च्या स्पंदनाचें दिसत नाहीं. आपल्या जीवनांत क्वचित् का होईना, पण असे कांहीं क्षण येतात कीं, जेव्हां देह जिवंत असतो पण 'मी' चा भास होत नाहीं. "मी स्वतःला अगदीं विसरून गेलों," असें कांहींतरी वर्णन आपण त्या अवस्थेचें करतों. हे दुर्मिळ क्षण काय दाखवितात ? 'मी' हा जीवनाचा अविभाज्य असा भाग कदाचित् नसावा, असेंच ते दाखवीत नाहींत काय ? आणखी एका तऱ्हेनें या प्रश्नाकडे पाहतां येईल. कालचा 'मी' आज जसाचा तसाच असतो काय ? काल मी दुःखी असलों तर आज कदाचित् आनंदी असेन; निदान कालच्यापेक्षां आज मी कमी दुःखी असण्याचा संभव आहे. काल मी कसल्यातरी काळजीनें ग्रस्त होतों, पण त्याच मला आज कसलीहि चिंता नाहीं. स्वच्छंदी पक्ष्यासारखें कुठेंहि भरारी मारून उडून जावें, असा उत्साह आज माझ्या मनांतून ओसंडत आहे, असा अनुभव आपल्याला येत नाहीं काय ? या अनुभवांचा अर्थ काय होतो ? हीं जीं स्थित्यंतरें 'मी'मध्यें होतात त्यांतून निष्कर्ष काय निघतो, हें पाहावयास नको काय ? काल ज्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा माझा 'मी' करीत होता, तो आज कोठें गेला ? आज तो जागेवर दिसत नाहीं. कारण आजच्या 'मी' ला, निराळ्याच वस्तूचें आकर्षण वाटत आहे. हें असें कां व्हावें ?

कालच्या इच्छा आज होत नाहींत, व आजची आकांक्षा उद्यां राहात नाहीं, हें अगदीं स्पष्ट दिसत असतांना एकाच कायम असलेल्या 'मी' ला, या भिन्न वासना वेळोवेळीं होतात, असें आपण धरून चालतों. एकाच बुंध्याला एकामागून एक वासनांच्या नव्या फांद्या फुटतात, असें आपण मानतों. याचें कारण असें दिसतें कीं स्मृति आपली फसगत करते. काल माझ्या 'मी' ला ज्या वासना होत्या, त्यांची स्मृति आज असल्यामुळेंच हा सर्व अनर्थ होतो. आज माझ्या वासना जरी अगदीं निराळ्या असल्या तरी त्या, कालच्या वासनांनाच मी जोडून घेतों. कांहीं वेळां तर दोहोंचें मिश्रण मी करतों, अथवा कालच्या वासनेच्या (म्हणजे तिच्या स्मृतीच्या) मदतीनें मी आजच्या वासनेचा आकार बदलतों; अगर ती ग्राह्य का अग्राह्य हें ठरवितों. माझा एकच खटाटोप सदैव चालू असतो. तो हा कीं, विचार अगर वासना जरी दिवसागणिक अथवा तासागणिक बदलत असल्या तरी जन्मापासून आजपर्यंतचा 'मी' मात्र एकच आहे; त्यांत यत्किंचितहि बदल झालेला नाहीं, असें मी स्वतःला व दुसऱ्यांना हरतऱ्हेनें सारखें बजावीत राहतों. माझ्या सर्व खटपटी, लटपटी एकाच खुंटीला टांगलेल्या असतात. ती खुंटी म्हणजे ज्या नांवानें मी स्वतःला ओळखतों व इतरहि ओळखतात, त्या नांवाचा एवंगुणविशिष्ट 'मी'. या 'मी'च्या पायावरच जीवनाची सबंध इमारत उभी आहे, अशी कल्पना आपण करून घेतली आहे. साहजिकच यामुळें आपणांला असें वाटतें कीं, हा पाया

काढून घेतला कीं इमारत एकदम खालीं कोसळेल. अधींत्रीपणाची भीति ही अशा प्रकारची आहे.

'मी' चें अस्तित्व गृहीत धरूनच आपल्या सर्व विचारप्रणालि व कार्य-पद्धति जन्माला आलेल्या आहेत. किंबहुना, 'विचार अथवा कार्य हा 'मी' च करणार, दुसरें कोण करणार?' असें आपणांला वाटतें. शरीराला थंडी वाजूं लागली कीं, तें हात लांबवून पांघरूण ओढून घेतें, तसें कर्तृत्व (आणि म्हणून, अस्तित्व) 'मी' चें असल्याखेरीज सुखसंपादन अथवा दुःखाचें निवारण कोण करणार, असें आपल्या मनाला वाटतें. सुख अगर दुःख जीवनांत नाहींच असें जोंपर्यन्त आमच्या अनुभवास येत नाहीं, तोंपर्यंत 'मी' नाहीं असें कसें म्हणावें? खरोखरच हें कबूल केलें पाहिजे कीं, **सुख अगर दुःख ही वस्तु 'मी' खेरीज अनुभवितां येणार नाहीं. पण या तीनही वस्तु असत्य असण्याचा संभव, आपण दृष्टीआड कां करावा?** कोणतीहि वस्तु समोर आली कीं, प्रथम तिचें दर्शन डोळ्यांना होतें. तिचे रंगरूप डोळे ग्रहण करतात. खरें पाहिलें असतां डोळ्यांचें अथवा शरीराचें काम येथें संपलें. पण दुसऱ्याच क्षणीं मन आपला उद्योग सुरू करतें. या मनावर आरूढ झालेला 'मी,' ती वस्तु कोणती आहे, तिचें नांव काय आहे, तिचा वर्ग कोणता आहे, वगैरे गोष्टींचा तपास घेऊं लागतों. ती वस्तु मला उपयोगाची अगर निरुपयोगी, मला हवी वाटणारी अगर नको वाटणारी, यांपैकीं कांहींतरी आहे असा निर्णय, हा 'मी' या दुसऱ्या क्षणांतच घेऊन टाकतो. हा निर्णय झाल्यानंतर, त्याला अनुसरून आपण हवे ते उद्योग सुरू करतों. पण हा निर्णय दोन गोष्टी गृहीत धरून केलेला असतो. पहिली गोष्ट ही कीं, 'मी' ला जें वाटतें तें निदान त्या क्षणापुरतें सत्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे खुद्द 'मी' हेंच एक सत्य आहे.

वरील निर्णय झाल्यानंतर म्हणजे वस्तु प्रिय अथवा अप्रिय हें ठरल्यानंतर 'मी' काय करतो, हें पाहण्यासारखें आहे. वस्तु प्रिय असली तर तिचा ताबा कसा मिळवितां येईल, ही विवंचना सुरू होते. तिची संगति, शक्य तेवढा अधिक काळ मला कशी उपभोगता येईल, हा विचार चित्तांत सुरू होतो. पण या सुखद वस्तूची संगति म्हणजे तरी काय? त्या वस्तूचें प्रथमदर्शन होतांच माझ्या स्मृति-यंत्रावर तिचा जो ठसा उमटलेला असतो, त्याची पुनरावृत्ति करीत राहणें, यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं! अर्थात् ही पुनरावृत्ति चालूं असतांना, त्या वस्तूच्या प्राप्ती-करतां अथवा तिचा वियोग होऊं नये याकरतां, ज्या कृति कराव्या लागतील त्यांचाहि विचार माझ्या मनांत चालूं असतो. पण माझें मुख्य लक्ष, त्या गत अनुभवाच्या पुनरावृत्तीकडे असतें. वस्तु अप्रिय असली तरी पुनरावृत्तीचा उद्योग सुरूच राहतो. मात्र तिचा प्रकार थोडा निराळा असतो. "नको त्या वस्तूचें दर्शन,"

असा मंत्र म्हणत म्हणत, मन त्याच दृश्याची उजळणी आंतल्या आंत करीत राहतें; व तें दुःख टाळण्याकरतां कोणत्या कृति कराव्यात याची योजना ठरवीत बसतें.

पण वस्तु प्रिय अगर अप्रिय, सुखद अथवा दुःखद, हें ठरतें कशांतून ? पूर्वी केव्हांतरी त्या वस्तूसारख्या वस्तूचा जो ठसा स्मृतियंत्रावर उमटलेला असतो त्यांतून. त्या वस्तूमध्यें सुख देण्याचें का दुःख देण्याचें सामर्थ्य आहे, हें त्या वस्तूकडे पाहून मी ठरवीत नाहीं. तर त्या वस्तूची स्मृति माझ्या कानांत जें सांगते तें ऐकूनच मी माझा निकाल देतों. या निकालाच्या आधारावर माझ्या सर्व कृति अवलंबून ठेवण्यांत मी केवढी चूक करतों, हें माझ्या ध्यानांतच येत नाहीं. अशा तऱ्हेनें, गत अनुभवाची स्मृति सांगेल तसें वागल्यामुळें, मी भूतकालांतच सारखा जगत राहतों. चालू क्षणांत जें काय घडतें त्याचा अर्थ भूतकाल मला सांगणार ! असा प्रकार सुरू झाल्यावर, खऱ्या जीवनापासून माझी संपूर्ण फारकत होणार, हें उघड आहे क्षणोक्षणीं घडणाऱ्या नव्या घटनांकडे पाहणारे माझे डोळे, एका अर्थानें मृत असतात. संपूर्ण मृत नव्हे, पण त्यांच्या अंगीं कसलेंतरी विपरीत दर्शन घडविण्याचें सामर्थ्यमात्र असूं शकतें.

वस्तुदर्शनाकरतां सर्व लोक हीच दृष्टि वापरतात, म्हणून वरील अनर्थ लक्षांतहि येत नाहीं. पण आजूबाजूचे लोक काय करतात इकडे लक्ष न देतां, सूक्ष्म आत्मनिरीक्षण केलें तर, वस्तु दिसतांच तिची प्रतिमा (image) भूतकालांतून वर कशी येते, हें लक्षांत येतें. कृष्णमूर्ति जेव्हां "अवधानपूर्वक पाहा (be aware)" असें म्हणतात, तेव्हां त्यांना "या प्रतिमेकडे पाहा," असें म्हणावयाचें असतें. आपण एखाद्या वस्तूकडे पाहतों, तेव्हां पहिल्या क्षणांतच त्या वस्तूची प्रतिमा निर्माण होते. समोर मोरासारखा पक्षी दिसतांच एकदम "हा एक सुंदर पक्षी आहे तो मला हवासा वाटतो. त्याच्याकडे डोळे भरून मला पाहूं द्या," असें आपलें मन म्हणू लागतें; व या प्रतिक्रियेला अनुरूप अशी कृति आपल्या हातून घडूं लागते. वस्तु दिसली कीं, तत्काळ प्रतिमेची उत्पत्ति व त्या प्रतिमेच्या मार्फतच ती वस्तु पाहणें, अशी आपल्या जीवनाची रीत आहे. प्रतिमा उत्पन्न झाली ही जाणीवहि न होतां, तिला धरून आपण पुढें चालू लागतों. कृष्णमूर्तींचें म्हणणें असें आहे कीं, नीट लक्ष दिलें तर प्रत्येक वस्तुदर्शनाच्या वेळीं, ही प्रतिमा मध्यें येते हें लक्षांत येऊं शकेल; तसेंच वस्तूचें खरें स्वरूप या प्रतिमेकडून झांकाळलें जातें, हेंहि ध्यानांत येईल. हवासा वाटणारा एक पक्षी म्हणून जेव्हां तुम्ही मोराकडे पाहतां, तेव्हां खरा मोर अगर मोराचें खरें स्वरूप तुम्हांला दिसतच नाहीं, हें **मोर पाहतांना** लक्षांत येणें हा सावधानतेचा (awareness) पहिला भाग होय.

वर वर्णन केल्याप्रमाणें, प्रतिमा भूतकालांतल्या अनुभवांच्या स्मृतीमुळें निर्माण होते, हें उमजणें, हा दुसरा भाग होय.

सावधानतेची यापुढची अवस्था फार महत्त्वाची आहे. असत्य अशा भूत कालांतून मी प्रतिमा निर्माण करतों, व तीच सत्याच्या आड येते, असें एकदां का मला समजलें कीं, मी मग त्या प्रतिमेचा दुःस्वास करूं लागतों हरतऱ्हेनें या प्रतिमेचा विध्वंस केला पाहिजे, असें मला वाटूं लागतें. प्रत्येक वेळीं ही प्रतिमा पुढें येते, व प्रत्येक वेळीं मी ती दूर सारूं लागतों. हा जो संघर्ष निर्माण होतो तो नीट समजून घेतला पाहिजे. वरवर पाहिलें असतां, असत्याचें निर्मूलन हें स्वागतार्ह वाटतें. पण कोणताहि संघर्ष उपद्रवालाच जन्म देतो. अगोदर असें कीं, 'नेमेचि येतो मग पावसाळा' या पद्धतीनें स्मृतियंत्रांतून आपोआप निर्माण होणारी प्रतिमा, म्हणजे प्रतिमा निर्माण करण्याची मनाची खोड, नष्ट करूं म्हटल्यानें नाश पावत नाहीं. तिच्याबद्दल कोणतीहि कृति जाणूनबुजून केली कीं, संघर्ष वाढीसच लागतो. मग मन दुसरीकडेच धांवूं लागतें, व या तापांतून निवाऱ्याचें स्थान शोधूं लागतें. एकदां का पलायन (escape) करायचें मनानें ठरविलें कीं, मग त्याला अंत राहात नाहीं. मनाचें हें धांवणें अक्षरशः सैरावरा असेंच असतें. एखादें जनावर गोठ्यांतून सुटलें कीं जसें या हिरवळीजवळ थांब, त्या गंजीपाशीं थांब, असें करीत वाटेल तिकडे भरकटत जातें, तसेंच आपल्या मनाचें होतें. व्यसनें, समाजांत चालू असलेले अनेक उद्योग, हीं संघर्षानें अस्वस्थ झालेल्या मनाला गुंतविण्याकरितां तयारच असतात. पूर्वानुभवांतून वर येणारी प्रतिमा सत्याच्या आड येते, एवढें समजून भागत नाहीं. तर तिच्या उपद्रवामुळें मनाला येणारा उबगहि समजून घेतां आला पाहिजे. हा उबग पाय रोवून बसला कीं, मग धडगत नाहीं. त्यामुळें मनाची वर दर्शविल्याप्रमाणें जी धांवाधांव होते, तीहि न झाली पाहिजे. म्हणजे, हा उबग कसा येतो, हें अलिप्तपणानें पाहतां आलें पाहिजे. **प्रतिमेबद्दल मनांत येणारा उबग, अथवा ती नष्ट करण्याची होणारी इच्छा म्हणजे एक निराळी प्रतिमाच आहे, असें कृष्णमूर्ति म्हणतात.** या दोन प्रतिमांचे दरम्यान युद्ध सुरू झालें तर त्याचा अर्थ असा होतो कीं, मनाच्या एका तुकड्यानें दुसऱ्या तुकड्याशीं वैर मांडलें आहे. हें असें होतें अथवा होऊं पाहतें एवढी—आणि फक्त एवढीच—जाणीव असणें यालाच कृष्णमूर्ति सावधान स्थिति (awareness) म्हणतात :—

"I am aware of your brown shirt and the colour of the scarf. I am aware of the image that I have built about you. I am aware this image is preventing me from coming directly in touch with you, seeing exactly what you are, or that the image which I have about myself prevents me from looking at myself. I want to get rid of that image because I have heard you say, self-know-

...४९३५९ संदर्भ
...२१८८ १/११/६२

ledge is very important. Therefore, I don't want to have an image about myself; I want to get rid of it. And when I want to get rid of it, then *there is a conflict between the former image and a new image which I have created.* You are following all this? So I am now in conflict. And if it is a pleasurable conflict I want it to go on. If the conflict promises a certain pleasure at the end of it, I want it to go on. And if that conflict breeds pain I want to get rid of pain. *So I am aware of the whole pattern of what is taking place.*"

(*Talks and Dialogues Saanen* (1967) p. 235).

पण सावधान स्थितीचें जें येथपर्यंत वर्णन केलें आहे, तेंहि अपुरेंच आहे. स्मृतीच्या कोठारांतून प्रतिमा उत्पन्न होतात, त्या असत्य असतांनादेखील सत्यता झांकण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें व त्यांच्यामागें लागल्यानें मनुष्य वाहवत जातो, येवढेंच समजून भागत नाहीं. 'या इकडच्या बाजूस उभा राहून, सावधान (aware) होऊन पाहणारा आहे तरी कोण' याचा पुरा उमज पडल्याखेरीज सावधानता आली, असें होतच नाहीं. प्रतिमा कोठून येते व तिचा अडथळा कसा होतो, हें ज्या क्षणाला लक्षांत येऊं लागतें त्याच क्षणाला, वस्तूकडे पाहण्याच्या निमित्तानें प्रतिमेकडे पाहणारा आहे तरी कोण, हेंहि दिसलें पाहिजे. प्रतिमा बाजूला सारण्याकरतां दुसरी प्रतिमाच पुढें येते, हें आपण वर पाहिलें आहे. कृष्णमूर्तींचें म्हणणें असें आहे कीं, जर सूक्ष्मदृष्टीनें आपण पाहूं लागलों तर **पाहणारा** (observer) **हादेखील एक प्रतिमाच आहे**, असें दिसेल. पाहणारा म्हणून खरोखरच कुणी जागेवर आहे, का तीहि एक कल्पनाच आहे? पाहणाऱ्याच्याच भूतकालांतून प्रतिमा त्याच्यापुढें उभ्या राहतात व त्याला उपद्रव देतात. त्यांचा निर्माता असा हा जो पाहणारा आहे, तो तरी कुठून आला? 'ज्या प्रतिमा डोळ्यांपुढें दिसतात, त्यांचा या पाहणाऱ्याशीं कांहीं संबंध आहे का?' असा प्रश्न उत्पन्न करून त्याचा पिच्छा आपण पुरवूं लागलों तर असें आढळून येईल कीं, या प्रतिमा आणि त्या पाहणारा एकाच घटकद्रव्याचे बनलेले आहेत. प्रत्येक प्रतिमेबद्दल जी प्रतिक्रिया (reaction) आपल्या मनांत होते त्या सर्व प्रतिक्रियांचा मिळून एक गठ्ठा तयार होतो व तोच "पाहणारा" या संज्ञेस पात्र होतो. प्रतिमा आणि पाहणारा यांचा हा अन्योन्यसंबंध तर्कानें सिद्ध करून कांहींच उपयोग नाहीं. **पण तो संबंध खरोखरच तसा आहे याची प्रत्यक्ष जाणीव, अनुभवाच्या वेळीं होणें जरूर आहे.** ती तशी झाली तरच ती खरी सावधानता (awareness) होय. पुढील उताऱ्यांत, हा मुद्दा अत्यंत प्रभावीपणानें मांडलेला आहे :—

"Now, that awareness again goes on deeper. Who is the observer? Is the observer different from the images? Is not the

observer another image ? So one image, as the observer, observes the several images round him or in him. No ? This observer is really the censor, the person who says " I like ", " I don't like," " I like this image. so I am going to keep it ", " the other image I don't like, so I want to get rid of it.' But the observer is put together by the various images which have come into being, *through the reactions to the various images.*"

(*Talks & Dialogues, Saanen* (1967) p. 239).

एकूण प्रकार असा दिसतो कीं, वस्तु दिसतांच ती हवी अगर नको असें वाटूं लागतें. नुसती वस्तु दिसली, असें कधीं आपल्याला माहीतच नाहीं. कोणत्याच वस्तूचें अंगभूत सौंदर्य आपल्याला मुळीं प्रतीतच होत नाहीं. जन्मापासूनचे संस्कार (व शिवाय जन्माआधींचेदेखील पितृदत्त व वंशदत्त संस्कार) हा परिणाम घडवितात. संस्कारांच्यामुळें होणारा हा परिणाम, असत्याकडे आपणांला नेत आहे अशी जाणीव होतांक्षणींच ते संस्कार निष्प्रभ होतात. मग त्यांचा अंतराय, वस्तूच्या सत्य स्वरूपापासून आपणांला दूर ठेवूं शकत नाहीं. ही जाणीव ठेवणें म्हणजेच नुसतें पाहणें. वस्तूकडे नुसतें पाहणें; तसेंच संस्कार काय करतात याकडेहि नुसतें पाहणें. हें नुसतें पाहणें, जसें वस्तूकडे तसेंच पाहणाराकडेहि सुरू झालें तर त्या वेळीं पाहणारा कोणी असतो काय ? संस्कार जोंपर्यंत प्रभावी असतात, तोंपर्यन्तच पाहणारा, हवें–नको म्हणणारा, ज्याला आपण 'मी' म्हणतों तो, जागेवर असतो. **संस्कारांतूनच प्रतिमा पुढें येते, व प्रतिमा पाहणाराहि जन्माला येतो.** पण सावधानतेच्या स्पर्शानें दोन्हीहि वितळून जातात, व नुसतें पाहणेंच शिल्लक राहतें. या अवस्थेंत कसलाहि संघर्ष किंवहुना कोणतीहि मागणी (craving or demand) चित्तांत असणें शक्य नाहीं. वरील प्रवचनांतच पान २४६ वर कृष्णमूर्ति म्हणतात :–

"Then when the observer is the observed image, then there is no conflict between himself and the image. He is that ! He is not separate from that. Before, he was separate and took action about it, reacted to it. But when the observer realises he is that, there is no like and dislike. "

सावधानता ही अशा तऱ्हेनें 'मी'च्या प्रांतांतून, ' मी 'रहित अशा चैतन्यमय अवस्थेंत आपणांला नेऊन सोडणारा पूलच आहे म्हणाना. पण हा पूलहि त्या चैतन्यमय अवस्थेचाच एक भाग आहे. यामुळें त्याचें महत्त्व विशेष आहे. **कृष्णमूर्तींची जगाला देणगी म्हणजे हा सावधानतेचा पूलच होय.**

द्रष्टा व दृश्य असें जें द्वैत मनांत नेहमीं निर्माण होतें त्याचा निरास कसा होणें शक्य आहे, हें कृष्णमूर्तींनीं त्यांच्या अभिनव पद्धतीनें दाखविलें आहे. हें

द्वैतच जीवनांत असमाधान व संघर्ष निर्माण करतें. द्रष्टा निर्माण झाला कीं, त्याच्या ठिकाणीं कोणतातरी हेतु (choice) असतो; व तो हेतुच सत्य दृष्टीआड करतो. वरील द्वैत जाऊन, दिसणारी प्रतिमा ही द्रष्ट्याचाच एक भाग आहे, हें ज्या अवस्थेंत उमजतें ती अवस्था, क्षणोक्षणीं सारखी होत राहणें जरूर आहे. त्या अवस्थेपासून आपण ढळलों कीं, अनवधानानें भ्रमाच्या गर्तेंतच आपण पडलों, असें समजण्यास हरकत नाहीं. पण वरील अवस्था एकदां प्राप्त झाली कीं, कार्य संपलें, असा भाग जसा नाहीं, तसाच अनवधानानें कायमची हानि झाली, असाहि प्रकार येथें नाहीं. अनवधान होतांना अथवा झाल्यावर त्याच्याकडे अवधान देतां आलें कीं, आपण वर सांगितलेल्या पुलावरच जातों. कृष्णमूर्तींच्या शब्दांत सांगावयाचें तर If you are aware when you are inattentive, then inattention is turned into attention. या बाबतींत "नेहाभिक्रमनाशोऽस्ति, प्रत्यवायो न विद्यते" हे गीतेचे शब्द तंतोतंत लागू पडतील.

सध्याचें आपलें जीवन म्हणजे अनवधानाची प्रदीर्घ अशी अवस्था आहे. कोणत्याहि वस्तूशीं, घटनेशीं अथवा समस्येशीं प्रत्यक्ष संबंध न ठेवतां, बेसावधपणानें आपण तदधिष्ठित अशा भ्रमाशींच संपर्क ठेवतों. प्रत्येक अनुभवाच्या वेळीं, नवा भासणारा असा कोणतातरी भ्रम आपल्या चित्ताचा कबजा घेतो. पण सारे भ्रम– मग ते सुखद असोत कीं दुःखद असोत–गतानुभवाच्या स्मृतींतूनच उत्पन्न होतात. प्रत्येक क्षणाला भ्रमाचें हें आवरण चित्तावर पडू लागतांच, तत्काळ तें झटकून टाकतां आलें पाहिजे. हयगय अथवा चालढकल (postponement) झाली कीं, तो भ्रम मानगुटीस बसलाच म्हणून समजावें. म्हणूनच सावधानता आहे कीं नाहीं, इकडे आपलें लक्ष रात्रंदिवस आणि सतत पाहिजे. या अर्थानेंच कृष्णमूर्ति अशा सावधानतेचा आग्रह धरतात. अखंड म्हणजे एकसारखी सलग (continuous) अशी अवस्था नव्हे. ही अखंडता, सारख्या वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहासारखी आहे.

"अखंड सावधानता म्हणजे काय?" या प्रश्नाचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न आपण येथवर केला. कृष्णमूर्ति जेव्हां, माझे शब्द सावधानचित्तानें ऐका, असें श्रोत्यांना म्हणतात तेव्हां त्यांना काय अभिप्रेत असतें, हें पाहण्यापासून या विषयाला सुरुवात केली. त्यांना पाहिजे तसें ऐकणें (act of listening) सुरू झाल्यावर चित्ताची जी अवस्था होते, ती सावधानतेचा पहिला धडा होय. अशा तऱ्हेनें सावधानतेच्या सरहद्दीवर प्रवेश झाल्यानंतर पुढें आपला प्रवास कसा व्हावयास पाहिजे, हें समजून घेण्याकरतां कृष्णमूर्तींच्या दोन प्रवचनांचा आधार आपण घेतला. पहिल्या प्रवचनांत कृष्णमूर्तींनी, श्रोत्यांचें सारें लक्ष एकाच मुद्द्यावर केंद्रित केलें आहे. 'क्षणोक्षणीं बदलणारें जीवनाचें स्वरूप,' हा तो मुद्दा होय. 'अत्यंत वेगानें वाहणाऱ्या जीवनप्रवाहांत घडणाऱ्या हरएक नवीन घटना समजून

ध्यावयाच्या असल्या तर आपलें सारें लक्ष चालू घटनेवरच (present fact) पाहिजे, ही खूणगांठ मनाशीं पक्की नसली, तर चित्त कसें व कोठवर भरकटत जातें; व समस्येचें स्वरूप केवढें अवाढव्य व किती गुंतागुंतीचें होतें, हें दोन उदाहरणांच्या मदतीनें आपण पाहिलें. पूर्वानुभवांचा उपद्रव (interference of the background) किती प्रमाणांत आपण चालूं देतों, किंबहुना या उपद्रवालाच आपण आपलें जीवन कसें मानतों, हें कृष्णमूर्तींनीं अगदीं स्पष्ट केलें आहे. **मानवी जीवनांत एकच सत्य आहे. ते म्हणजे चालू क्षण.** या चालू क्षणांतच जगलें पाहिजे, अशी तीव्र तळमळ अगोदर उत्पन्न झाली तरच तरणोपाय आहे. नाहींतर सगळें सांगणें व ऐकणें व्यर्थच आहे. मनांत ही अशी तळमळ उत्पन्न होणें, म्हणजेच **सावधानतेची सुप्रभात होय.** ही तळमळ वाटूं लागते, न लागते तोंच, अधांत्री-पणाच्या भीतीनें आपण माघार कशी घेतों, आधार म्हणून ज्या 'मी' ला आपण कवटाळतों तो 'मी,' खरोखरच जागेवर आहे का, याचा विचार या लेखाच्या सुरुवातीला केला. 'मी' हाच आपली सावधानतेशीं गांठ पडू देत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. दुसऱ्या प्रवचनांत कृष्णमूर्ति सावधानतेचा विषय आणखी पुढें नेतात. पूर्वानुभवाचा उपद्रव नक्की कसा होतो, हें त्याचे अनेक पापुद्रे उलगडून दाखवून ते तपशीलवार सांगतात. या उपद्रवाची कहाणी, 'प्रतिमा' (image) हा त्यांचा आवडता दृष्टांत वापरून ते आपल्याला समजावून देतात. ही कहाणी म्हणजे आपल्या जीवनांत रोज घडणारी सत्यकथा आहे कीं नाहीं, हें ज्याचें त्यानें स्वतःलाच विचारून पाहावें.

चालू घडींतल्या सत्यावर सारें लक्ष केंद्रित करून, मनाचे खेळ संस्कारामुळें कसे होतात, हें तटस्थपणानें पाहणें म्हणजे मनाची सावधान स्थिति (awareness) अशी व्याख्या करतां येईल. पण व्याख्या करणें अथवा समजून घेणें, हाहि बुद्धीचा अथवा मनाचा एक खेळच आहे. मनापासून अथवा स्मृतियंत्रापासून **प्रत्यक्ष** (actually) अलग होतां आलें पाहिजे; व त्या **अलग अथवा शांत अवस्थेंतून,** मनाचे वर वर्णन केलेले सर्व व्यापार कसे होतात, यांचा संपूर्ण नकाशा उघडा करून त्याकडे पाहतां आलें पाहिजे. "हा नकाशा पाहा," एवढेंच कृष्णमूर्ति सांगतात, असें वाटतें. मग जीवनप्रवाह खंडित न होतां प्रतिमा (images) आल्याच तर येतील, पण त्यांचा उपद्रव (interference) होणार नाहीं.

* * *



पंधरा

यंदां कृष्णमूर्ति असें कां बोलले ?

कृष्णमूर्तींनीं गेल्या फेब्रुवारींत मुंबईंत जीं व्याख्यानें दिलीं, त्यांचा रोख अध्यात्मक्षेत्रांतल्या एका विशिष्ट प्रवृत्तीवर होता. सगळीकडे एखाद्या ठराविक रोगाची सांथ पसरली असतांना, डॉक्टरानें त्या सांथीवरच सर्व लक्ष केंद्रीभूत करावें तसें मला तीं व्याख्यानें ऐकतांना वाटलें. सध्यां समाजांत काय चाललें आहे, याचें कृष्णमूर्तींना अचूक ज्ञान असतें. म्हणूनच त्यांच्या प्रवचनांना यंदां एक विशेष प्रकारची धार होती. (दुसरें महायुद्ध संपल्यानंतर कृष्णमूर्ति जेव्हां भारतांत आले होते तेव्हांहि त्यांच्या वक्तव्याला अशीच विलक्षण धार आली होती, असें माझ्या कांहीं मित्रांनीं सांगितलें.) यंदां मात्र असें दिसलें कीं, एका विशिष्ट प्रवृत्तीशीं कृष्णमूर्ति झगडत आहेत. ती प्रवृत्ति मुळापासून उखडून टाकलीच पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाहीं, असें त्यांच्या मनानें घेतलें आहे.

' दुसऱ्यानें सांगायचें व आपण ऐकायचें ' ही ती प्रवृत्ति होय. भारतीयांत ही प्रवृत्ति सर्वच क्षेत्रांत इतक्या प्रमाणांत दिसते कीं, बोलतां सोय नाहीं. स्वतंत्र विचार कोणी करील तर शपथ ! (आपण ज्याला स्वतंत्र व नवा विचार म्हणतों तो तसा क्वचित्च असतो.) मला तर वाटतें कीं, ' स्वतंत्र विचार ' हा पदार्थ भारतांत अत्यंत दुर्मिळ झाला आहे; आणि म्हणूनच कीं काय कोण जाणे, त्याची गरजहि भासेनाशी झाली आहे. स्वतंत्र विचाराविषयीं अनास्था व उसनवारीचो

होस हाच कृष्णजींच्या यंदांच्या व्याख्यानसत्राचा प्रमुख विषय होता, असें म्हटलें तरी चालेल.

पण स्वतंत्र विचाराविषयीं तरी एवढा आग्रह कां ? कृष्णजींचें म्हणणें असें कीं, त्याशिवाय सत्य घटनांशीं आपली गांठच पडत नाहीं. नुसतें संघर्षांत बुडून राहणें म्हणजे कांहीं जीवन नव्हे. हा बाहेरचा व आंतला संघर्ष सध्या इतक्या पराकोटीला पोहोंचला आहे कीं विचारता सोय नाहीं. (याबद्दल तर कोणाचेंच दुमत नाहीं.) पण या संघर्षांतून मुक्त व्हावयाचें असलें तर बाहेरच्या जगांतले व स्वतःच्या मनाचे व्यापार कसे चालतात याचें सत्यज्ञान हवें. हें सत्यज्ञान मिळविण्याकरतां एका कलेची जरूर आहे. त्या कलेला, ' पाहण्याची कला ' (an art of looking at life or facts) असें नांव देतां येईल.

कृष्णमूर्तींनीं मग असा प्रश्न विचारला कीं, " तुम्ही कम्युनिस्ट म्हणून, हिंदु म्हणून, अथवा मुसलमान म्हणून जगाकडे पाहूं लागला तर काय तुम्हांला खरें जग दिसेल ? जें तुम्हाला दिसेल त्याचें रूप कल्पनानिर्मित असणार नाहीं का ? तुमचें कम्युनिस्ट अथवा हिंदु मन तें तसें आहे या एवढयाच कारणानें निर्भेळ सत्याचें ग्रहण करण्यास असमर्थ नाहीं का होणार ? हें इतकें उघड असतांना आम्ही ' सत्यान्वेषी ' सुशिक्षित लोकहि गुरु आणि पंथ यांच्यामागें कां लागतों ?" या प्रश्नाचें त्यांनींच उत्तर दिलें कीं " तुम्हांला सुरक्षितता (security) पाहिजे. " सुरक्षितता म्हणजे आपण एका समूहाचे (group) घटक आहोंत, या जाणिवेनें वाटणारी निश्चितता. " आपणाला कोणाचा तरी चांगला आधार आहे. चुका होण्याची भीति नाहीं. आपली जबाबदारी कुणीतरी शिरावर घेतली आहे," अशी खात्री वाटत राहावी म्हणूनच अनुयायीपणाचें वेड या विज्ञानयुगांतहि इतकें वाढीस लागत आहे, असें कृष्णजींना सुचवावयाचें होतें, असें दिसतें.

पण मग पाहण्याच्या कलेचें काय ? आत्मज्ञान, आपल्या मनाचें प्रत्यक्ष ज्ञान करून घेण्याची जी जरुरी आहे, तिचें काय ? पवित्र ग्रंथांतल्या वचनांचा अर्थ समजला तरी पुढें काय ? हा अर्थ समजून घेण्याकरतां ज्या झुंडीच्या झुंडी भारतांत सर्वत्र गोळा होतात, त्यांच्याबद्दल कृष्णजी बोलत असावेत असा मला क्षणभर भास झाला; पण त्यांना मुख्यतः दाखवावयाचें होतें तें असें कीं, यांत गुंतल्यावर स्वतःच्या मनाचे व्यापार तुम्ही केव्हां बघणार ? का बघणारच नाहीं ? जर बघणार असला तर कोणत्या पद्धतीनें तुम्ही आपल्या मनाकडे पाहणार ?

झाडाकडे पाहतांना, त्याचें नांवहि लक्षांत न येतां तुम्ही पाहूं शकतां काय ? असें पाहणें हेंच महत्त्वाचें. कारण, या पाहण्यांतूनच तुम्हांला सत्य गवसूं शकेल. ज्या पाहण्यांतून, ' मला हें आवडलें ' अथवा ' हें मला आवडत नाहीं ' असा निष्कर्ष

मनाच्या आंतल्या बाजूस निघतो, तें खरें पाहणेंच नव्हे असें त्यांनीं ठामपणें बजाविलें. पतिपत्नी हे एकमेकांकडे पाहतात, तेव्हां खरी व्यक्ति त्यांना दिसतच नाहीं. फक्त तिची प्रतिमा (image) त्यांना दिसते. कठोर स्वभावाचा अगर कर्तबगार म्हणून मानमान्यता पावलेला पति, अथवा कजाग अगर आज्ञाधारक पत्नी याच रूपांत एकमेकांना दर्शन होतें. हें काय सत्य पाहणें झालें ? या प्रतिमांचें दरम्यान असणाऱ्या संबंधांत (relationship) खऱ्या प्रेमाची उत्पत्ति कशी होईल ?

या अशा प्रतिमा आपल्या दैनंदिन जीवनांत सारख्या उत्पन्न होत असतात. कारण स्मृतियंत्र हें अव्याहत चालूं असतें. केव्हां प्रकटपणें तर केव्हां प्रकट रीतीनें, तें जें रेकॉर्ड सांचत जातें, त्याला आपण ज्ञान (knowledge) म्हणतों. या ज्ञानांतूनच या प्रतिमा जन्माला येतात; व त्या आपला सारखा पिच्छा करतात. 'ज्ञान' असें नांव वरील संचयाला जरी आपण देतों, तरी त्यांत नवीन असें कांहींच नसतें. भूतकालांतून उचलून घेतलेला तो एक पुंजका असतो. शास्त्रीय ज्ञान अथवा यंत्राबद्दलचें ज्ञानहि अशाच रीतीनें संपादिलें जातें. प्रत्येक वेळीं, भूतकालांतून मिळालेला एक गठ्ठा आपल्याजवळ असतो, व **त्याच्या मदतीनें** आणखी कांहींतरी मिळविलें जातें व त्यांत मिसळलें जातें. संचित ज्ञानाचा उपयोग करून जें मिळविलें जातें, त्याला 'नवीन ज्ञान' असें म्हणण्याचा प्रघात आहे. पण जुन्याच्या माध्यमांतून जें ग्रहण केलें जातें तें यथार्थज्ञान नसतें; व नवीनहि नसतें. हा सिद्धांत बाहेरच्या जगाच्या ज्ञानापेक्षांहि आपल्या मनाबद्दलच्या ज्ञानाला अधिक लागू पडतो; आणि स्वतःच्या मनाचें खरें ज्ञान जर अगोदर झालें नाहीं तर 'सारेंच मुसळ केरांत,' अशी आपली अवस्था होते. जें मन स्वतःला—त्याच्या संपूर्ण क्रियेला—जाणीत नाहीं, तें सदैव गोंधळलेलें असतें; व अशा गोंधळलेल्या मनानें कांहीं जरी केलें तरी तें संघर्ष उत्पन्न करतें. संघर्षानें हैराण झालेलें हें असें मन अध्यात्मज्ञान मिळवूं पाहतें हें एक आश्चर्य आहे.

संवेदनाशील व अत्यंत कार्यक्षम असें मन आपल्याजवळ असल्याखेरीज कसलें अध्यात्म आणि कसला मोक्ष ? मनाला ही अवस्था कशी प्राप्त होईल ? त्याकरतां काय करावें ? कृष्णमूर्ति म्हणाले, "एकच गोष्ट केली पाहिजे. ती ही कीं, स्मृतीमुळें उत्पन्न होणाऱ्या प्रतिमा सत्यज्ञानाच्या आड कशा येणार नाहींत, हें सतत पाहिलें पाहिजे. एकच **मूलगामी प्रश्न** मनाच्या खऱ्या तळमळीनें, तुम्हीं स्वतःला विचारला पाहिजे. **सतत सांचत जाणारें ज्ञान, माझ्या मनाच्या ग्रहणशक्तीला स्पर्श करीत नाही ना ?**" बस्स. हा प्रश्न ज्या क्षणाला तुम्ही विचाराल, त्याच क्षणीं तुमची बुद्धि अत्यंत तल्लख अशी झालेली असेल. तिची संवेदनाशक्ति

इतकी वाढलेली असेल कीं, जीवनांतल्या प्रत्येक घटनेंतलें सत्य तिला सहज वेंचून घेतां येईल.

मला वाटतें कीं, वरील क्षणांत ज्ञान करून घेण्याचें जें काम संवेदना करील तें ज्ञात्याच्या मदतीशिवायच करील. कारण ज्ञाता (observer) हा संचित ज्ञानांतून अथवा त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आवडीनिवडींतून जन्माला येतो. कृष्णमूर्ति पुढें म्हणाले कीं, "येथेंच खऱ्या प्रेमाचा उदय होतो." कुणींतरी विचारलें, "प्रेम म्हणजे काय?" त्या प्रश्नाला कृष्णजींनीं त्या दिवशीं उत्तर दिलें नाहीं. ते म्हणाले, "मी कोण उत्तर देणार? तुम्ही स्वतःच्या मनालाच हे प्रश्न विचारले पाहिजेत. कोणतेंहि सत्य तुम्हांला स्वतःला प्रत्यक्ष सांपडलें तर तें उपयोगाचें. नाहींतर तें असत्यच, नुसती कल्पना."

वरील मूलगामी प्रश्न विचारल्यामुळें आलेली संवेदनक्षमताच खऱ्या प्रेमाचें स्वरूप तुम्हांला दाखवील, असें त्यांना म्हणावयाचें होतें असें वाटतें. विज्ञानानें लावलेले शोध, आधुनिक युगांतली यंत्रकुशलता, यांतलें कांहींच टाकून द्यावयाचें नाहीं; फक्त त्यांचा अडथळा टाळावयाचा. हा मुद्दा कृष्णजींनीं इतका स्पष्ट केला कीं, "स्मृतीशिवाय जगणार कसें? स्मृतीखेरीज व्यवसाय कसा करतां येणार?" हा त्यांच्या प्रतिपादनावर नेहमीं घेतला जाणारा आक्षेप, पहिल्या दिवशींच्या प्रवचनानंतर विरून गेला.

दुसरें प्रवचन त्या मानानें लहान होतें. त्यामुळें पृच्छकांना त्यांचे प्रश्न विचारण्यास वेळ मिळाला. जीवनाकडे आणि मनाकडे पाहण्याची कला म्हणजे नक्की काय, तें श्रोत्यांना समजावें एवढ्याच हेतूनें कृष्णजी बोलत होते. (हा एकच विषय त्यांच्या सर्व व्याख्यानांचा असतो, असें म्हटलें तरी चालेल.) ते म्हणाले, "स्वातंत्र्याचा अर्थ काय समजतां? जेव्हां कोणत्या तरी विशिष्ट गोष्टीपासून तुम्ही स्वतंत्र होऊं पाहतां, तेव्हां ती निव्वळ कल्पना (abstraction) असते. पण जेव्हां मन सर्वच गोष्टींपासून पूर्ण अलग होतें तेव्हांच तें खरें स्वातंत्र्य (actual freedom) उपभोगतें. मला रागापासून मुक्त व्हावयाचें आहे, असा कांहींतरी संकल्प करून भागावयाचें नाहीं. मनाची मुक्तावस्था प्रथम मिळविली पाहिजे. ती कशी प्राप्त होणार? तुम्ही कोणाचे तरी शब्द ऐकतां; आणि त्यांच्या मदतीनें स्वतंत्र होतां येतें कीं नाहीं, हें तुम्ही पाहूं लागतां; पण हें चालणार नाहीं. तुम्हांला स्वतःला एकट्याला, कोणाच्याहि शब्दांचा पडताळा न पाहतां मुक्तपणानें जीवनाकडे बघतां आलें पाहिजे; व खरें खोटें जाणून घेतां आलें पाहिजे." पण मनांत कोणत्या का कारणानें होईना प्रस्तुतापासून दूर जाण्याची प्रवृत्ति सुरू झाली कीं, तें दुर्बल बनतें; नव्हें, तें भ्रमाच्या आहारीं जातें. असें मन क्रांतीला अगदींच निरुपयोगी असतें. कोणतें तरी साध्य अथवा ध्येय डोळ्यांपुढें ठेवल्यानें

एकच गोष्ट प्रथम घडते. ती ही कीं, जे प्रत्यक्ष या क्षणाला आहे, तें मला दिसेनासें होतें. कालांतरानें ध्येय मी प्राप्त करून घेईन, अशी आशा मी बाळगतों. पण या मधल्या काळांत काय घडतें ? परिस्थितींत अनेक बदल होतात; अथवा ज्या तीव्र भावनेनें ध्येयप्राप्तीचा मीं निश्चय केलेला असतो तिची धार बोथट बनते, तिला अनेक फाटे फुटतात. मग मी सुरुवातीस जो रागीट असतो तो तसाच कायम राहतो. कालावर विसंबून राहिल्यानें मनांत कधींच क्रांति घडत नाहीं.

नंतर कृष्णजींना जे प्रश्न विचारण्यांत आले, त्यांतला एक प्रश्न फारच महत्त्वाचा होता. एका जिज्ञासूनें विचारलें, "जीवनांतल्या समस्या सोडविण्याकरतां पुरेशी शक्ति (energy) आमच्याजवळ कशी राहील ?" या प्रश्नामुळें कृष्णजींच्या प्रतिभेचेंच दर्शन श्रोत्यांना घडलें. त्यांनीं अनेक उदाहरणें दिलीं, किती तऱ्हांनीं आपण आपली जीवनशक्ति वाया घालवितों, हें त्यांनीं फारच समर्पक रीतीनें सांगितलें. अनेक प्रकारचे सुखोपभोग, महत्त्वाकांक्षा, चढाओढ, लोकमान्यता, यांच्या मागें लागल्यानें जीवनांत जें द्वंद्व उत्पन्न होतें, मनाच्या आंतल्या बाजूस जो लढा अहर्निश चालू राहतो, त्यामुळें मन क्षीण होतें. जी शक्ति, समस्यांशीं मुकाबला करण्याकरतां व त्यांचा झटपट निकाल लावण्याकरतां आपणांला उपलब्ध झाली असती ती आपण आपल्याच हातांनीं उधळून लावतों, असें त्यांनीं बजावलें. चैतन्याचा अखंड प्रवाह जवळ असतांना, त्याला निरंकुशपणें वाहूं न देतां डबक्यांतलें जीवन जगण्याचा आग्रह माणसानें कां धरावा, असा प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला. आधीं आपणच आपले हात तोडायचे व मग हात कां नाहींत म्हणून ओरडायचें, असाच प्रकार हा दिसतो. मध्येंच एकानें विचारलें, "ईश्वराचा शोध कसा घ्यावा ?" कृष्णजी म्हणाले, "तुम्ही कांहींतरी सारखें शोधीत असतां. तें कां हेंच प्रथम शोधून पाहा." एका शब्दांत सारांश सांगायचा, तर वर्तमानकालांतलें संपूर्ण जीवन समजून घेण्याची कला माणसाला जमली तरच तो खऱ्या अर्थानें स्वतंत्र झाला, असें कृष्णजींना सांगावयाचें होतें.

कृष्णजींचें तिसरें प्रवचन संपल्यावर माझा एक मित्र सहज उद्‌गारला, "हा एक अलौकिक आविष्कार होता ! (It was a performance !") या प्रवचनाच्या वेळीं कृष्णजी व्यासपीठावरून बोलत नसून ते आमच्यांतच बसून, "जीवनाकडे पाहण्याची कला आतां आपण शिकूं या," असें वेळोवेळीं म्हणत आहेत, असा मला भास झाला. मला वाटतें कीं, ते एकदां तसें म्हणाले देखील.

प्रथमच ते म्हणाले कीं, जीवनांत फक्त दोन प्रेरणा (active principles) आहेत. एक भीति (fear) आणि दुसरी सुखाची ओढ (pleasure). कृष्णजी हे दोन्ही शब्द फारच व्यापक अर्थानें वापरतात. मरणाच्या भीतीपासून ते एकले-

पणाचा भीतीपर्यंत, सर्व प्रकारची भयें पहिल्या प्रेरणेंत ते घालतात. माझ्या हातून चूक होत नाहीं ना असें वाटणें, हेंसुद्धां एक प्रकारचें भयच आहे. "भीतीचें निरीक्षण तुम्ही या क्षणांत, इथें बसलेले असतांना कसें करणार ?" असा सवाल कृष्णमूर्तींनीं केला. तुम्ही आपल्या मानसिक स्वास्थ्याकरतां कशावर तरी अवलंबून आहांत कीं नाहीं ? हें आपल्या मनाला विचारून पाहा. हें परावलंबन भीतीपोटींच असतें, हें चटकन् तुमच्या लक्षांत येईल, असें ते म्हणाले. जो आधार तुम्हांला हवासा वाटतो, तो नष्ट झाला तर केवढा भयंकर अनर्थ होईल, अशी चिंता मन सदैव करीत असतें. **हें चिंतन म्हणजेच भीती नव्हे काय ?** समजा, हें चिंतन सुरूच झालें नाहीं; तर भीति नांवाचा स्वतंत्र पदार्थ आपल्या अनुभवाला येईल काय ? एखाद्या जखमेपासून ज्या वेदना होतात त्या मागें झालेल्या वेदना स्मरल्यामुळें अधिक वाढतात. तसेंच कोणतेंहि आजारीपण, त्याचा संभाव्य परिणाम मरणांत होणें शक्य आहे. या सूक्ष्म चिंतनानें, प्रत्यक्ष आहे त्यापेक्षां अधिक गंभीर भासतें. चिंतनच भीतीशीं आपली गांठ घालतें, असें म्हटलें तरी चालेल. हें असें होतें कीं नाहीं याबद्दलची खात्री, **स्वतः जातीनें मनाकडे** पाहिल्याशिवाय कशी होणार ? सुखाबद्दलची ओढहि चिंतनांतूनच निर्माण होते. सूर्यास्ताचा सुंदर देखावा नुसता पाहून आपलें भागत नाहीं. स्मृतियंत्रानें तो रेकॉर्ड केल्यावर तीच प्लेट पुन्हांपुन्हां लागते. **ही पुनरावृत्ति त्या सुखाबद्दल हव्यास उत्पन्न करते.** "सूर्यास्त ज्या क्षणाला पाहिला, त्याच क्षणाला तो संपवितां येणार नाहीं काय ?" असा प्रश्न कृष्णजींनीं जेव्हां केला तेव्हां, हें अगदीं सोपें दिसणारें काम आपणांला कां साधूं नये, असा विचार माझ्या मनांत येऊन मी विषण्ण झालों. मला वाटत होतें कीं, वासनेला स्वतंत्र अस्तित्व आहे. पण स्मृतियंत्राचीं चक्रें नुसतीं फिरत राहण्यांतूनच ती स्वतंत्र भासते व आपल्या मानगुटीवर बसते, हें कृष्णजींनीं जेव्हां दाखवून दिलें तेव्हां मी चकित झालों ! घडत राहणाऱ्या घटनांची नोंद, स्मृतियंत्रानें करूंच नये अशी तर व्यवस्था करतां येत नाहीं. मग हा पेंच सोडवावा कसा ? "स्मृति जें टिपून घेतें, तें माझ्या जीवनांत वरीलप्रमाणें अडथळा होऊन बसत नाहीं ना ?" हा प्रश्न जर मीं स्वतःला तें **रेकॉर्डिंग चालूं असतांना** केला तर मनांत विलक्षण संवेदनाशक्ति येते. एक प्रकारचें नवें सामर्थ्य त्याला येतें; व हें सामर्थ्य तो अडथळा सुरू होण्यापूर्वीच दूर करतें. यापेक्षां दुसरी कोणतीहि क्रिया केली तर ती संघर्षाला जन्म देते, असें कृष्णजी म्हणाले.

मग कृष्णजी, 'प्रेम म्हणजे काय,' या विषयाकडे वळले. कदाचित् पहिल्या दिवशींचा पृच्छक त्यांच्या लक्षांत असावा. "प्रेम म्हणजे काय हें कोणालाच सांगतां येणार नाहीं." अशी त्यांनीं सुरुवात केली. मग खऱ्या अर्थानें प्रेम ही वस्तु जगांत नाहींच कीं काय ? तसें नाहीं. पण प्रेमभावनेचा अनुभव घेण्याची रीत

अकरणात्मक (negative) आहे. जीवनांतील अधिकाची हांव गेली, हिंसेची प्रवृत्ति गेली, सत्तेची अभिलाषा नष्ट झाली, सुखलालसा निमाली, तर जें जीवनांत उरेल तें प्रेम, असें कृष्णजींनीं सांगितलें.

मग कृष्णजी 'मरण व पुनर्जन्म' या विषयाकडे वळले. "विज्ञान आणखी वाढलें तर आयुर्मर्यादा पंचवीस-पन्नास वर्षांनीं वाढेल, यापेक्षां अधिक काय होणार ?" असा प्रश्न त्यांनीं केला. जेव्हां केव्हां शरीर मरणाच्या उंबरठ्यावर उभें राहील, तेव्हां मरणाची भीति पुन्हां येणारच. विज्ञानाला ती दूर करतां येईल काय ? विज्ञानाचा तोकडेपणा चटकन् माझ्या ध्यानांत आला. मला वाटलें, **भीति, निराशा, संघर्ष, यांना विज्ञान कधींच स्पर्श करूं शकणार नाहीं.** ही भीतिच मरणाबद्दलच्या निरनिराळ्या विचारप्रणाली (theories) निर्माण करते. त्यांच्या खरेपणाची खात्री कोण देणार ? पण अशा पद्धतीनें या विषयाकडे न पाहतां, आपल्या अंतरींची खरी इच्छा काय आहे, हेंच पाहिलें तर ? मरणाच्या क्षणांतसुद्धां, बँकेंतली ठेव घट्ट पकडून धरणारीं माणसें आहेत. तसेंच जीवनांत ज्या आशा बाळगल्या, ज्या स्मृति उराशीं घट्ट धरल्या, त्यांनाच आपण जीवन समजतों. मग असें तर नाहीं कीं, या आशा-निराशांचा गठ्ठा मरणानंतरहि कायम राहावा या एकाच हेतूनें पुनर्जन्माबद्दल एवढी चौकशी करून आपण हैराण होतों ? मरणानें या सर्वांचा चक्काचूर होईल, अशी भीति आपणांला वाटते; आणि **तसें तर होणार आहे.** जिवंत असतांना हा गठ्ठा वाढवीत राहण्याऐवजीं दर क्षणाला आपण भूतकाल संपवीतच गेलों तर ? म्हणजे, ज्याला आपण जीवन म्हणतों व ज्याचा गाभा मृत्यूनंतरहि कायम राहावा, असा आग्रह धरतों, तेंच क्षणाक्षणाला संपवितां आलें तर ? मग मरण आणि पुनर्जन्म या समस्या आपणांला भेडसावणार नाहींत. याचा अर्थ, **मानवाचें खरें जीवन त्याच्या स्मृतियंत्रांतून जन्माला येत नसतें** हें सत्य उमगलें तर हा साराच प्रपंच संपतो. खऱ्या जीवनाची ओळख न पटल्यामुळेंच सर्व घोंटाळा झाला आहे. मरण काय हें न समजल्यामुळें आपलें कांहींच बिघडलेलें नाहीं.

पण कर्मसिद्धांत आणि पुनर्जन्म यांच्याबद्दल इतकी चर्चा जरी आपण करतों तरी खरी श्रद्धा त्यावरहि आपली नाहीं, असें कृष्णमूर्तींनीं दर्शविलें. मला वाटतें, कृष्णमूर्तींनीं हें विषयांतर मुद्दामच केलें. श्रद्धा श्रद्धा म्हणून जी आपण उराशीं कवटाळतों ती भयांतून मनानें काढलेली वाट असते. स्मृतींचा गठ्ठा संपूं नये याकरतां केलेली ती युक्ति असते. "आतां जें आपण करतों त्यांतूनच जर पुनर्जन्म ठरतो तर स्मृतींचा आणि वासनांचा संचय सारखा करण्याचा एवढा खटाटोप कां ?" असा सवाल कृष्णजींनीं केला. "तुम्ही ज्यांना 'श्रद्धा' (beliefs) म्हणतां ते नुसते शब्द असतात, वर्तनाशीं त्यांचा संबंध नसतो, नाहीं का ?" असें त्यांनीं विचारलें. जें हल्लीं आपण प्रत्यक्ष करतों तें सत्य; तें पाहतां आलें पाहिजे. शब्दांचें

मायाजाल सत्य पाहूंच देत नाहीं, असें त्यांना सुचवावयाचें होतें. अशा प्रकारच्या श्रद्धा अथवा सिद्धींचा पाठलाग माणसाला मुक्त होऊंच देत नाहीं, असें त्यांनीं बजावलें. मुंबईच्या या सत्रांत कृष्णजींनीं समजून घेणें (learning), आत्मज्ञान मिळविणें, यांचें जणू प्रात्यक्षिकच दाखवलें. बोलतांना त्यांचीं बोटें ही learning ची, आत्मनिरीक्षणाची प्रक्रिया कशी असते, हें दाखवीत होतीं. सारखी पुढें जाणारी व मागें वळून न पाहणारी एक गति (movement) कृष्णजींना सुचवावयाची होती. ही गति चालू क्षणांतच उपलब्ध असते; चालू क्षण सोडला कीं, ती खंडित होते. मग भलतेंच कांहींतरी होऊं लागतें. चालू क्षण, तो जाऊन लगेच पुढें येणारा नवा क्षण यांच्याकडे अवधान देतां आलें, तरच जीवन समजेल. या क्षणावर भूतकालाचें आक्रमण कशा पद्धतीनें होत आहे, हें सूक्ष्मदृष्टीनें पाहात राहिलें पाहिजे, दुसरा मार्ग नाहीं. 'मागें मी कसा होतों' याचा अभ्यासहि उपद्रवालाच कारण होतो. कारण लिप्त मनहि सारखें बदलत राहतें. आतां लोभग्रस्त तर थोड्या वेळानें कामविव्हल, नंतरच्या क्षणांत कोपाविष्ट, त्यानंतर अगदीं समाधानी, अशा अवस्था मनाच्या होत राहतात. "Are you permanently greedy ?" "तुमचें मन सदैव हावरें असतें काय ?" असा प्रश्न कृष्णजींनीं केला. मनाची अवस्था सारखी बदलत राहते ही जाणीव तीव्रपणानें झाली कीं, मन मोकळें होऊं लागतें, असें त्यांना या प्रश्नानें ध्वनित करावयाचें होतें. Learning ची प्रक्रिया आपलें मन कधीं सुरूच करीत नाहीं, ही तर खरी अडचण आहे. 'काल मला वाटलेलें भय कसें होतें.' याचाहि विचार उपयोगी नाहीं. आतां जें घडत आहे तेंच महत्त्वाचें. मात्र त्यांत भूतकालानें आणून सोडलेलें किल्मिष बाजूला काढून फेकून देतां आलें पाहिजे. हें किल्मिष नक्की कोठें व कोणतें आहे, तें ध्यानांत खरोखरच आलें, तर हें साधणें शक्य. त्याकरतां 'पाहण्याची कला' हस्तगत केली पाहिजे. पण पाहणारा (observer) (म्हणजे हेतु) निर्माण झाला कीं, पाहणें संपतेंच, मग द्वंद्व, संघर्ष आपल्या नशिबीं येतो. दुसरें कांहीं पदरांतच पडत नाहीं.

ग्रंथ, अधिकारी पुरुष (authority) यांच्याकडून जीवनविषयक सत्य आपणांला मिळवितां येईल, या भ्रमांत सर्वजण आहेत. या चंद्रयुगांतहि हा लोकभ्रम फारच प्रभावी आहे. सुशिक्षित, अशिक्षित, विज्ञानवादी, सर्वचजण या भ्रमांत आहेत. कृष्णजींनी विद्वानांचे महत्त्व यत्किंचितहि कमी केलें नाही, हें लक्षांत घेतलें पाहिजे. पण जीवन जगतांना वरील समजूत उराशीं बाळगल्यानें जीवनहि उमजत नाहीं, व अंतिम सत्य तर नाहींच नाहीं. हें जितकें स्पष्ट करावें तितकें हवेंच आहे, असें वाटल्यानें या खेपेस कृष्णजी थोडें परखडपणानें बोलले. निदान तसा भास कित्येकांना झाला. पण चालू युगप्रवृत्तिच विलक्षण दिसते त्याला काय

करावें ? दुसऱ्याच्या तोंडाकडे सदैव पाहणारी याचकवृत्ति (dependence) सगळीकडे दिसत आहे. शब्दांचें पठण, त्यांची अमर्याद पुनरावृत्ति, यांनाच लोक अध्यात्म समजत आहेत. बौद्धिक गुलामगिरी वाढत आहे, जें फक्त ग्रंथांतून अथवा इतर कोणाच्या तरी मुखांतून घेतलें तेंच मला झालेलें ज्ञान, असें खुशाल मानलें जात आहे. बुद्धिवंत म्हणवणारे, अनुयायी बनण्यांत इतिकर्तव्यता समजत आहेत. कृष्णजी म्हणाले, "एक तरी नियम करा. जें तुम्हीं खरोखर प्रत्यक्ष अनुभवलें नाहीं तें इतरांना सांगावयाचेंच नाहीं, हा तो नियम." असत्याची वीण एवढ्यानें तरी थांबेल, असें त्यांना वाटलें असावें. पण कृष्णजींचा सगळा भर आत्मनिरीक्षणावर होता; हें निरीक्षण मनाच्या आंतल्या बाजूस सुरू आहे कीं नाहीं, हें नीट पाहा, हें सांगण्यावर होता. **निरीक्षणाची गतिशील अवस्था व तिच्यामुळें उत्पन्न होणारी समज** (understanding) **हीच काय ती मोक्षदात्री आहे.** मुक्त होणें आपल्याच हातांत आहे. ती कला दुसरा शिकवूं शकत नाहीं. दुसरा ती शिकवूं शकेल, ही भावनाहि बद्धकच आहे. म्हणूनच शेवटीं कृष्णजी म्हणाले, "माझ्यापासून आज तुम्ही कांहीं शिकलां, ही भावना उत्पन्न होऊं देऊं नका. मग तुम्ही माझ्या शब्दांतच अडकून बसाल. हेंच शतकानुशतकें होत आलें आहे. तुम्ही स्वतःबद्दल स्वतःच्याच मदतीनें शिकूं लागा. मग ज्या ज्ञानाचा उदय **क्षणोक्षणीं** होत राहील, तेंच तुम्हांला मुक्त करील !"

टीप : कृष्णमूर्तींचीं मुंबई येथें ता. ७, १० व १४ फेब्रुवारी १९७१ रोजीं जीं व्याख्यानें झालीं तीं ऐकून जें समजलें असें वाटलें, तें वर दिलें आहे. कृष्णजींचे स्वत:चेच शब्द असा अर्थ, अवतरण चिन्हांचाहि घेऊं नये. हा लेख त्या व्याख्यानांचा रिपोर्ट असा न समजतां, त्यांचें लेखकाच्या अल्पमतीप्रमाणें समीक्षण म्हणून समजावा.

* * *



सोळा

नवा मानव – आणि जगहि नवें !

मनुष्यप्राण्याची निर्मिति हाच निसर्गाच्या सृजन-शक्तीचा परमोच्च बिंदु आहे, असें भौतिकशास्त्रज्ञ मानतात. 'उत्क्रांतिवाद' हा शब्दच असें दर्शवितो कीं, विविध प्राणी निर्माण होतां होतां असा एक प्राणी निर्माण झाला कीं, त्याच्या-मध्यें पूर्वीच्या सर्व प्रयोगांची परिणति झाली. शास्त्रज्ञांचे निष्कर्ष जरी बाजूला ठेवले तरी आपला अनुभवहि असें सांगतो कीं, माणसाच्या मेंदूमध्यें व शरीरामध्यें कांहीं विशेष चापल्य आहे. भोंवतालच्या परिस्थितीचें ज्ञान करून घेण्याची इतर प्राण्यांपेक्षां फारच अधिक शक्ति माणसाला आहे; व या ज्ञानाचा अचूक उपयोग कसा करून घ्यावा, हेंहि माणसालाच इतर प्राण्यांपेक्षां जास्त कळणें शक्य आहे. माणसाला इतकी सामग्री उपलब्ध करून दिल्यानंतर, निसर्ग कांहीं काळ तरी स्वस्थ राहिला आहे असें दिसतें. उत्क्रांतिवादी शास्त्रज्ञांची चालू पिढीहि, माण-साच्या टप्प्यावर उत्क्रांति थांबली आहे, असेंच मानते. याचा अर्थ इतकाच कीं, नजीकच्या भविष्यकाळांत माणसापेक्षां जास्त प्रगत (developed) असा प्राणी, निर्माण करण्याचा निसर्गाचा बेत दिसत नाहीं, निदान तशीं निसर्गाचीं पावलें, शास्त्रज्ञांच्या दूर अंतरावर पाहूं शकणाऱ्या सूक्ष्मदृष्टीच्या टप्प्यांत अद्याप तरी आलेलीं नाहींत, एवढें विधान करण्यास कांहींच हरकत नाहीं.

सर्व प्राण्यांत माणूस जास्त उत्क्रांत झाला आहे असें जेव्हां म्हटलें जातें,

तेव्हां त्याचा अर्थ एवढाच असतो कीं, माणसाच्या मेंदूमध्यें विलक्षण शक्ति आहे. त्याचा मेंदू असंख्य स्मृतींचा सांठा वर्षानुवर्षें बाळगूं शकतो. पण सामर्थ्याचा हा फक्त एक भाग आहे. स्मृतींचा संग्रह करतां येणें, व तो संग्रह चिरकाल टिकवतां येणें, एवढ्यानें फारसें कांहीं साधत नाहीं. त्या स्मृतींपैकीं कोणती स्मृति केव्हां बाहेर काढावयाची, हें समजलें पाहिजे. तसेंच कांहीं स्मृतींचें मिश्रण करतां आलें पाहिजे. हें मिश्रण करतांना कोणत्या स्मृतीचा केवढा भाग घ्यावयाचा, हें समजलें पाहिजे. योग्य प्रमाणांत मिश्रण झाल्यावर जो विचार (thought) मेंदूंत तयार होतो, त्याची कार्यवाही होणें शक्य आहे का नाहीं, हें ठरवतां आलें पाहिजे. कार्यवाही जरी शक्य असली तरी ती इष्ट आहे कीं नाहीं, हेंहि जाणतां आलें पाहिजे. इतकी सिद्धता झाल्यावर, त्या विचाराबरहुकूम इंद्रियांची हालचाल करतां आली पाहिजे. या सर्व क्रिया कोणताहि गोंधळ न होतां व शक्य तेवढ्या त्वरेनें करतां आल्या, कीं माणसाचें काम झालें. वर दर्शविलेल्या प्रत्येक क्रियेंत माणूस इतर प्राण्यांपेक्षां फारच अधिक निपुण आहे, आणि म्हणूनच 'सर्वश्रेष्ठ प्राणी' असा त्याचा गौरव शास्त्रज्ञांनीं केला आहे. भारतीय परंपरेंतहि मनुष्याची निर्मिति झाल्याबरोबर ब्रह्मदेवाला परम संतोष झाला, अशा अर्थाची कथा आहे. तींतहि मानवाचें हें विशेष नैपुण्यच अभिप्रेत आहे. शेक्सपियरचा हॅम्लेट मानवप्राण्याला "paragon of animals" म्हणतो, तें उगाच नव्हे.

माणसाच्या अंगच्या आणखी एका गुणाचा उल्लेख केला पाहिजे. तो म्हटलें तर निसर्गदत्त, म्हटलें तर माणसाचा स्वसंपादित, अशा प्रकारचा आहे. स्मृतींसंबंधीं ज्या क्रियांचा वर उल्लेख केला आहे, त्या क्रिया, अत्यंत जलद गतीनें व फार मोठ्या प्रमाणावर करणें, ज्या साधनामुळें शक्य होतें असें एक साधन माणसानें शोधून काढलें आहे तें साधन म्हणजे भाषा. मुद्रणकला, वाचनाची कला, लेखनकला, वक्तृत्वकला, यांसारख्या कलांचा भाषेंतच समावेश होतो. भाषेनें माणसाची स्मरणशक्ति शतपटींनीं वाढविली आहे, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

निसर्गानें स्मृतीची जी देणगी दिली ती माणसानें प्रयत्नानें वाढविली. आपली समजूत अशी आहे कीं, अशा तऱ्हेनें स्मरणशक्तीचा व्याप वाढविल्यामुळें माणसाची प्रगती झाली आहे.

इतर प्राण्यांपेक्षां माणसाला, स्मरणाच्या बाबतींत अत्यंत गुंतागुंतीची व विशेष प्रभावी अशी सोय करून देण्यांत निसर्गाचा नक्की हेतु काय असावा, हें कोणालाच सांगतां येणार नाहीं. निसर्गानें कांहीं केलें तर तें हेतुपूर्वक असलें पाहिजे, हा आपला आग्रह तरी योग्य आहे कीं नाहीं, कोणास ठाऊक ? शास्त्रज्ञ

तरी निसर्गाचा खरा हेतु कसा अजमावणार? निसर्गाचा हेतु अगोदर समजून घेऊन, मगच पाऊच पुढें टाकावयाचें असें माणसानें ठरविलें तर तें जीवन नैसर्गिक राहील काय? सारांश असा कीं, मानवप्राण्यानें गांठावयाचें ध्येय कोणतें अशा प्रकारच्या विचारांत कालाचा अपव्यय न करतां, जें जीवन हल्लीं आपण जगतों, त्याचेंच सूक्ष्म निरीक्षण करून, कांहीं नवा प्रकाश मानवी जीवनावर पडतो का, तें आपण पाहूं.

स्मरणशक्तीमुळें ज्या सोयी होतात त्या कोणीच नाकारूं शकत नाहीं. त्या अगदीं उघड आहेत. पण प्रश्न असा आहे कीं, सोय म्हणून जी गोष्ट उपलब्ध झाली तिनें आपली मोठी गैरसोय केली; नव्हें आपला अगदीं घात केला, असें तर झालें नसेल? व्यवहारांत असें केव्हां केव्हां होतें. ज्या सुरीनें फळ कापावयाचें ती विशेष तीक्ष्ण असली व अवधान सुटलें तर तिनेंच बोट कापलें जातें; व तें फळ नसतें मिळालें तरी बरें झालें असतें, असें वाटूं लागतें. माणसाला स्मरणशक्तीचें जें वरदान मिळालें आहे, तोच शाप होऊन बसला आहे कीं काय, कळत नाहीं. कितीतरी प्रतिभावंत कवींनीं स्मरणशक्तीची अशी करुणा भाकली आहे कीं, ती जर कांहीं काळ त्यांना सोडून गेली तर फार बरें होईल! प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांतहि असे कांहीं प्रसंग येतात कीं, त्यांची स्मृति नको असें वाटूं लागतें. स्मृतीचा हा जो जाच होतो तो निसर्गाच्या योजनेला धरून आहे, का अनैसर्गिक आहे?

माणसाच्या आयुष्यांत दुःख अजिबात नसलें पाहिजे अशी निसर्गाची योजना दिसत नाहीं. पण दुःखाचे कांहीं प्रकार तरी माणसानेंच शोधून काढले आहेत, यांत संशय नाहीं. हीं मानवनिर्मित दुःखें स्मृतींतून जन्माला येतात. प्रतिकूल घटनेला आपण दुःख म्हणतों. पायाला जखम झाली तर ती प्रत्येक वेळीं अनैसर्गिक वर्तनामुळेंच झाली, असें म्हणतां येणार नाहीं. कांहीं जखमा तरी माणूस कसाहि वागला तरी होणारच. या जखमा झाल्या असतांना जें दुःख होतें, त्याला 'वेदना' हा शब्द जास्त समर्पक ठरेल. वेदनांची जाणीव मेंदूला होतांना जी क्रिया होते, तींत स्मरणशक्तीचा भाग केवढा आहे याचा शोध घेणें मोठें मनोरंजक आहे. शरीराला ज्या वेदना जाणवतात, त्यांचें खरें कारण म्हणजे शरीरांतल्या जीवनशक्तीचें जखमेशीं चाललेलें युद्ध होय. ती जखम नीट करण्याकरतां होणाऱ्या अनेक क्रियांपैकीं ती एक क्रिया असते. पण जखमी झाल्यामुळें, मी जो स्वतःला दुःखी समजतों, त्यांत तुलनेचाहि भाग असतो. "मी पूर्वी निरोगी होतों, व यापुढें जखम वाढते कीं काय," हे विचार, न कळत निसर्गनिर्मित वेदनांमध्यें मिसळले जातात; व या संपूर्ण मिश्रणाला, 'जखमेपासून होणारें दुःख' असें नांव मी देतों. हे जे विचार वेदनांची संगत करतात, ते कशांतून निर्माण होतात? अर्थात पूर्वानुभवाच्या

स्मृतींतून. माझ्या निरोगी अवस्थेचें जसें मला स्मरण होतें, तसेंच ज्यांच्या जखमा पुढें चिघळल्या व जे जन्माचे पंगु झाले, त्यांचीहि आठवण मला होते; व या सर्व आठवणी मला 'भयंकर जखमी' ठरवितात व मी बेचैन होतों.

वरील उदाहरणाचाच आणखी पुढें उपयोग करूं. खांचखळग्यांच्या रस्त्यांत अनवधानानें आपण गेलों म्हणून जखम झाली, हें सत्य आपल्या स्मृतींत जखम होऊन गेल्यानंतरहि कांहीं काळ राहतें; व तें तसें राहिलेंच पाहिजे, असा निसर्गाचा हेतु आहे. कारण, पुन्हा रस्त्याचा तो भाग आपण टाळला पाहिजे, ही आपल्या जीवनाची खरी गरज आहे. जीवरक्षणाच्या खऱ्या गरजा भागविण्याकरतां तर आपल्या मेंदूला स्मृतीचें सामर्थ्य दिलें आहे. पण स्मृतीचा कांहीं गैरवाजवी उपयोग तर आपण करीत नाहीं ना ?

"आपण जें करतों तें बरोबरच असलें पाहिजे; फक्त परिस्थिति त्याला साथ देत नाहीं, एवढेंच मानवी जीवनांतलें वैगुण्य आहे," अशी धारणा बहुधा प्रत्येक माणसाची असते. स्मृतीचा आपण करीत आलेला उपयोग, हाच एका असत्य जगांत आपणाला नेऊन सोडीत असेल, अशी शंकासुद्धां आपणांला येत नाहीं. पण अगदीं हेंच ढळढळीत सत्य आहे. सुखदुःखांबद्दलच्या प्रेरणा कशांतून उत्पन्न होतात, भय कसें निर्माण होतें, काळजीचा उगम कोठून होतो, वगैरे प्रश्नांचा थोडा जरी खोल विचार केला तर चटकन् लक्षांत येतें कीं, या सर्वांची जननी स्मृति हीच आहे. स्मृतीचें संपूर्ण स्वरूप अजून आपल्या ध्यानांतच आलेलें नाहीं. एखादी घटना चटकन् आठवली, पूर्वी पाहिलेला चेहरा पाहतांच त्या माणसाचें नांव आठवलें, इतिहासांतलें एखादें साल प्रश्न विचारतांच तत्काळ सांगतां आलें कीं, हें स्मृतीचें काम, असें आपण म्हणतों. वरील करामत आपल्या स्मरणशक्तीची, यांत तर संशयच नाहीं. पण यापेक्षां कितीतरी मोठा प्रांत माणसाच्या स्मरणशक्तीनें व्यापलेला आहे. **स्मरणशक्तींतूनच एका बाजूनें विचार** (thought) **जन्माला येतो, तर दुसऱ्या बाजूनें विकारांची** (emotions) **उत्पत्ति होते.**

हें उदाहरण पाहा. नुकतीच वर्तमानपत्रांत वाचलेली एक घटना अशी. एका तरुण विवाहित स्त्रीला चार अपत्यें होतीं. तिचा नवरा दुसऱ्या स्त्रीच्या मोहांत सांपडला होता. तो आपल्याशीं बेइमान झाला आहे, असा तिला सारखा संशय येत होता. त्या विवाहित स्त्रीला जीवन नकोसें होऊन, तिनें दुःखातिशयाच्या भरांत अथवा संतापाच्या आवेगांत आपलीं चारीं मुलें पेटवून देऊन स्वतःलाहि जाळून घेतलें. या घटनेंतल्या स्त्रीची मनःस्थिति अभ्यासण्यासारखी आहे. 'विकृत मनोवृत्तीची बाई' अथवा 'भावनातिरेकाचें अपवादात्मक उदाहरण' असा शेरा मारून, ही सत्यकथा बाजूला सारण्यासारखी नाही. हें कृत्य अतिरिक्त विचारांतून अथवा विकारांतून झालेलें आहे हें जरी खरें असलें, तरी आपल्या मनाचे व्यापार

कसे होतात, हें समजून घेण्यास तें उपयोगी आहे. वस्तूंचे गुणधर्म समजून घेण्याकरतां, शास्त्रज्ञसुद्धां द्रव्यांचें प्रमाण कांहीं वेळा मुद्दाम वाढवितो; व मग काय होतें तें पाहून त्या त्या द्रव्याचें–जरी तें सामान्यपणें कमी प्रमाणांत सर्वत्र असलें तरी–गुणांबद्दल सिद्धांत ठरवितो.

ज्या मेंदूचा उपयोग मुख्यतः शरीररक्षणाकरतांच व्हावयास पाहिजे, त्या मेंदूनें येथें काय केलें आहे हें पाहण्यासारखें आहे. मेंदूला स्मृतीची जी संवेदना दिली आहे ती, जीवनपथ आक्रमीत असतांना दिव्यासारखा तिचा उपयोग व्हावा या एकाच हेतूनें, जीवन सुकर व्हावें याकरतां. पण येथें तर अंधारांत उडी घेण्याची प्रेरणा, त्याच स्मृतीनें दिलेली आपण पाहतों. हें असें कां व्हावें? "माझ्या देहावरचें नवऱ्याचें प्रेम कमी झालें," ही खंत त्या स्त्रीला सारखी व्यथित करीत होती. कांहीं घटना तिनें पाहिल्या असतील, त्या ती विसरूंच शकत नव्हती. त्यांची पुन्हां पुन्हां येणारी स्मृति तिच्या वेदना वाढवीत होती. "पूर्वी मी किती भाग्यवान् होतें!" असा विचार तिच्या मनांत रात्रंदिवस येत असला पाहिजे. त्या गतसुखाशीं तुलना करण्याला, तिची स्मृतीच तिला मदत करीत होती. कदाचित्, पुस्तकांतून वाचलेल्या कथा स्मरल्यामुळें, अथवा भोंवतालीं इतर स्त्रिया कसें वागतात, कांय बोलतात, हें सतत मनांत येत राहिल्यामुळें तिच्या मनांत एक 'मानबिंदु' तयार झाला असावा. त्या मानबिंदूभोंवतीं तिचें स्मृतिचक्र सारखें फिरत राहिल्यामुळें, आपली गेलेली प्रतिष्ठा परत मिळाली, आपलें पूर्वीचें स्थान पुन्हां प्राप्त झालें तरच जगण्यांत स्वारस्य; नाहींतर जगणें तें जगणें नव्हेच, असा सिद्धांत तिनें मनाशीं ठरविला असावा. किंबहुना, "हें गेलेलें स्थान म्हणजेच माझा प्राण! त्या स्थानाच्या रक्षणाकरतांच जगावयाचें, देहरक्षणाकरतां नव्हे. त्या मानबिंदूच्या रक्षणाकरतां देहाचा त्याग करावा लागला तरी तो केलाच पाहिजे," अशा निश्चयाप्रत ती आली असावी. हा 'मानबिंदु' सतत चिंतनानें तिनें इतका श्रेष्ठ ठरविला कीं, त्याच्या पुढें चारी मुलांच्या जीवनाचींहि कांहीं किंमत तिला वाटली नाहीं. शिवाय ज्या देहाचा अवमान तिच्या नवऱ्यानें केला म्हणून ती इतकी दुःखी झाली, तोच देह सरळ भस्मसात् करण्यासहि तिनें मागेंपुढें पाहिलें नाहीं. चिंतन सत्य घटनांपासून व निसर्गप्रेरणांपासूनहि किती दूर नेऊं शकतें, इंद्रजालांतच तें मनाला कसें अडकवितें, हें समजण्यास एवढें विवेचन पुरें आहे.

आपण असें समजतों कीं, "या सर्व आपत्तींतून विचारशक्ति माणसाला तारूं शकेल. तर्कशुद्ध विचार, स्वतंत्र विचार करण्याची माणसाची शक्ति जसजशी वाढेल, तसतसा माणूस खरोखरच शहाणा होत जाईल. मग अशा भ्रमांत माणूस सांपडणार नाहीं. विकारांचा तो गुलाम होणार नाहीं." शिवाय, कांहीं विकार माणसाच्या प्रगतीला उपकारक आहेत, अशीहि आपली समजूत आहे. पण मुद्द्याचा

प्रश्न असा आहे कीं, विचारशक्ति पूर्वी कधींहि नव्हती इतकी समृद्ध व प्रभावी झाल्यानंतरसुद्धां हल्लींच्या मानवाच्या जीवनाला गति देणाऱ्या ज्या प्रेरणा आहेत, त्या कशांतून येतात ? या प्रेरणा दोन प्रकारच्या आहेत. एक सुखप्राप्तीची व दुसरी दुःखाचा प्रतिकार करण्याची. सृष्टींत ज्या सत्यवस्तु आहेत अथवा सत्य-घटना सारख्या घडत आहेत, त्यांच्याशीं या माणसाला कांहींहि कर्तव्य नाहीं. सुख मिळविण्याला या वस्तु अथवा घटना मदत करतात कीं नाहीं, एवढेंच माणूस पाहात आला. तसेंच त्याची तक्रार एकच आहे. ती ही की, बऱ्याच वेळां सत्यवस्तु आणि सत्यघटना या दुःखाची निर्मिति करतात; आणि मग माणसाला तें दुःख निवारण करण्याकरतां भयंकर खटाटोप करावा लागतो.

पण आपल्या लक्षांत हें येत नाहीं कीं, **जीवनप्रवाहाशीं अगदीं विसंगत किंबहुना विरोधी अशी एक प्रेरणा आपली सहचरी होत आहे. ही प्रेरणा सुख-संपादनाची होय.** दुःखाचें निवारण व्हावें अशी इच्छा होणें म्हणजेसुद्धां, सुख मिळावें असें वाटण्याचाच दुसरा प्रकार आहे. त्याचा समावेश सुखाबद्दलच्या तृष्णें-तच होतो ही तृष्णा मानवी जीवनाचा अविभाज्य असा भाग आहे काय ? ती जर स्मृतीला आपण फार लाडावून ठेवल्यामुळेंच उत्पन्न होत असली, तर पुढचा प्रश्न असा आहे कीं, ही चूक सुधारणें शक्य आहे काय ? सुखाबद्दलची तृष्णा म्हणूनच वर जिला म्हटलें ती शरीररक्षणाच्या प्रेरणेपासून अगदीं भिन्न आहे, हें पुन्हां एकदां सांगणें जरूर आहे. शरीरस्वास्थ्याकरतां ज्या कृति आपण करतों त्या करतांनासुद्धां स्मृतीची मदत आपण घेतों, पण तें स्वास्थ्य मिळालें कीं, ती स्मृतीहि तेथेंच संपते. आपलें काम झाल्यावर ती उगाच रेंगाळत बसत नाहीं. आतां हें खरें कीं, शरीरस्वास्थ्याचें निमित्त सांगून आपली व इतरांची फसवणूक करतां येते. पण सूक्ष्म विचार केला तर, शरीराची खरी गरज कोणती व मनानें शरीरावर लादलेली 'गरज' कोणती, हें लक्षांत येण्यासारखें आहे.

"निसर्गानें माणसाला मेंदू दिला व त्या मेंदूला स्मरणशक्ति दिली, हें जर आहे, तर स्मृतींतूनच उत्पन्न होणारी 'सुखतृष्णा' जीवनविरोधी कशी असूं शकेल," अशी शंका वाचकांना येण्याचा संभव आहे. पण निसर्गदत्त इंद्रियांचा दुरुपयोग, आपणांला अपरिचित का आहे? जिभेला खावें वाटतें एवढ्याच कारणां-मुळें तें नैसर्गिक व जीवनाला उपकारक आहे, असा सिद्धांत मांडता येईल का ? **अतिरेक करण्याचें स्वातंत्र्यहि एकट्या मानवालाच निसर्गानें दिलें आहे.** खाण्या-पिण्यांत असा अतिरेक करण्याची मुभा पशूंना नाहीं; व आपण ज्याला सुख म्हणतों त्याबद्दलची तृष्णाहि मानवेतर प्राण्यांत आढळत नाहीं. सुधारलेला मानव हल्लीं अशा टप्प्यावर आलेला आहे कीं, इंद्रियसुखाचा हव्यास धरणें यांत जीवन-विरोधी असें कांहीं असेल, असें त्याला मुळींच वाटत नाहीं. पण पुन्हां संयमानें सर्व

प्रश्न सुटत नाहींत, जीवनांतला संघर्ष मिटत नाहीं; व सुखाची तृष्णा तर कायमच राहते असें जेव्हां आपण पाहतों तेव्हांच पुढचा मूलगामी प्रश्न उभा राहतो. तो असा कीं, कोणतेंतरी सुख मिळालेंच पाहिजे असा जो आग्रह मनांत सारखा चालूं असतो, त्याचें कारण काय ? हा आग्रह मेंदूनें कां उत्पन्न करावा ?

या प्रश्नाचा पिच्छा आपण पुरवूं लागलों तर प्रथम असें नजरेस येतें कीं, स्मृतीच्या मदतीनें सुखदुःखांचें हें शुक्लकाष्ठ मेंदू आपल्या मागें लावतो. आपण सुखी झालें पाहिजे असें वाटणें, ही मानवी जीवनाची अंगभूत अशी गरज आहे काय ? रानटी अवस्थेंतून बाहेर पडून माणूस जसजसा अधिक सुसंस्कृत होत गेला तसतशी त्यानें एकच कामगिरी बजावली आहे. ती ही कीं, तथाकथित स्थूल सुखाची (animal pleasures) जागा, सूक्ष्म अथवा उच्च प्रकारच्या (?) सुखांना घ्यावयास लावली आहे. तसेंच " चारदोन मूलभूत गरजांचें कांहींसें अतिरिक्त स्वरूप " एवढाच मानवी सुखाचा जो प्रांत होता त्याच्या कक्षा प्रमाणाबाहेर वाढवून सुखाचे असंख्य प्रकार मानवानें निर्माण केले आहेत सुसंस्कृतीच्या नांवाखालीं व संयम वाढीस लागला असा भास उत्पन्न करून, चित्तांतली वखवख कमालीची वाढविली आहे. कारण चित्तांतलें असमाधान, उच्च प्रकारचीं सुखें सारखीं मिळत राहिलीं, तरी कमी होत नाहीं. रानटी माणसाशीं तुलना केली तर आधुनिक माणसाच्या मेंदूचें सामर्थ्य फारच वाढलेलें आहे हें खरें, पण हें सामर्थ्य एका ठराविक दिशेनेंच वाढलें आहे व वाढत आहे. ' मेंदू ' नांवाचें जें अजब यंत्र निसर्गानें मानवाला बहाल केलें आहे, त्याचे जणू काय दोन भाग पडलेले दिसतात व एका भागाचीच अतिरिक्त अशी वाढ (specialization) मानवी संस्कृतीच्या उदयापासून आतापर्यंत होत आलेली आहे. (प्रत्यक्षांत असे पृथक् भाग नाहींत. एकच मेंदू केव्हां स्मृतिव्याप्त, तर केव्हां शांत म्हणजे स्मृतिरहित होत असला पाहिजे. विवेचनाच्या सोयीकरतां दोन भागांची कल्पना केली आहे.) एवढ्यानेंहि कांहीं बिघडलें नसतें. पण मेंदूला बुद्धि अथवा स्मृति यांखेरीज दुसरें अंगच नाहीं, अशी समजूत आपण करून घेतली आहे. **जें काय आपण करतों तें या बुद्धीच्या** प्रांतांतूनच. बुद्धिच आपल्या संपूर्ण मेंदूला व शरीराला राबविते. यामुळें जीवनाचें व बाहेरच्या जगाचें जें दर्शन आपणांला होतें, तें केव्हां अर्धवट तर केव्हां विकृत, अशा स्वरूपांत होतें. हें दर्शन सत्याचेंच आहे, असें आपण धरून चालतों; व त्या दर्शनाच्या पायावर आपल्या सर्व कृतींची व भावनांची इमारत आपण उभी करतों. कांहीं चूक होते असें वाटलें, तर तिची दुरुस्तीहि बुद्धि (म्हणजे स्मृति व तज्जन्य हेतु–motive) सांगेल त्याबरहुकूमच आपण करतों. या दुरुस्तीला ' तर्कशुद्ध विचारसरणी ' असें गोंडस नांव आपण देतों. पण आपल्या लक्षांत हें येत नाहीं कीं, आपल्या सर्व तर्कांचा मूळ पायाच डळमळीत आहे. (तर्कोऽप्रतिष्ठः).

एकूण प्रकार असा दिसतो कीं, आपल्या हातून कांहींतरी गफलत होत आहे. चालतांना जरूर पडेल तेव्हां कंदिलाच्या उजेडाचा उपयोग करावा म्हणून कोणींतरी आपल्या हातांत कंदील द्यावा, व कुणीकडे जावयाचें हें आपण त्या कंदिलालाच सारखें विचारीत बसावें, अशासारखा वेडेपणा आपण करीत आहोंत. स्मृतीचा उपयोग गणकयंत्रासारखा (computer) केला पाहिजे. **कृति कोणती करावयाची हें ठरल्यानंतर ती करतांनाच फक्त स्मृतीची मदत घेतली पाहिजे.** कृति कोणती, हेहि जेव्हां आपण त्या स्मृतीलाच विचारूं लागतों, तेव्हां गणकयंत्रानेच प्रश्न विचारावयाचे व उत्तरेंहि त्यानेंच द्यावयाचीं अशासारखें होतें. पण असा विक्षिप्तपणा आपल्या हातून घडत आहे याची जाणीवसुद्धां आपणांला होत नाहीं. आपण समजतों कीं, सुख मिळवण्याचें फक्त साधन म्हणून स्मृतींत सांठविलेल्या ज्ञानाचा आपण उपयोग करीत आहोंत. सुख ज्याला पाहिजे तो 'मी' स्मृतीच्या बाहेर कोठेंतरी उभा आहे, व सुख कोणतें असावें याबद्दलचा निर्णय त्यानें अगदीं स्वतंत्रपणानें (स्मृतीच्या मदतीखेरीज) घेतलेला आहे, अशी आपली समजूत असते.

गणकयंत्रासारखीच जिची रचना आहे, अशा स्मरणशक्तीकडे आंतरजीवनाचा संपूर्ण ताबा आपण दिला आहे. सुख मिळावें अशी भावना या यंत्रातल्याच एका भागाला होते. सुख कशाला म्हणावें, हें आपण गतानुभवावरूनच नेहमीं ठरवितों. हा गतानुभव स्मृतींत शिल्लक नसला तर हें सुख कां व हें दुःख कां असें विचारलें, तर आपणांला बोलतांच येणार नाहीं. कोणत्यातरी गतघटनेच्या फांदीला मला जें सुख हवें असतें, तें टांगलेलें असतें. त्या गतघटनेच्या स्मृतीत मला पाहिजे असलेले फेरबदल (modifications) मीं केलेले असतात, पण गाभा (core) बराचसा कायम असतो. मौज अशी कीं, हे फेरबदल करतांना जो मालमसाला मी वापरतों, तो दुसऱ्या सदृश घटनांच्या स्मृतींतूनच मी निवडलेला असतों. कसेंहि असलें तरी, स्मृति जें चित्र माझ्या मनश्चक्षूंपुढें उभें करतें त्याचें अंगप्रत्यंग गतकाळांतूनच आलेलें असतें, यांत संशय नाहीं.

शरीराला ज्याप्रमाणें भूकतहान लागते अशी मनाला 'सुखाची भूक' लागत असली पाहिजे, अशी आपली समजूत आहे. याचा अर्थ असा कीं, माणसानें 'सुखार्थी' असणें हा त्याचा धर्मच आहे. जीवनाचें स्वरूपच असें आहे, असें आपण मानतों. यावर, "सुखाची तहानहि लागणारच असें तुम्ही म्हणतां; मग दुःखभोगालाहि तयार राहा. कारण कोणतेंच सुख चिरकाल टिकणारें नसल्यामुळें, तें केव्हांतरी संपल्याचें दुःख तुम्हांला टाळतां येणार नाहीं. तसेंच अनपेक्षितपणें प्रतिकूल घटनेचा आघात होऊनहि दुःख प्राप्त होणें शक्य आहे. तेव्हां मी सुखीच राहीन, असा आग्रह धरण्यांत काय अर्थ आहे ?" असें कोणीं म्हटलें तर, "मानवी जीवनाचें

स्वरूपच सुखदुःखात्मक आहे. तें जसें आहे तसें मला स्वीकारलें पाहिजे,'' असें आपण उत्तर देतों. सुसंस्कृत माणसाची मजल फक्त एथवर जाते. सुख-दुःखांच्या पलीकडे जाऊन मानवाला जीवन जगतां येईल, असें जेव्हां कृष्णमूर्ति सांगतात तेव्हां आपल्या आटोक्याबाहेरची ही गोष्ट आहे, असें मनांत म्हणत, हा सर्वच प्रश्न आपण अंगाबाहेर टाकतों.

याचें कारण असें आहे कीं, तर्कानें किती जरी पटविलें तरी गतानुभवाच्या निव्वळ स्मृतींतून सर्व प्रकारचें सुख जन्माला येत असेल, हेंच मुळीं मनाला आंतून खरें वाटत नाहीं. सुखाकडे ज्याअर्थीं मन धांव घेत आहे, त्याअर्थीं ती सत्यवस्तु असलीच पाहिजे असा आपला आंतला आग्रह आहे. तो आग्रह सांगतो कीं, एखादी वस्तु आठवणें निराळें, व ती हवीशी वाटणें निराळें. पाहिलेल्या वस्तूची स्मृति होणें ही फक्त यांत्रिक क्रिया, हें आपण कबूल करूं. पण ती मला प्राप्त व्हावी असें जेव्हां वाटतें, तेव्हां माझ्या मनांत कांहींतरी निराळें, स्वतंत्र व जगण्याच्या क्रियांपैकीं मूलभूत असें घडत आहे, असा भास मला होतो. स्मृतीलाच एक प्रकारची गति मिळाली कीं, तिला आपण 'माझी इच्छा' असें म्हणतों, अशी वस्तुस्थिति आहे. पण ही वस्तुस्थिति आपल्या ध्यानांत यावी कशी, हाच काय तो प्रश्न आहे.

याला एकच मार्ग आहे. तो असा कीं, ज्या क्षणाला वासना, चित्तांत पहिला पदक्षेप करते त्या क्षणाला व त्यानंतरचा तिचा प्रवास सुरू झाल्यावर तिचें तटस्थपणानें निरीक्षण करतां (awareness) आलें पाहिजे. हें निरीक्षण करतांना चित्ताचा कांहीं भाग त्या स्मृतीपासून व वासनेपासून अगदीं अलग असा करतां आला पाहिजे. म्हणजेच तो संपूर्ण मोकळा (space) असा झाला पाहिजे. पण आपली पंचाईत अशी होते कीं, 'चित्ताचा स्मृतिव्याप्त भाग हेंच काय तें संपूर्ण चित्त' असें आपण धरून चालतों. निरीक्षण करण्याचें काम हाच भाग करूं लागतो व मग सर्वच घोंटाळा होतो. वर उल्लेख केल्याप्रमाणें मेंदूच्या दोन भागांपैकीं एका भागाचीच जोपासना आपण आजपर्यंत केली आहे. तेव्हां उघडच आहे कीं, खरेंखोटें ज्या मेंदूच्या भागानें आपण शोधूं पाहतों, त्यांत स्मृति, हेतु, सुखवासना, यांखेरीज दुसरें कांहीं नाहींच. मग होतें काय? प्रस्तुत सुखवासनेचें निरीक्षण, दुसरी वासनाच, जिला उच्च वासना अथवा ध्येयनिष्ठा असें नांव आपण दिलेलें असतें, करूं लागते. (हें तटस्थ निरीक्षण नव्हे.) अर्थातच पहिल्या वासनेवर 'हीन वासना' असा शिक्का बसतो. मग तिचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न उच्च वासना, 'मी' च्या मदतीनें करूं लागते. येथपर्यंत 'मी' जन्माला आलेला असतो. यांतून संघर्ष वाढीस लागतो. 'हीन वासना' दुर्बल असली, तर ती भिऊन मनाच्या तळाशीं कांहीं काळ दडी मारते. पण केव्हां तरी

ती पुष्ट होऊन, वेषांतर करून पुन्हां वर उसळी मारते. पुन्हां तिचें मूल्यमापन (evaluation), निर्दालनाची खटपट, वगैरे सोपस्कार आलेच ! सारांश असा कीं, हा उद्योग वर्षानुवर्षे चालला तरी त्यांतून सुखाबद्दलची तृष्णा ही मानवी जीवनाचा मूलभूत भाग आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा निकाल लागणें शक्य नाहीं. हा प्रश्न अनिर्णीत असा ठेवूनच नाना प्रकारच्या सुधारणा, समाजरचनेंत प्रचंड बदल घडवून आणणाऱ्या चळवळी, राज्यक्रांत्या वगैर सारें आपण करीत आलों आहोंत. इतकी यातायात हजारों वर्षे करूनहि " आतला माणूस कांहीं बदलला नाहीं. तो अद्याप पशूसारखेंच वर्तन करतो," ही विचारवंतांची तक्रार कायमच आहे.

' सुख हवें वाटणें व त्याकरतां जरूर वाटेल ती खटपट करणें ' हा मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे, असें एकदां म्हटल्यावर, फारसें महत्त्वाचें असें कांहीं करतांच येत नाहीं. या हक्काची बजावणी करतांना इतरांशी विरोध उत्पन्न होणारच; त्यांतून धनाची अथवा सत्तेची हांव, हिंसा, बेदिली, युद्ध यांची उत्पत्ति ही ओघानेंच आली. माणूस सुसंस्कृत होऊनहि जगांतला संघर्ष व असमाधान कमी कां होत नाहीं, या प्रश्नाचें खरें उत्तर काय असावें ? माणसाच्या मेंदूच्या एकाच भागाची अतिरिक्त वाढ, हेंच तें उत्तर असावें. मानवाला अत्यंत समर्थ असा मेंदू मिळाला असतांनाहि, त्याचा नीट उपयोग करण्याची कला त्याला अद्याप आत्मसात करतां आलेली नाहीं. ही कला तो शिकला नाहीं तर जगाची स्थिति अधिकच भयप्रद होत जाणार, यांत शंका नाहीं. जगाला व्यापणारा हा रोग वरचेवर असाध्यच होत चालला आहे. यामुळें, **नवा मानव जन्माला येणें शक्य आहे काय** ? हा प्रश्न, अत्यंत महत्त्वाचा असा हल्लीं झालेला आहे. व्यक्तीच्या दृष्टीनेंहि, आपण जगतों तें जीवन सत्य कीं असत्य, हा विचार अगदीं जिव्हाळ्याचा आहे. कारण आपल्या जीवनांतल्या प्रेरणा असत्य अशा स्मृतींतुनच येत असल्या, व त्यामुळेंच जीवनांत दुःख, निराशा, विषण्णता, वगैरेंचा अनुभव येत असला तर ती चूक दुरुस्त करणें, अगदीं जरूरच आहे. शिवाय, अंतिम सत्य–दिक्कालाच्या पलीकडलें सत्य–म्हणून खरोखरच कांहीं आहे, का ती केवळ अनेकांनीं मांडलेली कल्पना आहे, याचाहि छडा लावला पाहिजे. कृष्णमूर्ति म्हणतात :—

" The appalling conditions in the world demand that you have a new, fresh mind, because *otherwise the problems are going to increase*. There will be more bloodshed, more wars, more confusion, more competition, more so-called progress and slavery to things. If your mind is not fresh, it is going to be caught by circumstances. Not only that, but you also need a fresh, young mind to find if there is something beyond the measurable, beyond the things put

together by society, beyond the beliefs and dogmas invented by the priests. For that you need tremendous energy—an energy which is not the outcome of conflict, an energy that has no motive. And you can awaken that destructive, liberating energy only when you have understood and resolved in yourself, every form of conflict."

(*Talks in Europe* (p. 57) 1963.)

अंतिम सत्याचें दर्शन होण्याकरतां मेंदूचा स्मृतिव्याप्त असलेला भाग उपयोगी नाहीं, हें एक वेळ आपण कबूल करूं. पण दैनंदिन जीवन जगतांना अथवा व्यावहारिक जगांतले उद्योग पार पाडतांना, स्मृति आणि तिच्यांतून होणाऱ्या प्रतिक्रिया (reactions) यांची जरुरीच आहे; एवढेंच नव्हे, तर आम्ही याकरतां स्मृतींतून उद्भवणाऱ्या प्रेरणांचीच कार्यवाही करणार, असा हट्ट आपण धरूं. परमार्थप्राप्तीकरतां स्मृतिविरहित मेंदू व व्यवहाराकरतां स्मृतिमय मेंदू, अशी विभागणी करतां आली तर ती आपल्याला पाहिजे. अशी कांहींतरी तडजोड निघाली पाहिजे, असा आपला आग्रह असतो. या आग्रहाच्या बुडाशीं एक गैर-समजूत आहे. सुखप्राप्तीचा हेतु असल्याखेरीज कोणतेंच कर्म माणसाला करता येत नाहीं; किंबहुना त्याची देहयात्रासुद्धां वरील हेतु नसला तर अशक्य आहे, असें आपल्याला वाटतें. **सुख सोडावें असें प्रामाणिकपणानें वाटत नसल्यामुळेंच, वरील तर्क आपण लढवितों.** सुखाचा हेतु नसतांनादेखील जगतां येतें कीं नाहीं, हें कळणार केव्हां व कोणाला ? सुखाचें आकर्षण ज्या चित्ताला राहिलेलें नाहीं, असें चित्त या प्रश्नाचा पिच्छा पुरवील तेव्हांच काय तें त्याला कळेल. दुसरें असें कीं, सुखवांछेंतून उद्भवलेला 'मी' च या साऱ्या शंका काढतो. 'मी' कायम ठेवूनच आपण सारे प्रश्न सोडवूं पाहतों. साहजिकच, मेंदूच्या ज्या भागांत स्मृतींचें थैमान रात्रंदिवस चालूं आहे, त्या भागांतलेंच उत्तर 'मी' ला पाहिजे असतें. कारण 'मी'चा जन्म याच भागांतून झालेला असतो. हें खरें सत्यशोधनच नव्हे. मी आधींच ठरवून ठेवलेलें उत्तर मला द्या, असा हा नुसता दुराग्रह आहे !

'मी' रहित होऊन जगण्यास सुरुवात करावी, तसा प्रयोग करून पाहावा, असें आपणांला केव्हांच वाटत नाहीं. कारण, अशी अंधारांत उडी घेणें भयप्रद वाटतें. ही उडी आपण घेतलीच, तर जगांतले सर्व संबंध (relationships) संपुष्टांत येतील. आपल्या हातून कांहींच काम होणार नाहीं. आपलें जीवन निर्माल्यवत होईल. त्यांत राम राहणार नाहीं. निदान, 'एक अत्यंत निष्क्रिय, निरुपयोगी माणूस' म्हणून सर्व जग आपला तिरस्कार करूं लागेल, अशा अनेक शंका आपल्याला येऊं लागतात पण कृष्णमूर्ति, "एकदम तुमचें जग सोडून जा, सर्व उद्योगधंदे बंद करा, सर्व संबंध तोडून टाकून रानांत एकटें राहा." असें

मुळींच सांगत नाहींत. 'मी' कसा निर्माण होतो, तो सर्व प्रकारचें कर्म स्मृतींतून उद्भवणाऱ्या प्रतिक्रियेंतूनच (reactions of memory) कसें करतो, हें वर सांगितलेल्या तऱ्हेनें नीट अवधानपूर्वक पाहा (attention) एवढेंच ते सांगतात. हें साधलें तर 'मी' त्या त्या वेळीं नष्ट होतो, व त्या तशा अवस्थेंतूनहि कर्म होतच राहतें. अर्थातच तें कर्म, प्रतिक्रियेच्या (action born of reaction) स्वरूपाचें राहणार नाहीं. खऱ्या अर्थानें, "सहजकर्म" असें तें असतें. मात्र या कर्माची प्रेरणा, निर्लेप पण संवेदनशील अशा चित्तांतून म्हणजे मेंदूच्या ज्या भागाकडे आपण आतांपर्यन्त अजिबात लक्ष दिलेलें नाहीं अशा भागांतून, बुद्धीच्या पलीकडच्या प्रांतांतून, आलेली असते.

"In the state of attention, there is no reaction; one is merely attending.....Being empty, the mind is not projecting, seeking, wanting, hoping. It has understood all its own reactions and responses, its depth, its shallowness, *and there is nothing left. There is no division between the observer and the thing observed...* Now, it is only in the state of attention, that you can be a light unto yourself and then every action of your daily life springs from that light–*every action*, whether you are doing your job, cooking, going for a walk, mending clothes or what you will."

(*Talks in Europe*, (1963) p. 50,)

"निर्लेप मनाची ही अशी अवस्था, या क्षणाला माझी आहे कीं नाहीं?" असा एकच प्रश्न आपणांपुढें सारखा राहिला पाहिजे. मग जें काय कर्म आपल्या हातून घडेल तें घडेल; तें शुभाशुभाच्या पलीकडचें असेल. पण कुणालाहि त्यापासून दुःख असें होणार नाहीं. "कोणत्या का कर्माची होईना, प्रेरणा (urge for action) अशा निर्लेप माणसाला कशांतून मिळणार?" असा प्रश्न आपण विचारूं लागतों. (आपले प्रश्न कधीच संपत नाहींत). याचें उत्तर असें कीं, तो माणूस संवेदनाक्षम असूनहि 'मी' रहित आहे, यांतच सर्व कांहीं आलें. 'मी'च्या तृप्तीकरतां तो कांहींच करणार नाहीं. पण संवेदनक्षमतेतून (sensitivity) त्याची सर्व कृती होणार. ही संवेदनक्षमता कशी असते, याचा अंदाजसुद्धां आपणांला करतां येत नाहीं. कारण तिचा अनुभवच आपणांला आलेला नाहीं. तिला, 'प्रेम,' 'दैवी प्रेम,' 'सर्वाभूतीं असणारें प्रेम' अशीं नांवें आपण देऊ शकतों, पण कृष्णमूर्ति म्हणतात तेंच खरें :–

"We may love somebody in particular, but we do not know that extraordinarily vital, clear state of being which is love."

हा असा मुक्त झालेला माणूस म्हणजे नवाच मानव होय. लेखाच्या सुरु-

वातीला, माणसाला स्मृतींचें अत्यंत कार्यक्षम असें यंत्र मिळाल्यामुळें तो सर्वांत अधिक उत्क्रांत असा प्राणी आहे, असें आपण म्हटलें. त्याच्या स्मृतीचें आणि बुद्धीचें सामर्थ्य अजूनहि सारखें वाढत आहे, असें दिसतें. निरनिराळ्या यंत्रांचा व सुखसाधनांचा शोध लागून, त्याची कार्यक्षमताहि वाढत आहे पण ज्याअर्थीं माणूस, सुखी व स्वतंत्र असा झालेला नाहीं, त्याअर्थी वरील प्रगतीची संपूर्ण दिशाच चुकलेली आहे, असें दिसतें. त्याच्या जीवनांत, 'सुख मिळावें,' ही जी प्रेरणा पूर्वीइतकीच अजूनहि आहे, किंबहुना वाढलेली आहे, तीच त्याच्या स्वातंत्र्याच्या आड येत आहें असें दिसतें. या प्रेरणेच्या हुकमाबरहुकूम वागल्यामुळें त्याच्या हातून अशाच कृति घडत आल्या आहेत कीं, एक अत्यंत दुःखमय व संघर्षग्रस्त असें जग, त्यानें उभें केलें आहे. नवा मानव व अगदीं संपूर्ण नवें असें त्याचें जग, निर्माण करतां येईल का ? तसें झालें तर तिला 'उत्क्रांतीची पुढची झेंप' असें नांव विज्ञानवादी देतील. पण खरें पाहिलें असतां ही आमूलाग्र अशी क्रांतिच (total revolution) आहे. कृष्णमूर्ति म्हणतात :–

" So, when you really have the prefume of this thing not in somebody else's nostrils but in your nostrils, in your breath, in your being; not on some rare occasions but every day, waking and sleeping, then you, will see for yourself, without somebody telling you, what an extraordinary thing it is to live, to live with actuality, not with words and symbols, to live with death and therefore, to live every minute, *in a world in which there is not the known, but there is always freedom from the known.* It is only such a mind that can see what is truth, what is beauty, and that which is from the everlasting to the everlasting."

(*Talks in India* (1963) p. 35)

* * *

...५१३.५२ ...विवेक...
...२५६६ ... ७/७०/५२



सतरा

मनाचें वार्धक्य [पूर्वार्ध]

मन शरीराला वार्धक्य आणतें का वृद्ध शरीरांतलें मन आपोआपच मरगळूं लागतें, या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. "शरीराचा विचार अजिबात न करतां नुसत्या मनाच्या अवस्थेचाच विचार करतां येईल का? म्हणजे त्यांतून कांहीं महत्त्वाचें सत्य हातीं लागेल काय?" मीं हा प्रश्न जेव्हां उपस्थित केला तेव्हां माझे सारे मित्र मजवर खूपच रागावले. कारण ते माझ्यासारखेच वयोवृद्ध होते. वय जसें वाढतें तसें शरीराच्या इतर शक्ति कमी होऊं लागतात; पण रागावण्याची शक्ति अथवा प्रवृत्तिमात्र वाढत जाते.

प्रत्येकाला हा अनुभव आहे. इतरांचीं मतें अन्याय करणारीं म्हणून आपण सोडून देऊं. पण स्वतःचें स्वतःलासुद्धां असें कित्येकदां दिसतें कीं, तरुणपणांतला तल्लखपणा अथवा जोष उत्तरवयांत राहात नाहीं. 'हें असें होणारच; निसर्ग आहे हा.' असे कांहींतरी उद्‌गार काढून हा प्रश्न बाजूला टाकण्याचा प्रघात आहे. पण प्रश्न बाजूला टाकण्यानें सुटत नसतात, त्यांची गुंतागुंत वाढते. बुद्धींतला तल्लखपणा वयामुळें नाहींसा झाला तरी वृद्धजनांना असें वाटतें कीं, 'जीं वर्षें त्यांनीं गांठीला बांधलीं त्यांच्या संख्येमुळें त्यांना शहाणपणा अथवा जीवनाबद्दलची समज अधिक आहे. सभोंवतालीं जे प्रसंग उत्पन्न होतात, त्यांचें अचूक निदान करण्याची त्यांची शक्ति कांहीं विशेष आहे. इतरांचें काम एवढेंच आहे कीं, त्यांचे

निर्णय विचारावयाचे व ते निमूटपणें अमलांत आणावयाचे.' वृद्धांची ही अपेक्षा फलद्रूप कां होत नाहीं, या विषयांत आज आपणांला शिरावयाचें नाहीं. पण निसर्गाची योजना अशी कां आहे, कीं आयुष्याचा शेवट जसजसा जवळ येऊं लागेल तसतसें मानवाला दिलेलें वरदान म्हणजे त्याच्या मेंदूचें सामर्थ्य कमीकमी होत जावें ? शरीराचें वार्धक्य कसें व केव्हां येऊं लागतें, तें समजतें. पण मनाचें वार्धक्य नक्की केव्हां सुरू होतें ? तें वार्धक्य आपोआप येतें का त्याला आपण बोलावून आणतों ? हें वार्धक्य टाळतां येईल का ? हे प्रश्न फक्त वृद्धांच्याकरतांच आहेत असें नाहीं. कारण, प्रत्येक तरुणापुढें आज ना उद्यां वृद्ध होण्याचा प्रसंग वाढून ठेवलेलाच आहे. 'मनाचें वार्धक्य टाळतां येईल का ?' या प्रश्नाचा विचार, फक्त एका दृष्टिकोणांतून करायचें या लेखांत योजिलें आहे. आंब्याच्या झाडाला लागलेला मोहर कोणतेंतरी विघ्न पडून आम्रफल हातीं येण्यापूर्वीच वाळून गळून गेलेला केव्हां केव्हां आपण पाहतों. तसें तर माणसांचें होत नसेल ? आणि जें विघ्न अपूर्णतेंतच आपल्या जीवनाचा अंत घडवून आणते, तें आपल्या कांहीं घातक संवयीमुळेंच आणलें गेलें, असें तर नसेल ?

मनाचें वार्धक्य केव्हां सुरू होतें ? तरुणपणीं मनाचा उत्साह कांहीं आगळाच असतो, यांत शंका नाहीं. पण वार्धक्याचीं बीजें त्या वयांत मनोभूमींत नसतीलच अशी खात्री देतां येत नाहीं. कदाचित् असें सुद्धां असेल कीं, तरुणपणांत मनोराज्यें करावींत, आणि तीं विफल झालीं कीं म्हातारपणांत अश्रु ढाळीत बसावे, असा जो क्रम आहे त्यांतच वरील प्रश्नाचें उत्तर सांपडेल. माणसाच्या जीवनांत केव्हांतरी मनाचा एक चुकीचा व्यापार सुरू होतो, असें दिसतें. तो एकदां सुरू झाला कीं वाढतच जातो. कोणत्यातरी क्षणाला एक छंद लागतो. **जें दिसलें अथवा अनुभवलें तें आणखी हवें, अशी मागणी करण्याचा तो छंद होय.** ही मागणी कां सुरू होतें हें कळत नाहीं, शरीराची ती गरज नसते; मग मनानें आपली स्वतःची अशी स्वतंत्र गरज कां निर्माण करावी ? मन व शरीर यांच्यामध्यें हें जें द्वैत निर्माण होतें तें समजून घेणें जरूर आहे.

असें का आहे कीं, माणसाला दोन शरीरें आहेत ? त्याचें जीवन दुहेरी का आहे ? एकदम हा प्रश्न आपण झटकून टाकूं. आपलें जीवन एकजिनसी आहे असेंच आपण धरून चालतों. या समजुतीला प्रथम धक्का दिला तो फ्राईडनें. त्यानें असें दाखविलें कीं, चेहऱ्यावरचे भाव निराळे, व मनांत वाटतें निराळें. एवढींच दोन रूपें माणसाला असतात असें नाहीं. तर आणखी खोल तर गेलें तर असें दिसतें कीं, मनांत असतें त्याचेहि दोन भाग असतात. जें आपलें आपल्याला कळतें तें बहिर्मन; आणि जें आपलें असूनहि आपल्याला कळत नाहीं तें अंतर्मन. आणखी असें कीं, या अंतर्मनाची शक्ति बहिर्मनापेक्षां मोठी व एकदम प्रगट होऊन चकित करणारी अथवा

उत्पात घडविणारी. पण आपल्या जीवनांत जे अवघड प्रश्न उत्पन्न होतात ते अंतर्मनामुळें नसून 'मी' नांवाचा जो अंतर्देहच (image) तयार होतो अथवा भासतो, त्याच्यामुळें. कसें तें पाहूं.

प्रत्येकाला वाटतें कीं, आपल्या शरीरांत 'मी' नांवाचा एक पुतळा आहे. त्याचे हुकूम पाळणें एवढेंच शरीराचें काम. शरीराला स्वतःचें असें कामच नाहीं. अर्थात् धन्याचीं कामें चांगलीं व्हावींत म्हणून पूर्वीच्या गुलामांना आपलें शरीर समर्थ ठेवावें लागे. तशा शरीराच्या गरजा भागल्या पाहिजेत. पण खरें अस्तित्व फक्त 'मी' चें. या 'मी' चें ठीक चाललें आहे ना, एवढी एकच काळजी शरीरानें अहर्निश बाळगली पाहिजे.

'मी' ची स्थापना करून शरीराला त्याचा गुलाम, ज्या क्षणाला माणसानें बनविलें त्याच क्षणाला वार्धक्याचीं बीजें रोवलीं गेलीं. ही कृति प्रत्येकाच्या आयुष्यांत बालवयांतच घडते, असें दिसतें. केव्हांतरी असा एक दिवस उगवतो कीं, ज्या दिवसापासून 'माझें हें शरीर' असें वाटावयास लागतें. 'मी' इतरांपासून निराळा आहे अशी जाणीव होऊं लागते. त्याच दिवसापासून, 'आजचा दिवस कालच्यापेक्षां चांगला किंवा वाईट आहे,' असें माणूस म्हणूं लागतो. नव्हे त्या दिवसापासून आजच्या दिवसाचें महत्त्वच संपतें; व माणसाचे डोळे सारखे 'उद्यां'-कडे लागतात. कोठपर्यन्त ? ते डोळे कायमचे मिटेपर्यंत !

त्या दिवसापासून माणसाची बुद्धिहि पलटते. ती आपलें प्रत्येक काम तें किती का बारीकसारीक असेना, आपल्या धन्याला म्हणजे 'मी' ला विचारून मगच करतें. तें काम कसें करावें, हेंसुद्धा ती धन्यालाच विचारते. धन्यालामात्र वाटत असतें कीं, बुद्धीनें कांहीं, स्वतंत्र संशोधन केलें आहे व त्याची मातब्बरी विशेष आहे. 'मी' आवमात्र असा आणतो कीं, बुद्धि जें खरें अथवा योग्य ठरवील तेंच मी स्वीकारीन, अन्यथा नाहीं; ' पण कोणतें खरें अथवा योग्य, हें बुद्धीनें अगोदर (गुप्तपणें) 'मी'लाच विचारून ठेवलेलें असतें; व तें खरें कां व योग्य कां या-बद्दलचीं मोहक कारणें देणें, एवढेंच काम बुद्धि करीत असते. यापेक्षां अधिक कांहीं नाहीं.

एकदां का 'मी' ची प्रतिमा (image) हृदयांत तयार झाली कीं, पुढचें काम सोपें आहे. त्या प्रतिमेच्या इशाऱ्याबरहुकूम वागणें, एवढेंच काय तें शरीराचें काम. पण केव्हां केव्हां शरीर आपल्या स्वतःच्या गरजा पुढें मांडू लागतें. 'तुम्ही हें सांगता, पण माझ्याच्यानें जमणार नाहीं. मला त्रास होईल.' अशी विनवणी तें मृदु आवाजांत करूं लागतें. पण 'मी' इतका जुलमी राजा झाला नाहीं व होणार नाहीं. त्याला आपल्या आज्ञेचा भंग तर राहोच, पण ती चुकीची असण्याचा संभव आहे, असा संशय व्यक्त केलेलाहि खपत नाहीं. शरीराची थोडीशी कुरकुर दिसण्याचा

अवकाश, ती बुद्धीच्या मदतीनें ताबडतोब दडपून टाकली जाते. नुसतें शरीर एका बाजूला आणि बुद्धीची तलवार हातांत धरलेला 'मी' दुसऱ्या बाजूला, असें दृश्य केव्हां केव्हां दिसतें. 'मी' चा विजय ठरलेलाच असतो. पण प्रजेच्या खुषीची अजिबात पर्वा न करतां, ज्या राजानें दीर्घकाल राज्य केलेलें असतें त्याच्या कारकीर्दीचीं शेवटचीं वर्षें कशीं असतील ? अगदीं तोच प्रकार वृद्धावस्थेंत पाहावयास मिळतो. कित्येक ठिकाणीं बंडें होत आहेत, तीं दडपून टाकतां टाकतां नाकीं नव येत आहेत. क्षणाचीहि उसंत नाहीं. 'मला राज्यापासून सुख काडीचेंहि नाहीं पण तें सोडवतहि नाहीं.' अशी स्थिति वृद्ध माणसाची होते.

आपल्या जीवनाचें शेवटचें पर्व खरोखर असें व्हावयास नको आहे. कांहीं तरी अनैसर्गिक अथवा विपरीत वर्तन झाल्यामुळेंच वृद्धपणीं ही दशा येते, असें दिसतें. या दशेंत अनेक विकृति उत्पन्न होतात. त्यांचें थोडें वर्णन आतां करूं. वास्तविक प्रत्येक वृद्धाला या विकृतींची थोडीबहुत जाणीव असते. पण 'हें म्हातारपणामुळें होतें; म्हातारपणीं असें होणारच' असें समर्थन तो करीत असतो. कांहीं गुन्हेगारांना, 'गुन्हा कां घडला ?' याचीं कारणें देतां आलीं कीं, आपण निर्दोषी ठरूं असें वाटतें, त्यांतलाच हा प्रकार आहे. दुसरें असें कीं, इतर वृद्ध लोकांचेंहि असेंच झालें आहे, असें दिसत असल्यामुळें वयाला अथवा निसर्गाला जबाबदार धरून प्रत्येकजण आपली सुटका करून घेत असतो.

'वर्तनांत आणि शब्दांत ठराविकपणा' हा तर बहुतेक वृद्धांच्या बाबतींत दिसतो. घड्याळांत किती वाजले आहेत, हें न पाहतांदेखील वृद्धांच्या दिनचर्येवरून दिवसाची वेळ समजूं शकते. शारीरिक आरोग्याकरतां जो नियमितपणा जरूर असतो, त्याचा विचार आपण करीत नाहीं. वृद्धावस्थेंत ठराविक कृति जर नेमक्या वेळेस घडली नाहीं तर मनाची जी चलबिचल होते, अथवा तडफड होते, ती अगदीं डोळ्यांत भरण्यासारखी असते. वेळ चुकल्यामुळें होणारें नुकसान व ही तडफड यांचा मेळ अजिबात नसतो. अपरिचित माणसाला तर, 'भलताच कांहींतरी घात झालेला नाहीं ना ?' असा प्रश्न पडतो. भलतें असें कांहींच झालेलें नसतें. फक्त ठराविक गोष्ट ठराविक वेळेला झालेली नसते, एवढेंच काय तें.

ज्या वृद्धांना कोणत्यातरी मानसिक रोगाची विकृति (neurosis) जडलेली असते त्यांचा विचार आपण येथें करीत नाहीं, हें सांगणें जरूर आहे. अशा रोगांचीं बीजें, कदाचित् सगळ्याच वृद्धांच्या विचारपद्धतींत सांपडत असतील. पण आपण फक्त सर्वांनाच येणाऱ्या वृद्धावस्थेचें स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहोंत; व निरोगी वृद्धाचाच विचार करीत आहोंत.

शब्दांत येणारा ठराविकपणा हा मेंदूंतल्या विचाराची दिशा दाखवतो. वृद्धावस्थेंत माणसाचें मन प्रत्येक बाबतींत साचेबंद पद्धतीनें विचार करूं लागतें.

त्याचीं मतें ठरलेलीं असतात व तीं व्यक्त करणारे शब्द, द्यावयाचे आधार, किंबहुना कोणत्या आवाजांत म्हणजे किती आवेशानें बोलायचें, हेंसुद्धां ठरलेलें असतें.

या ठराविकपणाचेंच आणखी एक अंग आहे. बहुतेक वृद्ध माणसांना कोणत्या-तरी विशिष्ट विषयाचें वेड (obsession) असतें. त्या विषयाचें चिंतन म्हणजेच खरोखर त्यांचें जीवन असतें. ते खातात, पितात, पाहुण्यांशीं बोलतात, अथवा कुटुंबियांबरोबर प्रवासाला निघतात. पण त्या सर्व गोष्टींत त्यांना खरा रस नसतो. रस असतो त्यांना प्रिय असणाऱ्या चिंतनांत. तें चिंतन यथास्थित चालू राहील अशी व्यवस्था करूनच, ते इतर व्यवहार करतात. हें चिंतन कांहीं वेळां एखाद्या क्षुद्र अथवा निरुपयोगी वस्तूचें असतें; तर कांहीं वेळां तें समाजानें 'उदात्त' असा शिक्का ज्या विषयावर मारलेला असतो, त्या विषयाचें असतें. चिंतनाच्या मदतीनें कांहीं वृद्धजन एखाद्या विषयाचा व्यासंग करतात. तो व्यासंग समाजाला केव्हां केव्हां उपकारक ठरतो; अथवा तसा वाटतो. मग मिळणारी कीर्ति अथवा प्रशंसा, त्या माणसाच्या चित्तांत दडलेल्या स्वतःबद्दलच्या प्रतिमेला अधिक पुष्ट करते. ही प्रतिमा घडविण्यांत त्या चिंतनाचा फार मोठा भाग असतो.

आणखी एका विकृतीचा आतां विचार करूं. वरच्यासारखा छंद असणाऱ्या वृद्धाला अथवा कोणताहि छंद नसणाऱ्या वृद्धाला ती विकृति सारखीच सतावीत असते **प्रत्येक वृद्धाचीं कांहीं गाऱ्हाणीं (grievances) असतात, ही ती विकृति होय.** कुणाहिविरुद्ध गाऱ्हाणें नसेल तर तो वृद्ध कसला ? गाऱ्हाणें न सांगणारे वृद्ध आढळतील. तसेंच, तें तक्रारीच्या स्वरूपांत न मांडणारे व 'मी फक्त वस्तु-स्थिति सांगतों आहें' अशी प्रस्तावना करून, तिऱ्हाइताची भूमिका घेणारेहि कांहीं सांपडतील. कित्येक असेहि आढळतील कीं, त्यांच्या शब्दाशब्दांत जणू समाधान पाझरत आहे, असा भास होईल. पण मनाच्या तळाशीं कसलेंहि असमाधान नाहीं, असा वृद्ध सांपडणें अशक्य. कारण उघडच आहे. वृद्ध इसम मनानें वावरतो भूतकालांत, आणि त्याचें शरीर असतें वर्तमानकाळांत. केव्हां त्याची तक्रार कुटुंबियांविरुद्ध, तर केव्हां समाजाविरुद्ध, तर केव्हां संपूर्ण तरुणपिढीविरुद्ध असते. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, वृद्धाचें अंतःकरण खोलून पाहिलें तर तेथें दोनच कप्पे आढळतील. एक कप्पा गाऱ्हाण्यांचा, व दुसरा तीं कशीं योग्य आहेत हें दाखवणाऱ्या कारणांचा. हीं कारणें नानाप्रकारचीं असतात. त्या वृद्धानें इतरांकरतां काय केलें, व त्याबद्दल ते सर्वजण कसे कृतघ्न आहेत हें दाखविणारें एक सदर त्यांत असतें.

'विकृति' म्हणून वर ज्यांचा निर्देश केला त्यांना 'विकृति' तरी कसें म्हणावें ? त्या काढून घेतल्या तर वृद्ध माणसाचें कांहीं जीवन जागेवर उरतें

काय ? नाहीं. या विकृतींतच जगणें, ही प्रत्येक वृद्धाची जणू प्रकृतिच असते. तोच त्याचा स्थायीभाव बनतो. वरीलपैकीं कोणत्याच विकृतीचा मागमूस नसेल, तर त्या इसमाला 'वृद्ध' म्हणून कोणी ओळखणारदेखील नाहीं. त्याचें शरीर जीर्ण कसें दिसतें, याचें सर्वजण आश्चर्य करीत राहतील. कदाचित् जरेचें चिन्ह त्याच्या शरीरावर तितकेसें दिसणारहि नाहीं. माणूस सगळ्यांत जास्त वाळतो तो काळजीनेंच. (**चिंतासमम् नाऽस्ति शरीरशोषणम्** ।) असें एक जुनें वचन आहे. सर्वच वृद्धांना कसलीतरी काळजी, कसलेंतरी चिंतन त्रस्त करीत असतें. चिंतनाची संवय जिनें स्वतःला लागूच दिली नाहीं, अशी व्यक्ति पाहावयास मिळेल काय ? ही संवय वयावर का अवलंबून आहे ? तसें दिसत नाहीं. लहानपणापासूनच जीवनाकडे पाहण्याची एक पद्धति ठरून जाते; **त्या पद्धतीचा भूतकालाचें अथवा भविष्याचें 'चिंतन' हा मुख्य गाभा असतो.** हें चिंतन जेव्हां विशेष उपद्रवकारक होतें, तेव्हां त्याला आपण 'चिंता' म्हणतों. चिंतनाचें हें परिणतस्वरूप, बाल्यावस्थेंत अथवा तारुण्यांत सामान्यतः आढळत नाहीं. पण मनाला चिंतनाचें जें वळण लागतें, तें अगदीं लहानपणींच लागत असावें, असा माझा अंदाज आहे. याचाच अर्थ असा कीं, वार्धक्याचीं बीजें माणसाच्या पूर्ववयांतच असलीं पाहिजेत.

'मी' म्हणूनच ज्याला आपण ओळखतों तो आपल्या शरीरांतला अंतर्देह (image) हाच या सर्व अनर्थांचें मूळ आहे. हा अंतर्देह अथवा ही प्रतिमा, आपल्या हृदयांत कशी तयार होते, हें समजून घेणें फार जरुरीचें आहे कारण या प्रतिमेमुळेंच आपल्या आयुष्याचें सारें वाटोळें होतें, असें दिसतें. आयुष्याला कांहीं अर्थ असला तर तो सर्व वार्धक्यांत येणाऱ्या अवस्थेमुळें नाहींसा होतो. बालपणीं एखाद्या इमारतीचा पाया घालावा अत्यंत प्रयास करून जन्मभर तिचें बांधकाम करावें व शेवटीं त्या इमारतींत सुखानें नुसतें राहतांसुद्धां येऊं नये, याकरतां का मानवी जीवन आहे ? वार्धक्यांत जी अवस्था होते तिची अगोदर कल्पना आली, तर कोणतीच व्यक्ति जीवनाचा स्वीकार करणार नाहीं. 'हेंचि फल काय मम तपाला ?' असे उद्गार काढण्याकरतां का कोणी तप करतो ?

आमचा 'मी' खोटा आहे, हें ऐकण्याचा आम्हांला आतां अगदीं कंटाळा आला आहे. कितीवेळां हें ऐकायचें ? जुन्या अध्यात्मशास्त्रांत, कोणत्याहि धर्मग्रंथांत, तसेंच पुराणमतवादी अथवा नवमतवादी व्याख्यात्यांच्या प्रतिपादनांत हेंच सूत्र आलटून पालटून असतें. इतके का आम्ही मूर्ख आहोंत ? जो 'मी' जागेवरच नाहीं असें तुम्ही म्हणतां त्याची जाणीव, प्रत्येक क्षणाला आम्हांला होत असतांना 'तो एक भ्रम आहे,' असें का तुम्हांला म्हणावयाचें आहे ?' असे प्रश्न कांहीं वाचकांच्या मनांत उभे राहिले असतील. त्यांना असेंहि वाटण्याचा संभव आहे कीं,

वाचकांच्या सभ्यतेचा गैरफायदा कांहीं लेखकांनीं–निदान अध्यात्माबद्दल लिहिणाऱ्या लेखकांनीं–सतत घेत राहावा, असा एक पायंडाच पडून गेला आहे.

'जें प्रत्यक्ष अनुभवाला येतें तें खोटें', असें सांगतें तें अध्यात्मच नव्हे. आपणांपुढें प्रश्न एवढाच आहे कीं, आपला अनुभव खरोखर काय आहे? वृद्धावस्थेंत असें होत नाहीं का कीं, विसरत चाललें आहे तें तसें विसरूं नये म्हणून त्याला आपण घट्ट पकडून ठेवतों? कांहीं भाग विसरला तर तो पुन्हां पुन्हां आठवून जागेवर बसवण्याचा आपण प्रयत्न करतों, असें नाहीं का? एखाद्या मातीच्या पुतळ्याची पडझड होऊं लागली तर तो ठिकठिकाणीं लिंपून, जसाचा तसा कायम ठेवण्याची धडपड कलाकार करतो. तसाच प्रकार आपणहि करतों. ही पडझड जशी होईल तशी होऊं दिली, तर काय होईल? 'काळ जें करील तें करील, त्याची फिकीर करायची नाहीं,' असा निश्चय केला तर? कालाचा प्रवाह जें आणील तें खुषीनें स्वीकारायचें व जें घेऊन जाईल तें जाऊं द्यायचें, असें वर्तन ठेवलें तर? पण तसें होत नाहीं. माझी प्रतिमा (image) मला तसें करूं देत नाहीं. ज्या प्रतिमेला मी एवढ्या प्रेमानें कवटाळतों, तीच माझें शत्रुत्व करते. हरतऱ्हेचें दुःख ती निर्माण करते; व सर्वांत वाईट गोष्ट अशी कीं, ही प्रतिमाच मला इतरांपासून अलग पाडते. **वृद्धांच्या जीवनांत त्यांना भासणारा एकाकीपणा** (loneliness) **हाच खरा शाप आहे स्वतःची प्रतिमा जितकी ठांशीव व खंबीर, तितका हा एकाकीपणा अधिक दाह करतो.** तारुण्यांतहि स्वतःच्या प्रतिमेचें पूजन व संरक्षण चालूं असतें; पण ती प्रतिमा ठिसूळ असते व वरचेवर थोडीबहुत बदलते. निदान ती बदलली तर चालेल अशी मनोवृत्ति असते. प्रतिमारक्षणाची जिद्द वयाबरोबर वाढत जाते. पण त्याच वेळीं ती केव्हां ढासळेल, ही भीतिहि वाढूं लागते. या भीतीलाचा आपण 'काळजी' म्हणतों. **तारुण्य व वार्धक्य यांच्यामधला फरक हा असा आहे.** खरा रोग प्रतिमानिर्मितीचा आहे. या रोगाचा स्पर्श झालेला नाहीं, असा माणूसच दिसत नाहीं. लहान-मोठा, श्रीमंत-गरीब, सुशिक्षित अशिक्षित, सत्ताधीश-सत्ताहीन, सगळेच या प्रतिमा-रोगानें पछाडलेले आहेत.

चित्तांत सदैव राहणारी प्रतिमा (image) असते तरी कशी, याचें कृष्णमूर्तींनीं केलेलें वर्णन पाहा :–

"You have an image about yourself, ideas about yourself, concepts, experiences and so on. You have your particular idiosyncrasies, tendencies—all that has built an image about yourself .....If you observe, you have an image about yourself; that you are this, you are that; that you had this experience and

that experience; that you are ugly or you are beautiful; that you want to be this or you want to be that. You have an image, an idea, a conclusion about yourself, that you are spiritual, that you are the Atman, that you are the soul or whatever it is. You have an image carved by the mind or carved through your experience, through tradition, through circumstances, through strange pressures."

(*Talks in India* (1966) p. 47)

कृष्णमूर्तींनीं प्रतिमेचें दाखवलेलें हें स्वरूप लक्षांत घेतां, मनाच्या वार्धक्यावर कांहीं उपाय सांपडतो का, हें उत्तरार्धांत पाहूं.

* * *



अठरा

मनाचें वार्धक्य [उत्तरार्ध]

वार्धक्य आलें कीं, मृत्यूची चाहूल लागते. मृत्यु कदाचित् बराच दूर असेल; पण तो वाट चालूं लागला आहे अशी बातमी रोज कानांत सांगण्याची वार्धक्याला मोठी खोड आहे. केव्हां हळूं आवाजांत तर केव्हां मोठ्यानें हा जो घंटानाद होतो, तो फक्त त्या वृद्धालाच ऐकू येतो. इतरांना त्याची दखल नसते. मग तर्क (reason) त्या वृद्धाच्या मदतीला येतो. मृत्यु येऊं लागला आहे हें जर निश्चित आहे, तर मनांतल्या प्रतिमेचें रक्षण अधिक दक्षतेनें करावयास नको का? पण हा तर्क इतका बिनबुडाचा असतो कीं, विचारतां सोय नाहीं. शत्रूच्या सामर्थ्याचा अजमास न घेतां, संरक्षणाची तयारी केली म्हणण्यांत काय अर्थ आहे ? प्रत्येक माणूस असेंच करतो. मृत्यूनें आपल्या प्रतिमेसह सबंध शरीरच उद्ध्वस्त होणार आहे हें दिसत असूनहि, प्रतिमेचा खंबीरपणा वाढविण्याची खटपट आम्ही रात्रंदिवस चालूं ठेवतों. या खटपटीचा फार मोठा भाग नुसत्या काळजीनेंच व्यापलेला असतो.

शरीर थकत चाललें तर शक्य तोंवर बाहेरच्या साधनांची मदत घेणें, अथवा स्वकीयांचा आधार घेणें, हें अगदीं नैसर्गिक आहे; पण या शारीरिक दुर्बलतेचा मनावरहि परिणाम होतो. 'असलेला आधार नाहींसा झाला तर ?' असा प्रश्न हरघडी मन करूं लागतें. स्वसंरक्षणाच्या सहजप्रवृत्तीपासून हा प्रश्न आपणांला

किती दूर नेतो, हें पाहण्यासारखें आहे. माझा पाय घसरूं लागला तर मी स्वतःला सावरून धरणें, अगदीं साहजिक आहे. पण उद्यां मी पडणार म्हणून आजच शरीराचा तोल मी सांभाळूं लागलों, तर तें शहाणपणाचें होईल काय ? आपण ज्याला तर्क म्हणतों तो अगदीं याच पद्धतीनें काम करतो. माणसाच्या मेंदूकडे शरीराच्या रक्षणाचें काम निसर्गानें जेव्हां सोंपविलें, तेव्हां ती कामगिरी इतकी गुंतागुंतीची नव्हती. शरीरावर संकट प्रत्यक्ष येऊन ठेपलें असतां तत्काळ करावयाची ती एक क्रिया होती. पण बुद्धीचा जसजसा विकास होत गेला तसतसा या क्रियेंत फारच बदल होत गेला. 'भविष्यकाळाची तरतूद' ही देहरक्षणांतच येते असें माणसानें ठरविलें व मेंदूला तसा हुकूम दिला. मेंदूनें ही नवी जबाबदारी जेव्हां अंगावर घेतली तेव्हांच माणसाच्या जीवनांत भीतीचा प्रवेश झाला. ही भीति तर्कावर आधारलेली आहे, असा भास होतो. पण, 'पुढें काय होईल ?' याचें नुसतें चिंतन तर्काच्या चौकटींत बसतें काय ? म्हणजे, देहयात्रेकरतां त्याची जरुरी आहे काय ? 'पुढें जें खरोखरच लागणार त्याच्या प्राप्तीची योजना आम्ही आंखून ठेवतों, यापेक्षां अधिक कांहींच करीत नाहीं,' असें वाचक म्हणतील. पण प्राथमिक गरजांच्या क्षेत्रापुरत्याच या योजना असतात काय ? कां, 'माझ्या आजपर्यंतच्या प्रतिष्ठेला अनुसरून एवढें मला मिळालेंच पाहिजे,' अशा आग्रहांतून या योजना निघालेल्या असतात ? बहुतेक वृद्धांच्या बाबतींत त्यांची स्वतःबद्दलची प्रतिमा (image) हुकूम देईल त्याप्रमाणेंच योजनेचे नकाशे तयार होत असतात. त्यांत कितीतरी गोष्टी गृहीत धरलेल्या असतात, व हें सारें तर्कशुद्ध आहे, असा धोशा मात्र सारखा चालू असतो. प्रतिमेचा हा जाच, त्यांतून उद्भवणारा संघर्ष हाच वृद्धपणीं अंतःकरण जाळीत असतो. वार्धक्य त्यानें येतें. निदान मनाचें वार्धक्य आणणारा हा प्रतिमारोगच आहे, यांत संशय नाहीं. या रोगाचें पुढील वर्णन पाहा.

" Man's identification with his idea of himself gives him a spacious and precarious sense of permanence. For, this idea is relatively fixed, *being based upon carefully selected memories of his past memories which have a preserved and fixed character*... But to the degree that he identifies himself with the fixed idea, he becomes aware of 'life' as something which flows past him, faster as he grows older as his idea becomes more rigid, more bolstered with memories. The more he attempts to clutch the world, the more he feels it as a process in motion."

(" *Way af Zen* " by Allan Watts...p. 122)

एकूण प्रकार असा दिसतो कीं, जीवन खरोखर स्थिर नसतांना त्याच्या प्रवाहांत 'एक भक्कम किल्ला बांधून त्यांतच मी राहणार व हा किल्ला मी

ढामळं देणार नाहीं. ' अशा हट्टांतून वृद्धावस्थेंतल्या साऱ्या अडचणी उत्पन्न होतात. हा हट्ट पूर्ववयांतच सुरू झालेला असतो. पण उत्तरवयांत वृद्धाचें संपूर्ण जीवन त्या हट्टाभोंवतींच फिरत राहतें. प्रत्येक क्षणाकडे व प्रत्येक घटनेकडे, ' माझ्या या हट्टाला बाध येत नाहीं ना ?' अशा दृष्टीनेंच तो पाहात असतो. जणू काय, त्या क्षणाला अथवा घटनेला स्वतंत्र अशी कांहीं किंमतच नसते.

पण, ' हा आपला नुसता हट्ट आहे, व तो कांहीं असत्य गोष्टी सत्य समजण्याच्या वेडेपणांतून निघालेला आहे,' अशी जाणीव वृद्ध माणसाला मुळींच होत नाहीं. ती व्हावी कशी ? एवढाच प्रश्न आपणांपुढें आहे. खरें पाहिलें असतां वृद्धावस्थेंत-अपवाद सोडले तर-बुद्धीला कांहीं प्रमाणांत परिपक्वता आलेली असते. जीवनांतलीं सुखें (pleasures) बऱ्याच प्रमाणांत भोगून झालेलीं असतात. म्हणूनच त्यांच्याबद्दल तरुणांच्या ज्या भलत्या कल्पना असतात, त्यापासून वृद्ध माणूस मुक्त झालेला असतो. तसेंच जगाचा अनुभव दीर्घकालीन असल्यामुळेंच बऱ्याच अपेक्षांचा फोलपणा त्याच्या लक्षांत आलेला असतो. घरांतली सत्ता त्याला जेव्हां सोडून जाते तेव्हांच तिनें आपल्याबरोबर जबाबदारीहि नेलेली असते; व मोकळा वेळ व चिंतनस्वातंत्र्य हीं त्याच्या पदरांत आयतीं पडलेलीं असतात. धकाधकीच्या जीवनांत ज्या असंख्य विवंचना कराव्या लागतात, त्यांपासून तो शरीरानें तरी दूर असतो. पण इतकी अनुकूलता जमेला असूनहि, त्याची अवस्था एवढी दयनीय कां ?

जें अनुकूल तेंच प्रतिकूल कसें होतें पाहा. " मला इतका अनुभव मिळाला आहे, त्याअर्थीं मला जें वाटतें तेंच जीवनाबद्दलचें अंतिम सत्य." अशी कांहींतरी सुप्त भावना प्रत्येक वृद्धाच्या मनांत असते. ही भावना इतरांपेक्षां त्यालाच अधिक घातक होते. ' जीवनाचें निरीक्षण आतां आणखी करायची जरूर काय ?' असा त्याचा प्रश्न असतो. तो विसरतो कीं, जें संपादलें व सांठवलें ती निव्वळ अडगळ असते. या अडगळीच्या खोलींतच सदा राहिल्यानें त्याच्या अधु डोळ्यांना चालू जीवनाचा प्रकाश दिसतच नाहीं. दिसला तरी तो सहन होत नाहीं. बहुतेक वृद्ध माणसांचे जीवनाबद्दलचे आडाखे (conclusions) ठरलेले असतात; व फक्त त्यांचा पडताळा पाहण्याचें काम ते करीत असतात. जीवनाचा नवा शोध घेण्याची जरूरच वृद्धांना वाटत नाहीं. ' हा शोध नको,' असें वाटण्याचें आणखी एक कारण आहे. " आपल्याला आतां इतका वेळ आहे कुठें ?" असें मन आंतून कुजबुजतें. " आतां संशय नको, जें सांपडलें आहे तेंच पक्कें करावें, म्हणजे झालें," असें वृद्ध मनाला वाटतें. विशेषतः परमार्थाच्या गोष्टी कुणी बोलूं लागला तर वृद्धांची एकच अपेक्षा असते. आपल्या धारणेला पोषक असेल तेंच ऐकावें, जें धक्का देणारें असेल तें टाळावें; निदान त्याचा अर्थ आपल्या साधनेला अनुसरून लावावा. या

भूमिकेंतूनच ते अध्यात्म अथवा जीवनाच्या अंतरंगांत शिरणारें इतर महत्त्वाचें कांहीं असेल तर तें ऐकतात. "जीवनाचें नवें दर्शन नको; मला जीवन जसें समजलें तसेंच तें आहे, असें धरून मी चालणार. तेंच सत्य आहे, असा हट्ट मी धरणार," हाच याचा अर्थ नाहीं का ?

येथें थोडा शरीराच्या दुर्बलतेचा व त्यामुळें मनाला आलेल्या थकव्याचा संबंध येतो. म्हणूनच शरीराच्या निरोगीपणावर सर्व विचारवंतांनी भर दिला आहे. मन तल्लख असेल तरच तें नवीन कांहींतरी ग्रहण करूं शकेल. पण "माझें शरीर व मन वृद्ध झालें आहे; म्हणून मला सत्याकडे पाहण्याचें श्रम घ्यावयास सांगूं नका," असें का म्हणतां येईल ? शरीराची गोष्ट वेगळी आहे. पण मन सदैव भूतकालांत फिरत राहतें तेव्हांच तें थकतें; व तें असें थकलें कीं, "नका आतां मला हालवूं," अशी विनवणी करूं लागतें. मनाचा वापर अशा तऱ्हेनें आपण करतों कीं, तें थकून जावें; व कोणीहि चूक दाखविली कीं लगेच म्हणतों, "बाबारे, मी फार थकून गेलों आहे. नको आतां मला थांबायला सांगूं," व आहे तीच चाल चालूं ठेवतों. त्याच त्या गोष्टींची पुनरावृत्ति केल्यामुळें तेच ते विचार सारखे घोळवीत राहिल्यामुळें, मनाला मरगळ आली आहे हें जरी ध्यानांत आलें, तरी जुना सांचा टाकवत नाहीं. कारण, त्यांत सुरक्षिततेचा आधार (security) वाटतो. हें दुष्ट वर्तुळ तोडलें पाहिजे.

वृद्धपणांत मनाचा थकवा वाढतच जातो, याचें आणखी एक कारण आहे. जीवनाचा प्रवाह स्वस्थ बसलेल्या मनाला सारखे धक्के देत असतो; व न हालण्याचा आग्रह जितका खंबीर तितका या धक्क्यांचा त्रास अधिक, हें उघड आहे. म्हणूनच नवीन काळाशीं जे वृद्ध जमवून घेतात त्यांना त्रास कमी होतो.

मनांतली प्रतिमा जितकी मजबूत तितक्या अडचणी जास्त, असें दिसतें. प्रतिमा आगंतुक आली आहे, ती मानवी जीवनाचा अविभाज्य असा भाग नाहीं, हें मुळीं लक्षांतच येत नाहीं. जें होत आहे ते नैसर्गिकच असलें पाहिजे, असें आपण धरून चालतों. नैसर्गिक असतें फक्त शारीरिक दुर्बलता व येणारें मरण. पण मरण येणार म्हणून ज्या ज्या कृति मनानें आपण करूं लागतों, त्या सर्व टाळतां येणें शक्य आहे. आत्मसंरक्षणाच्या भावनेचें क्षेत्र शरीरापुरतेंच मर्यादित ठेवतां येणार नाहीं का, याचा शोध घेणें जरूर आहे.

स्वतःबद्दलची विशिष्ट प्रतिमा दैनंदिन जीवनाकरतांही जरूर वाटते. आपला सर्व सारासार विचार या प्रतिमेमार्फत चालतो. मला नांव नसलें तर सर्व व्यवहार बंद पडतील. तसेंच एवंगुणविशिष्ट असा 'मी' जागेवर नसला तर जीवन चालणार कसें, अशी प्रामाणिक शंका प्रत्येकाला येते. या गुणांत उघड दिसणारे दुर्गुणही असतात, ही आणखी एक मौज आहे. कसें का असेना, "हा मनांतला

पुतळा कायम ठेवून काय करायचें तें सांगा," असा ठराविक आग्रह वृद्धांचा असतो. दारू सोडण्याचें पथ्य औषधाकरतां करावें लागणार नाहीं तें औषध द्या, या तळीरामाच्या मागणीसारखीच ही मागणी आहे. वरवर पाहिलें तर ही मागणी स्वाभाविक वाटते. "प्रत्येक माणसाचें एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व (personality) असतें. तें कायम राहावयास नको का ?" अशी शंकाहि कांहीं वाचक विचारतील; व आधुनिक मानसशास्त्राचा आधार घेतील. पण, 'माझें व्यक्तिमत्त्व' हा अहंकारच नव्हे काय ? "मला हें आवडत नाहीं; तें खपत नाहीं. स्वाभिमान सोडणारा मी नाहीं. अपमान गिळणारे दुसरे असतील; पण मी नाहीं. मी शिस्तीचा भोक्ता आहें. मला उलट बोललेलें ऐकायची संवय नाहीं," अशा प्रकारचे उद्‌गार वृद्धांच्या तोंडून नेहमीं निघतात. या उद्‌गारांपैकीं कांहीं उद्‌गार असा भास निर्माण करतात कीं, कोणतातरी उच्च आदर्श या इसमापुढें आहे; एवढेंच नव्हे, तर तो त्यानें आत्मसात् केला आहे. आतां त्यांचेपुढें अडचण एवढीच उरली आहे कीं, इतरांना ही माहिती नाहीं; व ती देणें भाग आहे ! खरा प्रकार असा असतो कीं, हे नुसते शब्द असतात. 'अंदरकी बात' निराळीच असते. कोणत्यातरी स्वार्थाला स्वाभिमानाचें नांव दिलें जातें. कारण, "मी स्वार्थी आहें, म्हणून मला अमुक हवें," असें म्हटलें तर तें लोक मानीत नाहींत. दुसऱ्याची फसवणूक करण्याकरतां स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा अथवा चारित्र्याचा (character) टेंभा मिरविला जातो, तेव्हां तें एक उघडें असें असत्य असतें. पण खरी अडचण यापुढची आहे. "मी शीलाची कदर बाळगणारा आहें. मला भ्रष्टाचार मुळींच खपत नाहीं. मी तर तो करणार नाहींच; पण इतर कोणी केला तर त्याला फाडून खाईन." असें अंतःकरणापासून म्हणणारीं माणसें आढळतात. बहुतेक ते वृद्धच असतात. त्यांना शीलाचें खरोखरच महत्त्व वाटतें. पण कां ? **तो एक आत्मपूजनाचा प्रकार म्हणून!** 'सच्छील व्यक्तिमत्त्व' ही एक चांगली व समाजाला उपकारक अशी गोष्ट असतांनादेखील, ती अहंकाराचें पोषण कसें करते याचें हें उदाहरण आहे. अशा व्यक्तींना संघर्षाचा जो उपद्रव होतो तो त्यांच्या हृदयांतील स्वतःबद्दलच्या प्रतिमेमुळें. या प्रतिमेच्यामार्फतच जीवनाकडे व इतरांकडे पाहण्याच्या त्यांच्या संवयीमुळें सत्यान्वेषणाची त्यांची शक्ति नष्ट झालेली असते. एवढेंच नव्हे, तर सहानुभूति व प्रेम यांचाहि झरा आटलेला असतो. ते स्वतः त्या प्रतिमेतच बद्ध असतात. **सत्यदर्शनाचें त्यांचें क्षितिज ही प्रतिमा ठरविते.** येथेंच सांगून टाकलेलें बरें, कीं समाजाला सोईस्कर अशा प्रतिमांचें पोषण तो मोठ्या दक्षतेनें करतो.

वृद्धांच्या अडचणी या अशा आहेत. त्या नाहींतच असें कोणी म्हणत नाहीं. मुक्त होण्याचा मार्ग आडवणारे हे पर्वत अनुल्लंघनीय आहेत का दुर्लंघ्य आहेत, एवढाच काय तो प्रश्न आपणांपुढें आहे.

वार्धक्यांत मनाचें काय होतें याचें दर्शन, 'हें असें होणारच' अशा प्रकारचा कोणताहि विचार मनांत न येतां घेतां येईल काय ? असें दर्शन घेण्यास मदत व्हावी, म्हणून जरा विस्तारानें वृद्धावस्थेंतल्या अनेक गोष्टींचा आपण येथवर विचार केला. वृद्धावस्थेंत, मन धरलेली जागा सोडीत नाहीं, ही एकच मुख्य अडचण आहे. एवढेंच नव्हें, तर 'मी वृद्ध आहें, म्हणूनच अशी अशी समस्या मला त्रस्त करीत आहे' असेंहि आपण समजूं लागतों. प्रत्येक वृद्धानें जणू काय आपापली समस्या अचूक पकडलेली असते व माझ्या परिस्थितींत ही समस्या असणारच, असें ठरवून टाकलेलें असतें.

पुढच्या मुद्द्याकडे वळण्यापूर्वी, वृद्धावस्थेचें चित्र आणखी एकदां नीट पाहून घेऊं :– (खरें म्हणजे, कळूं लागल्यापासूनच्या जीवनाचेंच हें चित्र आहे. वृद्धावस्थेंत या चित्राचे रंग जास्त गडद होतात, इतकेंच काय तें.)

"How frightened we are of the new, of the unknown ! We like to remain enclosed in our daily habits, routines, quarrels and anxieties. We like to think in the same old way, take the same road, see the same faces and have the same worries. We dislike to meet strangers, and when we do, we are aloof and distraught. And how frightened we are to encounter an unfamiliar animal ! We move within the walls of our own thought, and when we do venture out it is still within the extension of those walls. We have never an ending, but always nourish the continuous. We carry from day to day the burden of yesterday, our life is one long, continuous movement, and our minds are dull and insensitive."

(*Commentaries on Living I*, p. 234)

प्रतिमारोगापासून मुक्त कसें होतां येईल, याचा शोध आतां आपण घेऊं. मनाला आलेलें वार्धक्य घालविण्याचा तेवढा एकच उपाय आहे.

वर दिसणाऱ्या देहाखेरीज आपल्या चित्तांत आणखी एक अंतर्देह (image) आहे, ही जाणीव होणें हें **पहिलें पाऊल** होय. ही जाणीव शब्दांतूनच आलेली व शब्दांच्या बाहेर पडून हृदयांत न शिरलेली, अशी असतां उपयोगी नाहीं. ती खरी जाणीवच नव्हे. तर्कानें काढलेला निष्कर्ष हा या रोगावर उपाय नव्हे. हा निष्कर्ष कडेलाच राहतो; व मध्यबिंदूंत प्रतिमा अगदीं सुरक्षित अशी राहूं शकते. आतांपर्यंत हेंच आपण करीत आलों. चित्तांतल्या प्रतिमेचें दर्शन, निर्विचार अशा अलग मनालाच घेतां येतें, असें दिसतें. केव्हां केव्हां असें होतें कीं, 'आंतून हुकूम सोडणारा 'मी' आहे तरी कोण ?' असा प्रश्न मन विचारूं लागतें; व संचितज्ञानाच्या

मदतीनेंच काम करणाऱ्या बुद्धीची कुजबूज न ऐकली तर, कोणत्या तरी निष्कर्षावर (conclusion) अगर अनुभवावर अगर स्मृतीवर रोवलेला पाय म्हणजेच हा 'मी' असा प्रत्यय येतो. आणखी थोडें खोल पाहिलें तर अनेक निष्कर्ष, अनुभवा आणि स्मृति यांचें एक सूत्र, असें स्वरूप 'मी' चें असावें, असें वाटूं लागतें. पण हें होतें न होतें तोंच, चित्तांत एक पिंड तयार होतो; व तोच पुढचें सर्व काम करूं लागतो. त्या पिंडाचा आकारच (खरें म्हटलें तर त्याच्या घटक असणाऱ्या विशिष्ट स्मृति) मग एका विवक्षित दिशेनें आपणांला पाहावयास लावतो. त्या दिशेला जी व जशी सृष्टि दिसेल तीच खरी, असें आपण मानूं लागतों; व त्या सृष्टींतच मग आपण जगूं लागतों. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर तो पिंड, कोळ्याप्रमाणें आपल्या शरीरांतून कांहीं धागे बाहेर काढतो, त्यांचें एक जाळें विणतो व त्या जाळ्यांतच तो पुढें राहूं लागतो. एकदां हें समजल्यासारखें, ध्यानांत आल्यासारखें वाटतें; पण पुढल्याच क्षणाला सर्व मावळतें, आणि आपला नेहमींचाच व्यवहार जारीनें सुरू होतो.

'माझ्या सर्व जुन्या संवयी मीं टाकून दिल्या आहेत. माझा पुनर्जन्म झाला आहे. मी अंतर्बाह्य बदलून गेलों आहें.' असे उद्गार मोठ्या दिमाखानें काढतांना, कांहींजण आढळतात. हे उद्गार प्रामाणिकपणाचे असले तरी नक्की काय झालेलें असतें? एक प्रतिमा जाऊन तिच्या जागीं दुसरी प्रतिमा आलेली असते. या घटनेला 'जीवनांतली क्रांति' असें ती व्यक्ति समजत असली, तरी ती खरी क्रांति नव्हे. कोणतातरी उबग आल्यामुळें, कसल्यातरी तीव्र प्रतिक्रियेमुळें, त्या माणसानें स्वतःमध्यें डोळ्यांत भरण्यासारखी सुधारणा (reform) केलेली असते, एवढेंच काय तें. तिला समाज फार महत्त्व देतो, हें तर आपण पाहतोंच. पण प्रतिमारोगाचें उच्चाटन हें नव्हे. केव्हां केव्हां चालू संघर्षामुळें, प्रस्तुतच्या समस्येनें, जीव इतका हैराण होतो कीं, कशी का होईना, त्यांतून सुटका व्हावी असें वाटू लागतें. या सुटकेला मदत करणाऱ्या अनेक गोष्टी समाजात तयारच असतात. मग माणूस चित्ताच्या मध्यभागीं असलेल्या जुन्या आकांक्षा, प्रथमच्या वासना, काढून टाकून त्यांच्या ठिकाणीं नव्या व 'जास्त चांगल्या' आकांक्षांची प्रस्थापना करतो; व 'क्रांति झाली,' असें म्हणूं लागतो. पण या नव्या आकांक्षांचा पिंडहि जें विश्व निर्माण करतो त्यांतहि संघर्ष आणि असमाधान वाटचाला येतेंच. एखाद्या रोगावर इंजेक्शनें दिल्यामुळें नवा रोग उत्पन्न व्हावा, तसेंच आहे हें.

एकूण असें दिसतें कीं, प्रतिमारोगाचें मूळ सांपडलें पाहिजे. जी यंत्रणा प्रतिमा निर्माण करते, 'मी'-चा अंतर्देह तयार करते, ती ओळखतां आली पाहिजे. अंतःकरणांत प्रतिमा आहे. एवढ्या जाणिवेनें भागत नाहीं, तर वरील यंत्रणेचीसुद्धां जाणीव झाली पाहिजे. वर उल्लेख केलेला कोळी आपलें जाळें विणीत असतांना

पाहतां आला पाहिजे; व त्याकरतां त्या जाळ्याच्या बाहेर पदक्षेप करतां आला पाहिजे.

'हा पदक्षेप प्रत्येक क्षणाला होत आहे ना, का मी जाळ्यांतच आहे?' असा प्रश्न स्वतःला विचारण्याचें धैर्य वृद्धावस्थेंतहि अंगीं आणतां येईल काय? 'जें घर पूर्वायुष्यांत वर्षानुवर्षे खपून बांधून तयार केलें, व ज्याचा आश्रय सदैव घेण्याखेरीज मीं आतांपर्यन्त दुसरें कांहीं केलेंच नाहीं, त्या घराच्याबाहेर दर क्षणाला येऊन मी त्या घराकडे पाहूं शकतों काय?' असा प्रश्न प्रत्येक वृद्धानें स्वतःच्या मनाला केला पाहिजे. प्रश्न नव्हे, ही कृतीच केली पाहिजे तीं वृद्धपणींच होणें शक्य आहे. कारण हें घर तकलुपी आहे; तें पुन्हांपुन्हां पडतें व पुन्हांपुन्हां बांधावें लागतें, हा अनुभव वृद्धालाच पुरेपूर आलेला असतो. म्हणून इतक्या जीर्ण घराचा खोटा आश्रय घेण्यापेक्षां उघड्यावरच राहणें बरें, हें शहाणपण तरुणापेक्षां त्यालाच सुचण्याचा संभव जास्त आहे. पण त्याकरतां, अमुकच हवें, तमुकच झालें पाहिजे, ही तथाकथित विधायक (positive) दृष्टि सोडून, अकरणात्मक जीवन (life of total negation) जगण्याचा प्रयोग वारंवार करीत राहिलें पाहिजे. या प्रयोगांत काय काय करावें लागतें, किती जागरूक राहावें लागतें, याचें दिग्दर्शन पुढील शब्दांत कृष्णमूर्तींनीं केलें आहे :-

"Total negation is that freedom. To negate everything we consider to be positive, to negate the total social morality, to negate all inward acceptance of authority, *to negate everything one has said or concluded about reality*, to negate all tradition, all teaching, all knowledge except technological knowledge, to negate all experience, *to negate all the drives which stem from remembered or forgotten pleasures, to negate all fulfilment, to negate all commitments* to act in a particular way, to negate all ideas, all principles, all theories. Such negation is the most positive action, therefore, it is freedom."

(*Urgency of Change*, p. 148)

एकंदरींत असें दिसतें कीं, प्रतिमेमुळें चित्तांत संघर्षाची पेरणी सारखी होत राहते. प्रतिमा जर मला, "तूं इतरांपेक्षां निराळा आहेस, तुझें व्यक्तिमत्त्व कांहीं विशेष आहे," असें रात्रंदिवस सारखें बजावीत असली तर ती, **दोन प्रकारचा संघर्ष** निर्माण करील, हें अगदीं उघड आहे. **पहिला संघर्ष** इतर व्यक्तींशीं; मग मी त्यांना स्वकीय समजो अगर परकीय समजो. जी व्यक्ति माझी प्रतिमा पुष्ट करते ती मला आवडेल; जी तिचेशीं वैर मांडते ती माझी शत्रु होईल. पहिल्या वर्गांतल्या व्यक्तिसुद्धां मला कायमच्या आवडतील अशी खात्री नाहीं. कारण, त्या प्रत्येक व्यक्तीजवळ तिची स्वतःची प्रतिमा असतेच; व त्या प्रतिमेच्या मागणी-

प्रमाणें तिचेंहि वर्तन चालूं असतें. या वर्तनांत केव्हां फरक पडेल त्याचा नेम नसतो. शिवाय प्रेम कायम असेल तो काळसुद्धां, 'त्याला धोका पोचत नाहीं ना,' या सततच्या भीतीमुळें तापदायकच होतो. एकूण असें दिसतें कीं, प्रतिमेचें अस्तित्व हीच युद्धाची सुप्त अथवा प्रगट तयारी होय. दुसरा संघर्ष जीवनप्रवाहाशीं सुरू होतो. जीवनांत नवीन नवीन घटना फार मोठ्या वेगानें घडत असतात. दर क्षणाला तें बदलत असतें; व मी मात्र माझ्या प्रतिमेंतच स्थिर राहतो. प्रवाहाबरोबर मला जातां न आल्यामुळें जे धक्के मला बसतात, ते वरचेवर माझ्या मनाची शक्ति कमी करतात. या दुहेरी संघर्षामुळें माझ्या मनाला (व त्यामुळें कांहीं प्रमाणांत शरीरालाहि) वार्धक्य येऊं लागतें, व तें वाढत जातें. हें वार्धक्य दूर ठेवण्याचा उपाय एकच. **जीवनांतला संघर्ष मिटविणें; व त्याकरतां प्रतिमेशिवाय जीवन जगणें हा तो उपाय होय.**

मनाला वार्धक्य कां यावें, या प्रश्न पूर्वार्धांत (मागील प्रकरणांत) आपण चर्चेला घेतला व त्याचें बीज, माणूस मनांत जी प्रतिमा तयार करतो तींत सांपडलें. मृत्यूची भीति, शरीराची दुर्बलता, या वृद्धावस्थेबरोबर येणाऱ्या कांहीं थोड्या गोष्टी जरी आपणांस आढळल्या तरी एकंदरीनें असेंच दिसून आलें कीं, माणसाची 'मी'बद्दलची कल्पनाच त्याचा घात करते. या कल्पनेंतून अनेक भ्रम जन्माला येतात. ते एकदा मानगुटीला बसले कीं, सत्य दिसेनासें होतें व असत्य सत्यासारखें भासूं लागतें. मग जीवन म्हणजे एक निरर्थक व कधींहि न संपणारी अशी लढाई होते. त्यामुळें स्मरणशक्ति, बुद्धि, निर्णय घेण्याची शक्ति, यासुद्धां नीट काम देईनाशा होतात, व पूर्वार्धांत वर्णन केलेल्या विकृति दिसूं लागतात. या विकृतींमुळें वृद्ध माणूस स्वतःच्या प्रतिमेमध्यें अधिकच रुतला जातो. फारच जर्जर अवस्था झाली तर पहिली प्रतिमा टाकून तिच्या जागीं दुसरी आणण्यांत येते. पण संघर्ष कायम राहतो, व वार्धक्य वाढीस लागतें. जीवनाचें परिपक्व फळ हातीं येतच नाहीं. संपूर्ण विकास (full flowering) हा तर जीवनहेतु आहे. तो साध्य व्हावा आणि **'सोनियाचा दिवस अमृतें पाहिला'** असे उद्गार तोंडून निघावेत असें वाटत असेल, तर **अकरणात्मक जीवनाची पद्धति आत्मसात् केली पाहिजे.** प्रतिमेंतून निघणाऱ्या प्रेरणांच्या आधारावर चालणारें जीवन संपलें पाहिजे. मनांतला अंतर्देह वितळला पाहिजे. तरच, शरीर वृद्ध झालें तरी मनाला वार्धक्य न येतां, तें सदैव ताजेंतवानें व कार्यक्षम राहील.

* * *



एकोणीस

भीति हें सुखलालसेचेंच दुसरें नांव आहे काय ?

'भय' हा शब्द, आपण मनाच्या कांहीं ठराविक व्यापारांनाच लावतो. बांगला देशचे रहिवासी सैनिकांच्या भीतीमुळें तो देश सोडून भारतांत पळून येत आहेत असें आपण म्हणतों. त्यांच्या पलायनाला कारण होणारी प्रेरणा ही भीतिच आहे, यांत संशय नाहीं. वाघ अंगावर येत असतांना जी पळायला लावते तीहि भीति आहे, यांत शंका नाहीं. सर्प दिसतांच आपण एकदम उडी मारतों; कारण तो चावेल हें आपल्या चटकन् लक्षांत येतें व त्या भीतीमुळें आपण उडी मारतों. संकट येऊन ठेपलें असतांना त्या संकटापासून दूर जावें असें वाटायला लावणारा विचार म्हणजे 'भीति' असें आपण समजतों. पण वरील तीनहि उदाहरणांत संकटाचा जो प्रकार आहे तो जीवरक्षणाच्या नैसर्गिक प्रेरणेलाच (instinct of self-preservation) एकदम आवाहन करतो. अशा परिस्थितींत पलायनाची जी क्रिया होते, ती फक्त जीव बचावण्याकरतां. त्या क्रियेचें कारण भीति असें म्हणण्याचा जरी प्रघात आहे, तरी या विशिष्ट भीतीनें आपल्या जीवनाचा फारच थोडा अंश व्यापलेला आहे हें सहज लक्षांत येईल. ज्या भीतीची सबंध जीवनावरच जणू काय काळीकुट्ट छाया पडलेली आहे, जी केव्हां प्रगटपणें तर केव्हां सुप्त स्वरूपांत क्षणोक्षणीं आम्हांला हैराण करते, ती ही नव्हे. भीतीचे

हे दोन प्रवाह क्वचित् प्रसंगीं एकमेकांत मिसळून जातात; पण देहरक्षणाची नैसर्गिक क्रिया कोणती, हें नीट पाहिलें तर स्पष्ट ओळखतां येण्यासारखें आहे. तिची एक खूण अशी आहे कीं, ही कृति तत्काळ होत असते. दुसरी खूण अशी कीं, तिचा उगम विचारांतून (Thinking) झालेला नसतो.

मानवी जीवनांत भीतीचा पहिला पदक्षेप, कदाचित् देहरक्षणाकरतांच झाला असावा. पण तिचें हल्लींचें परिणत स्वरूप केवढें व्यापक आहे, याचा फारसा विचार आपण करीत नाहीं. भीतीचें हें 'विश्वरूपदर्शन' आपण कधीं घेतच नाहीं. तिला नाना प्रकारांनीं, आपण झांकून ठेवतों; अथवा कोणतें तरी उदात्त नांव देऊन तिचें समर्थन करतों. वर ज्या प्रकारच्या भीतीचा उल्लेख केला आहे, तिलाच फक्त 'भय' असें नांव आपण देतों. म्हणूनच, भीतीची समस्या पुष्कळांना तितकीशी महत्त्वाची वाटत नाहीं.

कृष्णमूर्तींचें हें विधान पाहा.

"Fear demands comfort, physically, mentally, emotionally, salvation through another, or help from without."

शारीरिक सुखाचाच प्रश्न घ्याना. ऐषआरामांत गाद्यागिरद्यांवर लोळणारा श्रीमंत माणूस, प्रत्यक्ष विलास भोगतांनासुद्धां मनांतून भीतिग्रस्तच असतो. कां? "हें वैभव टिकेल ना?" असा प्रश्न त्याचें मन आंतून सारखा विचारीत असतें. हा प्रश्न दडपून टाकण्याकरतां तो नानाप्रकारच्या युक्त्या योजतो; पण तो सतावतोच. या प्रश्नामुळें उपभोगाचा आनंद कितीतरी कमी होतो. पण त्याला इलाज काय? प्रख्यात कवि शेले यानें ही व्यथा, "Our sincerest laughter with pain is fraught" (आम्ही जेव्हां खदखदून हसतों, तेव्हांसुद्धां त्यांत दुःखाची छाया असते.) अशा शब्दांत सांगितली आहे. प्रत्येक माणसाला हा अनुभव आला असेल. बढतीची तार यावी; आप्तजन, मित्र अभिनंदनाचा वर्षाव करीत आहेत, स्वकीय परकीय आनंदोत्सवाचा जल्लोष करीत आहेत पण ज्याची बढती झाली, त्याचा चेहरा कांहीं संपूर्ण खुलत नाहीं. त्याच्या मुद्रेवरचें ओढूनताणून आणलेलें हास्य, सूक्ष्म निरीक्षकाच्या नजरेंतून सुटत नाहीं. कारण? तोच सतावणारा प्रश्न- दुसरें काय?

प्रत्येक माणूस सुखाला फार लालचावलेला असतो, त्यामुळें असें होतें. सुखाची मातब्बरी त्याला एवढी वाटते कीं, तें जाऊं शकेल हा दूरचा संभवदेखील त्याला सहन होत नाहीं. जें मिळालें तें घट्ट धरून ठेवावें, असें मनाला वाटतें. यांतूनच, 'तें जाणार तर नाहीं ना?' ही भीति निर्माण होते. सुखलालसेपोटींच भीतीचा जन्म होतो.

शरीररक्षणाशींच भीतीचा संबंध असतो असें नाहीं. तर 'सुखद अवस्था दीर्घकाल राहावी,' अशी जी मागणी मन करतें, त्या मागणीमुळेंहि भय उत्पन्न होतें, हें आतां स्पष्ट होईल. पण जिला 'सुखद अवस्था' असें मी म्हणतों तिचा तरी अर्थ काय? ती कायम राहावी असा आग्रह धरण्यांत माझा हेतु काय? ती कायम न राहिल्यानें माझें असें काय मोठें बिघडतें?

शेवटचाच प्रश्न मूलगामी आहे. तो प्रथम घेऊं. माणसाचें चित्त ही एक अजब वस्तु आहे. एकाकी राहणें (to be alone) त्याला मानवत नाहीं. कां कोणास ठाऊक, **या चित्तरूपी बादलींत कांहींना कांहीं भरीत राहिल्याशिवाय मनाला चैनच पडत नाहीं. चित्त रिकामें ठेवतां न येणें, हा मानवजातीला लागलेला मोठा रोग आहे.** या रोगाचा, सुखलालसेचा, आणि भयाचा अत्यंत निकटचा संबंध आहे. पण तिकडे वळण्यापूर्वी, चिंतनाचे दोन प्रकार लक्षांत घेऊं.

प्रकार पहिला :

मनांत सारखें कांहींतरी चालू पाहिजे, असा आपला आग्रह असतो. तें मधूनमधून निमिषमात्र मोकळें होतें. पण तें तसें झालें आहे, हें लक्षांत येतांच त्यांत आणखी नवीन कांहींतरी भरण्याला आपण सुरुवात करतों. 'नवीन' याचा अर्थ, पूर्वी जी स्मृति मनांत होती तिच्यापेक्षां थोडीबहुत निराळी भासणारी अशी दुसरी स्मृति. पुष्कळदां ही दुसरी स्मृति म्हणजे, नुकत्याच येऊन गेलेल्या स्मृतीचें न आठवलेलें अथवा पुसट आठवलेलें एखादें अंग असतें. भूतकालांतला कोणतातरी समारंभ प्रथम आठवतो. त्यांत मध्यभागीं बसलेले आपण, जवळच्या माणसांचे चेहरे, हें सर्व डोळ्यांपुढें उभें राहतें. नंतर तें मावळतें. मन मोकळें होऊं लागतें. पण लगेच कांहींतरी चुकल्यासारखें आपणाला वाटतें. मोठ्या प्रयत्नानें आपण तो समारंभ पुन्हां आठवूं लागतों व दुसऱ्या कोपऱ्यांत बसलेल्या प्रिय व्यक्तीचा चेहरा नीट कां आठवत नाहीं, किंवा कुणाचे तरी सगळे शब्द कां आठवत नाहींत, अशी विवंचना करूं लागतों. थोडक्यांत म्हणजे, जो चित्रपट मध्यें तुटला होता तो पुन्हां सुरू करतो. कांहीं वेळां हा चित्रपट खरोखरच संपतो पुन्हां मन मोकळें होतें. पण त्याला मोकळें कोण राहूं देणार? दुसरा चित्रपट मनांत लगेच सुरू करण्याची घाई आपण करतों. हे चित्रपट केव्हां गतघटनांचे, अथवा त्यांच्या मिश्रणाचे, बनलेले असतात, तर केव्हां ते भविष्यकाळांत काय व्हायला पाहिजे, अगर होणें शक्य आहे, हें दाखविणारे असतात.

प्रकार दुसरा :

आपण आजारी पडलों असतांना पूर्वी येऊन गेलेला आजार आठवतो. त्या आजारांत मरणाच्या किती जवळ आपण गेलों होतों, हें आठवतें. तें चित्र संपतें न

संपतें तोंच, पुढें येणारें मरणाचें भेसूर चित्र दिसूं लागतें. हें चित्र मनानें मुद्दाम तयार केलेलें असतें. इतरांचा डोळ्यानें पाहिलेला मृत्यु, पुस्तकांत वाचलेलीं वर्णनें, वगैरे बराच मालमसाला घालून तें चित्र बनविलेलें असतें. हें चित्र दिसूं लागतांच मन भयभीत होऊं लागतें. "नको हें मरण" असें आक्रंदन तें करूं लागतें. याच क्षणांत, आपलीं अर्धवट राहिलेलीं कामें, मुलांचीं व्हावयाचीं लग्नें, अथवा पार न पडलेल्या जबाबदाऱ्या, आठवूं लागतात. मग चित्त जास्तच अस्वस्थ होतें. बसलेल्या अथवा पडलेल्या जागेवरून फेंकल्यासारखें होतें. या निरनिराळ्या आठवणींनीं मनांत जी गर्दी केलेली असते, **त्या गर्दीलाच "मरणाची भीति" असें नांव आहे.** अशा आठवणी झाल्या कीं, "कुठेंतरी पळून जाऊं का?" अशी भावना होते. कुठेंतरी अशी जागा लपण्यास सांपडेल का, कीं जियें गेल्यावर ही भीति वाटणार नाहीं, असा शोध मन घेऊं लागतें.

चिंतनाचे वर जे दोन प्रकार दिले आहेत, त्यांपैकीं फक्त दुसऱ्या प्रकारालाच आपण 'भीति' हें नांव देतों. पहिल्या प्रकारचें चिंतन आपल्या जीवनांत अहर्निश चालूं असतें. पण त्याला आपण फारसें महत्त्व देत नाहीं. भयाचीं बीजें या चिंतनांत असूं शकतील, अशी कल्पनाहि आपणांला येत नाहीं. हें चिंतन नेहमीं गतकालावर आधारलेलें असतें.

भूतकालांत रमण्याची संवय एकदां का मनाला लागली कीं, वर्तमानकाल भेसूर वाटूं लागतो. आपण सर्वजण भूतकालांत, नाहींतर भविष्यांत, जगत राहतों. चालू क्षणांत संपूर्णपणें वास्तव्य करण्याचें आपण टाळतों. चालू क्षणांत जें घर अस्तित्वांत असतें, त्याच घरांत आपण राहतों. समोरच्या ताटांतलें चालू क्षणांतलेंच अन्न आपण सेवन करतों, हें जरी खरें असलें तरी, मनानें आपण गतकालांत अगर आगामी काळांतच वावरत असतों चालू क्षणाचा उपयोग, **त्या दोन दालनांमधल्या दारासारखा** आपण करतों. त्या दारांतून, या दालनांत अगर त्या दालनांत जावयाचें; यापेक्षां त्या दरवाजाला कांहींच महत्त्व नाहीं, असें आपण समजतों. एवढेंच नव्हे, तर या दरवाज्याच्या उंबरठ्यावर क्षणभरदेखील थांबणें आपणांला अशक्य होऊन बसतें. नव्हें, त्या उंबरठ्याचा एवढा आपण धस्का घेतों कीं, केव्हां एकदां पलीकडच्या दालनांत पाऊल पडेल, असें वाटूं लागतें. चालू क्षणांत राहणें, याचा अर्थ मनानें एकाकी (alone) राहणें, मन निवांत, शांत असणें, मनांत कोणतीहि वासना, कसलीहि सुखाची ओढ अगर दुःखाची भावना, कोणतीहि स्मृति नसणें, असा आहे. हा असा चालू क्षण नको, त्यापासून शक्य तेवढें दूर पळावें, असें आपलें मन सांगतें. एकाकीपणाची वाटणारी भीति आपल्या मनाच्या तळाशीं सदैव असते. माणसाच्या जीवनांत जीं अनेक प्रकारचीं भयें दिसतात, त्या सर्वांचा उगम

या मूलभूत भीतींत (fundamental fear) तर नसेल ? जरा खोल जाऊन हा शोध घेतला पाहिजे.

वर उल्लेख केलेल्या दोन प्रकारांपैकीं चिंतनाच्या पहिल्या प्रकारांत माणसाचा प्रयत्न एवढाच असतो कीं, चालू क्षणापासून दूर जावें. चालू क्षणाचें दर्शन घेण्यासच माणूस भितो. हें असें कां ? मनाचा स्वतःशींच जो संवाद (chattering) चालूं असतो तो बंद पडला तर काय होईल ? त्या संधिकालांत काय आपण जिवंत राहणार नाहीं ? केव्हां केव्हां हे असे मोकळे क्षण न कळत येऊन जातात. काय त्या वेळेला आपला एखादा अवयव गळून पडतो ? आपल्या मेंदूची कांहीं शक्ति त्या क्षणांत निघून जाते का ? यांपैकीं कांहींहि घडत नाहीं. पण अशा निर्विचार क्षणाचें स्वागत करण्यास आपण तयार नसतों. "तो नकळत यऊन लवकर गेला तरच ठीक, नाहींतर केवढी आपत्ति आली असती ?" अशाच जणू भयानें, आपण लगेच दुसरा विचार अथवा स्मृति बोलावून आणतों; व तिचेशीं खेळत बसतों. कोणत्यातरी विचाराची संगत न मिळाली, तर माणसाचा जीव कासावीस होतो. हा नुसता छंद नाहीं. विचारांचें व आपल्या आंतरजीवनाचें अतूट असें नातें असतें. विचार मनांत नसला तर तें जीवनच नव्हे, अशी पक्की समजूत आपण करून घेतली आहे. ही संवय कळूं लागल्यापासूनची आहे. ती इतकी जुनी व एवढी प्रभावी आहे कीं, ती आपला देहस्वभावच बनून गेली आहे. 'मन रितें राहूं देणार नाहीं,' अशी जणू भीष्मप्रतिज्ञाच आपणांपैकीं प्रत्येकानें केली आहे !

मला वाटतें कीं, मन रितें राहूं न देण्याच्या आग्रहांतून जे अनेक खटाटोप माणूस करतो, त्यांनींच जीवनाचा जवळजवळ सारा प्रांत व्यापून टाकला आहे. देहयात्रेकरतां अगदीं आवश्यक असें कर्म आपल्या दैनंदिन जीवनांत फारच थोडें असतें. मनांत कांहींतरी भरीत राहिलें पाहिजे, अशा अट्टाहासानें जे उद्योग आरंभिले जातात त्यांचा व्याप फार प्रचंड असा आहे. सुखलालसा यांतूनच उगम पावते. सुख हवें कशाकरतां ? तर मला रिकामें बसवत नाहीं म्हणून ! (हा सत्य जबाब शपथेवरहि कोणी देणार नाहीं.) मला जें सुख पाहिजे तें मिळविण्याचा माझा हक्क किती बिनतोड आहे, हें दाखविणारे आधार, वाटेल तेवढे सांपडतात. एवढेंच नव्हे, तर इतरांपेक्षां माझा हक्क जास्त कसा आहे, हेंहि सहज दाखवितां येतें. पण एकदा का सुखाची प्राप्ति हा जीवनहेतु ठरला कीं, मग माझें जीवन, धडपड, संघर्ष, यश, अपयश, राग, द्वेष, वैर, यांनींच भरून जातें. "हें असें होणारच. नमुनेदार समाज जन्माला येईपर्यन्त ही व्यथा भोगलीच पाहिजे," असें माझें समाधान करण्याकरतां, इतिहास अथवा भिन्न विचारप्रणालींचे (ideologies) उद्‌गाते तयारच असतात.

"मनांत स्मृति अथवा विचार सतत सांठविले म्हणून काय बिघडलें ? तो एक मनाचा धर्म समजावा म्हणजे झालें," अशी शंका कांहीं वाचक घेतील. पण हें काम इतकें निरुपद्रवी नाहीं. मनांत जी स्मृति येते, ती घोळूं लागली कीं, तिचें रूपांतर वासनेंत होतें. ती वासना माणसाला मग स्वस्थ बसूं देत नाहीं. ती त्याला तिचें लक्ष्य प्राप्त करून घेण्याकरतां हालचाल करावयास लावते. मग तें साध्य प्राप्त करून झालें कीं, पुढें काय होतें ? कांहीं वेळां पदरांत पडलेलें साध्य हें अपुरें वाटतें; व त्याची अपूर्णता घालविण्याकरतां खटपट सुरू होते. कांहीं वेळां जें फळ हातीं आलें तें अपेक्षेच्या मानानें इतकें नीरस वाटतें कीं, तें टाकून दुसरें सरस सुख मिळेल का, याचा शोध सुरू होतो. कांहीं वेळां, मिळालेल्या सुखाबद्दल तक्रार करण्यास जागा नसतांनादेखील नुसता विलंब लागल्यानेंच तें बेचव वाटतें. तर आणखी कांहीं वेळां, इतरांचेजवळ अधिक मातब्बर सुखें आहेत, असें लक्षांत येऊन, तीं सुखें मला कां मिळू नयेत या विचारानें हातीं आलेलें सुखच दुःखरूप वाटूं लागतें.

पण आपला मुख्य विषय भीतीचा आहे. प्रश्न असा आहे कीं, सुखाचे विविध प्रकार, **मनांतली पोकळी** भरून काढण्याकरता आम्ही धुंडाळीत बसलों नसतों, तर जीवनांत हरघडीं भेटणाऱ्या बऱ्याचशा भयांची व आपली गांठ पडली असती का ? किती तरी भयस्थानें अशीं दाखवितां येतात कीं, ज्यांचा कोणत्या तरी सुखवासनेशीं साक्षात् संबंध असतो. इस्टेट जाण्याचें अथवा अपकीर्ति होण्याचें भय, आप्तजनांचा अथवा गुरूचा **आधार** तुटण्याचें भय, एखादी संवय अगर व्यसन सोडतांना वाटणारें भय, सुख मिळालें असतांना तें टिकतें कीं नाहीं असें वाटणारें भय, सुख मिळविण्याच्या प्रयत्नांत असतांना तें हातीं येईल कीं आपणांला चकवील असें वाटणारें भय, वगैरे अनेक भयांचे प्रकार सुखरूपी नाण्याच्याच दुसऱ्या बाजू आहेत. मनांतला भकासपणा नाहींसा होण्याकरतां, तें गुंतवून ठेवण्याकरतां, श्रीमंती, कीर्ति, आप्तजनांचा सहवास, व्यसनासारख्या संवयी, यांचा आधार आपण घेतों. या आधार देणाऱ्या वस्तूंची मातब्बरी, एकाकीपणांत समरस होतां आलें तर वाटेल काय ? स्वतःच्या ठिकाणीं, कशाचेंहि अवलंबन न करतां, स्थिर व संतुष्ट राहण्याची कला ज्या मनाला साधली, त्याला वरील भयांचा उपद्रव होईल काय ? **मग असें कां म्हणूं नये कीं, एकलेपणाची भीति हीच सर्व भयांची माता आहे; व त्या भीतीमुळें होत असलेला सुखांचा पाठलाग संपविणें हाच भयनिवृत्तीचा एकमेव उपाय आहे ?**

प्रथम मनाला कोणतीतरी स्मृति अथवा विचार धुंडाळीत राहण्याची संवय आपण लावली. या संवयीतूनच तथाकथित सुखें जन्माला आलीं, त्यांचें रंगरूप ठरविण्याकरतां तुलनेची, अनुकरणाची, मदत घेतली; आणि मग झालें असें कीं,

ज्या क्षणाला मनांत कसलीतरी स्मृति,–तिलाच आतां आपण सुख म्हणूं या,– कोणतेंतरी सुख वसत नसेल तो क्षण वाटेल तें करून टाळण्याची प्रवृत्ति, हा आपला स्वभावच बनला. एकाकीपणा नको, ती कांहींतरी भयंकर अशी अवस्था आहे, असें आपण ठरवूनच टाकलें. या एकाकी अवस्थेच्या भयाला कांहीं आधार आहे का ? पण एवढा विचार करतो कोण ? एकदां, "भूत आहे" असें मनानें घेतल्यानंतर त्याच्याकडे पाहतो कोण ? पाहिलें तर कळेल कीं, तें एक झाड आहे. पण न पाहतां उलट दिशेनें पळत सुटण्याची क्रिया म्हणजेच भीति होय. भीति हा स्वतंत्र पदार्थ नाहीं. कांहींतरी टाळण्याकरतां, उपयोगांत आणलेला तो एक शब्द आहे.

सुखलालसेचें भीतीशीं किती जवळचें नातें आहे, हें समजण्याकरतां एवढें विवेचन पुरें. 'सुख पाहिजे' हें एकदां ठरल्यावर तें धरून ठेवणें क्रमप्राप्तच होणार. पण, "सुख कां पाहिजे ?" असा प्रश्न आपण कधीं विचारीत नाहीं; सुखावर संपूर्ण जीवन आपण अवलंबून ठेवतों. सुखाचा मनाला मोठा आधार वाटतो. नाहींतर जणू पायाखालची जमीन सरकेल अशी भीति वाटते. कोणतेंतरी सुख, अगर सुखाची आशा, अगर स्मृति, मनांत धरून ठेवल्याखेरीज आपलें भागत नाहीं. एकाकी अवस्थेपासून आपलें रक्षण करणारी, सुखाची अनुभूति ही एक भितच आहे म्हणा ना. पण आपण एक विसरतों. कोणतीच भित कायम टिकणारी नसते. ती केव्हां पडेल याचा नेम नसतो. म्हणूनच मिळालेलें सुख जाईल का, ही भीति सदैव मनाला जाचीत असते. एकूण मिळवलें काय ? तर एकाकी अवस्थेच्या भयानें सुखाचा आश्रय घेतला ! व सुखरक्षणाच्या चिंतेनें जीव कायमचा भयभीत केला. बस्स एवढेंच. यापेक्षां जास्त कांहींच नाहीं.

चिंतनाचा दुसरा प्रकार म्हणून वर ज्या भीतीचा उल्लेख केला, तिचा आतां विचार करूं. कांहीं वाचक तर म्हणतील कीं, आतांपर्यन्तचें विषयांतरच झालें. कारण, 'भीति' हा शब्द मरणाच्या अथवा संकटाबद्दलच्या भीतीलाच फक्त आपण लावतों. या भीतीचा, सुखाबद्दलच्या आकर्षणाशीं कांहीं संबंध आहे का ? कोणतातरी मोठा आजार झाला असतांना, अगर वार्धक्यामुळें मरण जवळ आलें आहे अशी भावना मनांत ठाण मांडून बसली असतांना, चित्त भयानें व्याप्त होतें, यांत शंकाच नाहीं. या भीतीमध्यें दोन प्रवाह एकमेकांत मिसळलेले असतात. एक नैसर्गिक शरीररक्षणाची प्रेरणा आणि दुसरी, आयुष्यभर जीं सुखें उपभोगलीं अथवा ज्यांची आशा केली तीं सर्व सोडून जाण्याची पाळी आली ही वेदना. कोणता प्रवाह बलवत्तर असतो, हें ज्याचे त्यानेंच पाहिलें पाहिजे. प्रत्येक लहानमोठा आजार अंतर्मनांत मरणाच्या भीतीलाच आवाहन करतो, असें दिसतें. नुसतें शारी-

स्वामी ज्ञान प्रकाशानन्द, मथुरा. [illegible]
नाम ...Lo&3Je ...पेपर...
क्लास ...B.A. ... 21.9.04.02

रिक दुःख असतें तर, " मी आजारी आहें, " असें ज्या दीन मुद्रेनें आपण सांगतों, ती संभवत नाहीं. निदान मागचे मोठे आजार तरी आठवतात, यांत संशयच नाहीं. पूर्वीची निरोगी अवस्था गमावल्याचें दुःख, पुन्हां पूर्ववत् ठणठणीत होऊं कीं नाहीं हा संशय, आपला आजार वाढवीत नसतीलच अशी खात्री देतां येत नाहीं. सभोंवतालीं जीं निरोगी माणसें वावरतात– स्वकीय अथवा परकीय–त्यांचा हेवा तर चेहऱ्यावर व शब्दांतहि स्पष्ट दिसतो. एवढें तरी म्हणण्यास हरकत नाहीं कीं, ज्या आजारांत मृत्यूची गांठ पडण्याचा धोका वाटतो त्या आजारांतली भीती ही निव्वळ शारीरिक नसते. निसर्गप्रेरणेचा फारच थोडा अंश तींत असावा. वर उल्लेख केलेली **वेदनाच प्रभावी असते.** सर्व सुखांचा व आशांचा सक्तीनें करावा लागणारा त्याग हाच मृत्यूला एवढा भेसूर बनवितो, यांत मला तरी शंका वाटत नाहीं. या प्रश्नांवद्दल कृष्णमूर्ति म्हणतात तेंच खरें दिसतें :—

" How am I to bear the pain, the fear of pain, the fear of death ? If I have physical pain– great or little; when there is an awareness of the pain, please follow this; not the sublime something or other– just an awareness of that pain without choice, to be aware that I have a toothache, great pain, *and not say 'I am suffering'* and the rest of it, but being choicelessly aware of that fact; I will have pain, but I am dealing with pain quite differently. There is not fear involved in it.

There is the fear of death from a disease which is incurable. Why am I afraid ? Am I afraid of leaving mywife, my husband, my house, my memories, my character, my work and the books I want to read, the books I have written or am going to write—is that it ? I am going to leave all that behind; and being frightened I create heaven, a hope—*which again breeds further fear.* So can I be free of fear ? I know I have to bear pain, a few drugs perhaps can help it, but there is the fear which is deep–rooted, it is in the animal, it is in every human being, the fear of dying ; and the fear of dying is the fear of living—Isn't it ? Fear of living: What is this life we lead, with its ugliness, brutality ? That is the only life we know, and we are afraid even to lose that; we are afraid of the known and we are afraid of the unknown. We would rather cling to the known; and so we divide life into dying and living. We do not know how to live. We do not know how to die. When we know how to live without conflict, with great beauty, with joy and with clarity and passion–and *that can only come abaut when you*

know how to die everyday to everything that you possess – then fear no longer is."

(*Talks with American Students*, (1968), p. 181–182)

एकूण असें दिसतें कीं, चित्ताच्या शांत आणि एकाकी अवस्थेंत कांहींतरी भरीत राहिलें अशी गरज, **तिच्याबद्दलच्या भयामुळेंच** वाटूं लागते. मग अनेक सुखें (pleasures) आपण बोलावून आणतों. पण तीं काळाच्या ओघांत टिकून राहतील का, अशी भीति पुन्हां सारखी सतावूं लागते. सुखांबद्दलचा हा उपद्व्यापच न केला तर ?

* * *



वील

स्मृति ही मैत्रीण का वैरीण ?

स्मरणशक्तीबद्दल वरच्यासारखा प्रश्न उत्पन्न केल्यामुळें कांहीं वाचक रागावतील. जिच्यावर दिवसाचे चोवीस तास आपण अवलंबून राहतों, त्या स्मृतीच्या उपयुक्ततेबद्दल संशय घेणें धाडसाचेंच आहे. पण स्मृति नेहमींच शत्रुत्व करते, असें लेखकाला म्हणायचें नाहीं. ज्या तऱ्हेनें स्मृतीचा उपयोग हल्लीं आपण करीत आहोंत, ती तऱ्हा बरीचशी चुकलेली आहे अशी शंका मला येऊं लागली आहे. या शंकेला प्रकट स्वरूप देणें, एवढेंच प्रस्तुत प्रकरणांत योजिलें आहे.

स्मृति आपलें काम रात्रंदिवस करीत राहते, ती क्षणभरहि थांबत नाहीं, हें प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. चित्तांत अगर चित्ताच्या बाहेर जें जें काय घडतें, तें नमूद करून ठेवणारें यंत्र म्हणजे स्मृति होय. आपणांला या आलेखनाची (recording) कित्येकदां कल्पनाहि येत नाहीं. हें काम कसें, मेंदूच्या कोणत्या कोपऱ्यांत चालतें, याची पुरेशी माहिती अद्याप शास्त्रज्ञांनाहि मिळालेली नाहीं. पण घडेल तें टिपून ठेवण्याचें काम, स्मृति इतकें बिनबोभाट करते कीं, बोलायची सोय नाहीं. आपल्या कामाचा गाजावाजा न करतां, किंबहुना दृष्टिआड राहून पण सतत खपून धन्याचें काम वर्षानुवर्षें करणारा इनामी सेवक असतो ना, (असे सेवक पूर्वी होते, असें म्हटलें तर तें जास्त बिनचूक होईल !) तसेंच या स्मृतीचें आहे. स्मृतीनें काय उचलून घेतलें आहे, तें त्या वेळीं लक्षांतहि येत नाहीं.

दहापांच वर्षांनंतर, पूर्वी ओझरता पाहिलेला चेहरा पुन्हां जेव्हां रस्त्यांत दिसतो, तेव्हां चटकन् स्मृति पुढें होते व कानांत सांगते कीं, "हा इसम पूर्वी भेटलेला आहे. त्याची नोंद माझ्या वहींत आहे." आपण एकदम आश्चर्यचकित होतों. असें बऱ्याच वेळां होऊं लागलें कीं, 'अत्यंत हुशार माणूस' म्हणून आपण स्वतःचीच पाठ थोपटतों. मग आपल्या अंगीं विशेष कर्तृत्व आहे, असें वाटायला लागतें. कोणत्याहि अवघड विषयांत अचूक निर्णय घेण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे, असा भास होऊं लागतो. शहाणपणाचा मक्ता देवानें आपणांलाच दिला आहे अशा थाटांत आपण इतरांशीं बोलूं चालूं लागतों. पण इथें आपण घसरतों. शहाणपण, निर्णयशक्ति यांचा स्मृतीशीं तितका संबंध नाहीं. आपलें स्मृतियंत्र इतरांपेक्षां जास्त चांगलें काम देतें, असें फारतर म्हणूं या. तल्लख स्मृति असणें, फार जुन्या गोष्टी आठवणें, बारीकसारीक तपशीलहि साद्यंत स्मरणें, यांचा आयुष्यांत फार उपयोग होतो, हेंहि खरें. पण यामुळें "सगळेंच मला साधतें," जसा जो गर्व होतो तो घातक आहे. स्मृतीमुळेंच कार्यशक्ति वाढत असली तर तिला मैत्रीण कां म्हणूं नये ? पण हीच मैत्रीण, वैरीण कशी बनते याचा शोध घेणें जरूर आहे.

स्मरणशक्तीचें सामर्थ्य व शहाणपण (intelligence) यांचा नेहमींच घोंटाळा होत आला आहे. पहिलें सामर्थ्य हें एका यंत्राचें शहाणपण आहे, हें आपण विसरतों. गणकयंत्राची कार्यशक्ति माणसापेक्षां कितीतरी अधिक आहे. पण म्हणून कांहीं माणसांच्या ऐवजीं सर्व ठिकाणीं गणकयंत्राची स्थापना करून भागेल काय ? माणूस ज्या पद्धतीनें कार्य करील, ती गणकयंत्रांना कधींतरी जमेल काय ?

स्मरणशक्ति, बुद्धि, हातपायांची शक्ति वगैरे माणसाच्या सर्व शक्तींची बेरीज केली तरी, 'माणूस' म्हणून कांहींतरी वेगळा उरतोच ना ? पण इतक्या व्यापक विषयांत आज आपणांला शिरायचें नाहीं. आपल्या जीवनांत हल्लीं स्मृति ज्या पद्धतीनें कार्य करते, त्या पद्धतींत कांहीं दोष उत्पन्न झाले आहेत काय, एवढेंच आपणांस पाहावयाचें आहे.

स्मृति आपलें काम दोन पद्धतींनीं करते. कांहीं वेळां, जें दिसतें अथवा ऐकलें जातें तें स्मृतींत शिरतांना जणू काय आपणांला सांगूनच आंत जातें. तर कांहीं वेळां, न कळत, चोरासारखा कोणतातरी अनुभव पटकन् येतो व स्मृतींत जाऊन लपून बसतो. पहिल्या पद्धतीचा वापर सहज समजण्यासारखा आहे. ज्या दृश्यानें अथवा ध्वनीनें, आपणांला प्रिय, हवासा वाटणारा अनुभव येतो, तो अनुभव "तुझ्या कोठारांत नीट सांभाळून ठेव" असा जणू हुकूमच आपण स्मृतीला देतों. याउलट आपणांला प्रक्षुब्ध करणारी घटना असते. ती, 'नको' असली तरी विरोधाला न जुमानतां आंत जाऊन बसते. इंद्रियांमार्फत मिळणाऱ्या अनुभवांपैकीं बरेचसे अनुभव असे प्रगट असतात; पण कित्येक अनुभव त्या त्या वेळीं आपल्या

ध्यानांत न आले तरी स्मृतिकोशांत जाऊन बसतात. मला वाटतें कीं, आपली नजर चुकवून चोरांसारखे मेंदूंत जाऊन बसणारे अनुभवच आपल्या जीवनांत अनेक समस्या उत्पन्न करतात.

कोणत्याहि अनुभवाचें ग्रहण प्रथम इंद्रियें करतात, असें आपण म्हणतों. पण हल्लींतरी तशी स्थिति नाहीं. कोणतीहि वस्तु पुढें दिसली कीं, लगेच तिचें नांव स्मृति आणन देते. जर तिला निश्चित असें नांव नसलें तर निदान ती अमक्या वस्तूसारखी आहे, असें चटकन् स्मृति सांगते. हें तिचें मोघम नांवच असतें म्हणाना. प्रत्येक वस्तूचें निश्चित अथवा मोघम नांव ठरविल्याखेरीज म्हणजे स्मृतीनें तें सांगितल्याखेरीज, इंद्रियें आपलें कामच करीत नाहींत. इंद्रियांची व स्मृतीची फारच गट्टी आहे. इतकी कीं, स्मृतीला बरोबर घेतल्याखेरीज ती बाहेरच पडत नाहींत. स्मृतीनें तरी प्रत्येक वेळीं ही धांवपळ कां करावी ? नामकरणाखेरीज (naming) कोणतीहि वस्तु तिला लक्षांत ठेवतां येत नाहीं म्हणून. आपलें काम अत्यंत तत्परतेनें करणारी सेविका म्हणजे स्मृति हें तर वर सांगितलेंच आहे.

नामकरणानंतर वर्गीकरणाचें कामहि स्मृतीच करते. ही वस्तु प्रिय, ही अप्रिय, ही उपयोगाची, ही निरुपयोगी; ही निरुपद्रवी, ही उपद्रवकारक वगैरे माहिती स्मृतीखेरीज दुसरें कोण सांगणार ? तिच्या कोठारांत जे पूर्वीचे अनुभव सांठवलेले असतात, त्यांच्या मदतीनें ती वरीलप्रमाणें अनुभवांचे वर्ग पाडते. यानंतरची मौज अशी कीं, हें वर्गीकरणच तिचें नंतरचें काम सुकर करतें. माणसाला सतत सुख हवें असतें. आपण समजतों कीं जगांत कांहीं वस्तु अंगच्याच सुख देणाऱ्या असतात. पण हें खोटें आहे. वस्तूच्या दर्शनानंतर स्मृति आपल्या कोठारांत डोकावूं लागते; व तेथें 'सुखद वस्तु' असें तिचें वर्गीकरण आढळलें तरच ती माणसाला, 'हें सुख आहे' म्हणून सांगते. **स्मृतीनें सांगितल्याखेरीज आपल्या जीवनांत सुखाचा अथवा दुःखाचा प्रवेशच होत नाहीं**, असें मला वाटतें.

सुरुवातीला सांगितलेंच आहे कीं, स्मृतियंत्र हें सतत फिरत असतें. हें त्याचें सतत फिरणें, जीवनयात्रेला आवश्यकच आहे. पण प्रश्न असा आहे कीं, प्रत्येक वस्तूवर नामाचा शिक्का बसून तिचा वरीलपैकीं कोणतातरी वर्ग ठरविणें जरूर आहे काय ? याचाच अर्थ असा कीं, इंद्रियांनीं प्रत्येक वेळीं स्मृतीची मदत घ्यावी असें ठरलेंच आहे काय ? जीवनयात्रेचा तो एक मूलभूत नियमच आहे का काय ?

वरील प्रश्नांचीं उत्तरें शोधलीं पाहिजेत. प्रथम असें कीं, इंद्रियांच्या ठिकाणीं स्वतंत्र अशी कांहीं ग्रहणशक्ति आहे की नाहीं, हें कळलें पाहिजे. माझे डोळे नामकरणाच्या व वर्गीकरणाच्या मदतीखेरीज पाहूंच शकत नसले, तर जें होतें आहे तें अपरिहार्यच म्हटलें पाहिजे. कदाचित् असेंसुद्धां असेल कीं, ज्याला मी हल्लीं 'पाहणें' समजतों तें खरें पाहणें नसेलहि; अथवा तें अपुरें पाहणें असेल. कोण-

तीहि वस्तू पाहिली कीं, तो 'हवी' अगर 'नको' याच वर्गांत पडते, असें कां व्हावें? या कोणत्याच प्रकारांत न पडणारी वस्तु काय जगांत नाहींच ? माझ्या हवें–नको वाटण्यावर त्या वस्तूचें सत्यस्वरूप का अवलंबून आहे ? असें कशावरून नसेल, कीं जी वस्तू मला प्रिय आहे असें मी स्मृतीच्या मदतीनें ठरवितों तिचें रंगरूप या पूर्वग्रहामुळें बदलून जात असेल ? मुळांत नसलेले रंग मला दिसत असतील ? निदान ते जास्त भडक दिसत असतील ? किंवा त्यांचें मिश्रण मला उगाचच आकर्षक वाटत असेल ? एवढें तर उघड दिसतें कीं, प्रिय व्यक्तीचा चेहरा सुंदर दिसतो, आणि अप्रिय व्यक्ति कांहीं अंशानें तरी कुरूप वाटते ! खरें सांगावयाचें म्हणजे स्मृतीसारख्या कार्यकुशल सेविकेबद्दल संशय घेण्याचें माझ्या जिवावर येत आहे. पण संशयाला कांहीं कारणें दिसतात. मग गप्प तरी कसें बसावें ?

पहिलें कारण असें कीं, कोणत्या वस्तूला सुंदर म्हणावें व कोणती असुंदर समजावी याबद्दल माणसांत, विशेषतः भिन्न देशांतल्या माणसांत फारच मतभेद दिसतात. निग्रो जमातीच्या सौंदर्याच्या कल्पना श्वेतवर्णीयांच्या विचारांशीं मुळींच जमत नाहींत. हें असें कां व्हावें ? लहानपणापासून जसें शिकवलें तसेंच दिसूं लागतें काय ? जवळचे सगेसोयरे ज्याला 'सुंदर' म्हणतात तेंच मला सुंदर वाटतें काय? त्यांच्या भिडेमुळें अथवा भीतीमुळें मी माझे डोळे झांकून घेतों म्हणजे मी त्यांचा पूर्ण उपयोग करीतच नाहीं, असें तर होत नसेल ? तसें असलें तर निसर्गानें मला डोळे दिले त्यांचा उपयोग काय ? आतां हें खरें कीं, डोळ्यांनीं मी वस्तु प्रथम पाहतों व नंतर तिचें नांव अथवा वर्ग ठरवितों. पण या प्राथमिक क्रियेपुरताच इंद्रियांचा उपयोग आहे काय ? स्वतंत्र स्वयंपूर्ण असें काम, इंद्रियांकडे निसर्गानें सोंपविलेलेंच नाहीं कीं काय ?

प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, स्मृति आणि इंद्रियें यांच्या संयोगाचें अथवा संयुक्त कार्याचें खरें स्वरूप काय आहे ? त्यांचें सहकार्य ज्या पद्धतीनें हल्लीं होत आहे, त्यांत कांहीं दोष उत्पन्न झाला आहे काय ? स्मृतीनें इंद्रियांवर कुरघोडी केली, असें तर झालेलें नाहीं ? निसर्गानें सृष्टीमध्यें कांहीं समतोल (balance) प्रस्थापित केलेले आहेत. त्या समतोलांमध्यें बिघाड होत आहे व हा धोका आहे अशी तक्रार, कांहीं शास्त्रज्ञ, विशेषतः अणुस्फोटापासून करू लागले आहेत. **माणसाच्या संवेदनेचें जें जग आहे, त्या जगांतलाहि समतोल असाच ढळला आहे कीं काय ?**

इंद्रियें जेव्हां एखाद्या वस्तूचें ग्रहण करतात, तेव्हांची संवेदना जर दूषित होत असली तर आपल्या जीवनाचा सबंध पायाच डळमळीत होतो. कारण, या संवेदनेवर आपली प्रत्येक कृति अवलंबून असते. चुकीची संवेदना व तिच्यावर आधारलेली जास्तच चुकीची कृति, पुन्हां त्या कृतींमुळें येणारे नवे अनुभव व त्यांचेहि विपरीत ग्रहण अशा चक्रांत का आपण सांपडलों आहोत ? एका असत्य

जगांत का आपण राहात आहोंत ? कांही वाचकांना ही उगाच अतिशयोक्ति वाटेल. पण तसें दिसत नाहीं.

स्मृतीचें मित्रकार्य कोणतें व शत्रुत्व कोठें सुरू होतें, हें समजून घेण्याकरतां आपल्या दैनंदिन जीवनांत स्मृति काय करते, याचा तपशीलच आतां पाहूं.

सकाळीं उठतांच आपण फिरायला गेलों तर काय काय होतें हें पाहणें मोठें उद्‌बोधक आहे. प्रथमच लक्षांत येतें कीं, आपले पाय नेहमींच्या ठराविक रस्त्यानेंच चालूं लागतात. स्मृतीच्या मदतीनें पायांना मेंदू जो हुकूम देतो, तो आपल्या ध्यानांतहि येत नाहीं. स्मृतीचें कार्य फार झटपट होतें, इतकाच याचा अर्थ आहे. नंतर असें होतें कीं, डोक्यांत विचारांचें चक्र सुरू होतें. काल कोणतीं कामें अर्धवट राहिलीं, कोणकोण भेटलें, वगैरे सारें आठवूं लागतें. कोणी कोणते शब्द वापरून अपमान केला, हें आठवतें. इतकेंच नव्हे, तर ते शब्द ज्या सुरांत, ज्या आवेशानें उच्चारले गेले तोसुद्धां आठवतो. या स्मृतीनें चित्तांत एक प्रकारची व्यथा सुरू होते. तोंच आपला कैवार घेणाऱ्या माणसाचे सुखद शब्द ध्यानांत येतात. नंतर एकदम, आपल्या अंगच्या गुणांची प्रशंसा करणारे शब्द कालचे, परवांचे, महिन्यामागचे, कित्येक वर्षांपूर्वीचेदेखील आठवूं लागतात. 'इतके लोक आपणांला चाहणारे आहेत.' ही जाणीव सुखाचा शिडकावा टाकते न टाकते तोंच कसलीतरी विवंचना डोकावूं लागते. झालें, मग एकामागून एक काळजीचेच विचार सुरू होतात. नोकरीची अशाश्वति, मुलांचा उनाडपणा, पत्नीचें आजारीपण, कितीतरी गोष्टी आपणांला प्रतिकूलच आहेत असें वाटूं लागतें. "त्यांत हे दुष्ट मत्सरी लोक, आपणांला नेहमीं पाण्यांत पाहणारे ! यांना धडा शिकविलाच पाहिजे." असें मन म्हणूं लागतें. मग द्वेषाचे, सूडाचे विचार, 'शठं प्रति शाठ्यम्' हें शास्त्रवचन, त्या शत्रूंना कसा शह द्यावा याबद्दलच्या योजना, अशी गर्दी डोक्यांत होते. घरून निघतांना, आज थोडी वाकडी वाट करून फुलें आणावयाचीं, असें ठरविलेलें असतें. पण ही आठवण, कशी कोणास ठाऊक, एकदम चित्तांत उद्‌भवते. तें वळण तर मागेंच गेलेलें असतें; व "इतक्या दूर आपण कसे आलों," याचें आश्चर्य करीत आपण परतूं लागतों.

वरील एकंदर प्रकारांत प्रथमची रस्ता दाखविणारी स्मृति,—खरें म्हटलें तर संवय—ही एकच स्मृति उपकारक असते. बाकीच्या सर्व आठवणी व त्यांतून सुरू होणारी विचारधारा ही निव्वळ अडगळ असते. मनांतली जागा अडवून ठेवणें हें तिचें काम. पण अशा प्रकारचा जो स्वतःशीं संवाद (chattering) सतत चालू असतो तो अडगळीसारखा निरुपद्रवी नसतो. त्यांतून एक प्रकारची बोचणी, असमाधान, थकवा, सूडभावनेसारख्या समस्या, अशा कितीतरी अडचणी निर्माण होतात. मन मरगळीला येतें; व जेव्हां एखादा अवघड निर्णय चटकन्

घेण्याचा प्रसंग येतो तेव्हां तें अपुरें पडतें. जिला आपण मैत्रीण समजतों त्या स्मृतीच्या मदतीशिवाय हें चिंतन चालणें शक्य नाहीं. केव्हांकेव्हांतर इतका उबग येतो कीं, "माझी स्मृति नष्ट झाली असती तर बरें झालें असतें," असे उद्‌गार निघूं लागतात. कांहींजण तर दुःखद स्मृति थोडा वेळ तरी नष्ट व्हावी म्हणून मद्यपानहि करतात. जिला मैत्रीण म्हणून जवळ केलें तीच अशा तऱ्हेनें शत्रुत्व करते. हें असें कां व्हावें ?

स्मृतीचें पहिलें पाऊल हितकर, पण पुढची, सर्व करामत शत्रुत्वाची असा तरी सिद्धांत मांडतां येईल का ! वरील उदाहरणांत तसा प्रकार दिसतो. पण पहिल्या पावलानंतरची सर्वच पावलें स्मृति नेहमीं आडरानांतच टाकते, असेंहि म्हणतां येत नाहीं. पूल बांधण्याचें इंजिनियरचें काम घ्या. एकामागून एक कितीतरी गोष्टी त्याला आठवाव्या लागतात. स्मृतीची लांबलचक सांखळीच त्याच्या मदतीला येते. व्याख्याता जेव्हां भाषणाला सुरुवात करतो, तेव्हां विषयाचें नांव प्रथम त्याला आठवतें. पण नंतरहि अनेक स्मृतींचें तांडव त्याच्या मेंदूत सुरू होतें; व त्या सर्व स्मृतींना एक प्रकारची शिस्त लावून तो आपलें भाषण मुद्देसूद व प्रभावी करतो. पाकनिष्पत्ति करणाऱ्या सुगृहिणीचेंहि तसेंच आहे. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. यावरून असें दिसतें कीं, एखादा उद्योग चालूं असतांना स्मृतींची लांबच लांब मालिका चित्तांत उभी करणें जरूरच आहे. तसेंच पुढें करावयाच्या कार्याची योजना (planning) करतांनाहि, स्मृतींची जणू काय पलटणच बोलावून आणावी लागते. पण हे असे प्रसंग बाजूला ठेवले तर, इतर वेळीं आपली स्मरणशक्ति नक्की काय करीत असते ? हातून प्रत्यक्ष काम घडत नसेल अशा-वेळीं स्मृतीचें कार्य उपद्रवालाच जन्म देतें कीं काय ?

वरील प्रश्न किती महत्त्वाचा आहे, हे काळजी करण्याची संवय लागलेल्या माणसाला विचारा. तो म्हणेल कीं, माझ्या हातांत जेव्हां काम नसतें तेव्हां काळजी माझ्यावर झडप घालते. काळजी ही वस्तूच अशी आहे कीं, ती चालूं असतांना हातून कोणतीहि कृति घडत नसते. (कृति घडत असतांनाहि काळजी करतां येते. पण त्या कृतीचें नियमन काळजीमुळें होतें, असें म्हणता येणार नाहीं.) अनेक स्मृति बोलावून आणल्याखेरीज काळजी करतां येत नाहीं. स्मृतीचें शत्रुत्व, मला वाटतें, इथेंच सुरू होतें. असें तर नसेल कीं, आपोआप उद्‌भवणारी स्मृति मैत्रिणीसारखी मदत करते; पण ज्या स्मृति, निमंत्रण देऊन आपण जणू काय बाहेरून आणतो, त्या आपला कांटाच काढतात ? मला या निमंत्रित पाहुण्यांची फारच भीति वाटते. आणखी एक गंमत आहे. नको असलेले पाहुणे जसे आगाऊ न कळवितां गाडीनें एकदम उतरतात, तसा प्रकारहि कांहीं आठवणींच्या बाबतींत होतो. कदाचित् अंतर्मनांतून त्यांना निमंत्रण जात असावें. पण एक गोष्ट मात्र निश्चित

दिसते, ती ही कीं, हातून जें कार्य घडत असतें त्याकरतां अगदीं जरूर असणाऱ्या स्मृति सोडल्या, तर इतर सर्व स्मृति जीवनांत अनेक घोंटाळे व संघर्ष निर्माण करतात.

कांहीं वेळां वाटतें कीं स्मृतीनें फक्त समोर येणारी वस्तु ओळखावी व तेथेंच थांबावें. यापेक्षां जास्त भानगडींत पडूं नये. (कार्यनिष्पत्तीचें क्षेत्र—technological memories—वगळून आपण बोलत आहोंत.) याचा अर्थ असा कीं, कांहींतरी आठवण्याच्या मागें मनानें लागूंच नये. आपण जेव्हां कांहींतरी आठवूं लागतों तेव्हां त्याचा हेतु काय असतो ? गतकालांतले कोणतेंतरी सुख पुन्हां मिळविण्याची ती एक युक्ति असते. जेव्हां सुख मिळालें तेव्हां त्याचा उपभोग अपुरा राहिलेला असतो; निदान आपली तशी समजूत असते. तृप्ति झालेली नसते, व म्हणून जे निसटून गेलें तें परत मिळतें का, हें पाहण्याचा प्रयत्न मन सारखें करीत असतें. स्मृति मनाला सांगते, " चल, मी तुला भूतकाळांत—तो किती का लांबचा असेना—घेऊन जातें. पूर्वी जी घटना घडली अगदीं हुबेहूब तशीच घटना, मी माझ्या किमयेनें तुझ्या अंतश्चक्षूपुढें उभी करते. मग तोच सुखद अनुभव, तुला पुन्हां मिळाल्यासारखें नाहीं का होणार ?" स्मृतीची ही साखरपेरणी माणसाला नेहमी भुरळ पाडते. गतसुखाचा हव्यास प्रत्येकाला इतका असतो कीं, 'हें शक्य आहे का?' याचा कोणी विचारच करीत नाहीं. मनुष्य सारखा पुनरावृत्तीच्या मागें लागलेला असतो. बरें, एकदा पुनरावृत्ति झाली, तिथें तरी थांबावें कीं, नाहीं ? छट्, मग असें होतें कीं, एक सांखळी मनांत तयार होतें, प्रत्येक सुखाला पुनरावृत्तीमुळेंच एक विशिष्ट आकार प्राप्त होतो; आणि ' हें माझें सुख ' असें माणूस म्हणूं लागतो. ज्याला तो ' सुख ' ही संज्ञा देतो, तो स्मृतींचा फक्त एक गुंताळा असतो.

गतकालांतली घटना स्मृतीनें जेव्हां नमूद करून ठेवली, तेव्हां वस्तु ओळखण्याची सोय झाली. भाषेच्या मदतीनें हे काम सुकर झालें. पण शब्दांत गुंडाळून ठेवलेली घटना, मेंदूंत घर करून राहते. तिला सुखाचा आकार असला तर ती पुन्हां पुन्हां हवीशी वाटते. पण केव्हां केव्हां तिचें रूप दुःखाचें अथवा भयाचेंहि असतें. पूर्वी पाहिली अशी दुःखद अथवा भयप्रद घटना आयुष्यांत पुन्हां घडूं नये, असें मन म्हणूं लागतें. मनाची ही मागणी, देहसंरक्षणाच्या खऱ्या गरजेंतून जेथपर्यंत असते तेथपर्यन्त हें स्मृतीचें काम उपकारकच आहे. पण या गरजेची मर्यादा सोडून जेव्हां स्मृति आपली कक्षा वाढविते, तेव्हां अनेक कल्पित भयें व मनोनिर्मित दुःखें निर्माण होतात. नसलेलें भय अथवा दुःख, जर स्मृति अनेकदां पुढें आणूं लागली तर तिला वैरीण कां म्हणूं नये ? संपलेल्या घटनांची पुनरावृत्ति करून सुखांचा आभास उत्पन्न करणारी स्मृति आपली फसवणूक करते, असेंहि कां म्हणूं नये ?

स्मृतीचा उपद्रव, कल्पित सुखें निर्माण करून त्यामागें पिटाळून आपणांला

नुसतें थकविण्यापुरताच असता तरी हरकत नव्हती. पण आपल्या चेतनेला (consciousness) **एक प्रकारचा विशिष्ट आकारच स्मृति देते.** हें आपल्या लक्षांत आलें आहे काय ? स्मृति, जणू काय चेतनेचें हत्यार आपल्या हातांत घेते व त्या हत्याराचा असा वेडावांकडा उपयोग करूं लागते कीं, तें हत्यार स्वतःचा गुणधर्मच घालवून बसतें. जीवनाचें जें काय स्वरूप असेल त्याचें ग्रहण करणें, हें चेतनेचें काम. जीवन सारखें धांवत असल्यामुळें चेतनाहि त्याबरोबर धांवली पाहिजे; पण कोणती तरी स्मृति (अथवा विचार) दर क्षणाला जवळ बाळगलीच पाहिजे असा आपला आग्रह असतो. या स्मृतींत प्रत्येक वेळीं चेतना अडकून बसते. संवेदनेच्या प्रवाहांत यामुळें जे अडथळे (resistances) उत्पन्न होतात, त्यांच्या योगानें जीवन संपूर्ण बदलून जातें. हल्लीं आपल्या मनाची यंत्रणा अशी बनली आहे कीं, चेतनेचा प्रवाह अडविणारे हे अडथळेच फार महत्त्वाचे झाले आहेत. एका अडथळ्याकडून दुसऱ्याकडे, नंतर तिसऱ्याकडे, असें आपलें मन सारखें धांवत असतें. हे अडथळे म्हणजे सुखद अथवा दुःखद स्मृति. या स्मृति आलटून पालटून सारख्या येत राहिल्या पाहिजेत, त्याशिवाय जगणार कसें, अशी आपली धारणा आहे. स्मृतींच्या मालिकेंत सदैव अडकून राहणारें मन (chattering mind) ही एक **विकृति** तर नसेल ? सगळ्यांना या विकृतीनें पछाडलें आहे या एकाच कारणामुळें तिला कोणी विकृति म्हणत नाहीं. कारण चेतनेची प्रकृति अथवा शुद्ध अवस्था कोणती, तीच आपणांस माहीत नाहीं.

एक ठराविक स्मृतींत अथवा विचारांच्या सांच्यांत (obsession) अडकून बसलेला माणूस हा कोणत्या तरी मानसिक रोगाचा गुलाम आहे, हें आपण कबूल करतों. तेंसुद्धां त्याचा रोग प्रमाणाबाहेर वाढला तर. समाजजीवनांत त्याचा उपद्रव होत नसला तर तिकडे आपण लक्षच देत नाहीं. पण व्यक्तिजीवनाच्या दृष्टीनें या विषयाचा विचार व्हावयास नको का ? कां असें ठरूनच गेलें आहे कीं प्रत्येक व्यक्तीची जीवनयात्रा, स्मृतीची शृंखला पायांत अडकवल्याखेरीज व्हावयाचीच नाहीं ? चेतनेच्या प्रवाहांत स्मृतींचा कर्दम मिसळून तो गढूळ केल्याखेरीज आपलें भागणारच नाहीं का ? शुद्ध चेतना ही आकाशपुष्पासारखी अप्राप्य का आहे ?

"चालू क्षणाला जरूर नसलेल्या स्मृति, आपला पिच्छा कां सोडीत नाहींत ?" हा एक मोठा अवघड प्रश्न आहे. कांहीं वेळेला या स्मृति आगंतुक आहेत, त्यांची लुडबूड विनाकारण होते, हें कळतें. पण बऱ्याच वेळेला त्यांची अनावश्यकता लक्षांतच येत नाहीं. त्या स्मृतींचा धागा धरूनच मन काय करायचें तें करतें. "समजा, आजपर्यंत उपभोगलेलीं सर्व सुखें मी एकदम विसरलों. मग माझ्या जीवनांत उरलेंच काय ?" अशी शंका मन विचारूं लागत. एक वेळ

मागचीं सर्व दुःखें विसरण्यास आपण तयार होऊं. (त्याबद्दलसुद्धां मला खात्री नाहीं.) पण सुखें ? छे, तें कदापि शक्य नाहीं. याचें कारण असें आहे कीं, कसली तरी फाटकीतुटकी स्मृति चित्तांत धरूनच आम्ही आमचा दिवस सुरू करतों. (We always have a remnant, a tattered part of Yesterday remaining, and it is this that keeps the mind anchored, held by time— "

("*The only Revolution*" by Krishnamurti...p. 93.)

मागच्या दिवसाला आजचा दिवस त्याशिवाय जोडून कसा घेणार ? ही सांधेजोड जर झाली नाहीं तर अधांत्री का जगायचें ? असें आपणांला वाटतें. पण प्रत्येक दिवस, खरें म्हटलें तर प्रत्येक अनुभव, जेव्हांचा तेव्हां न संपवल्यामुळेंच सर्व अडचणी उत्पन्न होतात. यामुळेंच 'भविष्यांत अमुक एक घडलेंच पाहिजे' असा हट्ट सुरू होतो. **भविष्यकाळाच्या सर्व आशा अपुऱ्या भूतकाळामुळें संभवतात.** मला तर वाटतें कीं, सुखाबद्दलची अतृप्ति ही निव्वळ कल्पना आहे. एखादें सुख मला पुरेसें मिळालें नाहीं; तें आणखी मला हवें, असें जेव्हां मन म्हणतें तेव्हां त्याची ही मागणी म्हणजे स्मृतीचीच प्रक्रिया (process) असते. आपण तसें समजत नाहीं, ही गोष्ट वेगळी. आपण समजतों कीं, सुख ही एक स्वतंत्र व पृथक् वस्तु आहे, व तिची अभिलाषा धरणारा 'मी'ही वेगळा असा जागेवर आहे. **सुख, त्याबद्दलची वासना व ती ज्याला होते तो 'मी' हे तीनहि भाग एका स्मृतीचेच आहेत,** हें आपल्या ध्यानांत येत नाहीं. अनुभव घेतांनाच तो पूर्णपणें आत्मसात् करतां आला, तर त्याचा शेष स्मृतींत शिल्लक राहात नाहीं, पण अनुभव घेतांना आपलें चित्त सगळें जाग्यावर असतें कुठें ? त्याचा अर्धा भाग भूतकालांत अडकलेला असतो; व विचाराच्या (thinking) मदतीनें सदृश घटना आठवण्यांत गुंतलेला असतो. जें घडत आहे त्याचें नांव काय, अशी पृच्छा पहिल्याच क्षणाला चित्त करूं लागतें. नांव सांपडलें कीं, चित्तानें भूतकालांत उडी घेतलीच म्हणून समजावें. याचा परिणाम असा होतो कीं, प्रत्येक चालू अनुभव हा अर्धवटच घेतला जातो. जो अनुभव अर्धवट घेतला जातो तो स्मृतींत फार खोल रुतून बसतो. स्मृतियंत्राच्या कार्यपद्धतींत हा आणखी एक दोष आहे का काय, कळत नाहीं. संपूर्ण ज्ञान (complete understanding) ज्याचें झालें नाहीं, तें मनांत सलत राहतें. मग ती एखादी वस्तु असेल, अगर बौद्धिक विचार असेल, पण यामुळें केवढ्या आपत्तींत आपण सांपडतों ! चालू क्षणापासून कायमचें वंचित होण्याची व्यवस्था या पद्धतीनें होते.

स्मृतियंत्राचे आलेखनशक्ति (power of recording) ही तर जरूर आहे. ती नसेल तर जीवन अशक्य होईल. पण स्मृतीचा पुढचा उपद्रव कसा टाळावा ? काय केलें म्हणजे सुखद व दुःखद स्मृति तेवढ्याच वगळतां येतील ?

आलेखन चालू राहूनहि, तें चेतनेचा प्रवाह खंडित करणार नाहीं, अशी तजवीज करतां येईल का ? ही तजवीज बुद्धिपुरःसर करूं म्हटलें कीं त्याकरतां स्मतीच बोलावून आणाव्या लागतात ! स्मृति आल्या कीं, खरी चेतना झांकलीच म्हणून समजावें. मग स्मृतींचेंच नत्य सुरू होतें. असा हा मोठा पेंच आहे.

चालू क्षणाकडेच शुद्ध चेतनेनें पाहावयाचें, असें केलें तर ? मग आलेखन चालूं राहूनहि तें अंतराय उत्पन्न करणार नाहीं, असें वाटतें. दर खेपेला स्मृतीला गतकालांत पिटाळून ती काय आणते, हें पाहण्यांतच आपली सारी शक्ति (energy) खर्ची पडते. तसें न करतां, प्रस्तुत क्षणांतच चित्ताचें सर्व सामर्थ्य ओततां येईल काय ? मग 'गतानुभवांच्या स्मृति विसराव्या कशा,' हा प्रश्नहि शिल्लक राहणार नाहीं. चेतनेच्या शुद्ध प्रवाहांत, निःस्तब्ध मनाच्या मदतीनें सदैव राहण्याची कला आपणांला साध्य झाली, तर मनाच्या घरघरींतूनच (chattering) ज्या समस्या उत्पन्न होतात त्या सर्व मावळतील.

कृष्णमूर्ति म्हणतात :—

" Most people live in their memories. That is, Yesterday has great significance today, and the incomplete understanding of today creates tomorrow. This is not a cryptic saying. If you think about it, you will see that it is true. Memory is but incomplete thought. The experience not understood in the present remains as memory; and you can be free of memory, only when your experience is *complete in understanding.* If you are living fully, intensely, in the present, with great pliability of mind, then there is no memory of yesterday, no complex, *no searching backwards for the incidents of yesterday;* but if you live incompletely today, you are creating the complexes of tomorrow. You are curtailing the ardency of life in the present, and you want to know how to be free of the complex arising from that lack of adjustment. I say, 'Do not look to the past, but live with the joy of ecstasy in the present.' *The intensity of your living in the present, wipes out all the complexes, the idiosyncrasies and the crookedness of the past.*"

[Ojai 1932, Chetana 1971 September, p. 166.]

स्मृतीचें शत्रुत्व संपावयाचें असलें तर तें असेंच संपेल.

* * *



एकवीस

कुठें चूक झाली कुणास ठाऊक !

कुठें चूक झाली कुणास ठाऊक, पण चूक तर नक्कीच दिसते आहे.ती कशी उद्‌भवली यालाहि महत्त्व नाहीं. कारण समजलें म्हणजे रोग दूर करतां येतोच, असें नाहीं. पण रोगग्रस्त अशी अवस्था आहे, हें कळणें मात्र जरूर आहे. मग, कांहीं रोगांच्या बाबतीत कारण शोधून तें दूर करण्याचा प्रश्न असतो; तर बऱ्याच रोगांच्या बाबतींत रोगग्रस्त अवस्थेचें संपूर्ण स्वरूप समजलें, तरच उपाययोजना करतां येते.

मानसिक विकृतीच्या बाबतींत वरीलप्रमाणें दोन वर्ग पडतात कीं काय, माहीत नाहीं. पण एकमात्र गोष्ट सांगितली जाते, ती ही कीं, रोग्याचें सहकार्य नसलें तर कोणतेच उपचार फलदायी होत नाहींत. हें सहकार्य जितकें जास्त प्रभावी तितका गुण लवकर येतो, असें डॉक्टर म्हणतात; व जो रोगी स्वत:चा रोग काय आहे इकडे लक्षच देण्यास तयार नाहीं, त्याच्यापुढें ते हात टेकतात. याचाच अर्थ असा होतो कीं, अशा रोगाची हल्लींची अवस्था काय आहे, याची परीक्षा डॉक्टर व रोगी या दोघांनींहि केली पाहिजे. म्हणजे रोग्यानेंहि स्वत:च्या रोगाकडे नीट लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. रोग्याच्या या पाहण्यांतूनहि त्याला कांहीं उपाय सुचतात व त्यांची योजना तो आपोआप करूं लागतो, असें दिसतें.

रोगचिकित्सेचा एवढा प्रपंच करण्याचा हेतु एकच आहे. तो हा कीं, एखाद्या गोष्टीचें कारण नक्की सांगतां आलें नाहीं कीं, ती नैसर्गिकच असली पाहिजे व

तिच्यापासून सुटका नाहीं, असें मानण्याचा प्रघात या विज्ञानयुगांत पडूं लागला आहे. आणखी एक प्रथा या लोकशाहीच्या युगांत मूळ धरूं लागली आहे. जें सर्वजण करतात–नव्हे बहुजन–तें बरोबरच असलें पाहिजे; त्यांत कांहींहि चूक नसली पाहिजे, असें मानण्याची ती प्रथा होय. 'पांचामुखीं परमेश्वर,' 'पुष्कळांचें पुष्कळ सुख' या वचनांचा अर्थ असाच केला जातो कीं, जें सर्वांना मान्य असतें तें सत्यच असलें पाहिजे.

वरील दोन्ही प्रकारचे सिद्धांत बाजूला ठेवूनच आपणांला आज विचार करावयाचा आहे, आणि प्रत्येकाला अत्यंत प्रिय असलेल्या स्मरणशक्तीवरच हल्ला करावयाचा आहे.

हजारों वर्षांपूर्वी एक **विस्मयजनक घटना** घडली त्या घटनेचा प्रारंभ मानवाचा पूर्वज जो वानर अथवा त्या अगोदरचे पूर्वज यांच्याच जीवनांत झाला होता का काय, हें कळण्यास मार्ग नाहीं. पण आदिमानवाच्या जीवनांत त्या घटनेनें बाळसें धरलें यांत शंका नाहीं. **स्मरणशक्तीचा वापर एका निराळ्या पद्धतीनेंहि करतां येतो असा शोध मानवाला लागला, ही ती घटना होय.** आतांपर्यंत देहरक्षणाकरतां एक साधन, एवढाच उपयोग स्मरणशक्तीचा मानवाला होत होता. पण कोण्या एके दिवशीं प्रातःकाळीं त्याला आढळून आलें कीं, स्मरणशक्तींतूनहि कार्याची प्रेरणा मिळूं शकते. एक नवें दालनच माणसापुढें उघडलें. एक नवी सृष्टि त्याचेपुढें उभी राहिली. 'अग्नि उत्पन्न करतां येतो' हा शोध विज्ञानवादी 'क्रांतिकारक' मानतात. पण मला वाटतें कीं, स्मरणशक्तीबद्दलचा हा शोध ज्या क्षणाला लागला त्या क्षणानें माणसाच्या जीवनाची दिशाच बदलली. हा शोध लागला नसता तर काय झालें असतें, तो लागणें उत्क्रांतिवादाप्रमाणें अवश्यच होतें काय, वगैरे प्रश्नांत आपणांला शिरावयाचें नाहीं. पण त्या शोधानें माणसाचें अंतर्बाह्य जीवनच एका विशिष्ट तऱ्हेनें आकार धरूं लागलें, यांत शंका नाहीं. कसें तें आतां पाहूं.

आदिमानवाच्या हें लवकरच लक्षांत आलें असलें पाहिजे कीं, अरण्यांतल्या एका ठराविक भागांत वाघ, सिंह, वगैरे हिंस्र पशु राहात असतात. दाट झाडी असलेलीं तीं ठिकाणें अथवा त्या गुहा, तो मग टाळूं लागला. तिकडे जाईनासा झाला. काल जेथें वाघ पाहिला, तें ठिकाण दिसतांच तो तेथून पळून जाऊं लागला. काल जेथे धोका होता तें ठिकाण आज टाळलें पाहिजे असें त्यानें ठरविलें. मला वाटतें कीं, संकट टाळण्याकरतां स्मृतीचा उपयोग होतो, हें त्याच्या लक्षांत प्रथम आलें असलें पाहिजे. "मी आतां स्मृतीचा उपयोग करणार व काल संकट कोठें होतें हें लक्षांत आणणार," अशी प्रस्तावना करून तो वागत नव्हता. त्याला स्पष्ट जाणीव न होतांच स्मृति आपलें कार्य करूं लागली होती. बऱ्याच वेळां हें कार्य

केल्यानंतरस्मरण शक्ति अधिक पुष्ट झाली असली पाहिजे, व तिचें कार्य अधिक तत्परतेनें व बिनबोभाट होऊं लागलें असलें पाहिजे. पण नंतर या शक्तीचा व्याप वाढला. अन्नाचा संग्रह केला तर रोज छळणारी भूक लवकर शमवितां येते, हें स्मृतीनें त्या आदिमानवाच्या कानांत हळूंच सांगितलें असलें पाहिजे. या संग्रहाची मर्यादा मग वाढत गेली. लोकसंग्रहाची जरूर वाटूं लागली. कुटुंब, घराणें, माझें गांव, माझें राज्य, माझें साम्राज्य, येथपर्यन्त मजल गेली, हें तर आपण पाहतोंच.

पण हें सर्व होत असतांना केव्हांतरी एक चूक झाली. निसर्गाची तशी योजना नसतांनाहि एक चूक झाली. ती चूक अशी कीं, 'मला काय पाहिजे', हें स्मृतींतूनच माणूस ठरवूं लागला. देहाच्या गरजा व स्मृतीच्या मागण्या यांचें बेमालूम असें मिश्रण झालें. देहाच्या गरजा शुद्ध स्वरूपांत उरल्याच नाहींत. एवढेंच नव्हें, तर इतक्या नव्या मागण्या स्मृतीनें करावयास सुरुवात केली कीं, **माणसाचें सगळें जीवन या आगंतुक मागण्यांनींच भरून गेलें.** व देहाच्या खऱ्या गरजा जीवनाच्या एका लहान कोपऱ्यांत पडून राहिल्या.

हें असें व्हावयास नको होतें. माणसानें आपलें सगळें जीवन स्मृतीच्या हवालीं करावयास नको होतें. स्मृति ही अत्यंत जुलमी अशी राणी आहे. तिच्या राज्यांतली गुलामगिरी फार भयंकर आहे. त्यांतहि नवलाची गोष्ट अशी कीं, ही गुलामगिरी आहे, असें भासतच नाहीं. जर केव्हां भासलेंच तर सभोंवतालीं सर्वच गुलाम दिसत असल्यामुळें जीवनपद्धतिच ही अशी आहे, असें वाटूं लागतें. कारण आपण बरोबर का चूक हें ठरविण्याची एक सनातन रीत आहे. इतरांकडे पाहूनच जो तो आपल्या जीवनाचें मूल्यमापन करीत असतो. अनुकरण व तुलना यांच्या मदतीनें स्मृति आपली सत्ता अप्रतिहत अशी चालवूं शकते.

स्मृतियंत्र कशा पद्धतीनें आपलें कार्य करतें, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, ज्या घटका संपून गेल्या त्या तशाच चालू ठेवणें हें त्या यंत्राचें मुख्य काम आहे. त्याकरतांच त्या यंत्राचा अवतार आहे. "घटना झाली तेव्हांच संपली, तिचा मागमूसहि न उरला तर मोठीच आपत्ति येईल." अशी शंका वाचक घेतील, पण हें मर्यादित सत्य आहे. कोणत्याहि सत्याची व्याप्ति वाजवीपेक्षां वाढविणें, म्हणजेच असत्याच्या गर्तेंत जाऊन पडणें होय.

कोणताहि अनुभव येतो तो स्मृतीला येत नाहीं, हें प्रथम लक्षांत घेणें जरूर आहे. डोळ्यांना एखादें सुंदर दृश्य दिसलें तर जी संवेदना होते ती स्मृतीला होत नाहीं. देखावा दिसतांच पहिल्या क्षणांत जो आनंद होतो तो स्मृतीवर अवलंबून आहे का? तसें नसावें. तसें असतें तर ज्या व्यक्तीनें पुष्कळ सूर्यास्त बऱ्याच वेळां पाहिले तिलाच सूर्यास्त पाहून आनंद झाला असता. पण प्रौढ माणसापेक्षांहि जास्त आनंद लहान बालकाला तें रमणीय दृश्य पाहून होतो, असा आपला अनुभव आहे.

यावरून वस्तूच्या सौंदर्याची पहिली संवेदना इंद्रियांमार्फत होते, असें धरण्यास हरकत नाहीं. पण इंद्रियांचें हें काम संपतें न संपतें तोंच स्मृति प्रवेश करते. ती पूर्वी पाहिलेल्या सूर्यास्तांची आठवण देते. "हा सूर्यास्त सुन्दर कां ? तर तो इतर सूर्यास्तांसारखा आहे म्हणून" असें कांहींतरी ती कुजबुजते; व या कुजबुज-ण्यांतूनच त्या दृश्याचें सौंदर्य समजलें, असें आपण मानू लागतों. पण स्मृति येथेंच थांबत नाहीं. तें सुंदर दृश्य ती आपल्या यंत्रांत पकडते व त्याची आठवण पुन्हां पुन्हां व्हावी, अशी तजवीज करते. मग या आठवणीची सतत उजळणी कर-ण्याची क्रिया सुरू होतें.

एखादी वस्तु पाहिली कीं तिची स्मृतियंत्रांत जी नोंद होते, तिनें फारसें बिघडत नसावें. कदाचित् निसर्गाला तें मंजूर असावें. पण त्या आठवणीची जो पुनरावृत्ति होते, तिचा अर्थ काय ?ही पुनरावृत्ति दोन प्रकारांनीं होते, असें दिसतें. काल जो माणूस पाहिला तो आज दिसला कीं, कालच्या पाहण्याची आठवण होते. ही पुनरावृत्ति नैसर्गिक व जरूर आहे. यामुळेंच माणसें, वस्तु, आपण ओळखू शकतों. या ओळखण्याच्या क्रियेवर आपलें दैनंदिन जीवन बरेंचसें अवलंबून आहे, ही क्रिया थांबली तर सगळीकडे घोंटाळा होईल; अव्यवस्था, गोंधळ माजेल. प्रश्न असा आहे कीं, हें ओळखणें (recognition) फक्त 'कामापुरतें' ठेवतां येईल का ? 'कामापुरतें' याचा अर्थ त्या क्षणापुरतें असा आहे अगदीं जरुरीपुरता म्हणजे जीवनयात्रा चालू राहण्याकरतां आवश्यक तेवढाच वापर, स्मरणशक्तीचा आणि विचारशक्तीचा (thinking) करतां येईल का ?जीवनाचा अर्थ या कूट प्रश्नावर अवलंबून आहे.

स्मृतियंत्रानें जें टिपून घेतलें त्याची पुनरावृत्ति आणखी एका प्रकारानें होते. तो प्रकार, खरें सांगायचें म्हटलें तर जीवनाचा शत्रू आहे; नुसता शत्रू नव्हे, तर जीवनाचा घात करणारा तो मृत्युच आहे, असें म्हणावें लागतें. **कामापुरती स्मृति उपकारक आहे, पण कामोत्पादक स्मृति घातक आहे.** 'काम' याचा अर्थ सर्व प्रकारची इच्छा, 'अमुक हवें' असें वाटायला लावणारी प्रगट अथवा अप्रगट प्रेरणा, इतका व्यापक घेतला पाहिजे.

मृत्यूची छाया जीवनावर पाडणारी स्मृति, कोणत्या पद्धतीनें आपलें काम करते, हें आतां पाहूं. जें झालें व संपून गेलें तें संपू द्यावयाचें नाहीं, अशी प्रतिज्ञा करून स्मृति आपल्या कार्याला सुरुवात करते. तिच्या यंत्रांत याकरतां एक स्पेशल विभाग आहे. तिचेजवळ अशी एक युक्ती आहे कीं, जिचे योगानें घटना किती का जुनी असेना, ती जिवंत ठेवतां येते. आपण समजतों कीं, ही संजीवनीविद्या आहे. पण गतघटनांची भुतावळ उठवून त्या इंद्रजालांत माणसाला कायमचा अडकवि-णारा हा जादूटोणा आहे.

वस्तु पाहतांनाच ती हवीशी अगर नकोशी वाटली कीं, तिची नोंद स्मृति-यंत्रांत एका विशिष्ट पद्धतीनें होते असें दिसतें. ती नोंद तिथेंच संपत नाहीं. तिचेंतून विचार करणारा (thinker) अथवा 'मी' उत्पन्न होतो. 'मी'ची निर्मिति हीच अनुभव न संपविण्याची युक्ति होय. सुखद अथवा दुःखद (अगर भयप्रद) वस्तूची आणि इंद्रियांची गांठ पडतांना व ती पडल्यावर, स्मृति आपलें कार्य इतक्या जारीनें सुरू करते कीं, बोलायची सोय नाहीं. इंद्रियांना विचारतो कोण ? सगळा कारभार स्मृतिच आपल्या हातांत घेते. तीच इंद्रियांना सांगते कीं, " हें सुख आहे " व " तें दुःख आहे " इंद्रियें बिचारीं स्मृति सांगेल तें निमूटपणें ऐकतात. ती पिटाळील तिकडे ती धांवूं लागतात. सुख असो अगर दुःख असो, त्यांतून अनुभविता (experiencer) जन्माला येतो तो एकदां का निर्माण झाला कीं, पुनरावृत्तीची बेमालूम अशी व्यवस्था पुरी झाली. मग हा अनुभवितांच सर्व कांहीं करूं लागतो. कोणताहि अनुभव येतांना, स्मृतीचा हा जो हस्तक्षेप होतो, तो फार भयंकर आहे तो झाला कीं माणूस भूतकालांतच राहूं लागतो व चालू जीवनावर त्या भूतकालाचें सारखें दडपण आणूं लागतो. मृत्यूची ही जीवघेणी मगरमिठी, ही एकच काय ती मानवापुढची समस्या आहे. पण माणूस समजतो कीं, त्याच्या जीवनांतल्या समस्या निराळ्या व अनेक आहेत. भूतकालांतून येणाऱ्या आठवणींतून पुढें आलेला 'मी', जीवनाकडे विकृत दृष्टींतून पाहूं लागतो, " भूत-कालांतून उत्पन्न होणाऱ्या माझ्या आकांक्षा सफल कां होत नाहींत ?" एवढा एकच प्रश्न तो सदैन विचारूं लागतो. वस्तु अगर घटना सत्यस्वरूपांत समजून घेणें दूरच राहतें. स्मृतींतून त्यांचें जें (असत्य) स्वरूप भासतें तें तसें कां, ही एकच विवंचना माणसाला त्रस्त करूं लागते. हें सर्व, स्मृतियंत्राचा उपयोग चुकीच्या पद्धतीनें केल्यामुळें होतें. स्मृतीचें रूपांतर विचारांत (thinking) झाल्यामुळें व विचाराचा धागा विचार करणाऱ्या 'मी'नें पकडल्यामुळें, ही आपत्ति येते.

आपलें मन ज्या विविध प्रकारच्या मागण्या करूं लागतें, त्या कशांतून येतात हें पाहणें मोठें उद्‌बोधक आहे. शंभरांपैकीं नव्याण्णव माणण्यांचा उगम शोधीत गेलें तर, तो कोणत्यातरी स्मृतींत आढळतो. फक्त शरीराच्या खऱ्या मागण्या याला अपवाद आहेत. मौज अशी आहे कीं, जेव्हां कांहींतरी सुखद असें आठवतें तेव्हां तें ताबडतोब निघून जात नाहीं. तें तसेंच बराच वेळ रेंगाळत राहतें. जेव्हां आठवण चित्तांत पहिलें पाऊल टाकते तेव्हां ती निरुपद्रवी असते. याचा अर्थ असा कीं, चित्त प्रक्षुब्ध अथवा अस्वस्थ होत नाहीं. पण दुसऱ्याच क्षणाला, त्या आठवणींतला पदार्थ 'हवा' अगर 'नको' म्हणणारा 'मी', निर्माण होतो; व मग तो 'मी' आणि 'तो पदार्थ' अशा दोन गोष्टींचा (द्वैताचा) प्रत्यय आपणांला येऊं लागतो. यापुढची मौज अशी आहे कीं, त्या विशिष्ट आठवणींतूनच 'मी' पुढें

आला, हें आपण विसरतों. याच 'मी'ला इतर अनेक आठवणी येऊन मिळतात. मग तो चांगलाच पुष्ट होतो. त्याला एक प्रतिष्ठा प्राप्त होते. मग तो त्या पदार्थाबद्दल कांहींतरी कृति करूं लागतो. ही कृति कशी करावी, याबद्दलचे नियम त्याला आठवतात. जें हवें वाटतें, तें मिळवावें का टाळावें हें समाजानें शिकविलेलें असतें. त्या शिकवणीप्रमाणें वर्तन करण्याचा 'मी' मग प्रयत्न करूं लागतो. हा प्रयत्न केव्हां यशस्वी तर केव्हां अयशस्वी होतो. यांतूनच अनेक प्रकारचे संघर्ष व अत्यंत अस्वस्थ करणाऱ्या समस्या निर्माण होतात. त्यांचा इतका त्रास होतो कीं, आयुष्यांत "सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें" असे उद्गार वरचेवर निघूं लागतात.

'मानवी संस्कृति' ह्मणजे जिला आपण म्हणतों तिची आतांपर्यंन्तची कामगिरी काय आहे ? तिनें आतापर्यन्त एकच उद्योग केला आहे. तो हा कीं, जें 'हवें' अथवा 'नको' असें मनाला वाटतें, त्याचें स्वरूप काय असावें हें ठरविण्याचा. हें ठरवितांना इतर व्यक्तीशीं संघर्ष न यावा, आलाच तर तो शक्य तेवढा सौम्य असावा, एवढी एकच काळजी संस्कृतीनें घेतली आहे. पण मनुष्य हा जितका स्वार्थी तितकाच हुशार व कुटिल (cunning) आहे. अशा तऱ्हेनें स्मृतिदर्शित सुखांचा तो पाठलाग करूं शकतो कीं, त्याची कृति समर्थनीय अशीच भासावी.यामुळें केव्हांतरी व्यक्तिव्यक्तींमध्यें संघर्ष उद्भवतोच. शिवाय, प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांतला आंतरिक संघर्ष तर अधिकच तीव्र होत जातो. एखादी वस्तु 'हवी' अशी वाटल्यावर त्या वासनेचें नियमन कसें करावें, याचा शोध घेण्यांतच मानवजातीची इतकीं वर्षें खर्ची पडलीं. पण ती हवीशीं कां वाटतें व ती ज्याला हवी वाटते तो खरोखर अस्तित्वांत आहे का, याचा शोध न घेतां केलेले हे श्रम, एका अर्थानें वांयाच गेले आहेत.

स्मृतियंत्राला पुनरावृत्ति करण्याची ही जी खोड लागली आहे, तिच्यांतूनच सारा अनर्थ होतो; व 'मी'च्या मदतीखेरीज ही पुनरावृत्ति करतां येत नाहीं, येथपर्यन्त आपण आलों. मग ही पुनरावृत्ति थांबवावी कशी ? चूक समजली. ती आतां निस्तरावी कशी ? चित्तांत सुखसंवेदना (stimulation) उद्भवली कीं, 'ती जीवनांतलें एक सत्य आहे,' असे धरूनच आपण पुढची तजवीज करूं लागतों. ही संवेदनाच तेवढी आपण गृहीत धरतों, असें नाहीं. ती ज्याला होते असें वाटतें, तो 'मी'हि आपण गृहीत धरतों. मग या 'मी'नें ती संवेदना दाबून टाकूं म्हटलें, तरी काय साधणार ? **ज्या संवेदनेचाच एक तुकडा 'मी' आहे तो ती नष्ट करूं शकत नाहीं.** तो फारतर दुसऱ्या तुकड्याशीं संघर्ष करूं शकेल. हा संघर्ष बरवर फलदायी वाटतो. पण चित्त मोकळें असें केव्हांच होत नाहीं. एका संघर्षानंतर दुसरा, नंतर तिसरा, अशा संघर्षपरंपरेंत सर्व आयुष्य व्यतीत होतें. हे सर्व

संघर्ष जन्मापासून मरेपर्यंत करणारा एकच 'मी' आहे, असा भास सतत होत राहिल्यामुळें, व्यथा अधिकच वाढते. देह एकच असल्यामुळें, काल दुःखी होता तोच 'मी' आजहि दुःखी आहे, असें वाटूं लागतें. यांतून सुटका व्हावी कशी ?

'मी'चें टोंक हातांत गच्च धरल्याखेरीज दुःखाचा अगर सुखाचा अनुभव येत नाहीं. ज्या दुःखाबद्दल मी एवढी तक्रार करतों तीं, त्यांची स्मृति नुसती टाकून दिली कीं संपतील, हें माझ्या लक्षांत येत नाहीं. दुःख एक वेळ टाकवेल; पण सुखांचा त्याग करण्याची माझी तयारी आहे काय ? सुखांवरची पकड तशीच कायम ठेवून, दुःखाची गांठ पडूं नये अशी व्यवस्था करतां येईल काय? तसें शक्य दिसत नाहीं. आपल्या भोंवतालच्या परिस्थितींत सारखे बदल मोठ्या वेगानें घडत असतात. हा सतत होणारा बदल आपणांला बजावीत नाहीं का, कीं धरलेलें सुख कायम राहणार नाहीं ? एकूण असें दिसतें कीं, दोन सत्यांची नीट दखल न घेतल्यामुळेंच सर्व अडचणी उत्पन्न होतात. पहिलें सत्य असें कीं, जीवनाचा प्रवाह फार मोठ्या वेगानें सारखा धांवत आहे. दुसरें सत्य असें की, सुखी अगर दुःखी होणारा 'मी' असा जागेवर कोणी नाहींच. 'मी'ची जाणीव होणें, हा एक आगंतुक होणारा उपद्रव आहे. एखाद्या कारखान्यांतली मशिनरी कोणतेंतरी उपयुक्त असें उत्पादन करते; पण त्याच वेळीं तिच्यांतून कसलातरी विषारी पदार्थ उत्पन्न व्हावा, तसा प्रकार आहे हा. स्मृति दैनंदिन जीवनाला, ओळखण्याच्या (recognition) प्रक्रियेंतून फारच मदत करते. पण त्याच क्रियेंतून 'मी'चें जें हालाहल बाहेर पडतें, तें आपलें सबंध जीवन काळवंडून टाकतें.

स्मृतियंत्राची वर वर्णन केलेली सबंध प्रक्रिया (process of working) अवधानपूर्वक पाहात राहिलें तर ? 'मी' आहेच असें गृहीत धरून, पुढचे उद्योग करण्याऐवजीं, तो खरोखरच आहे का, हा शोध दरक्षणीं घेत राहिलें तर ? हा शोध 'मी'ला घेतां येत नाहीं, हें येथें आवर्जून सांगितलें पहिजे. याचें कारण असें आहे कीं, स्मृतीखेरीज अथवा विचाराच्या (thinking) क्रियेखेरीज 'मी'जवळ दुसरें हत्यारच नाहीं; आणि हें हत्यार वापरणें म्हणजे 'मी'ची उत्पत्ति चालूच ठेवणें होय. 'मी' हा कसा खोटा आहे याचें सुंदर विवेचन करणाराहि, 'मी'च असूं शकतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

आदिमानवाच्या आयुष्यांत जी चूक घडली, जो रोग त्याला जडला, त्याचें निवारण व्हावें कसें ? 'हा रोग आहे,' हें प्रथम कळलें पाहिजे. नंतर त्या रोगांत काय काय होतें, हें पाहतां आलें पाहिजे. हें 'पाहणें' रोग्याच्या चष्म्यांतून न करतां, डॉक्टरच्या-तिऱ्हाइताच्या-चष्म्यांतून झालें पाहिजे. असें कांहीं झालें तरच या विलक्षण रोगापासून मुक्तता होण्याची आशा आहे. सर्व उपाययोजना रोग्यानेंच पण डॉक्टर बनून केली पाहिजे, असें दिसतें. इतरांना रोग्याची मनःस्थिती, त्याच्या स्मृतियंत्राची करामत, कशी दिसणार ? " हें सामर्थ्य रोग्यालाच कसें असणार ?"

अशी शंका आपण घेतों. पण परमेश्वरानें स्मृति–तिच्या सर्व दोषांसह मानवाला देतांना, एक वरदानहि दिलें आहे. ती देणगी कोणती ? 'स्वसंवेद्यता' असें त्या देणगीचें नांव आहे. पशूंना मानवाचे सर्व विकार आहेत, व स्मृतिहि कांहीं प्रमाणांत आहे. पण, 'स्वतःकडेच पाहतां येणें' ही कला, फक्त मानवालाच साध्य करतां येणें शक्य आहे. ही कला त्याला साध्य झाली तरच, तो 'मानव' या श्रेष्ठ पदवीस पात्र होईल, नाहींतर, 'चांगले कपडे घातलेला पशु' एवढेंच त्याचें स्थान राहील. हल्लीं आपण 'सुसंस्कृत पशु' म्हणूनच जगत आहोंत. हा पशु, खऱ्या पशूपेक्षां जास्त क्रूर व अधिक उपद्रवकारक आह. दुःखांत व असमाधानांत तर तो आकंठ बुडालेला आहे.

* * *



बाविसावें

मनांत क्रांति कां होत नाहीं ?

माझ्या मनांत क्रांति कां होत नाहीं ? असा प्रश्न प्रत्येक विचारी माणसापुढें केव्हां ना केव्हांतरी उभा राहतोच. पुष्कळदां आपण तो झटकून टाकतों व आपल्या पुढील उद्योगांत मन घालतों. पण अशानें तो प्रश्न सुटला, असें मुळींच होत नाहीं. पुन्हां केव्हांतरी तो प्रश्न वर डोकें काढतो. या प्रश्नाचें उत्तर देण्याचें आपण सारखें टाळीत आलों आहोंत

माणसाची पहिली इच्छा अशी असते कीं, माझ्या परिस्थितींत क्रांति होऊन ती सर्वस्वीं मला अनुकूल म्हणजेच सुखदायक व्हावी. माणसाचें मन सदासर्वकाळ आपल्या परिस्थितीचाच विचार करीत असतें. "मला जें हवें तें कां मिळत नाहीं ?" हा एकच प्रश्न मन अहर्निश विचारीत असतें. हवा असणारा सुखोपभोग प्रत्यक्ष घेत असतांनादेखील हा प्रश्न संपलेला नसतो. तो फक्त तळाशीं गेलेला असतो, किंवा त्याचें रूपांतर झालेलें असतें. "हें जें सुख मिळत आहे, तें टिकेल का ? तें लवकर संपून तर जाणार नाहीं ना ?" असें रूप त्या प्रश्नानें धारण केलेलें असतें. तें कसें का असेना, आपल्या परिस्थितींत कांहीतरी बदल व्हावा अशी इच्छा आपलें मन बहुशः करीत असतें. पण केव्हां तरी असे प्रसंग येतात कीं, मन अंतर्मुख बनतें. "परिस्थितीचा जाच मला होत आहे कीं माझें मनच मला छळीत आहे ?" असा प्रश्न स्वतःला विचारण्याचें धाडस क्वचित्

का होईना, माणसाच्या हातून घडतें; व या प्रश्नाचा जर पुढें पिच्छा पुरविण्यांत आला तर सुरुवातीस दिलेला प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहतो.

नेहमींच्या परिचयांतलें उदाहरण घेऊं. सिगारेटची संवय लागलेल्या माणसाला पुढें, "माझी सिगारेट कां सुटत नाहीं ?" असा प्रश्न जेव्हां उभा राहतो, तेव्हा होणारे त्याच्या मनाचे व्यापार बारकाईनें पाहिले तर काय दिसतें ? प्रत्यक्ष हातात सिगारेट असतांनासुद्धां हा प्रश्न तो विचारूं शकतो. निव्वळ देखाव्याकरतां नव्हे, तर खऱ्या तळमळीनें वरील प्रश्न विचारलेला असतो. 'हें असें कसें होतें, हा 'वदतो व्याघात' कां निर्माण होतो ?" हाच काय तो मानवी जीवनांतला मुख्य प्रश्न आहे. माणसांत ही जी अगतिकता दिसते, तिचें खरें स्वरूप तरी काय आहे ?

वरील माणसाच्या मनाचा मुख्य गाभा, सिगारेटच्या आस्वादांत वाटणाऱ्या सुखांत गुंतलेला असतो; व तो गाभा तसाच तेथें राहून वरील प्रश्न विचारलेला असतो. म्हणजे मन हें एक फळ कल्पिलें, तर त्याच्या फक्त कवचांतच हा प्रश्न अथवा वासनेंतून मुक्त होण्याची इच्छा असते. तिनें फळाच्या आंतल्या मगजाला स्पर्शच केलेला नसतो. फळाचा संपूर्ण गर्भ व्यसनास्वादाच्या अनुभवांत रस घेत असतो, हें सर्व प्रामाणिकपणानें होऊ शकतें, असें मला मुद्दाम सांगायचें आहे. कांहीं लोकांच्या बाबतींत वरील प्रश्न मनाच्या कवचांतूनसुद्धां निघालेला नसतो. तो फक्त जिभेंतून निघालेला असतो, व कोणत्यातरी हेतूची त्याच्या मागें प्रेरणा असते. त्या भोंदू लोकांचा विचार आपणांला करावयाचा नाहीं. 'मनांत क्रांति व्हावी' असें प्रामाणिकपणानें वाटते, पण ती होत तर नाहीं, अशा लोकांची अडचण नेमकी कुठें आहे, त्याचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रामाणिकपणा असूनहि अज्ञान माणसाचा घात करतें. हें अज्ञान सिगारेटचे दुष्परिणाम कोणते होतात, याबद्दलचें नव्हे. त्या परिणामांची पूर्ण कल्पना असूनसुद्धां व्यसन कां सुटत नाहीं, असा प्रश्न आहे. तंबाखू ओढण्याचे परिणाम काय होतात, हें निदान सुशिक्षित माणसाला तरी आतां सांगण्याची जरुरी नाहीं. असें असून बहुश: सुशिक्षित माणसेंच त्या व्यसनाच्या कह्यांत अजूनहि आहेत, हें पाहून चमत्कार वाटतो. पण अशा प्रकारचे चमत्कार मनाचे व्यापार कसे होतात याबद्दलच्या अज्ञानामुळें होतात. हें अज्ञान फार प्राचीनकालापासून आपल्या मानगुटीस बसलें आहे.

ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष न च कश्चिच्छृणोति माम् ।
परोपकार: पुण्याय पापाय परपीडनम् ॥

हा व्यासांचा श्लोक काय सांगतो ? काय चांगलें, काय योग्य, याचें ज्ञान माणसाला कुणीं सांगितलें नाहीं म्हणून माणसें चुकीच्या मार्गानें वागत राहिलीं. असा प्रकार निदान चार-पांच हजार वर्षांत तरी नव्हता, असें असूनहि माणसाचें अंत:करण कां बदललें नाहीं, हा एक कूट प्रश्न आहे.

असें दिसतें कीं, मनाचे व्यापार मोठे गुंतागुंतीचे असतात. मनाला प्रथम एक अनुभव येतो. सिगारेटचा पहिला झुरका, सभ्य लोकांचें अनुकरण म्हणून अथवा मित्राच्या आग्रहामुळें माणूस घेतो. त्या वेळीं त्या झुरक्यांत स्वतःची कांहीं गोडी असते कीं नाहीं, याबद्दल शंका आहे पण एवढें खास कीं, असलीच तर ती गोडी फार थोडी आहे. निदान त्या गोडीखेरीज त्या अगोदरच्या कालांत जीवन ठीक चाललें होतें. त्यांत कसलीहि उणीव भासत नव्हती. पण हा अनुभव चारदोनदां घेतल्यावर मनांत असा कांहीं फरक होतो कीं, त्याला त्या अनुभवाच्या पुनरावृत्त्याखेरीज चैनच पडत नाहीं. आपण ज्या वस्तूचें उदाहरण घेतलें आहे, ती वस्तुच स्वतः उद्दीपक आहे व त्यामुळें असें होतें, अशी शंका कांहीं वाचक घेतील. पण आपला मुद्दा निराळा आहे. कशानें का होईना, एकदा पुनरावृत्तीची संवय लागल्यावर मन काय काय करतें, हें लक्षपूर्वक पाहण्याचा आपला हेतु आहे. जें सुख एकदां मिळालें तें पुन्हां पुन्हां हवें असें वाटूं लागलें कीं, मनाला एक विशिष्ट आकार प्राप्त होतो. मनाचा संपूर्ण रंगच बदलून जातो; व असें हें व्यसनरंजित मन स्वतःचे दोन भाग करतें. एक भाग, " हें व्यसन नको, तें सुटलें पाहिजे, " असा आग्रह धरतें असा भास आपणांला होतो, पण त्याच वेळीं, मनाचा दुसरा भाग व्यसनांत संपूर्णपणें बुडालेला असतो. हे दोन भाग परस्परांपासून अलग झालेले नसतात.किंबहुना,मनाचें एक टोंक हाललें कीं दुसऱ्या टोंकालाहि गति मिळते. कारण एकाच काठीचीं दोन टोंकें म्हणजे हीं दोन मनें. एक मन, " व्यसन दाबून टाक" असें म्हणतें. पण त्या त्याच्या कृतीमुळेंच दुसरें मन म्हणजे दुसरें टोक व्यसनाच्या गर्तेत जातें. पहिल्या मनांत व्यसन वाईट कां, याबद्दलचें सर्व शब्दज्ञान सांठवलेलें असतें, पण व्यसन अनिष्ट कां याबद्दलचें सर्व चिंतन प्रत्यक्ष व्यसनाशींच आपला संबंध जोडतें. यामुळें शब्दज्ञान भरपूर असूनहि माणसें व्यसनाधीन अशींच राहतात.

कांहीं वेळां शब्दज्ञानामुळें अथवा भीतीमुळें बाहेरची कृति थांबते, पण मनावर पडलेला व्यसनाचा आसर निघत नाहीं. एक प्रकारची अगतिकता माणसाला ग्रासून टाकते. हें असें कां होतें, हें समजून घेण्याचा आपण प्रयत्न करीत आहोंत.

वर, व्यसन लागलेल्या माणसाचें उदाहरण एवढ्याकरतांच घेतलें आहे कीं, मनाचें यंत्र कसें फिरत असतें, हें त्यावरून समजावें. मनाला एखादी विकृति जडल्यानंतर काय होतें, हें पाहिल्यानें मनाचे नेहमींचे गुणधर्म कळण्याला मदत होते. व्यसनी मनुष्याचे मनांत, त्याला ज्या अनुभवापासून सुख मिळालें त्या अनुभवाबद्दलच्या स्मृति सारख्या घोळत असतात. त्या स्मृतींपासून तो आपल्या मनाला वेगळें काढूंच शकत नाहीं. किंबहुना त्याचें मन त्या स्मृतींचंच बनलेलें असतें. त्या स्मृतींपासून बाजूला त्याचें मन गेलें कीं, पाण्यांतून बाहेर काढलेल्या माशासारखें

तें कासावीस होतें. मग तें अशी युक्ति करतें कीं, जें त्याला सुखद वाटत असतें तें तळाशीं ढकलतें व वरच्या बाजूस मात्र व्यसनविरोधी विचार ठेवतें. ही अशी व्यवस्था एकदां झाली कीं, जीवनांत विसंवाद उत्पन्न होतो. एक प्रकारचा संघर्ष मनांत सतत चालूं राहतो. हा संघर्ष विशेष तीव्र झाला कीं, त्याला समस्येचें (problem) रूप येतें, व माणूस त्रस्त होतो. पण संघर्षाचें बीज मनाच्या तळाशीं नेहमींच असतें.

विसंवाद अथवा द्वैत उत्पन्न होणें, हीच काय ती समस्या आहे. ती सुटल्या खेरीज आपण कधींच निर्धास्त होणें शक्य नाहीं. मनांत क्रांति झाली असें तेव्हांच म्हणतां येईल कीं, जेव्हां द्वंद्वापासून मन नेहमींच अलिप्त राहील.

समस्या उत्पन्न झाली कीं, मनाचे दोन विभाग होतात, येथेंच काय ती मानवी जीवनाची शोकांतिका आहे. समस्या एका बाजूला व तिचेकडे पाहणारा दुसऱ्या बाजूला अशी स्थिति होते. समस्येकडे पाहणारा (observer or thinker) समस्या कायमची सोडवूं शकत नाहीं, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. प्रत्येक वेळीं, अशी द्विधा स्थिति झाल्याखेरीज आपलें भागतच नाहीं. 'मनाची क्रिया ही अशी होणारच', असें गृहीत धरून आपण चालतों. मनाचे असे दोन भाग पाडण्याची आपणांला फक्त संवय लागलेली आहे. तशी वस्तुस्थिति नाहीं.

काळजीचें उदाहरण घेऊं. मला जेव्हां एखादी काळजी हैराण करते, तेव्हां मी ग्रंथ वाचूं लागतों. ते मला सांगतात कीं, " काळजी करणें वेडेपणाचें आहे तिनें प्रकृतीवर परिणाम होतो. बुद्धि नीट काम देत नाहीं." हें सर्व ज्ञान मला मिळूनहि माझी काळजी सुटत नाहीं. कारण, मी हें विसरतों कीं, **काळजीबद्दल एवढा खटाटोप करणारा 'मी' हाहि काळजीचाच एक भाग आहे.** ज्या क्षणाला काळजी माझें मन व्यापून टाकते, त्या क्षणाला तीच काळजी करूं नये असा म्हणणारा 'मी' निर्माण करते. या 'मी'पासून मुक्तता झाल्याखेरीज काळजीचा प्रश्न कायमचा सुटणें शक्य नाहीं. 'मी'चें टोंक हातांतलें सोडावयाचें नाहीं, असा माझा निश्चय जोंपर्यन्त कायम आहे तोंपर्यन्त कोणती ना कोणतीतरी काळजी मला सतावणारच. आपल्या काळज्या बदलतील, पण काळजी उत्पन्न करणारी 'मी'ची यंत्रणा जोंपर्यन्त कायम आहे, तोंपर्यन्त मन हें पुन्हां पुन्हां चिंताग्रस्त होणारच, यांत मुळींच संशय नाहीं.

'मनांत क्रांति व्हावी,' असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां त्याचा अर्थ या समस्या कायमच्या निकालांत निघाव्यात असा असतो. पण त्याकरतां जरूर तेवढी किंमत देण्याची आपली तयारी नसते.

प्रत्येक वेळीं आपण फक्त तात्पुरता विचार करतों. " आतां माझ्यापुढें असलेली काळजी मिटवा. पुढचें पुढें पाहतां येईल. " एवढीच विनंती माणूस करीत

असतो. " माझ्या रोगावर फक्त मलमपट्टी करा, तो कायमचा बरा करूं नका " असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ असतो. ही विलक्षण मागणी माणसानें कां करावी, हा शोध घेणें मोठें मनोरंजक आहे.

त्याचें असें आहे कीं, माणसाला त्याचा ' मी ' मोठा प्रिय आहे. कोणत्याहि व्यसनी माणसानें आपल्या व्यसनावर कधींहि केलें नसेल एवढें प्रेम, प्रत्येक माणूस आपल्या ' मी'वर करतो. ' मी'ची उत्पत्ति केल्याखेरीज एक क्षणहि माणसाचा जाऊं शकत नाहीं. ' मी'शिवाय एक पाऊलहि टाकावयाचें नाहीं, असें माणसानें ठरविलें आहे. तें त्याचें सर्वांत मोठें व्यसन आहे. आणखी मौज अशी कीं, व्यसन जसें असत्यावर आधारलेलें असतें पण संवयीमुळें अपरिहार्य वाटतें, अगदीं तसेंच ' मी'बद्दलहि आहे. कृष्णमूर्तींचे शब्द असे आहेत–

"Why are the thought and the thinker separate ?Not that they should be or must not be, but why are they separate ? *They are separate because of habit.* We have not doubted it; we have accepted it, taken it for granted; therefore it has become a habit for us. The thinker is separate from his thought; and the struggle between the two, the domination of the thinker over the thought, is our daily habit—habit being routine, repetitive. That is a fact, is it not?

What would happen if the thinker and the thought were not separate ? My mind is used to this habit. What would happen to my mind if this habit stops ? *The mind would feel lost*, would it not ? It would be puzzled, bewildered by something unexpected, something new; so the mind prefers to live in habit; so it says 'I keep my habit going.' "

[Madras Talks 1952, p. 62]

" माणसाला ' मी'चें व्यसन जडलें आहे," हें विधान ऐकल्याबरोबर आपली प्रतिक्रिया अशी होते कीं, हें विधान करणारा माणूस कवि असावा. (कवींना कल्पनेच्या जगांत रमण्याची संवय असते.) वरील विधान खरें न वाटण्याचें पहिलें कारण असें आहे कीं, ' मी ' नाहीं असा माणूसच आपणांला आढळत नाहीं. सिगारेटसारखें व्यसन, ' व्यसन ' म्हणून कां ओळखलें जातें ? तर कांहीं माणसें सिगारेटवांचून हांसत खिदळत जगूं शकतात, हें आपण प्रत्यक्ष पाहतों. दुसरें कारण असें आहे कीं, हें व्यसन नव्हतें असा काळ आपणांला माहीत नाहीं. या दोन अडचणी सोडल्या तर व्यसनाचे सर्व गुण ' मी'निर्मितीच्या संवयीमध्यें सांपडतात. वर दर्शविलेल्या दोन्ही अडचणी, आपलें अज्ञानच दाखवितात. ज्या समुदायांत आपण राहतों, त्यांतल्या सर्व व्यक्तींना कांहीं ऐतिहासिक कारणांनीं एकच रोग जडणें शक्य आहे. पण अशी रोगग्रस्त अवस्था म्हणजे कांहीं आरोग्य नव्हे. वर दिलेलें

दुसरें कारणहि अगदींच निराधार आहे. माणसाला कळूं लागण्यापूर्वीहि एखादा रोग अथवा व्यसन जडणें संभवनीय आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, 'मी'रहित अवस्थेचे क्षण क्वचित् का होईना पण प्रत्येकाच्या अनुभवाला येतात. पण त्यांचेकडे आपलें लक्ष नसतें.

एखादें व्यसन अंगांत भिनलें असलें तर त्याचेखेरीज जगणेंच अशक्य आहे, असें माणसाला वाटूं लागतें. जर दांडगाईनें कुणीं त्याला बाजूला केलें तर तो कावराबावरा होतो, घाबरा (bewildered) होतो; व केव्हां एकदां व्यसनाकडे पुन्हां वळूं असें त्याला होऊन जातें. अंगवळणीं पडलेल्या आपल्या संवयीला तो पुन्हां मिठी मारतो. अगदीं असाच प्रकार 'मी'च्या बाबतींत होतो. 'मी' रहित अवस्था कांहीं कारणानें क्षणभर अनुभवाला येते न येते तोंच, मन पलटी खातें; व आपल्या परिचित अवस्थेंत जाऊन बसतें. 'मी' रहित अवस्थेंतून जगण्याचा प्रयत्न करण्याला, आपलें मन तयारच होत नाहीं.

'मी'मध्यें स्थिर होऊन मगच प्रत्येक सुखाचा अथवा दुःखाचा अनुभव घेण्याची जी खोड आपणांला लागली आहे, तिच्यामुळें मनाला उसंत कशी ती मिळतच नाहीं. प्रत्येक अनुभव मनाला अधिकच दुर्बल करून सोडतो. पुढच्या क्षणीं समोर येणाऱ्या नव्या प्रश्नाचें स्वरूप नीट समजून घेण्यास मेंदू वरचेवर असमर्थ होत जातो. जीवनांत रस घेण्याची शक्तिहि कमी होते. जीवन शुष्क व भयाण वाटूं लागतें. मधून मधून किंचित् प्रमाणांत मिळणारा आनंद अथवा त्याबद्दलची आशा, यांचेवर माणूस शेवटपर्यन्त कसातरी जगतो.

'मी'च्या पायावर आपल्या जीवनाची सबंध इमारत उभी करण्यांत आपण केवढी चूक करीत आहोंत, हें ज्या दिवशीं आपल्या लक्षांत येईल, तो सुदिन, नव्हे, तो क्रांतिदिन. तुकारामम्हाराजांनीं या दिवसाला सोन्याचा दिवस म्हटलें आहे; व तो अमृतानें म्हणजे अमर चैतन्यानें पाहिला, असें वर्णन केलें आहे. तो दिवस येईपर्यन्त, 'मी'च्या चष्म्यांतून जों जों आपण जीवनाकडे पाहूं तों तों एकामागून एक नव्या समस्याच आपणांला दिसत राहणार, हें उघड आहे. या समस्यांची जरुरीपुरती सोडवणूक करण्यांत आपला सबंध जन्म जातो. अशा तऱ्हेनें जीवनाची फक्त सुधारणा (reform) करण्याकडे आपलें लक्ष आहे. जीवनांत क्रांति (revolution) व्हावी, असें वाटत असेल तर मनांत क्रांति झाली पाहिजे. ती 'मी'रहित जीवनांत पदार्पण केल्याखेरीज अशक्य आहे. पण हें पदार्पण घडावें कसें ?

कोणतेंहि व्यसन कायमचें सुटण्याचा जो एकच खरा उपाय आहे, तोच येथें आहे. प्रथम 'मी' चें असत्य स्वरूप उमगलें पाहिजे. 'मी'शिवाय जगतां येतें अशी खात्री पटली पाहिजे. ही खात्री कशी पटणार ? दुसऱ्या कोणाच्या सांगण्या-

मुळें ती पटेल, असें दिसत नाहीं. शब्दज्ञान किती जरी संपादन केलें तरी तें कामाला येत नाहीं. पण "स्वतःच्या मनाकडे लक्षपूर्वक पाहूं. कदाचित् 'मी' जागेवर नसेलहि !" अशी प्रेरणा मनांत उत्पन्न होण्याला केव्हां केव्हां शब्द कारणीभूत होतात. मनाकडे लक्षपूर्वक पाहतांना निव्वळ सत्यशोधनाची दृष्टि पाहिजे. अशी दृष्टि देतां आली तर, मनांत 'मी' नांवाचा खरोखर कोणी नाहींच, फक्त संवयीमुळें तो भासतो, असें नजरेस येणें शक्य आहे. हें दर्शन झालेंच तर तें आपणांला अगदीं अस्वस्थ करतें. "नको ही भानगड, आपली नेहमींचीच जीवन-पद्धति बरी." असें आपण म्हणू लागतों. व्यसनाच्या बाबतींतहि नेमकें असेंच होतें पण "जीवनाचें सत्यस्वरूप काय, हें मला समजलेंच पाहिजे," अशी जिद्द आपणांजवळ असली तर आपण माघार घेणार नाहीं. 'मी' हा आगंतुक आपल्या जीवनांत आलेला आहे, तो गतानुभवांच्या स्मृतींचाच बनलेला आहे, हें प्रत्येक वेळीं मनोमन पटतें कीं नाहीं, यावर आपली कार्यसिद्धि अवलंबून आहे. जेव्हां हें असें पटतें तेव्हां तें बुद्धीला पटतें, असेंहि ठाम म्हणतां येत नाहीं. पण हा प्रकाश चित्तांत एकदम पडतो, असें दिसतें. मगच 'मी' गळून पडण्याचा संभव आहे. सर्प पाहतांच निःसंदिग्धपणानें त्याचेपासूनचा धोका आपणांला उमजतो. तसा प्रकार याबाबतींत झाला पाहिजे. फार जुनें असें व्यसनहि एका क्षणांत सुटलें, असें केव्हां केव्हां आपणांला दिसतें.

कृष्णमूर्तींनीं 'मी'बद्दलच्या भ्रमाला व्यसनाची जी उपमा दिली आहे, तींत फार खोल अर्थ आहे या भ्रमाला आपण कां सोडीत नाहीं, हें तर ही उपमा सांगतेच; पण त्याशिवाय अध्यात्मांतला हा कूट प्रश्न कांहींसा सोपा करण्याचेंहि काम, ही उपमा करते, यांत शंका नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें, कोणताहि अनुभव घेतांना, विचार करतांना अगर स्मृतीमध्यें मन असतांना, मनाचे दोन भाग होतात. मनाचें असें विभाजन (splitting) होणार नाहीं, अशी अवस्था प्राप्त होईल काय ? प्रत्येक वेळीं मनाचें एक टोंक भूतकालांत जातें, व त्यांतून "मला हें हवे, तें नको' निर्माण होतें. मग आपली जाणीव (consciousness) एका ठराविक दिशेकडेच पाहूं लागतें; ती मर्यादित होते. तिला आपण 'मी' हे नांव देतों व हा 'मी'च आपल्या जीवनावर संपूर्ण हुकमत चालवितो. तसें न होतां, नुसती जाणीवच चित्तांत सदैव राहिली तर ? **कोणताहि अनुभव येतांना नुसत्या जाणिवेनें म्हणजे शांत अवस्थेनें** (from silence) त्याकडे पाहतां आलें तर ? मग अनुभव घेतां येईल, व त्यांतून कोणतीहि समस्या निर्माण होणार नाहीं. अशा जीवनांत सुखदुःख निर्माण होणार नाहीं. आशा चित्तक्षोभ करणार नाहीं व निराशा उद्वेग आणणार नाहीं. मनांत क्रांति व्हावयाचीच असली, तर ती अशा पद्धतीनेंच घडूं शकेल.

* * *



तेविसावें

राग

राग ज्याला माहीत नाहीं असा माणूस, मला वाटतें अजून जन्माला यावयाचा आहे आणि आलाच असला, तर त्याची व आपली गांठ अद्याप पडावयाची आहे. "मी जन्मांत कोणावर रागावलों नाहीं", "आपल्याला बुवा राग कधीं येतच नाहीं." अशीं वाक्यें एका विशिष्ट दिमाखांत उच्चारलेलीं आपण केव्हां केव्हां ऐकतों, पण तीं ऐकत असतांना देखील आपण मनांत थोडें साशंकच असतों. एक मन आपणांला विचारीत असतें, "खरें असेल का हो हें ? आपल्याला कसें हें साधत नाहीं ?" पण त्याच वेळीं दुसरें मन बजावीत असतें, "उगाच ऐट मारतो आहे झालं, सगळ्या थापा, नको विश्वास ठेवूं असल्या बोलण्यावर," आणि आपण सभ्य असलों तर त्या माणसाला म्हणतों, "असें का ? विशेष आहे बुवा तुमचें"; आणि लगेच "काय लबाड आहे !" असें मनांत म्हणत विषय बदलतों, अथवा पुढें चालू लागतों.

रागाचे प्रकार हजार आहेत; आणि म्हणूनच राग न येणारीं अथवा न दाखविणारीं माणसें जेव्हां आपण पाहतों तेव्हां आपली फसगत होते. रागाचें स्वरूप केव्हां अत्यंत सूक्ष्म असतें; तर केव्हां तें इतकें उग्र असतें कीं, पाहणाऱ्याला त्याची घृणा यावी.

"राग येणें फार वाईट" ही समजूत मात्र फार पुरातन आहे. मानव जन्माला आल्यानंतर थोड्याच कालांत, क्रोधाची गणना माणसाच्या रिपूत झाली

असावी. अग्रपूजेचा मान, वडिलकीच्या हक्कामुळें द्यावयाचा ठरला तर षड्रिपूंपैकीं क्रोधालाच तो द्यावा लागेल. पराक्रम जरी पाहिला तरी क्रोध हा, इतर रिपूंना हार जाईल असें वाटत नाहीं.

माणूस समूह करून राहूं लागल्यावर थोड्याच दिवसांत त्याच्या लक्षांत आलें असलें पाहिजे कीं, राग फार अनर्थकारी आहे. "दहा अंक मोज" हा दंडक फार प्राचीन आहे. रागाच्या भरांत, माणसाला 'आपण काय करतों' याचें भान राहात नाहीं; व त्याचे हातून अशा कांहीं कृति घडतात कीं, पुन्हां त्याचा त्यालाच पश्चात्ताप व्हावा. या पश्चात्तापामुळेंच कांहीं शहाण्या माणसांनीं ओळखलें कीं राग बेताल होऊन देतां उपयोगी नाही, रागाला आवरलें पाहिजे, आणि म्हणून त्याचा भर ओसरूं दिला पाहिजे. दहा किंवा शंभर अंक मोजण्याच्या मागें रागावलेला माणूस लागला कीं, त्याच्या हातून अविचारानें, ताबडतोब एखादें भयंकर कृत्य होण्याचें टळेल, व अशा रीतीनें कुटुंबांत अथवा समाजांत होणारा उत्पात अथवा अत्याचार थांबेल. राग हा माणसाच्या मनाला लागलेला सर्वांत जुना रोग आहे, व या जुनाट रोगावर माणसाला 'संयम' हें एकच औषध आतांपर्यंत सांपडलेलें आहे.

आतां प्रश्न असा आहे कीं, संयमावर आपलें भागेल काय? संयम म्हणजे तरी काय, नक्की कोणता परिणाम संयमाचा रागावर होतो?

सयंम हा, रागावर उपाय म्हणून जेव्हां सांगितला जातो तेव्हां फक्त तात्कालिक कार्याकडेच (immediate result) दृष्टि असते. मूल फारच खोड्या करूं लागलें तर त्याला कोंडून ठेवण्यासारखाच हा प्रकार आहे. आयुर्वेदांत तात्पुरता पण ताबडतोब गुण देणाऱ्या मात्रा असतात ना? त्यासारखीच संयमाची ही मात्रा आहे. तिनें रोगाचें निर्मूलन होत नाहीं.

माणसाला राग कसा येतो, त्याचीं सुरुवातीचीं पावलें कशीं पडतात, हें न पाहतां तो आल्यावर कोणती धांवपळ करावी, याचाच विचार आपण आजपर्यंत करीत आलों. तसें न करतां, रागाच्या उगमाकडे जर लक्ष दिलें तर काय आढळतें याचा आपण थोडा विचार करूं. या संशोधनाचे अनेक फायदे आहेत. एक तर, रागाचें आमूलाग्र स्वरूप आपल्या ध्यानांत येईल. दुसरा फायदा असा कीं, जास्त रागीट माणसें व कमी राग येणारीं माणसें यांच्यामधला फरक, खरोखरच महत्त्वाचा आहे काय हेंहि आपणांला कळेल आणि या संशोधनापासून सर्वांत मोठा लाभ असा होईल कीं, राग "कोणाला" येतो हें जर आपणांला कळलें, तर त्याची नीट ओळख आपणांला करून घेतां येईल; व ही ओळख जीवनांत पदोपदीं आपल्या फार उपयोगी पडेल.

'राग येण्याला अनेक कारणें असूं शकतात' अशी आपली समजूत आहे;

व या कारणांपैकीं शक्य तेवढीं कारणें, जर नष्ट केलीं तर रागाचें जीवनांतील थैमान बऱ्याच अंशीं कमी होईल, असें आपण धरून चालतों. रागावरच्या उपाय-योजनेपैकीं अगदीं स्थूल अथवा वरवर पाहून ठरविलेली अशी ही योजना आहे. 'व्याप तितका संताप' जास्तच असतो; म्हणून व्याप कमी केला कीं संतापहि कमी होईल अशा हिशेबानें आपण रागापासून मुक्त होऊं पाहतों. आजारी माणसाला विश्रांति मिळावी म्हणून त्याला चीड येईल असे प्रसंग टाळा, असें डॉक्टर म्हणतात, त्यांतलाच हा प्रकार आहे. पण ज्या जीवनांत कसलाच व्याप नाहीं असें जीवन माणसाच्या नशिबींच नाहीं, म्हणून राग हा जीवनांत असणारच असें आपण मानतों; व आपला सर्व खटाटोप, या रागाचा उपद्रव इतरांना शक्य तेवढा कमी कसा होईल, याकरतांच चाललेला असतो. इतरांच्या न्याय्य हक्कांवर दृश्य असें आक्रमण जो करीत नाहीं, तो माणूस रागीट नाहीं असें समाज ठरवतो; व समाज एवढेंच पाहतो कीं, ही नीतीची मर्यादा माणसानें ओलांडली आहे कीं नाहीं ? समाजाचा आग्रह हा एवढाच असतो. माणसाच्या मनांत रागानें काय उच्छाद मांडला आहे, हें पाहण्याचें काम समाजाचें नसतें. "मनांतला प्रक्षोभ बाहेर येत नाहीं ना ? व जरी आला तरी त्याचें कृतींत रूपांतर होत नाहीं ना ?" एवढा एकच प्रश्न समाज विचारीत असतो. कठोर शब्द ही सुद्धां उपद्रवकारक कृति, असें समाज मानतो. पण यापलीकडे समाजाची दृष्टि जात नाहीं. हें आपलें कार्य साधण्याकरतां समाजानें जी यंत्रणा उभी केली आहे, तिच्यामुळें माणूसहि असें समजून चालतो कीं, "रागाला काबूंत ठेवलें कीं, आपलें काम झालें." 'समाजाचा घटक,' यापेक्षां निराळें स्वतंत्र अस्तित्व माणसाला आहे, हें जेव्हां ध्यानीं येतें, तेव्हांच जीवनाबद्दलच्या खऱ्या तत्त्वज्ञानाला सुरुवात होते. आपणांला, रागाचें व्यक्तिगत जीवनांत काय स्थान आहे, माणसाच्या मनाच्या आंतल्या बाजूस राग काय उत्पात घडवून आणतो, हें पाहावयाचें आहे; व त्या दृष्टीनें रागावरच्या उपाययोजनेची छाननी करावयाची आहे.

वर सुरुवातीस सांगितलेला, 'दहा अंक मोज,' हा उपाय फक्त बाहेरची कृति थांबवितो, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेल. 'बाहेरची कृति' थांबवायला नको, असें लेखकाला म्हणावयाचें नाहीं. राग आला की, माणसानें वाटेल तें करावें व इतरांनीं तें निमूटपणें सोसावें, असें कोणीच म्हणणार नाहीं. इतरांनाहि कांहीं हक्क आहेत, व त्यांचें रक्षण करण्याची तरतूद समाजानें केलीच पाहिजे. पण समाजाचा प्रश्न अशा रीतीनें सुटला तरी रागावलेल्या व्यक्तीचा प्रश्न शिल्लकच राहतो. त्या प्रश्नाकडे समाजानें जरी फारसें लक्ष दिलें नाहीं, तरी व्यक्तीला तो डावलून चालणार नाहीं.

रागाचा माणसाच्या चित्तावर काय परिणाम होतो या विषयाचा आधुनिक

शास्त्रानेंहि बराच विचार केला आहे. फारसें खोल न जातां असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, राग हा रक्तदाब आणि शरीरांतली उष्णता वाढवितो. रागावलेल्या माणसाचा मेंदू शांतपणें विचार करूं शकत नाहीं, म्हणून त्याच्या हातून विसंगत व मूर्खपणाच्या कृति घडूं लागतात; व या कृति पाहिल्या कीं, तो माणूस आणखी जास्तच रागावतो, व चुकांची संख्या अधिक वाढवतो. जरी राग माणसानें दाबून ठेवला, तरी रक्तदाबासारखे परिणाम घडतच राहतात; व दीर्घ कालानंतर मानसिक व शारीरिक विकृति उत्पन्न होतात. याबद्दल जास्त तपशिलांत शिरण्याची जरुरी नाहीं. कारण रागाचें स्थूल परिणाम काय होतात, याची सर्वांनाच नीट कल्पना आहे.

मानवी जीवनांतून राग अजिबात नाहींसा करतां येणें अशक्य आहे, असें गृहीत धरून आपण चालतों. रागाचा समूळ उच्छेद करण्याच्या भानगडींत माणसानें पडूं नये अशी जी आपली समजूत आहे, ती कितपत बरोबर आहे ?

राग आवरणारीं माणसें आपणांला समाजांत कितीतरी भेटतात. अशा माणसांची संख्या जास्त असणें, हें तर सुसंस्कृत समाजाचें लक्षण मानलें जातें, पण अशा माणसांपैकीं एकहि माणूस असें म्हणणार नाहीं कीं, " राग ही समस्या (problem) त्याच्या जीवनांतून निघून गेली आहे." जगांतल्या अत्यंत सुधारलेल्या समाजांतसुद्धां प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत, ' राग ही एक समस्या कां असावी ?' हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. अत्यंत सुसंस्कृत मनुष्यसुद्धां असेंच म्हणेल कीं, " काय करावें, माझ्या जीवनांतून राग कांहीं नाहींसा होत नाहीं. मी तो बाहेर दिसूं देत नाहीं हें खरें, पण आंतून तो मला सारखा जाळीत असतो. शिवाय राग समूळ नाहींसा झाल्याखेरीज चित्तशुद्धि नाहीं व चित्तशुद्धीखेरीज परमार्थ नाहीं, असें सगळेच धर्म सांगत असल्यामुळें मी जीवनाविषयीं अगदीं निराश झालों आहें. या रिपूचें निर्दालन तर शक्यच दिसत नाहीं, तेव्हां त्याचें नीट दमन तरी कसें होईल, हें मला कोणी सांगेल तर बरें होईल." चित्तांतून राग मुळासकट उपटून काढण्याचे बाबतींत माणसानें हातपाय गाळले आहेत, असें दिसतें. ' उगाच आकाशपुष्पाची आशा कां धरावी?' असा शहाणपणाचा विचार करून माणसानें रागाशीं तडजोड केली आहे. ' नांदा व नांदूं द्या ' या तत्त्वाप्रमाणें, माणसानें, चित्ताच्या खोलींतला एक कोपरा, रागाला कायमचाच राहावयाला दिला आहे व तो त्या कोपऱ्याच्या बाहेर आपले हातपाय पसरीत नाहीं ना एवढ्या एकाच गोष्टीकडे माणूस सारखें, लक्ष देत आहे.

रागाशीं ही जी तडजोड माणसानें केली आहे तिचें स्वरूपच असें आहे कीं, ती सारखी मोडत राहावी. थोडेसें दुर्लक्ष होण्याचा अवकाश, राग त्या तथाकथित कोपऱ्याच्या बाहेर आलाच म्हणून समजावें. याकरतां, रागावर सारखी नजर

ठेवावी लागते व हें काम संतत करण्यामध्यें माणसाची एवढी शक्ति खर्ची पडते कीं, त्याला शांतता म्हणून कधीं लाभतच नाहीं. पण याशिवाय आणखी एक धोका आहे. तो असा कीं, राग हा वेषांतर करूं शकतो व तो एखाद्या सद्गुणाचें रूप घेऊन त्या कोपऱ्याच्या बाहेर पडला कीं, ओळखूंच येत नाहीं. मग त्याला आपण आपलें सारें चित्त खुशाल व्यापू देतों व त्याच्या हुकमाची ताबेदारी करण्यांत धन्यता मानतों. सद्गुणाचें रूप घेऊन हवें तसें वावरण्यास, समाज रागाला मदत करीत असतो हें मात्र लक्षांत घेण्यासारखें आहे.

माणसाची मोठी पंचाईत होते. इकडे, चित्तशुद्धीखेरीज मोक्ष नाहीं, असें तत्त्वज्ञान ओरडून सांगतें; तर तिकडे, रागाचें सद्गुणांत रूपांतर खुशाल होऊं द्या असें समाज सांगतो. मनांतून 'राग नको' असें तर सारखें वाटत असतें. शेवटीं राग तर सुटत नाहींच; पण हा दुहेरी संघर्षमात्र आपल्या नशिबीं येतो.

हा संघर्ष हीच खरी मानवी जीवनांतली समस्या आहे. जें करावें तें शेवटीं संघर्षालाच जन्म देतें. निदान रागाच्या बाबतींतला हा संघर्ष नीट समजून घेतला पाहिजे. तो कसा उत्पन्न होतो, तो जीवनांतून काढून टाकतां येईल का, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. पण त्याअगोदर रागाचीं उगमस्थानें तरी किती असूं शकतात, याचा थोडा विचार करूं.

कांहीं वेळां, रागाचें कारण अगदी स्थूल म्हणजे सहज लक्षांत येण्यासारखें असतें. शारीरिक दुर्बलतेमुळें कसलाच परिस्थितिजन्य आघात सहन होत नाही, व त्या आघातानें होणारी प्रतिक्रिया रागाच्या रूपानें व्यक्त होते. आजारी माणसांचा बराचसा राग या प्रकारचा असतो. हा राग म्हणजे, शरीरांत असणारी स्वसंरक्षणाची जी नैसर्गिक प्रेरणा (Instinct of self-preservation) तिचा परिणाम होय. एका अर्थानें, हा माणसाच्या शरीराला येणारा राग आहे, असें म्हटलें तरी चालेल. पण हा रागसुद्धां या शुद्ध स्वरूपांत बऱ्याच वेळां आढळत नाहीं. पुष्कळदां, आजारी माणसाच्या मनाचे व्यापार त्यांत गुंतलेले असतात. माणसाच्या मनाला राग येत असतो अशी जी आपली समजूत आहे, ती साधारणतः बरोबर आहे. कारण, माणसाला त्रस्त करणारा राग, त्यांत मन म्हणजे विचार (thinking) मिसळल्याखेरीज प्रत्ययास येत नाहीं; व हा रागच काय तो महत्त्वाचा विषय आहे.

रागाचे विविध प्रकार, कृष्णमूर्तींनीं पुढील उताऱ्यांत फारच स्पष्टपणानें सांगितले आहेत.

"Anger may arise from nervous tiredness and tension; it may arise from certain conditioning of thought-feeling, from fear,

from dependence, or from craving for security and so on; it may arise through bodily and emotional pain."

[Ojai Talks 1945, p. 41]

राग कां येतो, कोठून येतो, हें ज्याचें त्याला रागाच्या काळांत नाहींतरी त्यानंतर सहज समजून घेतां येण्यासारखें आहे. आपण म्हणतोंसुद्धां कीं, 'मनासारखें झालें नाहीं कीं माणसाला राग येतो.' " मनासारखें व्हावयास पाहिजे," हा जो आपला आग्रह तो मात्र चुकीचा आहे असें कुणाला कधींच वाटत नाहीं. फरक एकढाच असतो कीं, कांहीं माणसांच्या मनाला स्वतःच्या शरीराचे उपभोग हेच महत्त्वाचे वाटतात, व त्याकरतां इतरांच्या सुखाचा बळी घेण्यासहि ते मागेंपुढें पाहात नाहींत. तर दुसरे कांहीं असे असतात कीं, ते शरीरसुखाला इतकें महत्त्व देत नाहींत. ते समाजहिताकरतां झटत असतात, व त्याबद्दलचें जें ध्येय (Ideal) त्यांनीं ठरविलेलें असतें, त्या ध्येयाची प्राप्ति त्यांच्या मनाप्रमाणें व्हावी, एवढाच काय तो त्यांचा हट्ट असतो. शिवाय ही ध्येयसाधना त्यांच्या इभ्रतीचा (prestige) प्रश्न होऊन बसते. या ध्येयाच्या आड कोणी आला कीं, त्यांनाहि राग येतो, पण त्या रागाला ' कर्तव्यनिष्ठा,' ' पराक्रम ' अशीं सुंदर नांवें दिलीं जातात, व या रागाचा फार मोठा गौरव समाजाकडून केला जातो.

' भीतीच्या पोटीं राग असतो,' हें पुष्कळदां आपल्या ध्यानांत येत नाहीं. आपली स्वस्थता (security) जो कोणी बिघडवूं पाहील, त्याची एक प्रकारची भीति आपणांला वाटत असते; व ही भीति उत्पन्न करणारा माणूस दृष्टीसमोर नको असें वाटूं लागतें, व या भावनेचें रागांत रूपांतर होतें. " प्रेमाच्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूस राग असतो," असें केव्हां केव्हां म्हटलें जातें. हें ' प्रेम ' म्हणजे खरोखर परावलंबित्व (dependence) असतें. आपलें मन एखाद्याच्या संगतींत इतकें गुंतून बसतें कीं ती संगति हिरावून घेतल्याबरोबर सारें जीवन भकास होईल या भीतीनें, जो कोणी असा प्रयत्न करण्याचा संभव आहे असें आपणांला वाटतें, त्याचा आपण द्वेष करूं लागतों व द्वेष हें रागाचेंच दुसरें नांव आहे.

वरील विवेचनावरून एवढा निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं कीं, शरीराच्या रक्षणापुरती जो निसर्गप्रेरणा आहे, तिच्यांतून उत्पन्न होणाऱ्या रागानें आपल्या जीवनाचा फार थोडा भाग व्यापलेला आहे.

" रागाशिवाय कसें भागणार ? मला जिवंत राहण्याचा हक्क नाहीं का ? कोणावर तरी केव्हांतरी रागवावेंच लागतें" असें आपण पुष्कळदां म्हणतों, व हा प्रश्न अंगाबाहेर टाकतों. पण रागाचा प्रश्न दिसतो तितका साधा नाहीं. रागाचें स्वरूप फार विशाल आहे. केव्हां केव्हां असें वाटतें कीं, रागानेंच जगाला ग्रासलें आहे. रागामुळेंच जगांतले सारे संघर्ष, वाद, युद्धें उत्पन्न झालीं आहेत. हिटलरच्या

रागानेंच नाहीं का जगाला आग लावली ? रागाचा धागा एकदां का कर्तव्यपूर्ति, इभ्रत, देशाभिमान, विचारप्रणालीचा (ideology) आग्रह, यांचेशीं जोडला गेला कीं, त्याला अवाढव्य स्वरूप येतें; व सारें जग युद्धाच्या खाईंत लोटलें जातें. पण पण महापुरुषांचा राग कसा असतो आणि काय करतो, हा विषय तूर्त जरी बाजूस ठेवला, तरी सामान्य व्यक्तीच्या जीवनांत रागाचा जो एवढा प्रभाव पडतो त्याचें मूळ कारण एकच आहे. प्रत्येक व्यक्ति स्वतःला एक 'मोठा' आणि चांगला 'माणूस' समजत असते. या मोठ्या आणि चांगल्या माणसाला कांहीं अपेक्षा असतात. त्या अपेक्षांची पूर्ति हा त्याचा जन्मसिद्ध हक्क असतो; व या हक्काच्या आड येणारी परिस्थिति अथवा व्यक्ति, यांना बाजूस सारतांना त्या भल्या माणसाच्या मनाची जी प्रतिक्रिया होते, त्याला 'राग' म्हणतात.

आतां येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, हा 'भला माणूस' कोठें आहे ? त्याचें स्वरूप काय आहे ? माझ्या मनांत कोणीतरी 'पुरुष' दडून बसलेला आहे, असें मला वाटतें; व या पुरुषाची मर्जी संभाळणें एवढेंच माझ्या मनाचें व देहाचें काम आहे, असें मी मानतों. या पुरुषाखेरीज एक क्षणभरहि माझें भागत नाहीं हा पुरुष खरोखरच अस्तित्वांत आहे का, याचा मी विचार करीत नाहीं. त्याबद्दल मला शंकाच नाहीं. 'हा पुरुष म्हणजे माझा देह,' असें मुळींच नाहीं. "मी म्हणजे देहच आहे; कां उगीच नाकारतां ?" असा युक्तिवाद केव्हां केव्हां मी करतों. पण तो वरवरचा असतो थोडा जरी विचार केला तरी मला कळूं शकतें कीं, देह निराळा आहे. कांहीं वेळां, 'मी' म्हणजे 'माझें मन' असें दडपून सांगून मी वेळ मारून नेतों. माझ्या म्हणण्याचा उद्देश असा असतो कीं, "माझा देह जिवंत राहण्याला मनाची म्हणजे देहांतल्या 'मी'ची जरुरी आहे; व हा माझा देह, फक्त जिवंत ठेवण्याची खटपट मी करीत आहे. यापेक्षां अधिक कांहींच मी करीत नाहीं; व हें जिवंत राहणें जर साध्य व्हावयाचें असलें तर 'मी' हा, मृत्यू-पर्यन्त सतत टिकविलाच पाहिजे, त्याशिवाय तरणोपाय नाहीं. 'मी' टिकवावयाचा, तर त्याच्या अपेक्षांचा भंग होऊं देतां उपयोगी नाहीं. त्याच्या वासनांची तृप्ति झाली पाहिजे. त्याला जे जें अन्न लागेल तें सर्व देऊन तो पुष्ट केला पाहिजे; त्याशिवाय भागत नाहीं. फक्त माझी तक्रार एवढीच आहे कीं, हा 'मी' मोठा खादाड आहे. त्याची भूक कधीं संपत नाहीं. शिवाय त्याच्या वासना हरघडीं बदलतात. त्याला आज एक वस्तु पाहिजे; ती मिळाली कीं, उद्यां दुसरी पाहिजे; नाहींतर पहिल्या वस्तूचा फार मोठा सग्रंह पाहिजे व तो रोज सारखा वाढत राहिला पाहिजे. या वासनांची पूर्ति सारखी करीत असतांना कांहीं व्यक्ति आड येतात किंवा परिस्थिति प्रतिकूल बनते. मग राग येणार नाहीं तर काय होईल ? मानवी जीवनाचें स्वरूपच हें असें आहे. रागापासून संपूर्ण मुक्तता हें नुसतें मृगजल आहे."

पण वर उल्लेख केलेला 'मी' हा एक 'चांगला माणूस' आहे, हें विसरतां येत नाहीं. या 'मी'ची मोक्षाकडे प्रगति झाली पाहिजे व याकरतां चित्तशुद्धि जरूर आहे, असें सारखें या 'मी'ला वाटत असतें. कारण, 'मी' हा एक चांगला माणूस आहे. इकडे, जिवंत राहण्यास 'मी'ची जरूर वाटते व त्याचा अनुनय ही एक आवश्यक बाब मानली जाते. पण तिकडे सर्व शास्त्रें, जगांतले सर्व महात्मे, कंठरवानें सांगतात कीं, 'राग टाकून द्या;' आपणांला त्यांचेंहि ऐकावें वाटतें व 'मी'चेंहि ऐकावें वाटतें. दोन्हींमध्यें जो विरोध व संघर्ष (conflict) निर्माण होतो, त्यानें आपण अधिकच त्रस्त होतों. हा एक प्रकारचा संघर्ष झाला. आपल्या जीवनांत दुसराहि एक संघर्ष असतो. 'मी'ला जें जें हवेसें वाटतें, तें सर्व न मिळाल्यामुळें पदोपदीं निराशा पदरीं येते व राग येतो. परिस्थितीवर आपण रागावतों, किंवा स्वतःवर चरफडतों. हें असें वारंवार झाल्यामुळें, व या रागानें जीवाला फारच त्रास होतो, हें प्रत्यक्ष अनुभवास आल्यामुळें, 'राग संपूर्ण जिंकला पाहिजे' असें आपणांला वाटूं लागतें; व तें तर साधत नाहीं. यामुळें आपण अधिकच त्रस्त होतों. या दोन संघर्षांना बरोबर घेऊनच आयुष्याच्या शेवटापर्यन्त जायचें का त्यांचेपासून मुक्तता होण्याची शक्यता आहे, हाच काय तो मुख्य प्रश्न आहे.

एक लहानशी चूक आपली होत आहे, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. ती लक्षांत येण्याकरतां ग्रंथ अथवा इतर विचारवंत काय म्हणतात, हें बाजूला ठेवून आपल्या मनाच्या आंत आपणच डोकावलें पाहिजे. आधुनिक शास्त्रज्ञ असें म्हणतात कीं, माणसाचा देह दरदिनीं दरक्षणीं बदलत असतो. रोजचा होणारा हा बदल आपल्या ध्यानीं येत नाहीं; पण बालपणचा देह तरुणपणीं नाहीं, व तरुणपणचा देह वृद्धावस्थेंत तर नाहींच नाहीं, हें मान्य होण्याला हरकत नसावी. देह याप्रमाणें जरी बदलत राहिला तरी, देहांतला 'मी' अथवा माझें मन हें मात्र जन्मापासून मृत्यूपर्यन्त कायमच राहतें, असें मी समजतों. माणसाची ही समजूत बरोबर आहे का चुकीची आहे? लहानपणीं जो 'मी' चित्तांत राहात होता, त्याची माणूस फारशी पर्वा करीत नाहीं; पण तो 'मी' मोठेपणीं एकदां शहाणा झाल्यानंतर यांचें जें कोडकौतुक सुरू होतें, त्याला मर्यादा नाहीं. आपल्या कल्पनेप्रमाणें **आजन्म जो एकच 'मी' आपल्या चित्तांत ठाण मांडून बसलेला असतो, त्या 'मी'मुळे जीवनांतल्या रागासारख्या समस्या उत्पन्न होतात,** असें तर नसेल? आपण हे अशा प्रकारचे विचार ऐकून घेतों, कारण तशी संवय आपणांला झाली आहे. प्राचीन काळापासून ग्रंथांतहि हें तत्त्व (idea) सांगितलेलें आहे, हें आपणांला माहीत असतें; व उगाच भांडण नको, अशा समजूतदार वृत्तीनें आपण निमूट बसतों. पण हें तत्त्व खरें का खोटें, हें स्वतः पडताळून पाहण्याची इच्छा आपणांला कधींच होत नाहीं,

ग्रंथांतरीं जें तत्त्वज्ञान सांगितलें आहे, त्याचा परिणाम आपणांवर एवढाच होतो कीं, "माझा राग माझ्या चित्तांतून अजून नाहींसा कसा होत नाहीं?" अशी सारखी तळमळ मनाला लागते. पण ही तळमळसुद्धां 'मी'ची एक धडपडच असते; व तिच्यामुळें जीवनांतला संघर्ष नाहींसा होत नाहीं, तर तो वाढीस लागतो, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. यापुढची महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, संघर्षानें 'मी' जास्तच बळकट होत जातो. कृष्णमूर्ति वरील प्रवचनांतच पुढें म्हणतात :–

"Many of us are aware of the conflict of Opposites; but because of pain or disturbance due to conflict, we instinctively seek to be rid of it, violently or in varieties of subtle ways; we are concerned with escaping from the struggle rather than with understanding it. *It is this desire to be rid of the conflict, that gives strength to its continuity and so maintains contradiction;* it is this desire which must be watched and understood.....The modification of the outer, of the thought, is a self-protective device of the thinker; he sets his thought in a new frame which safeguards him from radical transformation. It is one of the many cunning ways of the self. Because the thinker sets himself apart from his thought, problems and conflicts continue; and the constant modification of his thought alone, without radically transforming himself, merely continues the illusion....."

तेव्हां, 'राग वाईट' अगर 'राग गेला पाहिजे,' असें आपल्या मनाला नुसतें वाटून फारसा उपयोग होत नाहीं, येथपर्यंत आपण आलों. जरी हें वाटणें कळकळीचें अथवा प्रामाणिकपणाचें असलें व त्याला अनुसरून आपण लगेच प्रयत्न सुरू केला, तरीहि राग जाईल असें नाहीं. कारण हा प्रयत्न म्हणजे बहुतेक रागाची मुस्कटदाबी अथवा दमन अशा प्रकारचा असतो. या दमनानें फारसें कांहीं साधत नाहीं, हें आतां मानसशास्त्रहि सांगूं लागलें आहे. राग एके ठिकाणीं दाबला तर तो दुसरीकडे उफाळून वर येतो, व तो इतक्या अतिरिक्त प्रमाणांत व अशा अनपेक्षित प्रसंगीं प्रगट होतो कीं, बोलायची सोय नाहीं. दमनाची अथवा संयमाची निरर्थकता नजरेस आली कीं, माणूस रागाचें उदात्तीकरण (sublimation) करूं पाहतो. तो रागाला सद्गुणाचें अथवा आवश्यकतेचें रूप देतो. पण हा स्वतःची फसवणूक करण्याचाच एक प्रकार आहे. हेंहि न जमलें तर, माणूस आपलें चित्त रागांतून काढून दुसऱ्या कोणत्यातरी उदात्त विषयांत गुंतवूं लागतो; व कांहीं काल तें तेथें रमलें कीं आपण यशस्वी झालों अशी प्रौढी मिरवूं लागतो. पण हा आत्मप्रौढीचा आनंदहि माणसाला फार काळ लाभत नाहीं. कालांतरानें असा कांहीं प्रसंग उद्भवतो कीं, पुन्हां राग पूर्वीप्रमाणेंच माणसाला येतो. येथें हें

लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, राग व्यक्त करण्याच्या प्रकारांत बदल झाला, अथवा राग जरा सौम्य रीतीनें प्रगट होऊं लागला कीं काम झालें, अशी जी पुष्कळांची समजूत आहे ती निराधार आहे. कित्येकदां, आपला राग जवळचे लोक किती प्रमाणांत चालवून घेतील, याबद्दलच्या आपल्या अंदाजावर रागाच्या प्रगटीकरणाच्या मर्यादा अवलंबून असतात. शिवाय, राग प्रगट न झाला म्हणजे तो चित्तांतून गेला, असें आधुनिक मानसशास्त्रहि समजत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे.

राग जाण्याकरतां जें करावयास नको, तें आपण किती तऱ्हांनीं करतों याबद्दलचा विस्तार आणखी करण्याची जरुरी नाहीं. परंतु राग असो, किंवा जीवनांतला आणखी कोणताहि प्रश्न (problem) असो, त्याबद्दल काय करावयास पाहिजे हें थोडक्यांत पण स्पष्टपणानें वरील प्रवचनांतच कृष्णमूर्तींनी सांगितलें आहे :

"Questioner :What is the lasting way to solve a psychological problem ?

Krishnamurti : There are three stages of awareness, are there not, in any human problem ? First, being aware of the cause and effect of the problem; second, being aware of its dual or contradictory process; and third, *being aware of self and experiencing the thinker and his thought as one*".

आतां कृष्णमूर्तींचा हा नवा दृष्टिकोण, रागापुरता कसा अंमलांत आणतां येईल, हें पाहूं. ज्या क्षणाला, आपलें चित्त रागानें व्यापलेलें आहे, त्या क्षणाचाच प्रथम विचार करूं. "मला राग आला आहे", असें आपण म्हणतों, पण असा विचार आपण करीत नाहीं कीं 'राग' ही निराळी वस्तु व 'मी' ही निराळी वस्तु, असें खरोखरच आहे का ? रागापासून 'मी' हा जो आपण बाजूला काढला आहे, त्याला सत्यसृष्टींत काय आधार आहे ? संवयीमुळें आपल्या या विचारांत कांहीं चूक आहे, असें आपणांला वाटत नाहीं. पण जरा सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें तर, राग ही एक मनाची स्थिति आहे, हें सहज ध्यानांत येईल. देह जसा सारखा बदलत असतो, तसें आपलें मनहि सारखें बदलत असतें. केव्हां तें आनंदी असतें, तर केव्हां खिन्न असतें. 'रागावलेलें मन' ही एक मनाची अवस्था आहे. मन हें प्रवाही आहे. ती एक जिवंत वस्तु आहे, म्हणूनच तें सारखें गतिशील आहे. अशा गतिशील मनानें, जी जी अवस्था त्याला क्षणोक्षणीं प्राप्त होईल त्या अवस्थेंतच नुसतें राहावें; यापेक्षां अधिक कांहीं करू नये, असें कां होत नाहीं ? ही अवस्था टाकून दे अथवा तींत कमीअधिपणा कर, असें मनाला कोण सांगतें ? अर्थात् 'मी.' या 'मी'च्या सुखाकरतां मन सारखें कांहींतरी करीत असतें. आपली समजूत अशी असते कीं, 'मी' ही एक स्थिर वस्तु आहे व ती वस्तु, रागासारखी मनाची जी अवस्था आहे, त्या अवस्थेच्या क्षेत्राच्या बाहेर कोठेंतरी राहात आहे. मनाच्या

अवस्था बदलतात, हें आपण कबूल करतों; पण हा 'मी' मात्र कायमचा आहे, असें आपण समजतों. मुद्द्याचा प्रश्न असा आहे कीं, मनाच्या अवस्थेच्या बाहेर व कायम टिकणारा असा 'मी' आहे, हें आपणांला कुणीं सांगितलें ? प्रत्येक क्षणाला मनाची जी अवस्था असते अथवा जी वृत्ति अगर विचार (thought) असतो, ती वृत्ति अगर विचार ज्याचे ठिकाणीं निर्माण होतो तो तथाकथित 'मी', कदाचित् जागेवर नसेलहि ! पण अशी शंकासुद्धां आपणांला येत नाहीं. मनाच्या अवस्थेचें अथवा मनांत येणाऱ्या संकल्पाचे आपण दोन भाग करतों; व त्यांतला एक कायमचा आणि पूर्वीचाच सिद्ध आहे असें मानतों; व राहिलेला भाग पहिल्या भागाचा म्हणजे 'मी'चा एखादा जणूं अवयव आहे अशी समजूत करून घेतों; व या समजुतीच्या पायावर जीवनाची सबंध इमारत आपण उभी करतों.

मनाच्या चालू अवस्थेंतून जो हा 'मी' बाजूला काढला जातो, त्याचें स्वरूप कसें सिद्ध होतें हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. गतकालांत आलेल्या सुखानुभवांच्या स्मृति व तदनुसार भविष्याबद्दलच्या केलेल्या अपेक्षा, या सर्वांचा मिळून एक गठ्ठा केला जातो व त्या गठ्ठाला 'मी' ही प्रतिष्ठा प्राप्त होते. हा 'मी', केवळ स्मृतींचा व त्या स्मृतींवर आधारलेल्या आकांक्षांचा मिळून होणारा एक पिंड आहे. अशा तऱ्हेनें, असत्य अशा स्मृतींच्या समूहाला केवळ कल्पनेनें सत्यत्व व नित्यत्व बहाल करून आपण सुखी, दुःखी, क्रुद्ध अथवा मोहाविष्ट होतों. हा कल्पनेंतला 'मी', जर बाजूस न काढला तर राग शिल्लक राहील काय? 'मी' खरा धरून, रागासारख्या 'मी' बाहेरच्या रिपूचें दमन अथवा निर्मूलन करतां येत नाहीं. पण ज्याच्या सुखांत विक्षेप आल्यानें राग उत्पन्न होतो, त्या 'मी'च्या टोंकापासून सुरुवात केली व मी समजून घेतला तर काम सोपें होतें. 'मी' समजून घेतला कीं, तो आपोआप विलयास जातो; कारण, स्मृतीचें असत्यत्व काय सांगावयास पाहिजे ? 'मी' नसतांना रागाचें प्रयोजनच काय ? जेव्हां 'मी'ला आपल्या अपेक्षापूर्तीच्या आड कोणीतरी, कांहींतरी, येत आहे असें वाटत असतें, तेव्हांच रागाची उत्पत्ति होते. हा असा राग उत्पन्न झाला आणि 'मी' कायम असला, तर त्या रागाचा विस्तार हवा तेवढा होऊ शकतो; व ती रागीट अवस्था दीर्घकालहि राहूं शकते. 'मी'च्या खुंटीवर एक टोंक बांधलें असतांना रागाची दोरी वाटेल तितकी लांब जाऊं शकते; पण ही खुंटीच नसली, तर त्या दोरीचा सर्व आधार संपून ती गळून पडते. राग नाहींसा करण्याचा हा एकच मार्ग आहे. दुसरे सारे उपाय फार तर, रागाला चित्ताच्या तळाशीं लोटतात; आणि संघर्षाला मात्र जन्म देतात.

"मी समजून घेतला तर" असा शब्दप्रयोग वर केला आहे. त्याचा अर्थ नीट लक्षांत घेणें अगत्याचें आहे. "हा पाहा माझा 'मी' ! खरोखरच तो स्मृतींचा

एक गुंता दिसतो. त्याच्या घटनेंत टिकाऊ अगर महत्त्वाचें असें कांहींच मला आढळत नाहीं." अशी खात्री मनोमन पटली तरच 'मी' समजला असें होईल. नुसत्या शब्दांच्या प्रपंचानें 'मी'बद्दलचा उमज पडला, असें कोणालाच म्हणतां येणार नाहीं. हा उमज जर खरोखरीच पडला तर,

न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ ।
मदो नैव मे नैव मात्सर्यभावः ॥

श्रीशंकराचार्य

असें आपणालाहि म्हणतां येईल !

* * *



चोविसावें

सुख म्हणजे तरी काय ?

वरील प्रश्न वाचतांच वाचकांची प्रतिक्रिया किती निरनिराळ्या तऱ्हांनीं होणें शक्य आहे, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. कांहीं वाचक लेखकाला वेड्यांत काढतील. तें म्हणतील, " काय हा प्रश्न ! प्रत्येकाला सुख म्हणजे काय, हें चांगलें समजतें. तें जितकें हवें तितकें मिळत नाहीं, एवढीच काय ती आमची तक्रार आहे. ती तक्रार कशी मिटवायची, हें सांगण्याचें सोडून, सुख कशाला म्हणावें हें आम्हांला समजत नाहीं, असें जें तुम्ही सूचित करतां तें बरोबर नाहीं." दुसरे वाचक आक्षेप घेतील कीं, ' मूले कुठारः ' अशा स्वरूपाचे प्रश्न उपस्थित करण्याची ही नवी टूम आहे. गूढगुंजनाचा हा नवा प्रकार आहे, आणि सामान्य माणसाच्या पुढें असणाऱ्या समस्यांची, नीट उकल करतां येत नसली म्हणजे त्या समस्यांना बगल देऊन, त्याला अधिकच गोंधळांत टाकण्याच्या या नव्या युक्त्या आहेत.

कोणतेंहि विवेचन करावयाचें तर त्यानें, मनांतला गोंधळ झालाच तर कमी व्हावा, पण तो वाढतां उपयोगी नाहीं, एवढी किमान काळजी घेतली पाहिजे, हे केव्हांहि खरें. पण सुखप्राप्तीबद्दल जी निराशा आपल्या पदरीं येते, तिचें मूळ मनांत असलेल्या गोंधळांत (confusion) अथवा विसंवादांत (contradiction) असेल, अशी शंकाहि आपणांला येत नाहीं.

मनांत उत्पन्न होणारा गोंधळ याचेंच दुसरें नांव ' अज्ञान ' आहे. हा 'अज्ञान'

शब्द वेदांताच्या परिभाषेंतला नाहीं. रोजच्या व्यवहारांत ज्याला आपण गैरसमजूत म्हणतों, तसा कांहींसा प्रकार आपल्या मनांत हरघडीं होतो कीं काय, असें वाटतें. वाळवंटांत उन्हाच्या झळचांना पाणी समजून त्यांच्यामागें धांवणाऱ्या हरणांना आपण हांसतों; एखाद्या झाडाकडे पाहात मोठानें रडणाऱ्या भ्रमिष्ट माणसाचें आपणांला आश्चर्य वाटतें. पण आपलें वागणें आपणांला जरी शहाणपणाचें वाटलें, तरी तें खरोखर तसें आहे का ?

✓ सुखाच्या (pleasure) बाबतींत नक्की आपली कांहींतरी फसगत होत आहे. सुखाची प्राप्ति होते न होते तोंच तें मावळूं लागतें. हें असें कां व्हावें ? या एका प्रश्नाचा जरी पिच्छा शेवटपर्यंत आपण पुरविला तरी पुष्कळच उलगडा होण्यासारखा आहे. प्रथमदर्शनींच हें स्पष्ट होतें कीं, ज्याअर्थीं सुख हें मावळूं लागतें त्याअर्थीं त्याचें कारण,कांहीं उद्दीपक वस्तु असतात ना (stimulants) त्यांच्या जातीचें असावें. शरीरातल्या कांहीं क्रिया, व्हाव्या तशा होईनाशा झाल्या, म्हणजे एक प्रकारचा मंदपणा त्याच्या हालचालींत येतो. मग ही आलेली मरगळ घालविण्याकरतां आपण बाहेरून कोणतेंतरी द्रव्य शरीरांत घालतों. एखादें पेय अगर एखादी औषधाची गोळी, असें कांहींतरी आपण घेतों; आणि लगेच आपणांला ताजेंतवानें वाटतें. पण नंतर थोड्याच वेळांत आपल्या अनुभवाला असें येतें कीं, ज्या प्रमाणांत त्या द्रव्याचा अंमल कमी होत जातो त्या प्रमाणांत तो ताजेपणाहि ओसरूं लागतो व नाहींसा होतो. कांहीं वेळां असें होतें कीं, हा ताजेपणा ओसरून गेल्यानंतरची परिस्थिति, मूळच्या मरगळीपेक्षांहि अधिक दुःखदायक होते. पण असें कांहीं न झालें तरी, या अनुभवांतली एक गोष्ट चटकन् लक्षांत येते. ती ही कीं, शरीरांत नसलेलें अथवा कमी झालेलें कोणतेंतरी द्रव्य जें बाहेरून पुरविलें गेलें, त्याच्यामुळेंच एक प्रकारचा ताजेपणा आपणांला वाटला.

वरील घटना नित्य परिचयाची व समजण्यास सोपी अशी आहे. पण जेव्हां आपण सुखी होतों अथवा दुःखी होतों, तेव्हां मनांत होत असतें तरी काय ? या प्रश्नाचें उत्तर देणें अवघड आहे.

आपण असें समजतों कीं, "सुखी होणें, हा मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे; आणि त्या हक्काच्या आड परिस्थिति नांवाची राक्षसीण सारखी येत आहे. परिस्थितीवर मात करून इतर कांहीं लोक सुखी होतात असें दिसतें; पण आपली परिस्थिति ही अशी कांहीं विलक्षण आहे कीं, तीच आपणांवर नेहमीं मात करीत असते." पण ज्या लोकांना वरील प्रकारचें यश येत आहे असें आपण म्हणतों, त्यांना काय वाटत असतें? त्यांनाहि दुसऱ्या कोणाबद्दल तरी,नेमकें हेंच वाटत असतें!

इतरांकडे पाहण्यामुळें काय होतें, याचा विचार पुढें करूं. पण सुखी होण्याचा जो हक्क आपण सांगतों, त्या हक्काइतका मोघम हक्क दुसरा कोणताहि

नसेल. या हक्काची मौज अशी आहे कीं, तो बहाल करूं असें एखाद्या सत्तेनें जरी म्हटलें, तरी तें तिला शक्य होणार नाहीं. आम्ही सुखी कशानें होऊं, हें एका दिवसापुरतेंसुद्धां आम्हांला ठाम शब्दांत सांगतां येणार नाहीं. कुणी फारच खनपटीस बसलें आणि खरोखरच प्रामाणिकपणानें बोलायचें आपण ठरविलें तर, "जें मजजवळ आतां नाहीं असें कांहींतरी मिळावें, असें सारखें मला वाटत असतें, तें नेहमींच मिळेल अशी व्यवस्था करा." असें आपण सांगूं. पण हें 'कांहींतरी' म्हणजे काय, असा प्रश्न जर पुढें विचारला तर प्रत्येक दिवसागणिक तर राहोच पण तासातासाला आपली ती इष्ट वस्तु बदलूं लागेल. मला असें वाटतें कीं, जरी अशा वस्तु मिळत राहिल्या, तरी त्यांचेपासून होणारें सुख फक्त पहिल्या क्षणापुरतें. दुसऱ्याच क्षणाला आणखी कोणत्यातरी वस्तूबद्दल अथवा अवस्थेबद्दल अभिलाषा उत्पन्न होऊनच, त्या जुन्या वस्तूचें आकर्षण केव्हांच संपून गेलेलें असेल. जुगारी माणसाबद्दल असें सांगतात कीं, त्याचा आनंद, जुगार यशस्वी होऊन त्याच्या हातांत ज्या क्षणाला पैसा पडतो त्या क्षणांत अजिबात नसतो. जुगारांतून मिळणें शक्य असलेल्या जास्तींत जास्त रकमेच्या दुप्पट जरी रक्कम त्याला कोणी रोख दिली, तरी तो जुगार सोडणार नाहीं. जुगार चालू असतांना यशापयशाच्या विचारानें जो मनाचा परक्षोभ (excitement) होतो त्यांतच त्याचा सारा आनंद सांठविलेला असतो. सुखाची प्रत्यक्ष प्राप्ति होते कीं नाहीं, इकडे आपण लक्षच देत नाहीं; आणि सारा जन्म फक्त सुखाचा हव्यास धरण्यांत संपून जातो.

सुखाची प्राप्ति ही, आपण कोणत्यातरी बाहेरच्या वस्तूवर अवलंबून ठेवतों असें जें वर सूचित केलें आहे, त्याचा जास्त विचार करणें जरूर आहे. एका अर्थानें बाहेरची पण दुसऱ्या अर्थानें मनांत प्रवेश करून आंतून आपणावर अंमल चालविणारी अशी, 'स्मृति' नांवाची एक वस्तु आहे. तिचा आणि ज्याला आपण सुख म्हणतों त्याचा अत्यंत निकटचा सबंध आहे ज्या वेळेला एखादें सुख आपणांला मिळत नाहीं म्हणून आपण तक्रार करतों, त्या वेळेला आपल्या मनांत डोकावलें तर तेथें काय दिसतें ? कशाची तरी स्मृति आपल्या चित्तांत येऊन बसली आहे, व ती आपणांला हुकमामागून हुकूम सोडीत आहे, असें दृश्य तेथें आपल्या विवेक-शक्तीला दिसतें. या हुकमांची तामिली करतांना मनाची जी धडपड होते तिला आपण, 'सुखप्राप्तीकरतां अपरिहार्य असलेली खटपट' असें नांव देतों; आणि अशी खटपट करीत नाहीं असा कुणीच दिसत नसल्यामुळें माणसाचे जीवनच या प्रकारचें आहे अशी आपली समजूत होते. कांहीं वेळां आपल्या लक्षांत येतें कीं, खटपट जिच्याकरतां ती वस्तु सारखी बदलत आहे. पण प्रत्येक वेळीं कोणतीतरी वस्तु डोळ्यांपुढें असतेच. म्हणून मग ज्यामध्यें, प्राप्यवस्तु सारखी बदलत असते पण तिच्या प्राप्तीकरतां जन्मापासून मरेपर्यंत हव्यास हा धरावाच लागतो, असें

जीवन माणसाच्या नशिबीं निसर्गानेंच घातलें आहे, असें गृहीत धरून आपण चालतों.

निसर्गानें जसें जीवन निर्माण केलें तसेंच आम्ही जगतों, असें म्हटल्यावर खरोखर सर्वच प्रश्न संपला. पण मॉर्फियाचें व्यसन ज्याचें अतिरेकाला गेलें आहे त्या माणसालाहि नेमकें असेंच वाटत असतें. तोहि असें समजतो कीं, त्याच्या पायांत चालण्याची शक्ति अशी नाहींच; मॉर्फियाचें इंजेक्शन घेतल्यावरच त्या पायांत खरा तकवा येतो. पण हें व्यसन नसणाऱ्यांचे पाय तसें सांगत नाहींत. फरक एवढाच आहे कीं, मॉर्फिया बाहेरून त्या माणसाचे शरीरांत केव्हांपासून जाऊं लागला हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. पण स्मृतीचा आणि आपला संबंध केव्हां कसा जडला हें कळणें तितकें सोपें नाहीं. दुसरें असें कीं, मॉर्फियाशिवाय जे जगूं शकतात अशा माणसांची संख्या बरीच मोठी असल्यामुळें मॉर्फियावर अवलंबून राहण्याची आपणांला फक्त संवय लागली आहे; तें बाहेरून चिकटलेलें एक व्यसन आहे, असें त्या व्यसनी माणसाच्या ध्यानांत येणें शक्य आहे. पण तशी सोय स्मृति आणि तज्जन्य सुखाबद्दलची प्रेरणा यांचे बाबतींत नाहीं. स्मृतीचा जाच सर्वांना सारखाच सोसावा लागत असल्यामुळें ती एक बाहेरची व आगंतुक चिकटलेली अशी वस्तु आहे, हें आपल्या लक्षांतच येत नाहीं.

सुख हें बाहेरून मनांत शिरणाऱ्या स्मृतीवर अवलंबून आहे अशी जाणीव जर खरोखरच आपल्या हृदयांत उत्पन्न झाली, तर आपल्या चालू जीवनांत फारच मोठी क्रांति होईल. हल्लीं सुखप्राप्तीबद्दल जी रात्रंदिवस धडपड आपण करतों तिचें मुख्य कारण असें आहे कीं, कोणत्यातरी सुखवस्तूचा लाभ आपणांला व्हावा असें सतत वाटणें, हेंच माणसाचें जीवन आहे असें धरून आपण चालतों. श्वासोच्छ्वासाशिवाय जसें शरीर चालणें शक्य नाहीं, तसेंच या प्रवृत्तीखेरीज माणसाला जगतांच येणार नाहीं. या गैरसमजुतीनें सर्वांनाच पछाडलेलें आहे. पण सुखाबद्दलची इच्छा ही, कोणत्यातरी बाहेरच्या वस्तूच्या गत अनुभवांतून म्हणजे स्मृतींतून जन्माला येते अशी मनोमन खात्री पटणें केव्हां शक्य आहे? एकतर तशी वस्तुस्थिति असली पाहिजे. दुसरें असें कीं, स्मृति अंतःकरणांत शिरतांना आपणांला दिसली पाहिजे, व ती एखाद्या वस्तूच्या दर्शनांतून निघाली असेंहि दिसलें पाहिजे. तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं, हें असें होतें कीं नाहीं हें बघण्याला आम्हांला सवड पाहिजे. ही सवड आम्हांला कां मिळत नाहीं, याचीं अनेक कारणें आहेत.

पहिलें कारण असें आहे कीं, ज्या क्षणाला एखादी सुखवस्तु आमच्या दृष्टीस प्रथम पडते, त्या क्षणानंतरच्या दुसऱ्याच क्षणापासून त्या वस्तूचे खरे रंग बदलूं लागतात. ते अधिक भडक होतात. त्या वस्तूचा आकार जास्तच मनोहर भासूं लागतो. त्या वस्तूला एक आगळेंच स्वरूप प्राप्त होतें; आणि लहान मुलाच्या

हातांत दिलेल्या नवीन खेळण्यानें जसें त्याचें सारें चित्त ओढून घेतलें जातें, तशीच स्थिती आमच्या मनाची होते. त्या वस्तूमध्यें दिसतात ते गुण खरोखर आहेत कीं नाहीं, याचा विचार आमचें मन करीत नाहीं. पण वस्तु दिसली कीं, कोठेंतरी पाहिलेल्या त्या वस्तूसारख्या दुसऱ्या वस्तूचा आधार मन घेतें व या नव्या वस्तूला तें नांव (naming) देतें. लगेच स्मरणशक्ति आणि कल्पनाशक्ति (imagination) या दोन्ही शक्तींचें संयुक्त कार्य सुरू होतें. कल्पनेचें कार्यच हें आहे कीं, कसलातरी धागा धरून इतर अनेक आठवणी गोळा करावयाच्या व त्यांचे मधला इष्ट तो भाग घेऊन त्या सर्वांचें मिश्रण करावयाचें. हें असें मिश्रण एकदां का झालें कीं दिसणाऱ्या वस्तूला अशी झिलई (glamour) चढते कीं, बोलतां सोय नाहीं. एवढी तयारी झाली कीं, आमचें चित्त त्या वस्तूच्या चिंतनांत संपूर्ण अडकून बसण्याची व्यवस्था पूर्ण झाली असें समजावयास हरकत नाहीं. कोणत्याहि वस्तूचें जबरदस्त आकर्षण जें मनाला वाटतें, त्याचें मुख्य कारण ही झिलई होय. तिचा प्रभाव एवढा असतो कीं, लोहचुंबकाप्रमाणें ती मनाला सोडीतच नाहीं.

यानंतर मनाची जी क्रिया होते, ती एखाद्या यंत्रासारखी असते. बहुतेक यंत्रांत पुन्हां पुन्हां त्याच पद्धतीनें आपोआप फिरणारीं चक्रें असतात. तसेंच आपलें मन पुन्हां पुन्हां वस्तूचा तो मनोहर आकार, भडक रंग व झिलई आठवूं लागते व मग त्या वस्तूच्या प्राप्तीखेरीज गत्यंतर नाहीं, असें वाटून तिचेकडे धांवूं लागतें; व शरीराला मनाच्यामागें धांवणें भाग पडतें. जिचेपासून सुख मिळेल असें वाटतें ती वस्तु, रंगरूप असलेली जडवस्तु असेल किंवा एखादें ध्येयहि (idea or ideology) असूं शकेल. स्मृतीचें व कल्पनाशक्तीचें कार्य दोन्ही प्रकारच्या सुखद वस्तूंचे बाबतींत सारख्याच पद्धतीनें होतें असें दिसतें; आणि म्हणूनच वरील विवेचनांत 'वस्तु' हा शब्द फार व्यापक अर्थानें वापरला आहे.

चित्तांत जोंपर्यन्त सुखद वस्तूची स्मृति असते व तिचें कार्य कल्पनाशक्तीच्या मदतीनें चालूं असतें, तोंपर्यन्तच सुखाची भावना आपल्या अनुभवाला येते; निदान तशी आपली समजूत असते. ही स्मृति चित्तांतून नाहींशी झाली कीं, ती भावनाहि ओसरते. म्हणूनच एखाद्या उद्दीपक वस्तूसारखें सुख असावें, असें वर म्हटलें आहे. ही अशा प्रकारची कोणतीतरी स्मृति चित्तांत आणावीच, असें माणसाला नेहमीं वाटत असतें. अशी कांहींतरी स्मृति पुसट अथवा स्पष्ट कशी का असेना, चित्तांत नसली कीं माणूस अस्वस्थ होतो; त्याला जीवनांत राम वाटत नाहीं व तो उदास होतो. एकलेपणा (loneliness) त्याला भेडसावूं लागतो. या दृष्टीनेंहि सुखाबद्दलच्या वासनेचें व्यसनाशीं बरेंच साम्य आहे.

एकूण असें दिसतें कीं, सुखवस्तूला जी झिलई चढते तीच आपला घात करते. कारण माणूस सुखाकडे जो ओढला जातो तो या झिलईमुळें. ही झिलई

आणि मृगजळ यांचेमध्यें फरक एवढाच असतो कीं, मृगजळ ज्या ठिकाणीं आहे असा भास होतो, तेथें पाण्याचा थेंबहि नसतो; पण जिचेपासून सुख मिळेल असें वाटतें, अशी कोणतीतरी वस्तु जागेवर असते. तथापि ती मिळाल्यानंतर आपल्या पदरांत पडणारें सुख आणि हरणांच्या तृषार्त मुखांत कधींच न जाणारें 'जल' यांचेमध्यें फारसा फरक असेल असें मला वाटत नाहीं. धडपड, धांवाधांव, दोघांचीहि सारखीच; व शेवटची निराशाहि तेवढीच, असा प्रकार दिसतो. असो सुखद वस्तूच्या रंगरूपांत सत्याला सोडून जो अधिकपणा आपणांला वाटतो, त्याचें आणखी एक कारण, इतरांशीं तुलना करण्याची आपल्या मनाची प्रवृत्ति हें आहे. कल्पनेची मदत घेऊन आपली स्मरणशक्ति, आपल्या स्वतःच्याच गत अनुभवांपैकीं कांहींचे आकर्षक रंग पुढें आलेल्या नव्या वस्तूला चिकटविते व त्यामुळें सुख म्हणून तिला भलती किंमत येते, हें आपण वर पाहिलेंच आहे. पण दुसऱ्या माणसांना ज्या वस्तूंचा उपभोग मिळतो, त्याच वस्तु आपणांलाहि मिळाल्या पाहिजेत असा आग्रह तुलनेंतून उत्पन्न होतो; व यामुळेंच सुखाची अभिलाषा जोर धरते. आपल्या स्वतःच्या जीवनाला स्वतंत्र अशी किंमतच नाहीं, असा एक अभिनव सिद्धांत माणसानें–विशेषतः आधुनिक संस्कृतींतल्या माणसानें–मनाशीं ठरवून टाकला आहे. मी स्वतःला सुखी, अगर दुःखी समजण्याकरतां नेहमीं दुसऱ्यांकडे, त्यांच्या पोषाखाकडे, त्यांच्या चालचलणुकीकडे, त्यांच्या घरांकडे व घरांतल्या फर्निचरकडे, सतत पाहात असतों. माझें सुख अगर दुःख त्याशिवाय मला मोजतांच येत नाहीं; आणि मौज अशी कीं, सुखाची ऊब मोजणारा थर्मामीटर (उष्णतामापक यंत्र) मी माझ्या अंगाला दररोज दरक्षणाला लावलेलाच असतो. यामुळें होतें असें कीं, ज्या वस्तूंमध्यें सुख देण्याची पात्रता अजिबात नसते अथवा असलीच तर फार कमी असते, अशा वस्तूंनासुद्धां भलतें महत्त्व प्राप्त होतें. तुलनेंतून ही जी अनुकरणाची वृत्ति उत्पन्न होते, तिचा प्रताप फार मोठा आहे. कदाचित ज्या वस्तूचें मीं जन्मांत तोंडहि पाहिलें नसतें व माझें जीवन त्यांचे वांचून बिनबोभाट तडीला गेलें असतें, त्या वस्तु एकामागून एक माझ्या घरांत भरूं लागतात; आणि कारण काय ? तर शेजारच्या बंगल्यांत त्या वस्तु आहेत म्हणून जें लहानसें टुमदार घर मला राहायला पूर्वी भरपूर वाटत होतें तेंच घर, माझ्या लहानपणच्या मित्रांनीं बंगले उठवलेले दिसतांच मला फार अपुरें व अत्यंत गैरसोयीचें वाटूं लागतें. मात्र येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अनुकरण कोणाचें करावयाचें याबद्दल कांहीं नियम ठरलेले आहेत. त्यांच्या तपशिलांत फार न शिरतां, एवढें सांगावयास हरकत नाहीं कीं, समाजानें ही विद्या शिकविण्याची सोय नाना तऱ्हांनी केलेली आहे. लहानपणापासूनच प्रत्येक व्यक्तीच्या मनांत महत्त्वाकांक्षा, चढाओढ, यांचीं बीजें कशीं रुजतील याची काळजी समाज घेत

असतो. शिवाय आईबापहि तेंच शिक्षण देतात. अशा तऱ्हेनें सुखाची वरील प्रकारच्या भ्रमांवर आधारलेली खोटी प्रतिमा आपल्या चित्तांत तयार होते

माणसाचें मन हें एक फार अजब यंत्र आहे. त्या यंत्राचा स्वभावच असा आहे कीं, तें सारखें फिरत राहतें. तें चालूं कसें करावें, असा प्रश्न आपणांला कधींच पडत नाहीं. तें कांहीं क्षण बंद ठेवतां येईल काय, एवढा एकच प्रश्न आपणांपुढें आहे. हें यंत्र सारखें चालूंच राहिल्यामुळें अनेक अडचणी उत्पन्न होतात.या अडचणींपैकी मुख्य अडचण अशी आहे कीं, या यंत्राची चालू राहण्याची क्रिया म्हणजेच आपले जीवन अशी समजूत आपली होते. हें यंत्र चालतें स्मृतींच्या व वासनांच्या जिवावर. मनांत स्मृति अगर वासना नाहीं, असा क्षणच आपल्या अनुभवाला येत नाहीं, आणि म्हणूनच मनांत कोणतीतरी स्मृति अगर वासना बाळगणें म्हणजेच जिवंत राहणें, असें आपण समजतों. आपण काळजी एवढीच घेतो कीं, वेळोवेळीं वासनेचे विषय बदलतो. याचा परिणाम असा होतो कीं, वासना कशाबद्दल तरी चित्तांत नाहीं, असा दिवसच उगवत नाहीं; आणि म्हणूनच समाधानाचें सुख आपल्या पदरांत पडलें, असें कधीं होत नाहीं. "सगळा जन्म गेला, पण मी कधीं पूर्ण सुखी झालों नाहीं." असेंच आयुष्याच्या शेवटीं म्हणण्याचा प्रसंग बहुतेकांवर येतो, याचें कारण हें असें आहे.

मनाचें हें यंत्र फिरत असतें तें भूतकालांत. आपण तोंडानें असें म्हणतों कीं, मी आज, वर्तमानकाळांत जगत आहें. पण वर्तमानकाळांत असतें फक्त शरीर. आपलें मन भूतकालांतच सदैव घिरट्या मारीत असतें; आणि स्वतःची अशी फसवणूक करतें कीं, "तें भविष्यकाळाचा विचार करीत आहे, अथवा भविष्यकालाबद्दल तरतूद करीत आहे." सुखदुःखांचा विचार, हा खरोखर अशा तरतुदीचा भागच नसतो, हें लक्षांत घेणें जरूर आहे. शरीरधारणेकरतां जी योजना माणसाला करावी लागते, तिचा विचार या लेखांत आपण करीत नाहीं.

मनाचें यंत्र हें कोणत्यातरी स्मृतीभोंवतीं अथवा वासनेभोंवतीं सतत फिरत असतें. ज्या कालांत एखाद्या सुखद वस्तूचा प्रत्यक्ष उपभोग आपण घेत असतों, त्या कालांतसुद्धां मनांतली स्मृति व तिच्यांतून उद्भवणारी तुलना मनाला सोडून जात नाहीं. किंबहुना एखाद्या वस्तूपासून मला सुख झालें असें आपण तेव्हांच म्हणूं शकतों कीं, जेव्हां त्या वस्तूच्या रंगरूपाची अथवा गुणांची तुलना, स्मृतीच्या मदतीनें आपण गतकालांत पाहिलेल्या कोणत्यातरी वस्तूबरोबर केलेली असते. फार तर संपर्काच्या पहिल्या क्षणांत (अक्षरशः)सुख देणारी वस्तु तिच्या स्वतःच्या अंगच्या गुणांमुळें प्रतीत होऊं शकते; पण दुसऱ्याच क्षणाला स्मृति हस्तक्षेप करते. तिचें नांव काय आहे, ती सुखद आहे का दुःखद आहे, वगैरे सर्व हकीकत ती आपल्या कानांत सांगूं लागते. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, त्या वस्तूबद्दलचें

आपलें मत आपण नेहमीं स्मृतीच्याच मदतीनें बनवीत असतों; आणि या मतावर त्या अनुभवाला सुख म्हणावयाचें का दुःख म्हणावयाचें हें सर्वस्वीं अवलंबून असतें. जर आपल्या मनानें "हें सुख आहे" असा कौल दिला, तर मनाचा पुढचा उद्योग दुसऱ्याच क्षणीं सुरू होतो. तो असा कीं, या सुखाची संगति शक्य तेवढा अधिक काळ लाभावी अथवा त्याची पुनरावृत्ति व्हावी, याकरतां जरूर त्या खटपटीस मन लागतें. जर "हें दुःख आहे" असा मनाचा निर्णय आला तर तें टाळण्याकरतां वरच्या उलट क्रिया सुरू होते; पण येथेंच हें सांगून टाकण्यास हरकत नाहीं कीं, वस्तु मूळची सुखद नसते; अथवा दुःखदहि नसते आपल्या स्मृतीचा तिचेशीं संयोग झाल्यामुळेंच तिला अनुकूल अथवा प्रतिकूल असें स्वरूप प्राप्त होतें. आपल्या मतामुळें अथवा तिला जें मूल्य आपण देतों त्यामुळें (evaluation), तिच्या मूळच्या स्वरूपांत बदल होतो, असें म्हटलें तरी चालेल. हा जो बदल होतो त्यांतूनच जीवनांतल्या सर्व समस्या निर्माण होतात. कृष्णमूर्तींचें पुढील उद्गार हेंच सांगतात.

"If I understand what actually is, then there is no problem. A fact does not create a problem, only an opinion about a fact creates a problem."

मनांतल्या स्मृतीचा सृष्टींतल्या वस्तूशीं जो संयोग होतो त्यावर जर आपलें सुखी होणें अथवा दुःखी होणें अवलंबून आहे, तर जीवनांत 'सुख जवापाडें व दुःख पर्वताएवढें' असें होणारच, हें सहज ध्यानांत येईल. येथें स्मृतीमध्येंच इतरांच्या परिस्थितीशीं अथवा स्वतःच्या गतकालीन तथाकथित सुखी क्षणांशीं चालू क्षणाची जी तुलना आपण करतों, तिचा अथवा तिच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या प्रक्षोभाचा समावेश आपण करूं. आतां फक्त एकच गोष्ट लक्षांत घ्यावयाची राहिली. ती ही कीं, सृष्टींतल्या घटना आणि प्रत्येक मानवाच्या जीवनांतल्या घटना या सारख्या बदलत असतात. कालचा दिवस आज नाहीं व आजचें जीवन उद्यां नाहीं. प्रत्येक क्षणांत खरोखर अगदीं नवीन असेंच कांहींतरी घडत असतें. या नवोनाशीं जेव्हां स्मृतींतल्या अथवा तुलनेंतल्या जुन्याची गांठ पडते, तेव्हां त्या दोघांमध्यें विसंवाद (contradiction) उत्पन्न होतो. नवीन जसें आहे तसें समजून घेण्याचें सोडून, व तेंहि क्षणानंतर निघून जाणार आहे हें विसरून, आपण त्याच्याशीं जुन्याच्या म्हणजे आपल्या वासनेच्या (अथवा स्मृतीच्या) मदतीनें झगडा करूं लागतों. कांहीं वेळां सत्यवस्तूचें स्वरूप आपण निराळेंच कल्पितों. असत्याला सत्य म्हणूं लागतों. यामुळें आपल्या चित्तांत जो संघर्ष अथवा प्रक्षोभ निर्माण होतो अगर मनाचा गोंधळ होतो त्यामुळें, पदोपदीं दुःखच आपल्या वांट्याला येतें. मात्र मनांत कोणतीतरी स्मृति अथवा वासना नेहमींच कायम राहात असल्यामुळें, सुखाचा

हव्यास संपत नाहीं. सबंध जन्मभर सुखाची तृष्णा कायम व पुरेसें सुख मिळत नाहीं ही तक्रारहि कायम, अशी परिस्थिति होते.

"सुखी व्हावें असें मला वाटतें, व तसें वाटणें अगदीं नैसर्गिक आहे." अशा-सारखीं विधानें केव्हां केव्हां आपण करतों. पण आपण 'सुख' (pleasure) कशाला म्हणतों, याबद्दल जर खोल विचार केला नाहीं तर कशा अडचणी उत्पन्न होतात, हें थोडक्यांत वर दर्शविलें आहे. जी घटना होऊन गेली म्हणजेच मृत झाली, त्या मृत घटनांच्या निव्वळ स्मृतींमध्यें आम्ही आपलें मन अडकावतों व पस्तावतों. "माझी अमकी वासना तृप्त झाली नाहीं म्हणून मी दुःखी झालों," अशी तक्रार करण्यापेक्षां सर्व प्रकारच्या वासना वर दिलेल्या चुकांमुळें कशा उत्पन्न होतात इकडे जर आपण लक्ष दिलें, तर कदाचित् दुःख आणि निराशा यांचेपासून आपली कायमचीच मुक्तता होईल व त्या अवस्थेंत एक निराळेंच सुख (bliss) आपल्या अनुभवास येईल, असा संभव आहे.

* * *



पंचविसावें

एकूण सारांश काय ?

कृष्णमूर्तींचे क्रांतिकारक विचार आपण येथवर समजून घेतले. जीवनांत अनेक समस्या आपणांला त्रस्त करतात. त्यांपैकीं महत्त्वाच्या अशा कांहीं समस्यांचा विचार कृष्णमूर्तींच्या दृष्टिकोणांतून केला, तर त्यांचा मुख्य संदेश काय आहे हें समजण्यास मदत होईल, असें लेखकाला वाटलें. बुद्धि, स्मृति यांचे व्यापार कसे चालतात हें समजून घेतांना कृष्णमूर्तींचा मुख्य मुद्दा अधिक स्पष्ट होईल असें वाटलें. ते ज्या अवस्थेला सावधानता (awareness) म्हणतात--व जो त्यांच्या विवेचनाचा केंद्रबिंदु आहे असें अनेकांचें म्हणणें आहे– ती अवस्था काय असावी, हें सरळ (directly) सागण्याचें धारिष्टहि लेखकानें केलें. पण एक गोष्ट मात्र वाचकांना–व स्वत:लाहि पुन्हां पुन्हां बजावणें जरूर आहे. ती अशी की, कृष्णमूर्तींचें तत्त्वज्ञान शब्दांच्या अथवा प्रकरणांच्या चौकटींत बसवण्याचा प्रयत्न करणें वेडेपणाचें आहे. सर्वच तत्त्वदर्शी महात्म्यांच्या बाबतींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आदि, मध्य, आणि अंत, हे दाखवतां न आले तर आपणाला कोणतीच वस्तु अगर विषय समजत नाहीं, अशी आपली अवस्था झाली आहे. ही जी अवस्था आपल्या ग्रहणशक्तीची झाली आहे तिचे किती लाड करायचे, हाच काय तो प्रश्न आहे. कोणतातरी ठाम असा निष्कर्ष (conclusion) ज्याच्या विचारमंथनातून निघत नाहीं, तो तत्त्वज्ञ आम्हांला प्रथमदर्शनींच पटत नाहीं; मग तो रुचणें व पचणें दूरच राहिलें. कृष्णमूर्तींकडे आधुनिकांनींहि पाठच फिरविलेली दिसते. कारण चालू युगांत, ज्याला 'उपयुक्त' असें म्हणतात तें कृष्णमूर्तींकडून मिळत नाहीं, असें

अनेकांना वाटतें. " आमचें जीवन कोणत्या सांच्यांत आम्ही बसवूं, ते आम्हाला सांगा, " अशीच जणू प्रार्थना जो तो करीत असतो. शेवटीं मुक्त होण्याकरतां का होईना, पण प्रथमच्या वर्तनाची कोणतीतरी निश्चित रूपरेषा सांगा असाच आग्रह जे पुरेसे आधुनिक बनण्याचे राहून गेले त्या परमार्थप्रेमी लोकांचाहि असतो.

आकृतिबंधाची (pattern) मागणी, हें तर जीवनांतल्या साऱ्या व्यथांचें मूळ आहे. ज्याला आपण चांगला आकृतिबंध म्हणतों तोच आपला 'अहम्' कसा असतो, हें पुढील संवादांत Hermann Hesse या प्रख्यात जर्मन लेखकानें फारच सुंदर रीतीनें सूचित केलें आहे:—

Siddharth :- You have learnt nothing through teachings, and so I think, O Illustrious one, that nobody finds salvation through teachings. To noboly, O Illustrious one, can you communicate in words and teachings, what happened to you, in the hour of your enlightenment. The teachings, of the enlightened Buddha embrace much; they teach much,—how to live righteously, how to avoid evil. But there is one thing that this clear worthy instruction does not contain; it does not contain the secret of what the Illustrious one himself experienced--he alone among hundreds of thousands...That is why I am going on my way--not to seek another and better doctrine, for, I know there is none, but *to leave all doctrines and all teachers and to reach my goal alone or die...*

Gautama : May you reach Your goal ! But tell me, have you seen my gathering of holy men, my many brothers who have sworn allegiance to the teachings ? Do you think that it would be better for all these, to relinquish the teachings and to return to the life of the World and desires ?

Siddharth : May they all follow the teachings... It is not for me to judge another life....If I were one of your followers, I fear that it would only be on the surface, that I would deceive myself that I was at peace and had attained salvation, while in truth the Self would continue to live and grow, for *it would have been transformed into your teachings, into my allegiance and love for you, and for the community of the monks.*"

(Siddharth 1964 Edn. p. 40 to 42)

एकूण प्रकार असा दिसतो कीं, जीवनांत माणसांना एकच ओढ आहे: (त्याचें अज्ञान एकच आहे). ती ओढ म्हणजे सुरक्षित होण्याची, कोणतेंतरी

सुरक्षित स्थान शोधण्याची. 'शरीराची सुरक्षितता जरूर आहे,' असें म्हणतां म्हणतांच शहाणा माणूसहि या सुरक्षिततेची कक्षा सारखी वाढवीत असतो; अगर एका क्षेत्रांतली सुरक्षितता सोडून ती दुसऱ्या क्षेत्रांत शोधूं लागतो. 'मला सुरक्षितता मिळाली,' अशी आत्मवंचना करणारे कांहीं अल्पसंख्य सोडले तर बहुतेकांचा सारा जन्म **सुरक्षितता शोधण्यांतच** जातो. या शोधाचें वर्णन कृष्णमूर्तींनीं फारच मार्मिक असें केलें आहे.—

"We are always seeking security consciously or unconsciously, security that eventually becomes our exclusive possession. Now there is physical security which in the present state of civilization a man can amass, through his cunning, his cleverness, through exploitation. Physically he may thus make himself secure, while amotionally he turns for security to so called love, which is for the most part possessiveness; he turns to the egoistic emotional distinctions of family, of friends, and of nationality. Then there is the constant search for mental security in ideas, in beliefs, in the pursuit of Virtue, systems, certainties and so-called knowledge.....you must discover what you are seeking, security or understanding. If you are seeking security, you will find it in philosophy, in religions, traditions, authority, but *if you desire to understand life, in which there is no security, comfort, then there is enduring freedom.* And you can discover what you are seeking only by being aware in action you cannot find out by merely questioning action. *When you question and analyse action, you put an end to action.* But if you are aware, if you are intense in your action, if you give to it your whole mind and heart, then that action will reveal whether you are thereby seeking comfort, security or that infinite understanding which is the eternal movement of life."

(Third Talk at Adyar, December 31, 1933,—'Chetana' February 1972).

कृष्णमूर्तींच्या प्रवचनांतला उतारा इतका विस्तृत देण्याचें कारण असें कीं, त्यांना जें कांहीं सांगायचें आहे त्याच्या सर्व बाजू (aspects) त्यांत आल्या आहेत. आणखी विशेष असें कीं, या घटकेस म्हणजे चाळीस वर्षांनंतरहि त्यांच्या विवेचनाचे सर्व मुद्दे अगदीं तेच आहेत.

हर्मान हेस्‌नें वरील उताऱ्यांत, अध्यात्मसाधनाच्या बाबतींत नेहमीं पुढें येणारा प्रश्नच उपस्थित केला आहे. प्रपंचांत ज्या समस्या रोज पुढें उभ्या राहतात

त्या चित्तांत सतत आकार धरणाऱ्या कोणत्यातरी आग्रहामुळेंच. हा आग्रह परमार्थाच्या क्षेत्रांतही आपला प्रभाव गाजवूं लागला तर मग साधलें काय? या आग्रहालाच 'अहम्' ही संज्ञा आहे. परमार्थाच्या क्षेत्रांतल्या 'अहम्'कडे दुर्लक्ष करण्याचा प्रघात आहे. पण त्या 'अहम्'मुळेंहि हेवेदावे, संघर्ष व युद्धेंसुद्धां उद्भवतात हें जर आपण पाहतों तर तो दुर्लक्षणीय कसा म्हणतां येईल? संघर्षापर्यंत जरी या अहम्नें आपणांला नेलें नाहीं तरी मुक्तावस्थेंतला आनंद तो आपणांला मिळूं देईल काय? 'सिद्धार्थ' कादंबरींतल्या नायकानें 'अहम्'चें हें सूक्ष्म स्वरूप फारच मार्मिक तऱ्हेनें दाखविलें आहे. जें तत्त्वज्ञान (Doctrine) आपण गच्च धरून बसतों, त्यांतच आपला 'अहम्' जाऊन बसतो, असें तर होत नसेल?

प्रश्न असा आहे कीं, कोणतीहि आत्मवंचना न करतां खरोखरच पूर्णपणें मुक्त होतां येईल का? होतें असें कीं, मी कुठेंतरी थांबतों. ज्या ठिकाणीं मी थांबतों तें ठिकाण, प्रथमच्या ठिकाणापेक्षां उन्नत-पुढचें आहे असें मला वाटूं लागतें; व त्यालाच मी माझें साध्य अगर मुक्तावस्था म्हणूं लागतों. मुक्त होण्याचा हा प्रवास कधींहि न संपणारा असतो, हें माझ्या लक्षांतच येत नाहीं. जर मी थांबलों, माझें चित्त कशांततरी-मग तें किती का उदात्त असेना-अडकून बसलें तर मला फक्त सुरक्षित अवस्थेची (security) अभिलाषा होती, असेंच नाहीं का सिद्ध झालें?

सुरक्षेची हांव माणूस धरूं लागला याचें कारण काय असावें? कदाचित् शरीररक्षणाच्या प्रेरणेतूनच ही विकृति उत्पन्न झाली असावी. या इच्छेला विकृति म्हणण्याचें कारण असें की, ती जीवनाबद्दलच्या वस्तुस्थितीशीं विसंगत आहे. जीवन सारखें पुढें धांवत आहे. शरीर, भोवतालच्या वस्तु, घडणाऱ्या घटना, त्या घटनांशीं येणारे संबंध, जवळच्या व्यक्ति, त्यांच्याशीं होणारे संबंध, सर्वच झपाटयानें बदलत आहे. या प्रवाहांत राहून त्याचेशीं वैर करण्यांत अर्थ काय? स्थिर अशा कोणत्यातरी बिंदूवर मी पाय रोवून उभा राहीन, असें म्हणण्यांत शहाणपणा कोणता? पण प्रत्येक व्यक्ति हाच आग्रह धरीत आहे.

सुरक्षेचा आग्रह प्रथम कुटुंबाची उभारणी करण्यास माणसाला प्रवृत्त करतो. नंतर त्यापायींच माणूस तथाकथित प्रेम अथवा देशाभिमानाच्या मागें लागतो. शेवटीं त्यातहि भ्रमनिरास झाल्यावर अनेक प्रकारच्या निष्ठांमध्यें अथवा ज्ञानसंग्रहामध्यें (यांत अध्यात्मशास्त्राचेंहि ज्ञान आलेंच), मनाला विश्रांति मिळेल अशी अशा त्याला वाटूं लागते. पण आसऱ्याचा शोध हा मुक्तीचा शोध नव्हे हे त्याच्या ध्यानांतच येत नाहीं. पहिली गोष्ट अशी कीं, आपण कशाचा शोध घेत आहोंत हें कळून घेतलें पाहिजे. आसराच पाहिजे असेल तर धांवत्या प्रवाहांत

तो कसा मिळणार ? स्वतःच्या वंचनेचें कवच निर्माण करून त्यांतच सदैव राहिल्यानें, एक प्रकारचा, खोटा आसरा मिळेल. पण मुक्त जीवनाचा आनंद तो नव्हे. मग करायचें काय ? वरील शोध जर योग्य तऱ्हेनें आपण घेत राहिलों, तर त्या शोधाच्या गतींतच जें उघड होईल तेंच खरोखर आपणांला मुक्त करील, असें ठामपणानें वरील उताऱ्यांत कृष्णमूर्तींनीं सांगितलें आहे.

एकूण सारांश असा कीं,मुक्तीचा शोध कसा करावयाचा हाच काय तो प्रश्न आपणांपुढें आहे. जोंपर्यन्त आश्रयस्थान(security)आपणांला मनांतून हवें आहे तोंपर्यन्त हा शोध सुरूच होत नाहीं, हें एकदां कळलें पाहिजे. नंतर जीवनाकडे म्हणजे त्यांतील घटनांकडे, संबंधाकडे, वस्तूंकडे, अथवा व्यक्तींकडे, कसें पाहावयाचें हें समजलें पाहिजे. तिसरी गोष्ट अशी कीं, पाहणारा आणि जें पाहिलें जातें यांच्यामध्यें फूट न पडली पाहिजे. तसेंच, कांहींहि पाहून झालें कीं, तेथेंच थांबण्याची क्रियाहि न घडली पाहिजे. या अशा अटी कां, हें सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आलें असेल. 'अत्यंत वेगानें वाहणारा प्रवाह,' असें संपूर्ण जीवनाचेंच (आंतर आणि बाह्य) स्वरूप असल्यामुळें वरील अटींशिवाय भागत नाहीं.

जीवनाचें प्रवाही स्वरूप लक्षांत न आल्यामुळें अनेक साधनें व इतर खटाटोप आपण करतों. पण या प्रवाहांत स्वतःला लोटून देणें, एवढी एकच क्रिया अथवा एकच साधन आपल्या हातांत आहे. मात्र वाटतें तितकें हें काम सोपें नाहीं. अगोदर या प्रवाहाची खरी जाणीव आपणांला होत आहे का, याचा शोध घेतला पाहिजे. नुसतें शब्दज्ञान उपयोगी नाहीं. ही जाणीव अत्यंत तीव्र अशा संवेदनेच्या स्वरूपांत झाली पाहिजे. पण याकरतां मनाला लागलेल्या कांहीं संवयी बाजूला सहजपणाने सारतां येतात का, हें पाहिलें पाहिजे.

ज्या वाचकांच्या हातांत हें पुस्तक पडेल त्यांपैकीं बहुतेकांना असें आढळून येईल कीं, सारासारविचारशक्ति (Power of analysis) हें एकच हत्यार (खरें म्हटलें तर ती एक संवय आहे) त्यांचेजवळ आहे. त्याचा उपयोग करून व कार्यकारणभाव निश्चित करून व्यवस्थित तऱ्हेनें जगण्याची कला साध्य झाली कीं, गंगेंत घोडें न्हालें, अशी त्यांची धारणा आहे. जें कांहीं वाचलें जातें अथवा ऐकलें जातें तें या तर्कशक्तीला अधिक मजबूत करण्याकरतां. या भूमिकेवरून कृष्णमूर्तींचीं प्रवचनें ऐकणारा एक मोठा वर्ग आहे. कृष्णमूर्ति आपल्या तर्कशक्तीलाच आवाहन करतात, असें या वर्गांतल्या लोकांना वाटतें. विज्ञानाच्या प्रगतीमुळें, सत्यशोधनाची ही रीत विशेष प्रतिष्ठा पावलेली आहे. पण वरील उताऱ्यांत जी धोक्याची सूचना दिली आहे, ती या विश्लेषणप्रवृत्तीबद्दलच आहे.(When you question and analyse action, you put an end to action) तर्क करणारा अथवा विश्लेषण करणारा (analyser) निर्माण झाल्याखेरीज, वरील पद्धतीचें काम करतां

येत नाहीं. पण हा एकदां का निर्माण झाला कीं, तो जीवनप्रवाहांत अडथळा उत्पन्न करतो. तो प्रवाहाबरोबर जाणारा असा असूंच शकत नाहीं. कारण, त्याच्या पायांत भूतकालांतून निर्माण झालेल्या हेतूची (motive) शृंखला असते. आपणांला वाटते कीं, आपलें संशोधन निर्हेतुकपणें फक्त सत्याकरतां चाललें आहे. पण कारणाचा शोध घेतांना व त्यांतून समोरची घटना कशी निघाली हें ठरवितांना, भूतकालांतल्या कोणत्यातरी अनुभवाशीं आपण थांबतों. तो अनुभव आपणांला महत्त्वाचा वाटतो व तेथेंच कारण सांपडेल, असें आपलें चित्त सांगतें. हें सर्व होत असतांना चालू जीवनप्रवाहापासून आपण अलग पडतों, हें आपल्या लक्षांतच येत नाहीं. शिवाय, कोणतातरी गत अनुभव कारण म्हणून खड्यासारखा बाजूला काढण्यांतहि आपली चूकच होते. कारण ती घटना सतत वाहण्याऱ्या प्रवाहाचाच एक भाग असते. ती स्वतंत्र व पृथक् अशी नसतेच. कारण शोधण्याची जी सवय आपणांला लागली आहे ती विज्ञानयुगाचा शाप आहे. कारण शोधीत तासचे तास घालवले तरी समस्येंतून मन मुक्त होत नाहीं, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. पण तरीही आपण–विशेषत: पश्चिमेकडील अद्ययावत् विचार ज्यांना आकर्षित करतात ते बुद्धिवादी लोक–नेहमीं हाच उद्योग करीत असतों. समस्येचें स्वरूप जाणण्याची ही क्रिया नव्हे. तें एक प्रकारचें पलायन आहे; व हें अगदीं न कळत संशोधनाचें निमित्त सांगून घडत असतें. याविरुद्ध कृष्णमूर्तींचा इशारा अगदीं स्पष्ट शब्दांत ठिकठिकाणीं आहे–

"But if you listen, and to listen implies learning then you are riding on a river which is fathomless, which has tremendous weight behind it, which is moving, carrying you along. If you so listen, then find out why you have these pretensions and *don't spend a single second on examining the cause of it, analysing it, dissecting it, fighting it, postponing it.* When you analyse it and search for the cause, you are merely avoiding. You know very well why you have these marks, these pretensions, these defences. You don't have to tell by anyone. You know it. What is important is *to be aware* of this resistance, these defences, these pretensions."

(Talks in Europe 1966-p. 107).

जीवनप्रवाहापासून अलग न पडतां जें होतें, तेंच सत्यसंशोधन असें कृष्णमूर्ति म्हणतात. पण अलग पडल्याखेरीज आमचें भागतच नाहीं.

विचार करणारा अथवा अनुभविता (experiencer) निर्माण होतो तोच मुळीं सुरक्षिततेच्या हव्यासांतून, व सुरक्षितता तर जीवनांत नाहींच. हें ज्या क्षणांत पक्कें ध्यानांत येईल, तो क्षण मुक्तीचा. मग अहम्पासून निघणाऱ्या सर्व कृति

निरर्थक वाटूं लागतील. त्या निरर्थक वाटूं लागल्यामुळेंच त्यांतल्या बऱ्याचशा गळतील; व ज्या राहतील त्या उपद्रव देणार नाहींत. हल्लीं होतें असें कीं, 'मी'च्या समाधानाकरतां एक कृति आपण करूं लागतों तोंच तींतून दुसरी जरूर वाटूं लागते. तिच्यांतून तिसरी, मग चौथी, अशी परंपरा जी एकदां सुरू होते ती कुठें थांबतच नाहीं. पण ज्या 'मी'च्या समाधानाकरतां एवढें करावयाचें तो जागेवर आला कसा ? कोणत्यातरी स्मृतींतून तो पुढें येतो; व ही जी स्मृति निवडलेली असते ती सुखाच्या (म्हणजे गतसुखाच्या पुनरावृत्तीच्या) हव्यासांतून. हें सुख (pleasure) म्हणजे जीवनाच्या चालू प्रवाहांतून बाहेर पडण्याकरतां शोधलेलें आश्रयस्थान ! तें आश्रय देतें हीहि निव्वळ कल्पनाच असते.

वरील प्रकार हरघडीं आपल्या जीवनांत होत आहे. हें उमजण्याकरतां जें पाहणें जरूर आहे, त्याचा आणि शांत मनाचा फार निकटचा संबंध आहे पण शांत मन (a quiet mind) कशाला म्हणायचें ?

एके ठिकाणीं बसून शांत मनाचा शोध घेण्याचें ठरविलें तर काय काय होतें ? प्रथमच मीं स्वतःला विचारलें पाहिजे कीं, हा शोध मला कशाकरतां पाहिजे ? संघर्षानें त्रस्त झालेलें मन निवविण्याकरतां मला शांतता पाहिजे असली तर हा हेतु खरी शांतता मला मिळूं देणार नाहीं. शांततेकडे वाटचाल करतांना दरक्षणीं माझें मन कसलीतरी पृच्छा अगर तुलना करीत राहील. "आधीं मी त्रस्त होतों, आतां तितकासा नाहीं," अशा प्रकारचे विचार चालू असतांना कसली शांतता ? एखादें नवीन उमलणारें फूल ज्या कुतूहलानें आपण पाहतों, त्या उत्साहानें मनाच्या स्थिर अवस्थेकडे लक्ष दिलें पाहिजे. नव्हे, 'हेंच जगणें खरें,' असें वाटून मन शांत करण्याकडे मीं वळलें पाहिजे. " कपडे कांहीं निमित्तानें घातले, ते काढून मला माझें नुसतें शरीर पाहूं द्या " अशी सारखी सहज कृति झाली पाहिजे.

ही कृति एकटे व स्वस्थ असतांनाच करावयाची व या एकदेशीय चिंतनाला विशेष महत्त्व द्यावयाचें, असें होतां उपयोगी नाहीं. एक नवी जीवनपद्धति (*Way of life*) आपणांला शोधावयाची आहे; व ती सांपडते का, हें पाहतांना सुरुवातीला कांहीं वेळ बाजूला काढतां आला तर फायदा होण्याचा संभव आहे. पण त्या वेळांत निग्रहाखेरीज व हेतूखेरीज शांत होतां येतें का, हें पाहिलें पाहिजे. मनाच्या हालचाली इतक्या सूक्ष्म असतात कीं बोलतां सोय नाहीं. आपण अगदीं शांत राहूं म्हटलें तरी कांहींतरी मनच उभें करतें; व " ही पाहा मला शांतता मिळाली," असें वाटूं लागतें. आपला मेंदू हल्लीं ज्या अवस्थेंत आहे ती व त्याची कार्यपद्धति समजून घेतली पाहिजे. कांहींहि दिसलें अथवा अनुभवलें कीं, त्याचा अर्थ लावल्याखेरीज (interpreting) मेंदू स्वस्थ बसत नाहीं. ही जी मेंदूची प्रतिक्रिया हजारों वर्षांच्या संस्कारांमुळें व अगदीं झटकन् होते, ती हल्लींची आपली जीवनपद्धति

(Way of living) आहे. अर्थ लावण्याची वरील क्रिया गत अनुभवांच्या मदतीनें होते; व जो अर्थ अशा तऱ्हेनें प्रतीत होईल तेंच वस्तूचें खरें स्वरूप असें वाटूं लागतें. आणखी एक अनर्थ होतो. या प्रतिक्रियेंतूनच (response) 'मी' जन्माला येतों. त्या 'मी'ला वरील पद्धतीनें वस्तूचें जें खरें स्वरूप वाटूं लागतें, तें गृहीत धरून मग त्याच्या सर्व क्रिया होऊं लागतात. मेंदूची वरीलप्रमाणें होणारी प्रतिक्रिया बाजूला ठेवून तिचेकडे, तींत न गुंतता पाहतां येईल काय ? त्या प्रतिक्रियेंत गुंतणें म्हणजेच, 'मी व मला प्रिय अथवा अप्रिय वाटणारी वस्तु या द्वैतात' सांपडणें होय. मनाला अनुभवांचा अर्थ लावण्याला सवड न देतां जागृत राहतां येईल काय ? अर्थाची उत्पत्ति क्षणभर झाली तरी तेथें न घोटाळतां पुढें सटकून जातां येईल का ? मन किती झटकन् अर्थ लावण्याच्या मागें लागतें, हें तटस्थ होऊन पाहता येईल काय ?

निवांत वेळ बाजूला काढून मन शांत राहतें का हें आपण पाहूं लागलों व डोळे मिटून जरी घेतले तरी कांहीं ध्वनि ऐकूं येतातच मग हा ध्वनि रातकिड्याचा, हा कुत्र्याचा, हा गल्लींतल्या माणसांचा, असें त्या ध्वनींचें भाषांतर तत्काळ होऊ लागतें. एकामागून एक अथवा एकदम ऐकूं येणारे असे अनेक ध्वनि ओळखत राहण्यांत, किती जरी काळ घालविला तरी त्या अवस्थेला शांतता म्हणतां येईल काय ? येथें प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ध्वनि कोणत्या प्रकारचा हें जाणून घेऊं नकोस असा मनाला हुकूम करतां येईल का ? कृष्णमूर्तींनी जेव्हां या विषयाचा उकल केला आहे, तेव्हां ते म्हणतात :

"Is it the desire to experience something new or is it the enquiry? If it is the enquiry, then you must enquire and investigate the whole business of thinking and be completely familiar with it, *know all its tricks and subtleties.* If you have done this, you will know that the question of going beyond thought is an empty one. Going beyond thought is knowing what thought is."

(The Urgency of Change, p. 188)

निवांत बसलें असतांना, ध्वनि वगैरेबद्दल मनाची जी वरील प्रतिक्रिया होते तींत न रेंगाळतां पुढें जाणें म्हणजे निव्वळ जागृत अशा अवस्थेचा प्रवाह चालूं ठेवणें, हीच कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेली 'शांत अवस्था' आहे, असें मला वाटतें. ही 'शांत अवस्था' मनाच्या सर्व कल्पना व लटपटी समजून घेतल्यानें आपोआप येते असें ते म्हणतात. याचा अर्थ मन या बारा भानगडी किती हुशारीनें करतें हें बाजूला राहून पाहा, व या पाहण्यानेंच मनाचा उद्योग थांबतो, असें त्यांना म्हणावयाचें आहे. हें 'बाजूला राहून पाहणें' जसें निवांत वेळीं जरूर आहे, तसेंच दैनंदिन व्यापार चालूं असतांनाहि जरूर आहे. ज्या भूमिकेवरून जगावयाचें

ती भूमिका म्हणजेच ही प्रवाही शांत अवस्था आहे. मग ती ठराविक वेळीं जरूर व इतर वेळीं दुर्लक्षणीय, असें कसें होईल ? पण त्या अवस्थेची सुरुवातीची ओळख करून घेण्याकरतां, झोंपेपूर्वीचा वेळ अथवा दिवसाच्या प्रारंभाचा काळ जरा अधिक सोयीचा वाटतो, इतकेंच काय तें. येथेंच एक धोक्याची सूचना देणें जरूर आहे. या अवस्थेची कवाईत करणें व ती वाढवीत जाणें, कृष्णमूर्तींना मुळींच मंजूर नाहीं. जी शांतता कालच्या शांततेसारखी म्हणूनच मला प्रिय वाटते, ती निव्वळ स्मृति होय. त्या स्मृतींत राहणें ही आत्मवंचना आहे, जास्त कांहीं नाहीं. **प्रत्येक वेळीं जी अगदी नव्यानेंच येते ती खरी शांतता;** येथें तडजोडीस वावच नाहीं. "ही नित्यनूतन शांतता चित्ताच्या तळाशीं आहे का ?" हा शोध दर क्षणाला घेत राहणें, ही **एकच साधना** (जर तो शब्द वापरावयाचा आग्रहच असला तर) कृष्णमूर्ति सांगतात. नव्हे, या अशा **शांत अवस्थेंतूनच जीवन जगा व जगाकडे पाहा,** असें ते म्हणतात.

पण एक गोष्टमात्र कबूल केली पाहिजे. जर शांत राहण्याकरतां आपण कांहीं वेळ बाजूला काढला, तर एक गोष्ट थांबते. ती म्हणजे मनाचा स्वतःशींच होणारा संवाद. याला Chattering of the mind म्हणतां येईल. मन कोणत्या-तरी कृतींत गुंतलें नसलें, तर गतसुखाबद्दल विचार करण्यांत, तुलनेंत, अगर भविष्यकाळाबद्दल मनोराज्य करण्यांत रंगून जातें. स्मृति व विचार बोलावून आणण्याचा हा निरर्थक (पण मनाच्या सर्व शक्ति खच्ची करणारा) उद्योग थांबावा, म्हणून तरी निदान कांहीं वेळ शांत राहण्याचा आग्रह आपण धरला पाहिजे. पण त्या वेळेंत नुसत्या जाणिवेंत (Pure wakefulness) खरोखरच राहतां येतें कीं नाहीं, हें पाहिलें पाहिजे.

वरील सर्व विवेचनावरून एक गोष्ट वाचकांच्या लक्षांत असेल. ती ही कीं, कृष्णमूर्ति ज्या अवस्थेला शांतता (silence) म्हणतात, तिचा अर्थ आपण समजतों त्याहून फार फार वेगळा आहे. अगोदर, मनाच्या बडबडीखेरीज निराळी अशी अवस्था आहे, हें आपण फारसें अनुभवलेलेंच नाहीं. झोंप आपल्याला परिचित आहे. पण शरीराला विश्रांति देण्याखेरीज, मनाची स्वतंत्र अशी काळजी आपण कधीं घेतलेलीच नाहीं. यामुळें मनाची 'शांत अवस्था' काय असावी याबद्दल, विचारचक्रांत अडकलेलें असतांना अंदाज करण्यापलीकडे (speculation) आपली मजल गेलेली नाहीं. फारतर एवढें म्हणतां येईल कीं, प्रपंचाबद्दलचे इतर विचार बाजूला ठेवून आम्ही या विशिष्ट विषयाबद्दल म्हणजे मन कसें शांत होईल याबद्दल दीर्घ विचार करूं शकतों ! पण हीहि एक सुशिक्षित मनाची संवयच आहे. तिनें खरी शांतता प्राप्त होईल, असें दिसत नाहीं.

कृष्णमूर्ति जें काय सांगतात तें सर्व अगदीं थोडक्यांत सांगा, असें मला कुणी

विचारलें तर मी पुढीलप्रमाणें उत्तर देईन. आमच्या जीवनांत ज्या समस्या उभ्या राहतात त्यांची सोडवणूक करतांना, समाज काय म्हणतो, ग्रंथ काय म्हणतात, अगर एखादा तज्ज्ञ विचारवंत काय म्हणतो, इकडे न पाहतां त्या समस्येचें स्वरूप समजून घ्या असें कृष्णमूर्ति प्रथम बजावतात. बऱ्याचशा समस्या समाजानें तुमच्यावर लादलेल्या विचारसरणींतून कशा उद्भवतात, हें ते दाखवतात. खोट्या ध्येयांच्या मागें लागल्यामुळें, अथवा इतरांच्या अनुकरणाची इच्छा झाल्यामुळें, अगर इतरांशीं स्पर्धा केल्यामुळें, जीवनांत अनेक संघर्षांना तोंड द्यावें लागतें, हें नीट डोळे उघडून पाहा, असें ते परोपरीनें सांगतात. पण कृष्णमूर्तींच्या शिकवणीचा हा एक भाग आहे. त्याहून अधिक महत्त्वाचा भाग सावधानतेबद्दलचा आहे. सावधानतेची अवस्था अंगीं बाणल्याखेरीज समस्याहि सुटत नाहींत, व खरें जीवनहि सुरू होत नाहीं. ही एक नवी जीवनपद्धति आहे. कृष्णमूर्तींनी दाखविलेली संपूर्ण क्रांतीची ती वाट आहे. तिसरा भाग असा कीं, **ही क्रांति करण्याकरतां चालू मनाचा** (*old mind*) **अजिबात उपयोग नाहीं.** हें कृष्णमूर्ति जितक्या स्पष्टपणानें बजावतात, तितक्या ठामपणानें कोणी सांगितलेलें माझ्या ऐकिवांत नाहीं.

आतां एकच प्रश्न राहिला. चालू मन गळावें कसें ? मनोलय व्हावा कसा? या मनानें कांहीं जरी केलें तरी तें स्वतःलाच नष्ट करूं शकेल काय ? कृष्णमूर्ति म्हणतात कीं, हें शक्य आहे. फक्त ज्या संचयाचें मन बनलेलें आहे, तो किती टाकाऊ आहे हें ध्यानीं आणा. आणखी असें कीं, नवीन वाटणाऱ्या वस्तूंची भर जुन्या अडगळींत सारखी टाकत राहण्याची मनाची खोड लक्षांत घेऊन सावध राहा. तिसरी गोष्ट अशी की, हें सर्व काम करीत असतांना व कोणतीहि कृति करतांना कर्ता अथवा अनुभविता उत्पन्न होऊं देऊं नका. याचाच अर्थ असा कीं, आपलें 'मी'केंद्रित जीवन संपलें पाहिजे.

येथें मात्र तर्कशक्ति (Logic) आपली दिशाभूल करते; नव्हे शत्रुत्व करते, म्हटलें तरी जालेल. मन स्वतःचाच नाश कसा ओढवून घेईल, अशी शंका येऊं लागते. हा अवघड पेंच सोडविण्याकरतां, कोणतीतरी बाहेरची शक्ति (गुरु अथवा देवता) कल्पिण्याचा पुरातन प्रघात आहे. तसेंच म्हटलें तर मनाच्या बाहेर असणारा प्रकाशच आपल्या खऱ्या उपयोगाचा आहे, असें कृष्णमूर्तींचेंहि म्हणणें दिसतें. पण हा प्रकाश, मनाची हालचाल चालू आहे तोंपर्यन्त फारसें काम करूं शकत नाहीं मन रितें झाल्याखेरीज त्या प्रकाशाला आंत शिरण्याला अवकाशच सांपडत नाहीं. एकदां का बाहेरची कोणतीतरी शक्ति माझ्या मदतीला येईल अशी आशा मी करूं लागलों कीं, किती अडचणी उत्पन्न होतात, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे त्या शक्तीचें स्वरूप, तिची कार्यपद्धति,याबद्दल माझें मनच सगळा अंदाज करूं लागतें. त्याकरतां वाचलेले ग्रंथ, केलेलें श्रवण, अथवा स्वतःच्या मनानेंच

लढविलेल्या कल्पना, हा मालमसाला तयारच असतो. सर्वांत अपायकारक गोष्ट अशी कीं, या मदतीवर सर्वस्वीं अवलंबून राहण्याची क्रिया मग सुरू होते. हें सर्व होत असतांना म्हणजे मनाची गिरणी इतक्या जोरानें चालू झाल्यावर, शांत अवस्थेची प्राप्ति कदापितरी होईल का !

इतर कशाचीहि मदत न घेतां स्वतः मनच स्वस्थ राहिलें तर ? पण हें केव्हां शक्य आहे ? मनाला काय उमजलें म्हणजे तें विराम पावेल ? त्याची धडपड केव्हां थांबेल ? कृष्णमूर्तींचें उत्तर असें आहे–

"So what is one to do ? We said that the response of the old brain is imitative and whatever it does has no answer. And that response of the past is what we call ' the positive activity ' of life which only breeds more confusion, more conflict. So you are confronted with this immense question, that the old brain is imitative and its responses are imitative; therefore *thought, in which is included the feeling and the emotion and all the rest of it, is imitative;* and therefore through thought you cannot find a way out. The intellect is not the door through which you can escape from the past, nor is emotion. Therefore all positive action must entirely cease which means the old brain must be completely negative, which means the old brain must be completely quiet. You are following ? The old brain can only be quiet if it has observed its activity in the light of its own perception ... That negative state and quietness can only come, not through dicipline, not through conformity and all that, but *only through its observing the whole process of its own thinking and becoming observant.* To be quiet and observant is to have light and without light you cannot observe. "

(Talks in India 1966 p 21–22)

ज्या कक्षेंत आपलें मन सदैव वावरतें ती कक्षा फक्त अनुकरणाची अथवा पुनरावृत्तीची आहे. मनाला दुसरें कांहीं करतांच येत नाहीं. त्या कक्षेंत सत्य वस्तूचें ज्ञान होणें अशक्य आहे,असा साक्षात्कार(perception)या चालू मनाला झाला तर तें आपोआप गप्प बसतें. मग जें काय चालू होतें तें अगदीं नव्या प्रकारचें जीवन, असें कृष्णमूर्ति म्हणतात. या नव्या जीवनांत, जुन्या चुका सहसा होतच नाहींत; झाल्याच तर त्या लगेच पुसल्या जातात. कारण, खऱ्या प्रकाशाची किंमत मनाला कळलेली असते; व त्या प्रकाशांत राहणें म्हणजेच जिवंत राहणें हेंहि उमगलेलें असतें. वरील पुस्तकांतच पान ३४ वर कृष्णमूर्ति म्हणतात—

"But it means that you have to be so alive, so sensitive, so clear, that nothing enters—nothing which needs to be stored up, to be examined and then acted upon, as forgiveness or compassion or action based on an idea... So to die to the past implies, doesn't it? *Not only that the past ceases but also that the present does not enter and accumulate and create a consciousness and inertia* ... So we are talking of dying to everything known and functioning in light—going to an office and so on—functioning from that freedom from the known ... When you see some thing very clearly, the seeing, the examination, creates the light and *the light acts* not 'you decide' or 'you don't decide'.

"एक निराळें जीवन आहे, तिकडे वळावें" असें केव्हां वाटेल? प्रतिक्रियेचा (reaction) लवलेशहि ज्यांत नाहीं असें वैराग्य, चालू जीवनाबद्दल उत्पन्न होईल तेव्हां. हें वैराग्य कृष्णमूर्तींचीं प्रवचनें वाचून अथवा ऐकून येण्याचा संभव आहे. तेवढेंच त्यांचें प्रयोजन आहे. बाकी सगळें जें करावयाचें (अथवा व्हावयाचें) तें स्वतःवरच पूर्णपणें अवलंबून आहे, हें विसरतां येत नाहीं.

* * *

REFBK-0018453

ठाणे ९६४९३